लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE

# ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी




## COMMUNICATIVE MARATHI FOR AUTO RICKSHAW AND TAXI DRIVERS



Sonalee Gujar
Suhas Limaye
Aditya Badle
Aditi Satam

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA | UNIVERSITY OF MUMBAI

सोनाली गुजर / SONALEE GUJAR
सुहास लिमये / SUHAS LIMAYE
आदित्य बदले / ADITYA BADLE
अदिती साटम / ADITI SATAM

# ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी
# Communicative Marathi for Auto Rickshaw and Taxi Drivers

लघु-अभ्यासक्रम / SHORT COURSE

**संपादक / EDITORS**
मेहेर भूत / MEHER BHOOT
विभा सुराणा / VIBHA SURANA
आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

**संकल्पना आणि निर्मिती / CONCEPT & PRODUCTION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN: 978-93-5382-605-5**

**FIRST EDITION, 2020**
**पहिली आवृत्ती, २०२०**

क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन - शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध
Published under Creative Commons Attribution - ShareAlike license (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR
  सुहास लिमये / SUHAS LIMAYE
  आदित्य बदले / ADITYA BADLE
  अदिती साटम / ADITI SATAM

- **संपादक / EDITORS**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  आनन्द काटीकर / ANAND KATIKAR

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  ज्योत्स्ना भिडे / JYOTSNA BHIDE
  गुरुनाथ कलमकार / GURUNATH KALAMKAR
  जमीर कांबळे / ZAMEER KAMBLE

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE
  दत्तात्रय पाडेकर / DATTATREY PADEKAR
  देवेंद्र कलप / DEVENDRA KALAP

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com
  deptofgerman@mu.ac.in

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com
  www.rmvs.maharashtra.gov.in
  www.mu.ac.in

**TEXTBOOK WITH EXERCISES AND**
**LINK FOR AUDIO & VIDEO LEARNING MATERIAL**
http://mu.ac.in/mumbairikshawala
**₹ 500**

# प्रस्तावना | Preface

*Communicative Marathi for Auto Rickshaw and Taxi Drivers* is a Marathi textbook cum workbook specially designed for auto rickshaw and taxi drivers, who come from other parts of India and do not know Marathi. It addresses a target group of non-native drivers, who wish to learn Marathi as beginners, particularly as adult learners, learners with or without any prior, little/random knowledge of Marathi. Whether the learners have some prior acquaintance with the Devanagari script or not, they can start learning the script as well as reading and writing in Marathi. The focus is on spoken Marathi.

A first of its kind, this book has been prepared using an integrated communicative approach. It dedicates itself to serve the sole purpose of teaching Marathi to the non-native drivers for them to be able to communicate in Marathi with the native customers, staff at RTO or local police.

The book consists of twenty chapters, each with units such as communicative texts in authentic situations, pattern drills, grammar exercises, learning games, cartoons, visuals, audio visual components and an overview of the vocabulary along with the meanings in Hindi. At the end of each chapter there is a section of topic related information highlighting the specific vocabulary needed for their routine communication. In addition to this, a comprehensive glossary from Hindi to Marathi is provided at the end. A final test has been included at the end to evaluate the language skills of the learners. Special efforts have been undertaken to integrate the communicative approach of learning so that the learners will be able to communicate in Marathi.

Though the book is meant for classroom teaching of approximately 60 teaching hours, self-learners too can make use of the book and the audio link with the help of the translation in Hindi. Keeping in mind the aim of the target learners, which is basically to communicate, the emphasis is on enhancing the speaking, listening and understanding skills of the learners.

*Communicative Marathi for Auto Rickshaw and Taxi Drivers* has been designed after an extensive research and a survey carried out amongst auto rickshaw and taxi drivers in Mumbai. The content and preparation of material of the book is based on the data collected from these surveys. It is created solely for teaching communicative Marathi.

This book has been prepared under the aegis of the innovative Marathi Language Teaching (MLT) project at the Department of German, University of Mumbai. Besides designing and preparing learning material for short courses for specific target groups like rickshaw- and taxi-drivers, nurses, government officials and bank employees, this project also seeks to develop structured courses for six levels of Marathi language proficiency for non-native speakers.

We are grateful to the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and the Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

We appreciate and thank all those who have contributed in the making of this book.

Meher Bhoot, Vibha Surana & Anand Katikar
2020

# आभार | Acknowledgement


Amarjeet Sharma

Amit Varandekar

Ashish Sawant

Bharti Chhatre

Disha Gudulkar

Gauri Brahme

Girissha Tilak

Gurudutt Kamath

Kalika Mehta

Kaushal Gujar

Kruttika Bhosale

Madhura Gawande

Manjiri Paranjape

Neha Thombare

Pradnya Dalvi

Rajesh Wadekar

Sachin Suresh

Shailesh Gujar

Sujata Mahajan

Sunanda Mahajan

Suparna Kulkarni

Sweni Vora

Tushar Ghate

Varsha Mane

**Special thanks for the copyrights**

Charuhas Pandit

Prabhakar Wadekar

# अनुक्रमणिका


| धडा | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृ. क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | परिचय | अभिवादन करणे<br>आपले नाव-गाव आणि व्यवसाय सांगणे व इतरांना त्याबद्दल विचारणे<br>मराठी वर्णमाला वाचणे आणि ऐकणे<br>रंग ओळखणे | स्वर-स्वरादी<br>व्यंजन<br>स्वरचिन्हे<br>शब्द<br>वाक्ये | काय, कुठे, कुठले<br>अच्छा, टाटा, ठीक आहे, चालेल, उद्या भेटू, नमस्कार, नमस्ते<br>व्यवसाय | १० |
| २ | ओळख करून घेऊ या | संपर्क साधणे<br>मराठी महिने आणि वार ओळखणे आणि सांगणे<br>१-२० अंक ओळखणे आणि सांगणे | प्रश्न<br>जोडाक्षरे | कुठचे, कधी, कोणता<br>मागचा, पुढचा<br>दिनदर्शिका<br>धन्यवाद<br>अंक : १-२० | २३ |
| ३ | मस्त चाललंय आमचं | स्वतःची खुशाली सांगणे आणि विचारणे<br>तो, ती, ते : पुरुषवाचक सर्वनामे वापरणे<br>क्रियापद 'असणे' वापरणे<br>कसा, कशी, कसे वापरणे<br>अंक : २१-६० ओळखणे आणि सांगणे<br>वेळ सांगणे आणि विचारणे | मी, तू, तो, ती : व्यक्तिवाचक सर्वनामे<br>असणे : सामान्य क्रियापद | कसा, कशी, कसे<br>उत्तम, मस्त, छान, ठीक, बरा, बरी, बरे<br>'नाही'<br>अंक : २१-६०<br>वेळ | ३१ |
| ४ | चौकातून उजवीकडे वळा! | दिशा विचारणे आणि सांगणे<br>करणे, राहणे, ... : सामान्य वर्तमानकाळ ओळखणे आणि वापरणे<br>मी करतो / करते, तू करतोस / करतेस, ... : क्रियापद चालवून वाक्यात प्रयोग करणे | सामान्य वर्तमानकाळ<br>क्रियापद चालवणे | कुठे<br>दिशा : पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण | ४७ |

| धडा | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृ. क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ५ | इथे नाही, तिथे | 'नाही' म्हणणे<br>रस्ता विचारणे<br>'असणे', 'नसणे' वापरणे<br>मागे, पुढे, जवळ, लांब, ... : स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय वापरणे<br>'असणे' आणि 'आहे' यातील फरक समजणे आणि वापर करणे | असणे - नसणे : अनियमित रूप<br>असणे - आहे<br>स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये | वाहने : बस, ट्रक, मोटारसायकल<br>वर, खाली, मध्ये, जवळ, लांब, पुढे, मागे, आत<br>डावा, उजवा | ५३ |
| ६ | हे माझं शहर | रस्ता सांगणे<br>शहरातील ठिकाणे ओळखणे<br>अंक : ६१-१०० ओळखणे आणि सांगणे | | ठिकाणे : हॉटेल, शाळा, विद्यापीठ, इस्पितळ, बाग, रेल्वे स्टेशन, विमानतळ, बँक, मंत्रालय, बाजार, सिनेमाघर, स्टॉक एक्स्चेंज, संग्रहालय, टपालघर, तलाव, रंगमंदिर<br>अंक : ६१-१०० | ६५ |
| ७ | माझा दिनक्रम | आपला दिनक्रम सांगणे<br>केव्हा, कधी : दिवसाच्या वेळा सांगणे आणि विचारणे<br>करणे - मी करत आहे : अपूर्ण / चालू वर्तमानकाळाचा वापर करणे | अपूर्ण / चालू वर्तमानकाळ | केव्हा, कधी<br>उठणे, झोपणे, जेवणे, खाणे, पिणे<br>दिवसाच्या वेळा : सकाळ, मध्यान्ह, दुपार, संध्याकाळ, रात्र | ७२ |
| ८ | चला, विचारू या | करणे - मी करत आहे / मी करत नाही आहे - मी करतोय / मी करत नाहीये : अपूर्ण / चालू वर्तमानकाळाची लिखित व बोली भाषेतील होकारार्थी आणि नकारार्थी रूपे वापरणे | अपूर्ण / चालू वर्तमानकाळ : होकारार्थी आणि नकारार्थी | चालत आहे, जात आहे, करत आहे, बोलत आहे, चाललोय, जातोय, करतोय, बोलतोय, भांडणे, नाही आहे, नाहीये | ७८ |

| धडा | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृ. क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ९ | प्रवासिदेवो भव। | प्रवाशाला माहिती देणे<br>भाडे स्वीकारताना ठिकाणाबद्दल विचारणे<br>आपल्या इच्छा व्यक्त करताना क्रियापद ‘हवंय’ चा वापर करणे<br>आहे - नाही / नाहीये : वर्तमानकाळातील होकारार्थी व नकारार्थीतील यातील फरक ओळखणे आणि वापरणे<br>ऋतू ओळखणे आणि सांगणे | क्रियापद ‘हवंय’<br>वर्तमानकाळातील होकारार्थी व नकारार्थीतील फरक<br>आहे – नाही / नाहीये | ऋतू | ८७ |
| १० | एक दिवस आर॰टी॰ओ॰मध्ये | शासकीय कागदपत्रे वाचणे आणि समजणे<br>काही अर्ज भरणे आणि समजणे | - | स्वाक्षरी, प्रमाणपत्र, निरीक्षक, पोशाख, वारसदार, साक्षीदार, वैधता, तपासणी, कलम, सदर | ९६ |
| ११ | किती झाले? | प्रवाशाला माहिती देणे<br>रिक्षा / टॅक्सीचे भाडे सांगणे<br>हा, ही, हे, तो, ती, ते : दर्शक सर्वनामे वापरणे<br>‘पण’ आणि ‘आणि’चा फरक ओळखणे | सर्वनामे<br>दर्शक सर्वनामे<br>पण – आणि | मला, तुला, तुम्हाला, आपल्याला, त्याला, तिला, त्यांना<br>हा, ही, हे, तो, ती, ते<br>वस्तूंची नावे | ११३ |
| १२ | रस्त्यावरील गफलती | आज्ञा देणे, विनंती करणे<br>करणे - कर / करा : आज्ञार्थी आणि विध्यर्थी क्रियापदे वापरणे | आज्ञार्थी, विध्यर्थी क्रियापदे<br>विनंतीरूपे | वळणे, थांबणे, वाजवणे (हॉर्न)<br>काही वाहतुकीची चिन्हे | १२४ |

| धडा | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृ. क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १३ | ओय् तेरी! | सूचना देणे<br>सल्ला देणे<br>आज्ञार्थी आणि विध्यर्थी क्रियापदे व त्यांची नकारार्थी रूपे वापरणे<br>१००च्या पुढील अंक ओळखणे आणि सांगणे<br>शिव्या देणे | आज्ञार्थी, विध्यर्थी क्रियापदे व त्यांची नकारार्थी रूपे | पाळणे, लावणे, कृपया<br>१०० च्या पुढील अंक<br>अपशब्द / शिव्या | १३३ |
| १४ | तुझं-माझं | मालकी हक्क दाखवणे : माझा, माझी, माझे / माझं वापरणे<br>चा, ची, चे, च्या : सर्वनामाची षष्ठी ओळखणे आणि वापरणे<br>कोणाचा, कोणाची, कोणाचे, कोणाचं वापरणे | सर्वनामाची षष्ठी | कोणाचा, कोणाची<br>माझा, माझी, माझे / माझं<br>-चा, -ची, -चे, -च्या<br>भ्रमणध्वनी, शाळा, चश्मा, सामान | १४१ |
| १५ | अति घाई, संकटात नेई | इतरांचे वर्णन करणे<br>एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे<br>नवीन – जुना : विरुद्धार्थी विशेषणे ओळखणे आणि वापरणे<br>पटकन, भरभर, ... : क्रियाविशेषण ओळखणे आणि वापरणे | नवीन – जुना : विरुद्धार्थी विशेषणे<br>एकदा, अनेकदा, ... पटकन, भरभर, ... : क्रियाविशेषण अव्यय | किती, कितीदा<br>जाड, बारीक, लहान, उंच, लांब, आखूड, हुशार, बावळट, गोरा, सावळा, काळा<br>हळू, सावकाश, जलद, भरभर<br>अनेकदा, भरपूर, पटकन, एकदा | १४९ |
| १६ | काल काय झालं? | झालेली गोष्ट सांगणे<br>होणे - होतो, होत नाही, झाला : वर्तमानकाळ, नकारार्थी आणि भूतकाळ रूपे ओळखणे आणि वापरणे | होणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप | होतो, झाला, झाला नाही<br>पूर्वी, आता<br>स्वस्त, महाग<br>अध्यक्ष, मैदान, पास | १५७ |

| धडा | विषय | संवादकौशल्य | व्याकरण | शब्दसंपदा | पृ. क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १७ | वेग कमी, जीवनाची हमी | भूतकाळातील प्रसंगाचे वर्णन करणे<br>असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (आहे, होता, नव्हता) ओळखणे आणि वापरणे | असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूपे<br>'असणे' आणि 'होणे' यातील फरक | आहे, होता, नव्हता<br>अपघात, बापरे | १६५ |
| १८ | नवी टॅक्सी, नवा प्रवास | उद्याची गोष्ट सांगणे<br>करणे - मी करीन / करणार (साधा भविष्यकाळ ओळखणे आणि वापरणे) | साधा भविष्यकाळ<br>सकर्मक आणि अकर्मक क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे | येईन, जाईन, घेईन, सांगेन, देईन, करेन / करीन, होईन, लावेन | १७३ |
| १९ | हे माझं कुटुंब | नाती ओळखणे<br>'चालकाला' आणि 'चालकांना' अशी रूपे ओळखणे आणि वापरणे | चतुर्थी विभक्ती<br>नामांची सामान्यरूपे | -ला, -ना<br>आई, बाबा, मामा, मामी, काका, काकी, आत्या, भाऊ, बहीण, आजी, आजोबा | १८० |
| २० | अशी बनते माझी रिक्षा / टॅक्सी | टॅक्सी आणि रिक्षाचे पार्ट्स सांगणे | | टॅक्सी आणि रिक्षाचे पार्ट्स | १८९ |
| २१ | वाक्प्रचारांची यादी | | | | १९४ |
| २२ | दृक्श्राव्य | | | | २०४ |
| २३ | पुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित संवाद, उतारे, इ. | | | | २०८ |
| २४ | परीक्षा | | | | २२६ |
| २५ | उत्तरे | | | | २३२ |
| २६ | शब्दसंग्रह | | | | २४७ |

# १ परिचय










## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **अभिवादन करणे**
  अभिवादन करना
- **आपले नाव-गाव आणि व्यवसाय सांगणे व इतरांना त्याबद्दल विचारणे**
  अपना अता-पता और कारोबार (व्यवसाय) बताना और दूसरों से इसके बारे में पूछना
- **मराठी वर्णमाला वाचणे आणि ऐकणे**
  मराठी वर्णमाला पढ़ना और सुनना
- **रंग ओळखणे**
  रंग पहचानना

## १.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।




- **नमस्ते, मी बबन पाटील.**
  नमस्ते, मैं बबन पाटील हूँ।
- **मी नाशिकचा.**
  मैं नाशिक से हूँ।
- **मी टॅक्सीचालक आहे.**
  मैं टैक्सी चालक हूँ।



- **हॅलो, माझं नाव गब्बर स्वामी.**
  हैलो, मेरा नाम गब्बर स्वामी है।
- **मी चेन्नईचा.**
  मैं चेन्नई से हूँ।
- **मी रिक्षाचालक आहे.**
  मैं रिक्शा चालक हूँ।



- **हाय, मी नमिता शर्मा.**
  हाय, मैं नमिता शर्मा हूँ।
- **मी पंजाबची.**
  मैं पंजाब से हूँ।
- **मी डॉक्टर आहे.**
  मैं डॉक्टर हूँ।




- **नमस्ते. मी सुमित.**
  नमस्ते। मैं सुमित हूँ।
- **मी हैदराबादचा.**
  मैं हैदराबाद से हूँ।
- **मी शिक्षक आहे.**
  मैं अध्यापक हूँ।



- **नमस्कार. माझं नाव राहुल जाधव.**
  नमस्कार। मेरा नाम राहुल जाधव है।
- **मी मुंबईचा.**
  मैं मुंबई से हूँ।
- **मी पोलीस आहे.**
  मैं पुलिसवाला हूँ।



- **हाय, मी टीना सिंग.**
  हाय, मैं टीना सिंह हूँ।
- **मी नागपूरची.**
  मैं नागपूर से हूँ।
- **मी विद्यार्थिनी आहे.**
  मैं छात्रा हूँ।



- **नमस्कार, मी आशिष घोष.**
  नमस्कार, मैं आशिष घोष हूँ।
- **मी भोपाळचा.**
  मैं भोपाल से हूँ।
- **मी वेटर आहे.**
  मैं वेटर हूँ।

## १.२ ऐकू या आणि स्वतः बद्दल लिहू या. सुनें और खुद के बारे में लिखें।

| | | |
|---|---|---|
| **तुमचं नाव काय?**<br>आपका नाम क्या है? | नमित शर्मा | -------------------------------- |
| **तुम्ही कुठले?**<br>आप कहाँ से हैं? | पंजाबचा | -------------------------------- |
| **तुम्ही काय करता?**<br>आप क्या काम करते / करती हैं? | डॉक्टर | -------------------------------- |

## १.३ संवाद पूर्ण करू या. संवाद पूरा करें।

**नमस्कार / नमस्ते / हॅलो / हाय**

| | |
|---|---|
| **तुमचं नाव काय?**<br>आपका नाम क्या है? | **माझं नाव ------------ / मी ---------**<br>मेरा नाम ------------ / मैं ------------ |
| **तुम्ही कुठले?**<br>आप कहाँ से हैं? | **मी ------------- चा / ची. ---------**<br>मैं ------------ से हूँ। |
| **तुम्ही काय करता?**<br>आप क्या काम करते हैं? | **मी ------------ आहे.**<br>मैं ------------ हूँ। |

**अच्छा / टाटा / उद्या भेटू / उद्या भेटू या** कल मिलेंगे।

**अभिवादन :** नमस्कार / ------------ / ------------ / ------------

**प्रश्न :** ------------------------------------------------------------------------


**उत्तर :** ------------------------------------------------------------------------

**प्रश्न :** ------------------------------------------------------------------------

**उत्तर :** ------------------------------------------------------------------------

**प्रश्न :** ------------------------------------------------------------------------

**उत्तर :** ------------------------------------------------------------------------



**निरोप घेणे** (अलविदा कहना) : ------------ / टाटा / ------------ / ------------

### १.४ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**स्वर :-**

अ आ इ ई

उ ऊ ए ॲ ऐ

ओ ऑ औ

ऋ

**स्वरादी :-**

अं अः

**व्यंजने :-**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ |
| च | छ | ज | झ | ञ |
| ट | ठ | ड | ढ | ण |
| त | थ | द | ध | न |
| प | फ | ब | भ | म |

य र ल व

श ष स

ह ळ क्ष ज्ञ

## १.५ वाचू या. पढ़ें।


| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |
| ख | खा | खि | खी | खु | खू | खे | खॅ | खै | खो | खॉ | खौ | खं | खः |
| ग | गा | गि | गी | गु | गू | गे | गॅ | गै | गो | गॉ | गौ | गं | गः |
| घ | घा | घि | घी | घु | घू | घे | घॅ | घै | घो | घॉ | घौ | घं | घः |
| च | चा | चि | ची | चु | चू | चे | चॅ | चै | चो | चॉ | चौ | चं | चः |
| छ | छा | छि | छी | छु | छू | छे | छॅ | छै | छो | छॉ | छौ | छं | छः |
| ज | जा | जि | जी | जु | जू | जे | जॅ | जै | जो | जॉ | जौ | जं | जः |
| झ | झा | झि | झी | झु | झू | झे | झॅ | झै | झो | झॉ | झौ | झं | झः |
| ट | टा | टि | टी | टु | टू | टे | टॅ | टै | टो | टॉ | टौ | टं | टः |
| ठ | ठा | ठि | ठी | ठु | ठू | ठे | ठॅ | ठै | ठो | ठॉ | ठौ | ठं | ठः |
| ड | डा | डि | डी | डु | डू | डे | डॅ | डै | डो | डॉ | डौ | डं | डः |
| ढ | ढा | ढि | ढी | ढु | ढू | ढे | ढॅ | ढै | ढो | ढॉ | ढौ | ढं | ढः |
| ण | णा | णि | णी | णु | णू | णे | णॅ | णै | णो | णॉ | णौ | णं | णः |
| त | ता | ति | ती | तु | तू | ते | तॅ | तै | तो | तॉ | तौ | तं | तः |
| थ | था | थि | थी | थु | थू | थे | थॅ | थै | थो | थॉ | थौ | थं | थः |
| द | दा | दि | दी | दु | दू | दे | दॅ | दै | दो | दॉ | दौ | दं | दः |
| ध | धा | धि | धी | धु | धू | धे | धॅ | धै | धो | धॉ | धौ | धं | धः |
| न | ना | नि | नी | नु | नू | ने | नॅ | नै | नो | नॉ | नौ | नं | नः |
| प | पा | पि | पी | पु | पू | पे | पॅ | पै | पो | पॉ | पौ | पं | पः |
| फ | फा | फि | फी | फु | फू | फे | फॅ | फै | फो | फॉ | फौ | फं | फः |
| ब | बा | बि | बी | बु | बू | बे | बॅ | बै | बो | बॉ | बौ | बं | बः |
| भ | भा | भि | भी | भु | भू | भे | भॅ | भै | भो | भॉ | भौ | भं | भः |
| म | मा | मि | मी | मु | मू | मे | मॅ | मै | मो | मॉ | मौ | मं | मः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | या | यि | यी | यु | यू | ये | यॅ | यै | यो | यॉ | यौ | यं | यः |
| र | रा | रि | री | रु | रू | रे | रॅ | रै | रो | रॉ | रौ | रं | रः |
| ल | ला | लि | ली | लु | लू | ले | लॅ | लै | लो | लॉ | लौ | लं | लः |
| व | वा | वि | वी | वु | वू | वे | वॅ | वै | वो | वॉ | वौ | वं | वः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शॅ | शै | शो | शॉ | शौ | शं | शः |
| ष | षा | षि | षी | षु | षू | षे | षॅ | षै | षो | षॉ | षौ | षं | षः |
| स | सा | सि | सी | सु | सू | से | सॅ | सै | सो | सॉ | सौ | सं | सः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ह | हा | हि | ही | हु | हू | हे | हॅ | है | हो | हॉ | हौ | हं | हः |
| ळ | ळा | ळि | ळी | ळु | ळू | ळे | ळॅ | ळै | ळो | ळॉ | ळौ | ळं | ळः |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्ष | क्षा | क्षि | क्षी | क्षु | क्षू | क्षे | क्षॅ | क्षै | क्षो | क्षॉ | क्षौ | क्षं | क्षः |
| ज्ञ | ज्ञा | ज्ञि | ज्ञी | ज्ञु | ज्ञू | ज्ञे | ज्ञॅ | ज्ञै | ज्ञो | ज्ञॉ | ज्ञौ | ज्ञं | ज्ञः |




**बबन** : काय रे, गब्बर? काय झालं?

**गब्बर** : मला मराठी...

**बबन** : काय? येत नाही? अगदी सोपं आहे.
ते लोक काय बोलतायत ते ऐकू या चल.



### १.६ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**हरिप्रसाद : नमस्कार, माझं नाव हरिप्रसाद यादव. तुझं नाव काय?**
नमस्कार, मेरा नाम हरिप्रसाद यादव है। तेरा नाम क्या है?

**निरंजन : नमस्ते, माझं नाव निरंजन जाधव.**
नमस्ते, मेरा नाम निरंजन जाधव है।



**हरिप्रसाद : अच्छा. कुठे राहतोस तू?**
अच्छा। तुम कहाँ रहते हो?

**निरंजन : मी अंधेरीत राहतो. आणि तू?**
मैं अंधेरी में रहता हूँ। और तुम?

**हरिप्रसाद : मी दादरला राहतो.**
मैं दादर में रहता हूँ।

**निरंजन : अच्छा. मग तू इथे काय करतोस?**
अच्छा। तो तुम यहाँ क्या करते हो?

**हरिप्रसाद : मी रिक्षाचालक आहे.**
मैं रिक्शा चालक हूँ।

**निरंजन : ठीक आहे. चला, नंतर भेटू.**
ठीक है। चलो, बाद में मिलते हैं।

**हरिप्रसाद : चालेल. नमस्ते.**
ठीक है। नमस्ते।

### १.७ संवाद वाचून माहिती लिहू या. संवाद पढ़ें और जानकारी लिखें।

**व्यक्ती १**

**नाव** (नाम) : ------------------------

**कुठे?** (कहाँ रहते हो?) : ------------

**व्यवसाय** (कारोबार) : --------------

**व्यक्ती २**

**नाव :** ------------------------

**कुठे? :** ------------------------

**व्यवसाय :** --------------------

### १.८ मी कल्याणचा / कल्याणची.

| तुम्ही कुठ + ले? | तुम्ही कुठ + ल्या? |
|---|---|
| मी ------------------------ चा. | मी ------------------------ ची. |

## १.९ रंग




## १.१० वाचू या. पढ़ें।

**थांबा!**
(रुकिए।)


**हळू जा!**
(धीमे जाइए।)

**जा!**
(जाइए।)



- **मला लाल रंग आवडतो.**
  (मुझे लाल रंग पसंद है।)
- **मला पिवळा रंग आवडतो.**
  (मुझे पीला रंग पसंद है।)
- **मला हिरवा रंग आवडतो.**
  (मुझे हरा रंग पसंद है।)

### १.११ हा रंग कोणता? यह कौन सा रंग है?



| | | | | |
|---|---|---|---|---|
| उत्तर:- ------------------------ | उत्तर:- ------------------------ | उत्तर:- ------------------------ | उत्तर:- ------------------------ | उत्तर:- ------------------------ |

### १.१२ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

| | |
|---|---|
| उदा. **शिक्षक / शिक्षिका**<br>**हिरवा** हरा | उदा. शिक्षक / शिक्षिका<br>**मला हिरवा रंग आवडतो.** मुझे हरा रंग पसंद है। |
| **शिक्षक / शिक्षिका**<br>**केशरी** केशरिया<br>**निळा** नीला<br>**गुलाबी** गुलाबी<br>**पांढरा** सफ़ेद<br>**काळा** काला<br>**राखाडी** भूरा<br>**जांभळा** बैंगनी | **विद्यार्थी / विद्यार्थिनी**<br>**मला केशरी रंग आवडतो.** मुझे केशरिया रंग पसंद है।<br>**मला निळा रंग आवडतो.** मुझे नीला रंग पसंद है।<br>**मला गुलाबी रंग आवडतो.** मुझे गुलाबी रंग पसंद है।<br>**मला पांढरा रंग आवडतो.** मुझे सफ़ेद रंग पसंद है।<br>**मला काळा रंग आवडतो.** मुझे काला रंग पसंद है।<br>**मला राखाडी रंग आवडतो.** मुझे भूरा रंग पसंद है।<br>**मला जांभळा रंग आवडतो.** मुझे बैंगनी रंग पसंद है। |




**चिंटू** : मला तुझे दात खूप आवडतात.
**चिंकी** : अय्या! खरंच? पण का रे?
**चिंटू** : कारण मला पिवळा रंग खूप आवडतो.

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो पोलीस, ते –**<br>पुलिस | **ती विद्यार्थिनी, त्या –**<br>छात्रा | **ते नाव, ती नावे / नावं**<br>नाम |
| **तो शिक्षक, ते –**<br>अध्यापक | **ती रिक्षा, त्या –**<br>रिक्शा | **ते अभिवादन, ती अभिवादने/ अभिवादनं**<br>अभिवादन |
| **तो डॉक्टर, ते –**<br>डाक्टर | **ती व्यक्ती, त्या –**<br>व्यक्ति | **ते उत्तर, ती उत्तरे / उत्तरं**<br>जवाब |
| **तो / ते वेटर, ते –**<br>वेटर | **ती ओळख, त्या ओळखी**<br>पहचान | **ते व्यंजन, ती व्यंजने / व्यंजनं**<br>व्यंजन |
| **तो चालक, ते –**<br>चालक | | |
| **तो निरोप, ते –**<br>संदेश | | |
| **तो रंग, ते –**<br>रंग | | |
| **तो व्यवसाय, ते –**<br>कारोबार | | |
| **तो संवाद, ते –**<br>संवाद / वार्तालाप | | |
| **तो स्वर, ते –**<br>स्वर | | |
| **तो नमस्कार, ते –**<br>नमस्कार | | |

| सर्वनाम | क्रियापद | शिष्टाचार शब्द | प्रश्नशब्द |
|---|---|---|---|
| **मी** मैं | **असणे** होना | **नमस्कार** | **काय** क्या |
| **तुम्ही**<br>आप / तुम | **सांगणे**<br>बताना | **नमस्ते** | **कुठचे / कुठले**<br>कहाँ से |
| **माझा** मेरा | **करणे** करना | **हाय** | **कुठे** कहाँ |
| **माझे / माझं** मेरा | **भेटणे** मिलना | **हॅलो** | **कोणता** कौन सा |
| **तुमचा**<br>आप का / तुम्हारा | **ऐकणे**<br>सुनना | **अच्छा** | |
| **तुमची**<br>आप की / तुम्हारी | **वाचणे**<br>पढ़ना | **नंतर भेटू**<br>बाद में मिलते हैं | |
| **तुमचे / तुमचं**<br>आप का / की /<br>तुम्हारा / तुम्हारी | **लिहिणे**<br>लिखना | **उद्या भेटू / उद्या भेटू या**<br>कल मिलते हैं | |
| | **राहणे** रहना | | |
| | **आवडणे**<br>पसंद करना | | |
| | **ओळखणे**<br>पहचानना | | |

## चिंटू



# २

# ओळख करून घेऊ या






## चला, शिकू या...

चलो, सीखें...

- **संपर्क साधणे**
  बातचीत करना
- **मराठी महिने आणि वार ओळखणे आणि सांगणे**
  मराठी महीने और दिन
- **१-२० अंक ओळखणे आणि सांगणे**
  १-२० अंक पहचानना और बताना

## २.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**हरिप्रसाद : काय मित्रा, कसा आहेस? खूप दिवसांनी दिसलास!**
कैसे हो, दोस्त? बहुत दिनों बाद मिले।

**रमेश : मी मस्त. तू कधीपासून मुंबईत राहतोस?**
मैं बढ़िया हूँ। तुम कब से मुंबई में रहते हो?

**हरिप्रसाद : मी फेब्रुवारीपासून मुंबईमध्ये राहतोय.**
मैं फरवरी से मुंबई में रह रहा हूँ।

**रमेश : अच्छा, मला आजची तारीख सांगशील का?**
अच्छा, क्या मुझे आज की तारीख बताओगे?

**हरिप्रसाद : आज १२ मार्च.**
आज १२ मार्च।

**रमेश : धन्यवाद!**
धन्यवाद!

| |
|---|
| जानेवारी |
| फेब्रुवारी |
| मार्च |
| एप्रिल |
| मे |
| जून |
| जुलै |
| ऑगस्ट |
| सप्टेंबर |
| ऑक्टोबर |
| नोव्हेंबर |
| डिसेंबर |

**महिने**

**गब्बर : मला महिने येत नाहीत.**
**बबन : अगदी सोपं आहे. हे बघ!**




**जानेवारी, मग फेब्रुवारी,**
**मग मार्च, नंतर एप्रिल,**
**मग मे, नंतर जून, जुलै**
**आणि ऑगस्ट, नंतर येतो सप्टेंबर**
**मग ऑक्टोबर, मग नोव्हेंबर**
**आणि आता डिसेंबर संपला!**

जनवरी, फिर फरवरी,
फिर मार्च, बाद में अप्रैल,
फिर मई, बाद में जून, जुलै
और अगस्त, बाद में सितंबर आता है
फिर अक्टूबर, फिर नवम्बर
और अब दिसंबर खत्म हो गया है!

**सांगा पाहू आता पुढचा महिना कुठला?** अब बताइये अगला महीना कौन सा?

## २.२ रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।

१. हा महिना मार्च, .................... महिना एप्रिल.
☐ पुढचा ☐ आत्ता
☐ नंतर ☐ नाही

२. हा महिना ऑक्टोबर, .................... महिना सप्टेंबर.
☐ नंतर ☐ मग
☐ मागचा ☐ माझं

३. हा महिना मे, .................... येतो जून.
☐ माझं ☐ नंतर
☐ पुढचा ☐ मागे

४. हा महिना ऑगस्ट, .................... येतो जुलै.
☐ पुढचा ☐ आधी
☐ नंतर ☐ तुमचं

## २.३ सोडवू या. सुलझाएँ।

१. **हा सप्टेंबर महिना आहे.**
यह सितंबर महीना है।

**पुढचा महिना कोणता आहे?**
अगला महीना कौन सा है?
उत्तर: ....................

**मागचा महिना कोणता होता?**
पिछला महीना कौन सा था?
उत्तर: ....................




२. **पुढचा जून महिना आहे.**
अगला महीना जून है।

**हा कोणता महिना आहे?**
यह महीना कौन सा है?
उत्तर: ....................

## २.४ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

| ० | शून्य | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ६ | सहा | ११ | अकरा | १६ | सोळा |
| २ | दोन | ७ | सात | १२ | बारा | १७ | सतरा |
| ३ | तीन | ८ | आठ | १३ | तेरा | १८ | अठरा |
| ४ | चार | ९ | नऊ | १४ | चौदा | १९ | एकोणीस |
| ५ | पाच | १० | दहा | १५ | पंधरा | २० | वीस |




## २.५ खालील शब्द अंकात लिहू या. नीचे दिये गये शब्द अंकों में लिखें।

शून्य : -------- एक : १ दोन : -------- तीन : -------- चार : -------- पाच : -------- सहा : --------

सात : -------- आठ : -------- नऊ : -------- दहा : -------- अकरा : -------- बारा : १२

## २.६ खालील तिकिटांचे निरीक्षण करून त्यावरील किंमत शब्दात लिहू या.

निम्नलिखित टिकटों का निरीक्षण करें और क़ीमत शब्दों में लिखें।




-------------------------------- -------------------------------- --------------------------------

## २.७ वाचू या आणि लिहू या. पढ़ें और लिखें।

**सुजाता :** **दादा, रोज तुम्ही मला स्टेशनला सोडणार, का?**
भैया, आप रोज मुझे स्टेशन तक छोड़ोगे, क्या?

**रिक्षाचालक :** **हो, ताई.**
हाँ, दीदी।

सुजाता : **ठरलं तर मग! माझा मोबाईल नंबर, लिहा. नऊ नऊ सात चार शून्य एक दोन तीन पाच सहा.**
ठीक है। मेरा मोबाईल नंबर, लिखो. नौ नौ सात चार शून्य एक दो तीन पाच छः।


रिक्षाचालक : **हळू हळू. नऊ नऊ सात चार शून्य एक दोन, मग?**
धीरे धीरे। नौ नौ सात चार शून्य एक दो, फ़िर?

सुजाता : **तीन पाच सहा. कळलं? आता मला तुमचा नंबर सांगा.**
तीन पाच छः। समझे? अब मुझे आपका नंबर दो।

रिक्षाचालक : **८६९७५९८६१२.**

सुजाता : **धन्यवाद, दादा. उद्या भेटू या.**
धन्यवाद, भैया। कल मिलते हैं।

- **आता तुमचा मोबाईल नंबर लिहा.** ------------------------------------------
  अब आपका मोबाईल नंबर लिखें।




## २.८ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



राहुल : **हॅलो, माझं नाव राहुल. तुमचं नाव?**
हेलो, मेरा नाम राहुल है। आपका नाम?

मेहुल : **नमस्कार, मी मेहुल. काय करता तुम्ही?**
नमस्कार, मैं मेहुल हूँ। आप क्या करते हैं?

राहुल : **मी रिक्षाचालक आहे. तुम्ही काय करता?**
मैं रिक्शा चालक हूँ। आप क्या करते हैं?

मेहुल : **अरे वा, मीसुद्धा रिक्षाचालक आहे. तुम्ही रिक्षा कधी चालवता?**
मैं भी रिक्शा चालक हूँ। आप कब रिक्शा चलाते हैं?

राहुल : **मी सोमवार ते शुक्रवार रिक्षा चालवतो. तुम्ही कधी चालवता?**
मैं सोमवार से शुक्रवार रिक्शा चलाता हूँ। आप कब रिक्शा चलाते हैं?

मेहुल : **मी शनिवारी आणि रविवारी.**
मैं शनिचर और इतवार को।

राहुल : **अच्छा! चला, मी निघतो. नंतर भेटू.**
अच्छा! अब मैं चलता हूँ। फिर मिलेंगे।

## २.९ वाक्ये लिहू या. वाक्य लिखें।

१. आहे – मी – एक – रिक्षाचालक    उदा॰ मी एक रिक्षाचालक आहे.

२. काय – तुम्ही – करता?    उत्तर : ..........................................

३. तुम्ही – चालवता – रिक्षा – कधी    उत्तर : ..........................................

४. सोमवार – शनिवार – मी – ते – चालवतो – रिक्षा    उत्तर : ..........................................

५. तुषार – नाव – माझं – आहे    उत्तर : ..........................................

## २.१० दिनदर्शिका (कॅलेंडर) बघून वार लिहिता येतील का?

क्या आप यह कैलेंडर देख के दिन लिख सकते हैं?

सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार.




उदा॰ २ बुधवार

४ ..............................    १२ ..............................

१७ ..............................    ८ ..............................


२० ..............................    ६ ..............................

(मंगळवार, शनिवार, गुरुवार, शुक्रवार, सोमवार, रविवार)

## २.११ वार ओळखू या आणि लिहू या. दिन पहचानें और लिखें।

| | |
|---|---|
| १. वि र वा र .............................. | ५. वा ग मं ळ र .............................. |
| २. वा ध र बु .............................. | ६. र श नि वा .............................. |
| ३. वा रु र गु .............................. | ७. र सो वा म .............................. |
| ४. क्र शु र वा .............................. | |


## २.१२ जोडाक्षरे शिकू या. जोडाक्षर सीखें।



स् + त = पुस्तक



प् + प = चप्पल



त् + र = पत्र



क् + ल = क्लच

## २.१३ याचप्रमाणे आता आपण लिहू या. इसी तरह, अब लिखें।

| | |
|---|---|
| १. ब् + द = शब्द | २. ...... + ...... = डॉक्टर |
| ३. ...... + ...... = सिग्नल | ४. ...... + ...... = मस्तक |
| ५. ...... + ...... = ट्रक | ६. ...... + ...... = उत्तम |



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो अंक, ते –**<br>अंक | **ती तारीख, त्या तारखा**<br>तारीख | **ते कॅलेंडर, ती कॅलेंडरे / कॅलेंडरं**<br>कैलेंडर |
| **तो वार, ते –**<br>दिन | **ती दिनदर्शिका, त्या –**<br>कैलेंडर | **ते अक्षर, ती अक्षरे / अक्षरं**<br>अक्षर |
| **तो पत्ता, ते पत्ते**<br>पता | **ती चप्पल, त्या चपला**<br>चप्पल | **ते जोडाक्षर, ती जोडाक्षरे / जोडाक्षरं**<br>संयुक्ताक्षर |
| | | **ते निरीक्षण, ती निरीक्षणे / निरीक्षणं**<br>निरीक्षण |

| सर्वनाम | क्रियापद | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|
| **आपण**<br>हम / आप | **भरणे**<br>भरना | **कधीपासून**<br>कब से | **मागचा**<br>पिछला |
| | **चालवणे**<br>चलाना | **कधी**<br>कब | **पुढचा**<br>अगला |
| | **निघणे**<br>निकलना | | **अरे वा!**<br>अरे वाह! |
| | **बघणे**<br>देखना | | **सुद्धा**<br>भी |
| | **शिकणे**<br>सीखना | | |

# ३

# मस्त चाललंय आमचं



## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **स्वतःची खुशाली सांगणे आणि विचारणे**
  अपनी खुशहाली बताना और पूछना
- **तो, ती, ते : पुरुषवाचक सर्वनामे वापरणे**
  वह, वे : पुरुषवाचक सर्वनाम
- **क्रियापद 'असणे' वापरणे**
  क्रिया 'होना'
- **कसा, कशी, कसे वापरणे**
  कैसा, कैसी, कैसे
- **अंक : २१-६० ओळखणे आणि सांगणे**
  अंक : २१-६० पहचानना और बताना
- **वेळ सांगणे आणि विचारणे**
  वक्त बताना और पूछना

## ३.१ वाचू या. पढ़ें।



नमस्कार, मी अभिनेता आहे.
नमस्ते, मैं अभिनेता हूँ।



आम्ही भाऊ आहोत.
हम भाई हैं।



आपण गावात राहतो.
हम गाँव में रहते हैं।



तू कुठे राहतोस?
तुम कहाँ रहते हो?



तुम्ही गप्प बसा!
तुम चुप रहो।



तुम्ही / आपण कसे आहात, काका?
आप कैसे हैं, चाचा?



**माझा भाऊ, योहान. तो विद्यार्थी आहे.**
मेरा भाई, योहान। वह विद्यार्थी है।



**माझे मित्र, स्वामी आणि अर्जुन. ते दिल्लीचे आहेत.**
मेरे दोस्त, स्वामी और अर्जुन। वे दिल्ली से हैं।



**माझी आई, माया. ती गृहिणी आहे.**
मेरी माँ, माया. वह गृहिणी है।



**हे माझ्या ताईचं बाळ. ते आई-बाबांबरोबर राहतं.**
यह मेरी दीदी का बच्चा है। वह अपने माता-पिता के साथ रहता है।




**हे दोघे भाऊ आहेत. ते आई-बाबांबरोबर राहतात.**
ये दोनों भाई हैं। वे अपने माता-पिता के साथ रहते हैं।



**या सीता आणि गीता. त्या मुंबईमध्ये राहतात.**
ये सीता और गीता। वे मुंबई में रहती हैं।

## ३.२ तुम्ही सध्या काय करता? आप आजकल क्या करते हो?

- **तू सध्या काय करतोस रे?**
  तुम आजकल क्या करते हो?
- **मी टॅक्सी चालवतो. आणि तुम्ही काय करता, दळवीकाका?**
  मैं टैक्सी चलाता हूँ, और आप क्या करते हो, दलवी चाचा?
- **मी शाळेत शिकवतो.**
  मैं स्कूल में पढ़ाता हूँ।



- **साहेब, आपण काय करता? माझं एक काम आहे.**
  साहब, आप क्या करते हैं? मेरा एक काम है।
- **मी सरकारी अधिकारी आहे. आत्ता मदत करू शकत नाही. मी कामात आहे.**
  मैं एक सरकारी अधिकारी हूँ। मैं अभी मदद नहीं कर सकता। मैं काम कर रहा हूँ।

- **सुरेश, तुम्ही काय करता?**
  सुरेश, आप क्या करते हो?
- **मी रिक्षाचालक आहे.**
  मैं रिक्शा चालक हूँ।



- **आपण इथे काय करतो?**
  हम यहाँ क्या करते हैं?
- **आपण इथे परवाना काढतो.**
  हम यहाँ परमिट बनवाते हैं।

## ३.३ योग्य पर्याय निवडू या. सही पर्याय चुनें।

१. परेश आणि रूपाली, ---------------------------- इथे काय करता?
(आम्ही / ते / तुम्ही)

२. दादा, ---------------------------- काम करता का?
(तू / मी / आपण)

३. ---------------------------- पोस्ट ऑफिसमध्ये काम करतो.
(ते / मी / ती)

## सर्वनाम

| अनौपचारिक | | औपचारिक / आदरार्थी | |
|---|---|---|---|
| एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
| मी मैं | आम्ही / आपण<br>हम | आम्ही / आपण<br>हम | आम्ही / आपण<br>हम |
| तू तू / तुम | तुम्ही / आपण<br>तुम / आप | तुम्ही / आपण<br>आप | तुम्ही / आपण<br>आप |
| तो वह | ते वे | ते वे | ते वे |
| ती वह | त्या वे | त्या वे | त्या वे |
| ते वह | ती वे | - | - |
| तो + ती + ते | ते वे | - | - |



बबन : काय रे, कसं चाललंय?
गब्बर : पायाने.
बबन : नाही रे! कसा आहेस?
गब्बर : ओह! ठणठणीत!

## सामान्य वर्तमानकाळ 'असणे'

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी आहे. मैं हूँ। | आम्ही / आपण आहोत. हम हैं। |
| तू आहेस. तू है। / तुम हो। | तुम्ही / आपण आहात. तुम हो। |
| तुम्ही / आपण आहात. आप हैं। | तुम्ही / आपण आहात. आप हैं। |
| तो / ती / ते आहे. वह है। | ते / त्या / ती आहेत. वे हैं। |

## ३.४ चला, सराव करू या. अभ्यास करें।

(मी, आम्ही, तू, तुम्ही, आपण, तो, ती, ते, त्या)

१. सुधाकर रिक्षाचालक आहे. ---------------- रिक्षा चालवतो.

२. ---------------- कोण आहात? - ---------------- पोलीस आहे.

३. प्रमिला कुठे आहे? - ---------------- शाळेत गेली आहे.

४. नमस्कार, ---------------- कसे आहात? - मी मस्त आहे.

५. तुम्ही गेटवेला येणार का? ---------------- तिथेच जात आहोत.

६. माझ्या टॅक्सीमध्ये दोन स्त्रिया आहेत. ---------------- डोंबिवलीला जात आहेत.

७. ---------------- काय करत आहेस? माझं एक काम आहे.

८. सुरेश आणि प्रकाश कुठे आहेत? - ---------------- खेळायला गेले आहेत.

## ३.५ पुढील संवाद ऐकू या आणि सर्वनामे आणि क्रियापदे ओळखू या.

संवाद सुनें और सर्वनाम और क्रिया रूपों को पहचानें।



काका : तू कसा आहेस?
तुम कैसे हो?

सुहास : मी ठीक आहे.
मैं ठीक हूँ।

काका : आणि प्रिया? ती कशी आहे?
और प्रिया? वह कैसी है?

सुहास : ती मजेत आहे. तुम्ही कसे आहात, काका?
वह बढ़िया है। आप कैसे हैं, चाचा?

काका : अरे, मी ठणठणीत आहे.
अरे, मैं स्वस्थ हूँ।

| सर्वनाम | क्रियापद |
|---|---|
| उदा॰ तू | आहेस |
| | |
| | |
| | |

### ३.६ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**राजेंद्रने घड्याळ बघितले. ८.१७ वाजले. आईने त्याला विचारले, "काय रे, आज तू कामाला जात नाहीस का?" तो म्हणाला, "मी आज नाही जात, आई!". आई बाबांना म्हणाली, "तो आज कामाला जात नाही आहे". बाबा म्हणाले, "अरे हो! आज रविवार, आज तर सुट्टी आहे ना!" राजेंद्र म्हणाला, "हो पण माझ्यासाठी नाही. मी रविवारीसुद्धा रिक्षा चालवतो. रविवारी प्रवासी तर असतातच ना! पण आज मी जात नाहीय."**

राजेंद्र ने घड़ी देखी। ८.१७ बज चुके थे। माँ ने उससे पूछा, "आज तुम काम पर नहीं जा रहे हो?" उसने कहा, "मैं आज नहीं जा रहा हूँ, माँ।" माँ ने पिताजी से कहा, "यह आज काम पर नहीं जाने वाला है"। पिताजी ने कहा, "अरे हाँ! आज तो इतवार, इतवार को छुट्टी होती है ना!" राजेंद्र ने कहा, "हाँ लेकिन मेरे लिये नहीं। मैं इतवार को भी रिक्शा चलाता हूँ। इतवार को यात्री तो होते ही हैं ना! पर आज मैं नहीं जा रहा हूँ।"

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी नाही. | आम्ही / आपण नाही. |
| तू नाहीस. | तुम्ही / आपण नाही. |
| तुम्ही / आपण नाही. | तुम्ही / आपण नाही. |
| तो / ती / ते नाही. | ते / त्या / ती नाहीत. |

### ३.७ पुढील वाक्ये पूर्ण करू या. निम्नलिखित वाक्यों को पूरा करें।

१. मी ड्रायव्हर नाही.
मैं ड्राइवर नहीं हूँ।

२. तू ड्रायव्हर ------------------------.

३. तुम्ही / आपण ड्रायव्हर ------------------------.

४. तो / ती / ते ड्रायव्हर ------------------------.

५. आम्ही / आपण ड्रायव्हर ------------------------.

६. ते / त्या / ती ड्रायव्हर ------------------------.



## ३.८ वाचू या. पढ़ें।

सारा : अमरावतीत कोण कोण राहतं?
अमरावती में कौन कौन रहता है?

नयना : मी नाही.
मैं नहीं।

कमला, कबीर : आम्ही नाही.
हम नहीं।

सारा : तू नाहीस, रवी?
क्या तुम नहीं, रवी?

रवी : नाही, मीसुद्धा नाही.
नहीं, मैं भी नहीं।

नयना : स्नेहल, सुनीता?

कबीर : नाही, त्याही नाहीत.
नहीं, वे भी नहीं।




## ३.९ वाचू या. पढ़ें।

ती : नमस्कार काळेकाका, कसे आहात तुम्ही?
नमस्कार काले चाचा, आप कैसे हैं?

ते : मी मजेत आहे बाळा, तू कशी आहेस?
बेटी, मैं तो बहुत अच्छा हूँ, तुम कैसी हो?

ती : एकदम मस्त.
एकदम बढ़िया।



## ३.१० वाचू या. पढ़ें।

| | | |
|---|---|---|
| आपण / तुम्ही कसे आहात? | मी बरा / बरी आहे.<br>मी मस्त आहे.<br>मी ठणठणीत आहे.<br>मी मजेत आहे.<br>मी ठीक आहे.<br>मी उत्तम आहे. | तू → कसा आहेस?<br>तू → कशी आहेस? |

## ३.११ योग्य उत्तर निवडू या. सही उत्तर चुनें।

१. तू कसा आहेस?

- क. मी ठीक नाहीत. ☐
- ख. मी ठीक नाहीस. ☐
- ग. मी ठीक नाही. ☐

२. तुम्ही कसे आहात?

- क. मी ठीक आहेत. ☐
- ख. मी ठीक नाहीस. ☐
- ग. मी ठीक आहे. ☐

३. गौरी कशी आहे?

- क. आम्ही ठीक आहोत. ☐
- ख. ती मजेत आहे. ☐
- ग. ती घरी नाही. ☐

४. वैभव कसा आहे?

- क. तुम्ही ठीक नाहीत. ☐
- ख. ती ठीक नाहीस. ☐
- ग. तो ठीक नाही. ☐

### आपण कसे आहात?

तुम्ही कसे आहात? - मी मजेत / बरा आहे.

तुम्ही कशा आहात? - मी मजेत / बरी आहे.




मी ------------------------ आहे.

उत्तम मस्त छान / मजेत
बरा / बरी / ठीक

आणि तुम्ही?

तुम्ही कसे आहात? -
आम्ही उत्तम / मस्त / छान / ठीक / मजेत / बरे आहोत.

तुम्ही कसे आहात? -
आम्ही उत्तम / मस्त / छान / ठीक / मजेत / बरे आहोत.

तुम्ही कशा आहात? -
आम्ही उत्तम / मस्त / छान / ठीक / मजेत / बऱ्या आहोत.

तू कसा आहेस?

तू कशी आहेस?

**३.१२ रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

(कोणता, कोणती, काय, कुठले)

१. रोहन : तुम्ही ........................?
   ओंकार : मी दिल्लीचा.

२. प्रदीप : आपण ........................ करता?
   आकाश : मी पोलीस आहे.

३. लोकेश : ट्रॅफिक सिग्नलमधला शेवटचा रंग ........................ असतो?
   अनुष्का : हिरवा.

४. शमिका : तुझी मातृभाषा ........................?
   कमलेश : गुजराती.

**३.१३ ऐकू या आणि वाचू या.** सुनें और पढ़ें।

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस | ५१ | एकावन्न |
| २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस | ५२ | बावन्न |
| २३ | तेवीस | ३३ | तेहतीस | ४३ | त्रेचाळीस | ५३ | त्रेपन्न |
| २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस | ५४ | चोपन्न |
| २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस | ५५ | पंचावन्न |
| २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | शेहेचाळीस | ५६ | छप्पन्न |
| २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस | ५७ | सत्तावन्न |
| २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस | ५८ | अठ्ठावन्न |
| २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास | ५९ | एकोणसाठ |
| ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास | ६० | साठ |

**३.१४ ऐकू या आणि वाचू या.** सुनें और पढ़ें।

**अनिल : नमस्कार, माझं नाव अनिल. तुमचं नाव काय?**
नमस्कार, मेरा नाम अनिल है। आप का नाम क्या है?

**सुनील : माझं नाव सुनील. मी नागपूरचा. ५ वर्षांपासून मी इकडे राहतो.**
मैं सुनील। मैं नागपुर से हूँ। मैं यहाँ ५ सालों से रहता हूँ।

**अनिल : अरे वा! मी पण नागपूरचाच. पण इथे १९ वर्षांपासून आहे. मी १७**

**वर्षांचा होतो. तेव्हाच इकडे पळून आलो. सलमान खानला भेटायला.**
अरे वाह! मैं भी नागपुर का। पर मैं यहाँ १९ सालों से रह रहा हूँ। मैं १७ साल का था। तभी यहाँ भाग आया। सलमान खान से मिलने।

**सुनील : खरंच! म्हणजे तुम्ही फक्त ३६ चे! वाटत तर नाही.**
क्या? मतलब आप सिर्फ ३६ के हैं! लगते तो नहीं।

**अनिल : हो ना. मी सलमानसारखा फिट राहतो.**
हाँ। मैं सलमान की तरह फिट रहता हूँ।




**सुनील : मस्तंच! पण सलमान भेटला का?**
बहुत खूब! पर सलमान मिला क्या?

**अनिल : सोडा ना! चला, उद्या भेटू या.**
छोड़ो ना! चलो, कल मिलते हैं।

### ३.१५ वरील संवादातील अंक शब्दात लिहू या. अंकों को शब्दों में लिखें।

१. -------------------- २. -------------------- ३. -------------------- ४. --------------------

### ३.१६ दुसऱ्या दिवशी ... दूसरे दिन...

**अनिल : अरे सुनील, आज जुहूला सलमानचं शुटींग आहे. येतोस का?**
अरे सुनील, आज जुहू में सलमान की शुटींग है। चल रहे हो क्या?

**सुनील : आज? आज तर शुक्रवार, १० डिसेंबर.**
आज? आज तो १० दिसंबर।

**अनिल : हा मग?**
तो फिर?




**सुनील : मग. १० डिसेंबर म्हणजे, माझा वाढदिवस.**
तो फिर, १० दिसंबर मतलब मेरा जन्मदिन।

**अनिल : अरे वा! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**
अरे वाह! हॅपी बर्थ डे!


**सुनील : धन्यवाद! चला ७.१५ झाले. माझी बायको वाट बघतेय.**
धन्यवाद! चलो ७.१५ बज गए। मेरी बीवी राह देख रही है।

**अनिल : चला, निघू या. सलमानपण माझी वाट बघतोय.**
चलो, चलते हैं। सलमान भी मेरी राह देख रहा है।

### ३.१७ वरील संवाद वाचून प्रश्नांची उत्तरे देऊ या. सवालों के जवाब दें।

| कोणता महिना? | कोणता वार? | किती वाजले? |
|---|---|---|
| | | |

**३.१८ वाचू या.** पढ़ें।





| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| सव्वा वाजला | अडीच वाजले | सव्वा पाच वाजले |
|  |  |  |
| दीड वाजला | साडे पाच वाजले | पावणे सहा वाजले |




**पप्पू :** साहेब, भूक लागली आहे. ५ रुपये द्या ना.
**साहेब :** ५० ची नोट आहे. ४५ रुपये सुट्टे आहेत का?
**पप्पू :** हो. आहेत ना साहेब.
**साहेब :** मग आधी ते खर्च कर.


## ३.१९ किती वाजले आहेत, ते लिहू या. समय लिखें।




एक वाजला




दोन वाजले





चार वाजले





१. ----------- वाजले




२. -------------------




३. -------------------








४. -------------------




५. -------------------

## ३.२० किती वाजले आहेत ते लिहू या. समय लिखें।

| | | |
|---|---|---|
| उदा॰ |  | सव्वाबारा वाजले आहेत.<br>सव्वाबारा झाले आहेत.<br>बारा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत. |
| क) |  | पावणेपाच वाजले आहेत.<br>----------------------------------------<br>पाच वाजायला पंधरा मिनिटे बाकी आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ख) |   | |
| ग) |   | साडेपाच वाजले आहेत. |
| घ) |   | |
| च) |   | दीड वाजला आहे.<br>एक वाजून तीस मिनिटे झाली आहेत. |
| छ) |   | |
| ज) |   | |
| झ) |   | |

| | | |
|---|---|---|
| ट) |  | |

## चिंटू


आई, मला एक खेळणं हवं होतं!
पप्पांना विचार.
पेट्रोल महाग, गॅस महाग. छे! छे! महागाई वाढतेच आहे.
ही वेळ नाही!
© 2003 चारुहास पंडित / प्रभाकर वाडेकर


## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो परवाना, ते परवाने**<br>वाहन अनुमति पत्र | **ती मदत, त्या मदती**<br>मदद | **ते उत्तर, ती उत्तरे / उत्तरं**<br>जवाब |
| **तो वाढदिवस, ते -**<br>जन्मदिन | **ती शुभेच्छा, त्या –**<br>शुभकामना | **ते क्रियापद, ती क्रियापदे / क्रियापदं**<br>क्रियाशब्द |
| **तो सराव, ते –**<br>अभ्यास करना | **ती शाळा, त्या –**<br>पाठशाला | **ते वाक्य, ती वाक्ये / वाक्यं**<br>वाक्य |
| **तो प्रश्न, ते –**<br>सवाल | **ती सुट्टी, त्या सुट्ट्या**<br>छुट्टी | **ते घड्याळ, ती घड्याळे / घड्याळं**<br>घड़ी |
| | **ती स्त्री, त्या स्त्रिया**<br>महिला | **ते काम, ती कामे / कामं**<br>काम |
| | | **ते घर, ती घरे / घरं**<br>घर |
| | | **ते वय, ती वये / वयं**<br>उम्र |

| सर्वनाम | क्रियापद | प्रश्नशब्द | इतर शब्द |
|---|---|---|---|
| मी | असणे | कोण | मस्त |
| आम्ही / आपण | करणे<br>करना | कसा / कशी / कसे | ठणठणीत |
| तू | काढणे<br>निकालना | किती | उत्तम |
| तुम्ही / आपण | जाणे जाना | | ठीक |
| तो | नाही | | मजेत |
| ती | वाजणे बजना | | |
| ते | | | |
| ते / त्या / ती | | | |


४

# चौकातून उजवीकडे वळा!










**चला, शिकू या...**

चलो, सीखें...


- **दिशा विचारणे आणि सांगणे**
  दिशा पूछना और बताना
- **करणे, राहणे, ... : सामान्य वर्तमानकाळ ओळखणे आणि वापरणे**
  सामान्य वर्तमान काल
- **मी करतो / करते, तू करतोस / करतेस, ... : क्रियापद चालवून वाक्यात प्रयोग करणे**
  क्रियारूप चलाना




मुंबईचा नकाशा

## ४.१ रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।

(फोर्ट, संजय गांधी उद्यान, जुहू, ऐरोली)




१. उत्तर : ..........................................

२. पश्चिम : ..........................................

३. पूर्व : ..........................................

४. दक्षिण : ..........................................

## ४.२ बोरीवली कुठे आहे? बोरीवली कहाँ है?

क. प्रभव : **बोरीवली कुठे आहे?**
बोरीवली कहाँ है?

मंगेश : **बोरीवली उत्तर मुंबईत आहे.**
बोरीवली उत्तर मुंबई में है।

ख. विराज : **कुलाबा कुठे आहे?**
कोलाबा कहाँ है?

सुरेखा : **कुलाबा दक्षिण मुंबईत आहे.**
कोलाबा दक्षिन मुंबई में है।

| | |
|---|---|
| बोरीवली | दक्षिण |
| कुलाबा | उत्तर |



**गब्बर :** बबन, मला एखाद्या जवळच्या डॉक्टरचा पत्ता सांग ना!

**बबन :** बदाम राणी!

### सामान्य वर्तमानकाळ 'करणे'

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| | मी काम करतो.<br>मी काम करते. | आम्ही / आपण काम करतो. |
| | तू काम करतोस.<br>तू काम करतेस. | तुम्ही / आपण काम करता. |
| | तुम्ही / आपण काम करता. | तुम्ही / आपण काम करता. |
| | तो काम करतो. | ते काम करतात. |
| | ती काम करते. | त्या काम करतात. |
| | ते काम करते / करतं. | ती काम करतात. |

## ४.३ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**राहुल :** **मेहुल, तू सगळ्यांना मदत करतोस. आज मला मदत कर ना.**
मेहुल, तुम सब की मदद करते हो। आज मेरी मदद करो।

**मेहुल :** **बोल ना, काय मदत करू?**
बोलो ना, क्या मदद करूँ?

**राहुल :** **अरे माझ्या रिक्षाची क्लच प्लेट खराब झालीय. एखादं गॅरेज सांग ना.**
मेरे रिक्शा की क्लच प्लेट खराब हो गई है। कोई गैरेज बताओ ना।

**मेहुल :** **तू रिक्षा चालवतोस आणि तुला गॅरेज माहीत नाही? माठ. पप्पूकडे जा. तो चांगलं काम करतो.**
तुम रिक्शा चलाते हो और गॅरेज नहीं पता? बेवकूफ़। पप्पू के पास जाओ। वह अच्छा काम करता है।

**राहुल :** **अच्छा. मी क्लच प्लेटचं काम करतो. आणि हो, आठवलं. रिक्षाचा ब्रेक खराब आहे, काच खराब आहे, चाक वाकडं आहे. आणि शेवटची गोष्ट ... पत्रा गंजलाय.**
अच्छा। मैं क्लच प्लेट का काम करता हूँ। और हाँ। याद आया। रिक्शे का ब्रेक खराब है, कांच खराब है, पहिया टेढ़ा है। और आखिरी बात ... पत्रे को जंग लगा है।

**मेहुल :** **अरे देवा! चल पळ आता. रानडे चौकातून उजवीकडे जा. तिथून दुसरा उजवा घे. पटेल चहा टपरीसमोर पप्पूचं गॅरेज आहे.**
हे भगवान! चलो भागो अब। रानडे चौक से दाहिनी तरफ जाना। वहाँ से दूसरा दाहिना मोड लेना। पटेल चाय टपरी के सामने पप्पू का गॅरेज है।

**राहुल :** **ठीक आहे. धन्यवाद!**
ठीक है। शुक्रिया!

## ४.४ खालील तक्ता भरू या. तालिका पूरी करें।

| | राहणे राह(णे) | बोलणे बोल(णे) | चालवणे चालव(णे) | जाणे जा(णे) | बदलणे बदल(णे) |
|---|---|---|---|---|---|
| मी | राहतो | | चालवतो | | |
| मी | राहते | | चालवते | | |
| आम्ही / आपण | राहतो | | | | |
| तू | राहतोस | | | | |
| तू | राहतेस | बोलतेस | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुम्ही / आपण | राहता | | | जाता | |
| तो | राहतो | | | | |
| ती | राहते | | | | |
| ते | राहते | बोलते | | | |
| ते / त्या / ती | राहतात | | | | बदलतात |

४.५ **रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

१. तू खूप छान रिक्षा ------------------------. कुठे शिकलास? (चालवणे)

२. मी कल्याणला ------------------------. (राहणे) तुम्ही कुठे ------------------------? (राहणे)

३. ती फक्त रविवारी टॅक्सी चालवायला ------------------------. (जाणे)

४. अभिदा शाळेत काम ------------------------. (करणे)

५. तुम्ही जरा त्यांचाशी ------------------------ का? (बोलणे)

६. आम्ही रोज क्रिकेट ------------------------. (खेळणे)

७. तू टायर पंक्चर झाल्यावर काय --------------------? (करणे)

मी टायर ------------------------. (बदलणे)



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो दरवाजा, ते दरवाजे**<br>दरवाज़ा | **ती दिशा, त्या –**<br>दिशा | **ते चाक, ती चाके / चाकं**<br>पहिया |
| **तो पत्रा, ते पत्रे**<br>छत | **ती काच, त्या काचा**<br>शीशा | |
| **तो आठवडा, ते आठवडे**<br>सप्ताह | **ती टपरी, त्या टपऱ्या**<br>टपरी | |
| **तो टायर, ते –**<br>पहिया | | |
| **तो चहा, ते -**<br>चाय | | |
| **तो नकाशा, ते नकाशे**<br>नक्शा | | |

| क्रियापदे | इतर शब्द |
|---|---|
| **आठवणे** याद करना / याद आना | **एखादं** कोई एक |
| **गंजणे** जंग लगना | **नक्की** पक्का |
| **जाणणे** जानना | **माठ** मूर्ख / बेवक़ूफ़ |
| **खेळणे** खेलना | **शेवटचे** अंतिम |
| **बदलणे** बदलना | **याला** इस को |
| **पळणे** भागना | **रोज** रोज़ |
| **बोलणे** बोलना | **पंक्चर** पंक्चर |
| | **जरा** ज़रा |
| | **समोर** सामने |
| | **उजवीकडे** दायें |
| | **वाकडे / वाकडं** टेढ़ा |

# इथे नाही, तिथे ५










## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **'नाही' म्हणणे**
  नहीं कहना
- **रस्ता विचारणे**
  रस्ता पूछना
- **'असणे', 'नसणे' वापरणे**
  'होना', 'नहीं होना'
- **मागे, पुढे, जवळ, लांब, ... : स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय वापरणे**
  स्थानवाचक क्रियाविशेषण अव्यय
- **'असणे' आणि 'आहे' यातील फरक समजणे आणि वापर करणे**
  है और होता है मे अंतर

## ५.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।





**सुरेश :** **काय रमेश, कसा आहेस?**
क्या रमेश, कैसे हो?

**रमेश :** **मी मस्त. तू कसा आहेस?**
मैं मज़े में हूँ। तुम कैसे हो?

**सुरेश :** **मीसुद्धा मजेत आहे. असतोस कुठे तू हल्ली?**
मैं भी अच्छा हूँ। हो कहाँ तुम आजकल?

**रमेश :** **अरे, मी आता मुंबईत नसतो.**
अरे, मैं अब मुंबई में नहीं रहता हूँ।

**सुरेश :** **मग, कुठे असतोस तू हल्ली?**
फिर कहाँ हो तुम आजकल?

**रमेश :** **हल्ली मी नागपूरमध्ये असतो.**
आजकल मैं नागपुर में हूँ।

**सुरेश :** **अच्छा. आणि तुझी बायको? ती तर असते ना मुंबईमध्ये?**
अच्छा। और तुम्हारी पत्नी? वह तो मुंबई में ही रहती है ना?

**रमेश :** **काय रे शहाण्या, मी नागपूरमध्ये आणि ती मुंबईत! तीसुद्धा इथे नसते. ती माझ्यासोबतच नागपूरमध्ये असते.**
वाह रे अक्ल के दुश्मन। मैं नागपुर में और वह मुंबई में! वह भी यहाँ नहीं रहती। वह मेरे साथ ही नागपुर में रहती है।

**सुरेश :** **मला वाटलं, की तू इथे नसतोस, ... वहिनी एकट्या असतात. त्यांना काही मदत लागली तर ...?**
मुझे लगा, कि तुम यहाँ नहीं, ... भाभीजी अकेली रहती है। उन्हें कोई मदद चाहिए होगी तो ...?

**रमेश :** **तू काहीच काळजी करू नकोस. मी आहे ना.**
तुम बिलकुल चिंता मत करो। मैं हूँ ना।

## ५.२ योग्य पर्याय निवडू या. योग्य उत्तर चुनें।

१. रमेश आजकाल कुठे असतो?
- ☐ नागपूर
- ☐ मुंबई
- ☐ दिल्ली

२. रमेशची बायको कुठे असते?
- ☐ नागपूर
- ☐ मुंबई
- ☐ नाशिक

३. सुरेश कुठे असतो?
- ☐ दिल्ली
- ☐ नागपूर
- ☐ मुंबई

४. रमेश हल्ली कुठे नसतो?
- ☐ दिल्ली
- ☐ मुंबई
- ☐ नाशिक

५.३ **'असणे' आणि 'आहे' यातील फरक ओळखू या.** है और होता है मे अंतर पहचानें।

हे गेट वे ऑफ इंडिया **आहे.**
यह गेट वे ऑफ इंडिया है।



इथे नेहमीच खूप गर्दी **असते.**
यहाँ हमेशा बहुत भीड होती है।


हा व्यंकटेश **आहे.**
यह व्यंकटेश है।



तो हैद्राबादला **असतो.**
वह हैदराबाद में रहता है।

**'असणे' आणि 'नसणे' यांची रूपे पाहू या.** होना और नहीं होना के दो रूप पहचानें।

| | असणे | नसणे |
|---|---|---|
| मी | असतो | नसतो |
| मी | असते | नसते |
| आम्ही / आपण | असतो | नसतो |
| तू | असतोस | नसतोस |
| तू | असतेस | नसतेस |
| तुम्ही / आपण | असता | नसता |
| तो | असतो | नसतो |
| ती | असते | नसते |
| ते | असते / असतं | नसते / नसतं |
| ते / त्या / ती | असतात | नसतात |



**बबन :** आत्ता तुला दिशा कळल्या का?
**गब्बर :** हो, दिशा खूप छान आहे.

## ५.४ खालील तक्ता भरू या. नीचे दी हुई तालिका भरें।

| | करणे<br>करना | असणे<br>होना | नसणे<br>नहीं होना | येणे<br>आना | बघणे<br>देखना |
|---|---|---|---|---|---|
| मी  | | | नसतो | | |
| मी  | | | | | |
| आम्ही / आपण | करतो | | | | |
| तू  | | | | | बघतोस |
| तू  | | असतेस | | | |
| तुम्ही / आपण | | | | येता | |
| तो  | | | | | |
| ती  | | | | | |
| ते  | | | | | बघते / बघतं |
| ते / त्या / ती | | | | येतात | |

## ५.५ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहू या. रिक्त स्थान भरें।

(असतोस, नसतं, नसतो, नसतो, असतात)

१. काय रे महेश, तू ------------------------ कुठे सध्या?

२. तुम्ही स्टेशनला असता ना? - नाही, आम्ही स्टेशनला ------------------------.

३. केळी पिवळ्या रंगाची ------------------------.

४. आंबा लाल रंगाचा ------------------------.

५. रिक्षेला स्टिअरिंग व्हील ------------------------. (ते व्हील)




## ५.६ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

आदित्य : दादा, मी आदित्य. आम्ही मुंबई विद्यापीठात ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मराठी पुस्तक लिहीत आहोत. त्यासाठी तुमची माहिती हवी.

भाई, मैं आदित्य। हम मुंबई विश्वविद्यालय में ऑटो रिक्शा और टैक्सी ड्राइवरों के लिए एक मराठी किताब लिख रहे हैं। इसलिए आपकी जानकारी चाहिए।


अहमद : **काय सांगता! मराठी पुस्तक! खूपच छान! ठीक आहे. काय सांगू?**
क्या कहते हो? मराठी किताब? बहुत खूब! ठीक है। क्या बताऊँ?

आदित्य : **नेहमीचीच. नाव, गाव, कुठे राहता वगैरे वगैरे ...**
साधारण जानकारी। नाम, गाँव, कहाँ रहते हैं वगैरह वगैरह ...

अहमद : **मी अहमद. मी बिहारचा. २०१८ पासून मी मुंबईत राहतोय. अजूनही घर नाही मिळालं. ही माझी रिक्षा. मी इथे रिक्षात राहतो. रिक्षात खातो, पितो, झोपतो.**
मैं अहमद। मैं बिहार से। २०१८ से मैं मुंबई में रहता हूँ। अब तक घर नहीं मिला। यह मेरा रिक्शा। मैं यहाँ रहता हूँ। रिक्शे में खाता, पीता, सोता हूँ।

आदित्य : **अरे बापरे! सगळं रिक्षात! पण, तुम्ही खूप छान मराठी बोलता. कुठून शिकलात?**
अरे बापरे! सब कुछ रिक्शे में! पर, आपकी मराठी बहुत अच्छी है। कहाँ से सीखी?

अहमद : **मी 'माय मराठी' पुस्तक वाचतो.**
मैं 'माय मराठी' किताब पढ़ता हूँ।



आदित्य : **रिक्षात? आता तुम्ही 'ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी' हे नवीन पुस्तक नक्की वाचा.**
रिक्शा में? अब आप 'ऑटो रिक्शा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी' यह नई किताब जरूर पढ़ना।

अहमद : **नक्की! का नाही! धन्यवाद!**
ज़रूर! क्यों नहीं! धन्यवाद!

आदित्य : **माहितीसाठी धन्यवाद! तुम्हाला भेटून बरं वाटलं.**
जानकारी के लिए धन्यवाद! आपसे मिलकर खुशी हुई।


| | |
|---|---|
| मी | माझा |
| | माझी |
| | माझे / माझं |

| | |
|---|---|
| माझा → | फोन |
| माझी → | रिक्षा |
| माझे / माझं → | वाहन |

| | |
|---|---|
| तू | तुझा |
| | तुझी |
| | तुझे / तुझं |

| | |
|---|---|
| तुझा → | फोन |
| तुझी → | रिक्षा |
| तुझे / तुझं → | वाहन |

## मुंबई शहर




**५.७ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.** संवाद सुनें और पढ़ें।

**हरीशला क्रमांक ४ पासून इस्पितळापर्यंत जायचं आहे. तिथे कसं जायचं, हे प्रवीण त्याला सांगतोय.**

हरीश ४ नंबर से अस्पताल तक जाना चाहता है। वहाँ कैसे जाना है, यह प्रवीण उसे बता रहा है।

**प्रवीण : शिवाजी रोडहून सरळ गेलास की पुढे उजवीकडे वळायचं. आता आला केळकर रोड. तिथे डावीकडे वाचनालय आहे. उजवीकडे वळल्यावर सरळ चालायचं. समोरच बाजार आहे. पुढे गेलास की डावीकडे एक रस्ता आहे. तो रस्ता टपालघर आणि चर्चच्या मध्ये आहे. डावीकडे वळल्यावर सरळ चालायचं. हा आहे एस॰व्ही॰ रोड. थोडसं पुढे चाललं की उजवीकडे इस्पितळ आहे.**

प्रवीण : शिवाजी रोड से सीधे जाओ और दाहिनी ओर मुड़ो। अब आयेगा केलकर रोड! बायीं ओर एक पुस्तकालय है। वहाँ से दाहिनी ओर मुड़ो और सीधे जाओ। सामने ही बाज़ार है। सीधे जाने पर बायीं ओर एक सड़क है, जो डाकघर और चर्च के बीच में है। बायीं ओर मुड़ने के बाद सीधे जाओ। यह है एस. वी. रोड। थोड़ा आगे बढ़ने के बाद दाहिनी तरफ़ अस्पताल है।

**हरीशला क्रमांक २ पासून महम्मद अली रोडपर्यंत जायचं आहे. तिथे कसं जायचं, हे प्रवीण त्याला सांगतोय.**

हरीश २ नंबर से महम्मद अली रोड तक जाना चाहता है। वहाँ कैसे जाना है, यह प्रवीण उसे बता रहा है।



**५.८ ऐकू या आणि रिकाम्या जागा भरू या.** सुनें और रिक्त स्थान भरें।

(सरळ, केळकर रोड, डावीकडे, डावीकडे, बाजूला, डावीकडे, उजवीकडे, उजवीकडे, सरळ)

प्रवीण : महात्मा गांधी रोडहून ------------------ (१) जायचं आणि पुढे ------------------ (२) वळायचं. आता आला ---------------------- (३). ---------------------- (४) वळल्यावर सरळ चालायचं. समोरच बाजार आहे. ---------------------- (५) एल्॰बी॰एस्॰ रोड आहे. तिथे वळायचं नाही. केळकर रोडवर समोर चालत राहायचं. ---------------------- (६) पुढे आलास की ---------------------- (७) वाचनालय आहे आणि त्याच्या ---------------------- (८) बँक आहे. तिथून ---------------------- (९) वळायचं. तोच महम्मद अली रोड आहे.

हरीशला क्रमांक ४ पासून राणीच्या बागेपर्यंत जायचं आहे. तिथे कसं जायचं, हे प्रवीण त्याला सांगतोय.

**५.९ कंसातील शब्द वापरून वाक्ये बनवू या.** नीचे दिए गए शब्दों को वाक्यों में प्रयोग करें।

(सरळ, उजवीकडे, केळकर रोड, उजवीकडे, वळायचं नाही, महात्मा गांधी रोड, उजवीकडे, शिवाजी रोड, पुढे, राणीची बाग, डावीकडे, उजवीकडे, बाजार, भाऊ दाजी लाड संग्रहालय, उजवीकडे, महानगरपालिका, रानडे रोड)

प्रवीण : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------


----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------


----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

## ५.१० चेंडू कुठे आहे? लिहू या. गेंद कहाँ है? लिखें।



पुढे   मागे   जवळ   लांब



मध्ये   समोर   वर   खाली

| पुढे | मागे | जवळ | लांब | मध्ये | समोर | वर | खाली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आगे | पीछे | पास | दूर | बीच में | सामने | ऊपर | नीचे |

उदा॰ चेंडू कुठे आहे? – चेंडू दोघांच्यामध्ये आहे.

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

## ५.११ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



**अदिती :** नमस्कार! मला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानला कसं जायचं, ते सांगाल का?
नमस्कार। जरा बताएँगे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान कैसे जाना है?

**परिमल :** हो! इथून पुढे डाव्या बाजूला वळायचं. तिथून थोडं पुढे गेलं की एक मोठा सिग्नल लागेल.

हाँ! यहाँ से आगे बायीं तरफ़ मुड़िए। वहाँ से थोड़ा आगे जाने के बाद एक बड़ा सिग्नल आएगा।

**अदिती : अच्छा, तिथे जवळच आहे का?**
अच्छा, वहीं पास ही है, क्या?


**परिमल : नाही हो. थोडं लांब आहे. सिग्नलच्या पुढे गेलं की तिथून उजवीकडे जायचं. तिथून दुसऱ्यांदा उजवीकडे वळायचं आणि मग डावीकडे वळायचं.**
जी नहीं। थोड़ा दूर है। सिग्नल से आगे जाने के बाद दाएँ ओर मुड़िए। वहाँ फिर से एक बार दाएँ मुड़ें और फिर बाएँ मुड़ें।

**अदिती : अच्छा, तुम्ही येणार का संजय गांधी राष्ट्रीय उद्यानला?**
अच्छा, क्या आप संजय गांधी राष्ट्रीय उद्यान चलेंगे?

**परिमल : हो. बसा ना. अहो ताई, आधीच सांगायचं ना. मघाशीच निघालो असतो.**
हाँ। बैठिए ना। अरे बहनजी, पहले ही बता देते। हम कब के निकल चुके होते।

**५.१२ खालील वाक्ये योग्य क्रमात आणू या.** नीचे दिये गए वाक्यों को सही क्रम में लाएँ।

- इथून सरळ जा आणि डावीकडे वळा. तिथून २ मिनिटं सरळ चाललं की आला शिवाजी चौक! ☐
- हो, सांगतो की! जवळच आहे तो चौक. ☐
- अच्छा. सांगा ना कसं जायचं तिथे. ☐
- नमस्कार. मला शिवाजी चौकात जायचंय. तुम्हाला माहीत आहे का तो चौक? १
- धन्यवाद, तुम्ही मदत केल्याबद्दल. मी जातो आता. ☐



### ५.१३ जोड्या जुळवू या. जोड़ियाँ बनाएँ।

१. **खाली बघ आणि चाल.**
नीचे देख कर चलो।

२. **तुझं ऑफिस लांब आहे का?**
क्या तुम्हारा ऑफिस दूर है?


३. **पुढे वळण आहे, गाडी सावकाश चालवा.**
आगे एक मोड़ है, धीरे चलाओ।


४. **राधा, इथे मध्ये उभी राहा.**
राधा, यहाँ बीच में खड़ी हो जाओ।


५. **जवळ एक शाळा आहे.**
पास में एक स्कूल है।


६. **ए, वर बघ, विमान!**
ए, ऊपर देख, हवाई जहाज़!


७. **जरा मागे होता का?**
क्या आप ज़रा पीछे हटेंगे?


अ. 


ब. 

क. 

ड. 

च. 

छ. 

ज. 

### ५.१४ चौकात काय दिसतंय ते सांगू या. चौक में क्या दिख रहा है, वह बताएँ।

**(इमारत, पुतळा, सायकलवाला, ट्रक, दुकानं, जाहिरात, जिलबीवाला, फळवाला, बस, मोटारसायकली)**
**(मागे, पुढे, जवळ, लांब, मध्ये)**



१. उदा॰ मध्ये एक पुतळा आहे.
२. ----------
३. ----------
४. ----------
५. ----------
६. ----------
७. ----------
८. ----------
९. ----------
१०. ----------

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो आंबा, ते आंबे**<br>आम | **ती बायको, त्या बायका**<br>पत्नी | **ते केळे / केळं, ती केळी**<br>केला |
| **तो नियम, ते –**<br>नियम | **ती वाहतूक –**<br>यातायात | **ते स्टेशन, ती स्टेशन्स / स्टेशने / स्टेशनं**<br>स्टेशन |
| **तो भाऊ, ते –**<br>भाई | **ती काळजी, त्या काळज्या**<br>चिंता | **ते वाहन, ती वाहने / वाहनं**<br>गाड़ी / वाहन |
| **तो टेम्पो, ते –**<br>टेम्पो | **ती बहीण, त्या बहिणी**<br>बहन | **ते दुकान, ती दुकाने / दुकानं**<br>दुकान |
| **तो ट्रक, ते –**<br>ट्रक | **ती वहिनी, त्या –**<br>भाभी | **ते पुस्तक, ती पुस्तके / पुस्तकं**<br>किताब |
| **तो पुतळा, ते पुतळे**<br>मूर्ति | **ती शंका, त्या –**<br>संदेह | **ते वळण, ती वळणे / वळणं**<br>मोड़ |

| | | |
|---|---|---|
| **तो रस्ता, ते रस्ते**<br>रस्ता | **ती इमारत, त्या इमारती**<br>इमारत | **ते विमान, ती विमाने / विमानं**<br>हवाई जहाज |
| **तो चेंडू, ते –**<br>गेंद | **ती जाहिरात, त्या जाहिराती**<br>विज्ञापन | **ते उद्यान, ती उद्याने / उद्यानं**<br>उद्यान |
| **तो चौक, ते –**<br>चौक | **ती बाजू, त्या –**<br>तरफ | |
| | **ती बाग, त्या बागा**<br>बगीचा | |

## सर्वनाम

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **माझा**<br>मेरा | **माझी**<br>मेरी | **माझे / माझं**<br>मेरा | **तुझा**<br>तुम्हारा | **तुझी**<br>तुम्हारी | **तुझे / तुझं**<br>तेरा |

## क्रियापदे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **विचारणे**<br>पूछना | **वळणे**<br>मुड़ना | **पाळणे**<br>पालन करना | **चालणे**<br>चलना | **सांगणे**<br>कहना | **शिकणे**<br>सीखना | **पिणे**<br>पीना | **झोपणे**<br>सोना |

## इतर शब्द

| | | |
|---|---|---|
| **लांब**<br>दूर | **जवळ**<br>पास | **मध्ये**<br>बीच में |
| **मागे**<br>पीछे | **पुढे**<br>आगे | **समोर**<br>सामने |
| **खाली**<br>नीचे | **वर**<br>ऊपर | **आजकाल**<br>आजकल |
| **उजवे / उजवं**<br>दाएँ / दाहिना | **डावे / डावं**<br>बाएँ / बायाँ | **काही**<br>कुछ |
| **बाहेर**<br>बाहर | **आत**<br>अन्दर | |

# ६

# हे माझं शहर









## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **रस्ता सांगणे**
  राह बताना
- **शहरातील ठिकाणे ओळखणे**
  शहर में स्थान पहचानना
- **अंक : ६१-१०० ओळखणे आणि सांगणे**
  अंक : ६१-१०० पहचानना और बताना

## ६.१ जोड्या जुळवू या. जोड़ियाँ बनाएँ।



१

क तो ट्रक



२

ख ती गाडी



३

ग ती बस



४

घ ती टॅक्सी




५


च ती लोकल




६

छ तो टेम्पो

## ६.२ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



आदित्य : ती रिक्षा कोणाची आहे?
अहमद : ती रिक्षा **माझी** आहे.
आदित्य : तुझी?
अहमद : हो. **माझी.**
आदित्य : नक्की ना?



आदित्य : त्या सायकली कोणाच्या आहेत?
अहमद : त्या सायकली **माझ्या** आहेत.
आदित्य : तुझ्या?
अहमद : हो. **माझ्या.**
आदित्य : नक्की ना?



## ६.३ आता याचप्रमाणे पुढील शब्द वापरून संवाद साधू या.
अब इसी तरह नीचे दिये गए शब्दों का प्रयोग करके संवाद करें।

तो ट्रक, ती टॅक्सी, त्या बसेस, तो टेम्पो, त्या गाड्या, ते वाहन, ती गाडी, ती सायकल, ती वाहने, ती लोकल



**गब्बर :** बबन, तुमच्या मुंबईत एवढी ठिकाणं आहेत. त्यांची नावं काही कळत नाहीत, बुवा.
**बबन :** अरे, अगदी सोपे आहे.

### ६.४ जोड्या जुळवू या. जोड़ियाँ बनाएँ।

| | | | |
|---|---|---|---|
| ती शाळा<br>पाठशाला | १ | क |  |
| ते विद्यापीठ /<br>ती युनिव्हर्सिटी<br>विश्वविद्यालय | २ | ख |  |
| तो मॉल | ३ | ग |  |
| ते रेल्वे स्टेशन | ४ | घ |  |
| ते विमानतळ<br>हवाईअड्डा | ५ | च |  |
| ते मंत्रालय | ६ | छ |  |
| ते मार्केट | ७ | ज |  |
| ते संग्रहालय | ८ | झ |  |

## ६.५ योग्य नाव निवडू या. सही नाम चुनें।

१




- स्टॉक एक्सचेंज ☐
- युनिव्हर्सिटी ☐
- मार्केट ☐

२



- राणीची बाग ☐
- जुहू बीच ☐
- कान्हेरी गुहा ☐

३




- हॉस्पिटल / रुग्णालय ☐
- रेस्टॉरंट ☐
- आयकर विभाग ☐

४



- बँक ☐
- हॉटेल ताज ☐
- मंत्रालय ☐

५



- मरीन ड्राईव ☐
- आयकर विभाग ☐
- लाल किल्ला ☐

६



- राणीची बाग ☐
- नाना-नानी पार्क ☐
- गेटवे ऑफ इंडिया ☐

## ६.६ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | एकसष्ट | ७१ | एकाहत्तर | ८१ | एक्क्याऐंशी | ९१ | एक्याण्णव |
| ६२ | बासष्ट | ७२ | बाहत्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ६५ | पासष्ट | ७५ | पंचाहत्तर | ८५ | पंच्याऐंशी | ९५ | पंच्याण्णव |
| ६६ | सहासष्ट | ७६ | शहात्तर | ८६ | शाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्त्याहत्तर | ८७ | सत्त्याऐंशी | ९७ | सत्त्याण्णव |
| ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्याण्णव |
| ७० | सत्तर | ८० | ऐंशी | ९० | नव्वद | १०० | शंभर |

## ६.७ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**रिक्षावाला :** **स्टेशन आलं दादा.**
स्टेशन आ गया, भाई।

**प्रवासी :** **हो, किती झाले?**
हाँ, कितना हुआ?

**रिक्षावाला :** **बाहत्तर.**
७२

**प्रवासी :** **काय? बाहत्तर? एवढे कसे? मी रोज साठ रुपयात येतो.**
क्या? ७२? इतना कैसे? मैं रोज ६० रुपये में आता हूँ।

**रिक्षावाला :** **अहो दादा, आज ट्रॅफिक होतं खूप. मी मीटरप्रमाणेच सांगतोय.**
अरे भाई, आज ट्रैफिक बहुत था। मैं मीटर से ही बता रहा हूँ।


**प्रवासी :** **काहीही बोलू नकोस. वाहतुकीची कोंडी तर रोजचीच आहे. मी फक्त पासष्ट रुपये देणार. जास्त नाटकं करतोस? पोलिसांना बोलावू का?**
कुछ भी! ट्रैफिक तो रोज की बात है। मैं सिर्फ ६५ रुपये दूँगा। ज्यादा नाटक मत करो। पुलिसवाले को बुलाऊँ?

**रिक्षावाला :** **तुम्हाला हवं, तर बोलवा. हक्काचे पैसेच तर मागतोय.**
बुलाना है तो बुलाओ पुलिस को। हक के पैसे ही तो माँग रहा हूँ।

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो बाजार, ते –**<br>बाज़ार | **ती महानगरपालिका, त्या –**<br>महानगरपालिका | **ते रुग्णालय, ती रुग्णालये / रुग्णालयं**<br>अस्पताल |
| **तो विभाग, ते –**<br>विभाग | **ती बस, त्या बसेस**<br>बस | **ते वाचनालय, ती वाचनालये / वाचनालयं**<br>ग्रंथालय |
| **तो विमानतळ, ती विमानतळे / विमानतळं**<br>हवाईअड्डा | **ती गाडी, त्या गाड्या**<br>गाड़ी | **ते टपालघर, ती टपालघरे / टपालघरं**<br>डाकघर |
| | **ती लोकल, त्या –**<br>लोकल | **ते संग्रहालय, ती संग्रहालये / संग्रहालयं**<br>संग्रहालय |
| | **ती वाहतूक, त्या वाहतुकी**<br>यातायात | **ते मंत्रालय, ती मंत्रालये / मंत्रालयं**<br>मंत्रालय |
| | **ती कोंडी**<br>जाम | **ते विद्यापीठ, ती विद्यापीठे / विद्यापीठं**<br>विश्वविद्यालय |

## चिंटू



# ७ माझा दिनक्रम



## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- आपला दिनक्रम सांगणे
  अपना दिनक्रम बताना
- केव्हा, कधी : दिवसाच्या वेळा सांगणे आणि विचारणे
  दिन का समय
- करणे - मी करत आहे : अपूर्ण / चालू वर्तमानकाळाचा वापर करणे
  अपूर्ण वर्तमान काल

## ७.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**डॉ. कलप :** **काय रे, तू हल्ली रिक्षा स्टँडवर का दिसत नाहीस?**
तुम आजकल रिक्शा स्टैंड पर क्यों नहीं दिखाई देते?

**अजय :** **तब्येत बरी नाहीये, दादा.**
तबियत ठीक नहीं है, भाई।



**डॉ. कलप :** **काय झालं?**
क्या हुआ?

**अजय :** **पोट दुखतंय हो माझं!**
मेरे पेट में दर्द हो रहा है।

**डॉ. कलप :** **अरे, असं कसं चालेल रे! पोट दुखण्यासारखं तू दिवसभर काय करतोस, सांग जरा किती वाजता उठतोस तू?**
अरे, ऐसा क्यों हो रहा है? बताओ, तुम दिन भर ऐसा क्या करते हो जिससे तुम्हारा पेट दर्द करता है। बताओ, कितने बजे उठते हो तुम?

**अजय :** **मी सकाळी लवकर उठतो ६ वाजता. आणि लगेच अंघोळ करतो.**
मैं सुबह जल्दी ६ बजे उठता हूँ और तुरंत नहाता हूँ।

**डॉ. कलप :** **आणि मग नाश्ता कधी करतोस?**
और फिर नाश्ता कब करते हो?

**अजय :** **नाश्ता नाही करत, दादा. लगेच रिक्षा काढतो अन् भाडी घेतो.**
नाश्ता नहीं करता, भाई। तुरंत रिक्शा निकालता हूँ और सवारी लेता हूँ।

**डॉ. कलप :** **हे बरोबर नाहीये बरं का! मग दुपारी किती वाजता जेवतोस?**
यह बिल्कुल ठीक नहीं है! तो दोपहर को खाना कब खाते हो?

**अजय :** **दुपारी नाही जेवत मी. संध्याकाळी जवळपास ५ वाजतात मला जेवायला. दुपारी फक्त रिक्षा चालवतो आणि कधी कधी रिक्षामध्येच झोपतो.**
मैं दोपहर में खाना नहीं खाता हूँ। मुझे शाम के ५ बज जाते हैं खाना खाने के लिए। दोपहर में केवल रिक्शा चलाता हूँ और कभी-कभी रिक्शे में ही सो जाता हूँ।

**डॉ. कलप :** **बरं! आणि मग रात्री?**
अच्छा! और फिर रात को?

**अजय :** **रात्री घरी गेल्यावर बायकोसोबत जरा गप्पा मारतो. स्वयंपाकात मदत करतो आणि मग जेवून झोपायला रात्रीचे १२ वाजतात.**
रात में घर जाने के बाद अपनी पत्नी के साथ थोडी गपशप करता हूँ। उसे खाना बनाने में मदद करता हूँ। और फिर सोते सोते रात के बारह तो बज ही जाते है।

**डॉ. कलप :** **हाच तर प्रॉब्लेम आहे ना! कधीही काहीही करतोस तू. जेवण, झोप कसं वेळच्या वेळी झालं पाहिजे. वेळच्या वेळी सगळं करत जा म्हणजे तब्येत खराब होणार नाही.**
यही तो समस्या है। कभी भी कुछ भी करते हो तुम। खाना, सोना समय पर होना चाहिए। सब कुछ समय पर करो तो सेहत खराब नहीं होगी।



**बबन** : ऐकलंस ना गब्बर, वेळेवर जेवणं, झोपणं किती महत्त्वाचं आहे ते.

**गब्बर** : हो रे बबन, मलासुद्धा डॉक्टरांचं पटलं.

## ७.२ चूक की बरोबर ते ओळखू या. सही या गलत पहचानें।

| | बरोबर | चूक |
|---|---|---|
| १. अजय सकाळी ८ वाजता उठतो. | | |
| २. अजय दुपारी २ वाजता जेवतो. | | |
| ३. कधी कधी अजय दुपारी रिक्षामध्ये झोपतो. | | |
| ४. संध्याकाळी ५ वाजता अजय नाश्ता करतो. | | |
| ५. अजय रात्री बायकोला जेवण बनवायला मदत करतो. | | |

## ७.३ जोड्या जुळवू या. जोड़ियाँ बनाएँ।


क


ख


ग


घ

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| रात्र | दुपार | संध्याकाळ | सकाळ |


तुम्ही रिक्षा केव्हा / कधी चालवता?

मी ---------------------------- रिक्षा चालवतो. (सकाळी / दुपारी / संध्याकाळी / रात्री)

### ७.४ चित्रे पाहून रिकाम्या जागा भरू या. तस्वीरें देखकर रिक्त स्थान भरें।



उदा॰ सुनील टॅक्सी चालवतो.
सुनील टैक्सी चलाता है।



सुनील आता टॅक्सी चालवत आहे.
सुनील अब टैक्सी चला रहा है।



रीना सफरचंद ------------------------.
--------------------------------------------------------



रीना सफरचंद खात आहे.
रीना सेब खा रही है।



जिनी कॉफी ------------------------------.
--------------------------------------------------------



जिनी कॉफी पीत आहे.
जिनी कॉफी पी रही है।



रीटा पुस्तक ------------------------------.
--------------------------------------------------------



रीटा पुस्तक वाचत आहे.
रीटा किताब पढ़ रही है।

## अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ ‘चालवणे’

| | वर्तमानकाळ | अपूर्ण (चालू) वर्तमानकाळ |
|---|---|---|
| | मी रिक्षा चालवतो.<br>मी रिक्षा चालवते. | मी रिक्षा चालवत आहे. |
| | आम्ही / आपण रिक्षा चालवतो. | आम्ही / आपण रिक्षा चालवत / चालवतो आहोत. |
| | तू रिक्षा चालवतोस.<br>तू रिक्षा चालवतेस. | तू रिक्षा चालवत / चालवतो आहेस.<br>तू रिक्षा चालवत / चालवते आहेस. |
| | तुम्ही / आपण रिक्षा चालवता. | तुम्ही / आपण रिक्षा चालवत आहात. |
| | तो रिक्षा चालवतो.<br>ती रिक्षा चालवते.<br>ते रिक्षा चालवते / चालवतं. | तो / ती / ते रिक्षा चालवत आहे. |
| | ते / त्या / ती रिक्षा चालवतात. | ते / त्या / ती रिक्षा चालवत आहेत. |

चालू (अपूर्ण) वर्तमानकाळ

उदा. खाणे – खा + त = खात आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत

वाचणे – वाच + त = वाचत आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत

### ७.५ खालील तक्ता भरू या. तालिका पूरी करें।

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| तू (करणे) | कर | करत + आहेस |
| मी (पळणे) | पळ | पळत आहे |
| तू (खाणे) | खा | ---------------- |
| तुम्ही / आपण (जाणे) | जा | ---------------- |
| ती (येणे) | ये | ---------------- |
| ते (होणे) | हो | होत आहे |
| ते (बोलणे) | बोल | ---------------- |
| आम्ही / आपण (जेवणे) | जेव | ---------------- |

## ७.६ वर्गातील सूचना (संवाद).

शिक्षक : तो मुलगा काय करत आहे? → विद्यार्थी : अभ्यास करत आहे तो.
वह लड़का क्या कर रहा है? वह पढ़ाई कर रहा है।

सगळे : तो अभ्यास करत आहे? → विद्यार्थी : हो. तो अभ्यास करत आहे.
क्या वह पढ़ाई कर रहा है? हाँ। वह पढ़ाई कर रहा है।

सगळे : अच्छा. तो मुलगा अभ्यास करत आहे.
अच्छा। वह लड़का पढ़ाई कर रहा है।

(याचप्रमाणे – बदलत आहे, विकत आहे, चालवत आहे, शोधत आहे)

### दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| तो नाश्ता, ते नाश्ते<br>नाश्ता | ती तब्येत, त्या तब्येती<br>सेहत | ते पोट, ती पोटे / पोटं<br>पेट |
| तो स्वयंपाक<br>रसोई | ती अंघोळ, त्या अंघोळी<br>स्नान | ते भाडे / भाडं, ती भाडी<br>सवारी / किराया |
| | ती सकाळ, त्या सकाळी<br>सुबह | ते जेवण, ती जेवणे / जेवणं<br>खाना |
| | ती मध्यान्ह, त्या मध्यान्ही<br>दोपहर | |
| | ती दुपार<br>दोपहर | |
| | ती संध्याकाळ, त्या संध्याकाळी<br>शाम | |
| | ती रात्र, त्या रात्री<br>रात | |

### क्रियापदे

| | | | |
|---|---|---|---|
| चालवणे चलाना | दिसणे दिखना | जेवणे खाना खाना | मारणे मारना |
| दुखणे दर्द होना | उठणे उठना | सांभाळणे संभालना | |

### इतर शब्द

| | |
|---|---|
| काहीही कुछ भी | वेडे पागल |

# ८ चला, विचारू या









## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- ✔ **करणे - मी करत आहे / मी करत नाही आहे - मी करतोय / मी करत नाहीये : अपूर्ण / चालू वर्तमानकाळाची लिखित व बोली भाषेतील होकारार्थी आणि नकारार्थी रूपे वापरणे**
  अपूर्ण वर्तमान के लिखित और बोली भाषा के रूप : सकारात्मक और नकारात्मक रूप

## ८.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**प्रभात : अहो ताई, मला आर॰टी॰ओ॰ ऑफिसला कसं जायचं सांगाल का?**
सुनिए, क्या आप मुझे आर॰टी॰ओ॰ ऑफिस का रस्ता बता सकते हैं?

**मालती : माफ करा. मला माहीत नाही.**
माफ कीजिए। मुझे नहीं पता।

**प्रभात : ठीक आहे. मी दुसऱ्या कोणाला तरी विचारतो. अहो दादा, मला एक रस्ता सांगाल का?**
कोई बात नहीं। मैं किसी और से पूछ लेता हूँ। सुनिये भाई, क्या आप मुझे एक रस्ता बता सकते हैं?



**दत्ता : हो. कुठे जायचंय तुम्हाला?**
हाँ। कहाँ जाना है आपको?

**प्रभात : मला आर॰टी॰ओ॰ ऑफिसला जायचंय. जवळचा रस्ता सांगा ना!**
मुझे आर॰टी॰ओ॰ ऑफिस जाना है। नजदीक का रस्ता बताई ना!

**दत्ता : हो. या सिग्नलवरून डावीकडे वळा. पुढे महात्मा फुले चौक लागेल. तिकडून पुन्हा डावीकडे वळा. मग दुसरं उजवं वळण घ्या. सरळ गेल्यावर आर॰टी॰ओ॰ ऑफिस येतं.**
हाँ। इस सिग्नल से बाएँ मुड़िए। आप महात्मा फुले चौक पहुँच जाएँगे। वहाँ से वापस बाएँ मुड़िए। फिर दूसरा दाहिना मोड़ लीजिए। सीधे जानेपर आर॰टी॰ओ॰ ऑफिस आता है।

**प्रभात : धन्यवाद!**

## ८.२ वरील संवाद वाचून त्या आधारे खालील वाक्ये बनवू या.
ऊपर दिया हुआ संवाद पढ़कर वाक्य बनाएँ।

१. लागेल - चौक - पुढे - महात्मा फुले
उदा॰ पुढे महात्मा फुले चौक लागेल.

२. कुठे - तुम्हाला - जायचंय
-----------------------------------------------

३. नाही - मला - माहीत
-----------------------------------------------

४. कसं - आर॰टी॰ओ॰ ऑफिसला - सांगाल - का - जायचं
-----------------------------------------------

५. या - वळा - सिग्नलवरून - डावीकडे
-----------------------------------------------

## ८.३ खालील तक्ता वाचू या. तालिका पढ़ें।


| वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान | अपूर्ण (चालू) वर्तमान |
|---|---|---|
| चालवणे चलाना | लिहिताना | बोलताना |
| मी चालवतो. | मी चालवत / चालवतो आहे. | चालवतो + य = मी चालवतोय. |
| मी चालवते. | मी चालवत / चालवते आहे. | चालवते + य = मी चालवतेय. |
| आम्ही / आपण चालवतो. | आम्ही / आपण चालवत / चालवतो आहोत. | चालवतो + य = आम्ही / आपण चालवतोय. |
| तू चालवतोस. | तू चालवत / चालवतो आहेस. | चालवतो + यस = तू चालवतोयस. |
| तू चालवतेस. | तू चालवत / चालवते आहेस. | चालवते + यस = तू चालवतेयस. |
| तुम्ही / आपण चालवता. | तुम्ही / आपण चालवत / चालवता आहात / आहोत. | चालवता + य = तुम्ही / आपण चालवताय. |
| तो चालवतो. | तो चालवत / चालवतो आहे. | चालवतो + य = तो चालवतोय. |
| ती चालवते. | ती चालवत / चालवते आहे. | चालवते + य = ती चालवतेय. |
| ते चालवतं. | ते चालवत / चालवते आहे. | चालवतं + य = ते चालवतंय. |
| ते चालवतात. | ते चालवत आहेत. | चालवता + यत = त्या चालवतायत. |
| त्या चालवतात. | त्या चालवत आहेत | चालवता + यत = ती चालवतायत. |
| ती चालवतात. | ती चालवत आहेत. | चालवता + यत = ते चालवतायत. |

**८.४ चित्र पाहून वाक्य बनवू या.** चित्र देखकर वाक्य बनाएँ।

**टॅक्सीमध्ये बसणे, भांडणे, गाडी चालवणे आणि फोनवर बोलणे, रस्ता ओलांडणे, गाड्या आपटणे, पावती फाडणे.**



**उदा॰ मीना पुस्तक वाचतेय.**

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| १. ---------------------------------- ---------------------------------------- | २. ---------------------------------- ---------------------------------------- | ३. ---------------------------------- ---------------------------------------- |
|  |  |  |
| ४. ---------------------------------- ---------------------------------------- | ५. ---------------------------------- ---------------------------------------- | ६. ---------------------------------- ---------------------------------------- |

८.५ **तक्ता पूर्ण करू या.** तालिका पूरी करें।

| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| १) निकिता वाचत आहे. | १) निकिता नियम वाचतेय. |
| २) मायकल ------------------------------------. | २) मायकल रस्ता ओलांडतोय. |
| ३) किरण गाडी चालवत आहे आणि ----------------------------------------. | ३) किरण गाडी चालवतेय आणि फोनवर बोलतेय. |
| ४) समीर आणि रीटा रागाने ----------------------------------------------------. | ४) समीर आणि रीटा रागाने भांडतायत. |
| ५) रस्त्यावर खूप गाड्या धावत आहेत. | ५) रस्त्यावर खूप गाड्या ----------------------------------------------------. |
| ६) ओमर टॅक्सीमध्ये -----------------------. | ६) ओमर टॅक्सीमध्ये बसतोय. |
| ७) ट्रॅफिक पोलीस ----------------------------------------------------. | ७) ट्रॅफिक पोलीस पावती फाडतोय. |

८.६ **संवाद वाचू या आणि ऐकू या आणि अपूर्ण (चालू) क्रियापदे ओळखू या.**
संवाद पढ़ें और क्रिया पहचानें।

**प्रवासी :** **मार्केटला येणार का?**
बाजार चलोगे?

**टॅक्सीचालक :** **नाही. मी जेवायला चाललोय.**
नहीं। मैं खाना खाने जा रहा हूँ।

**प्रवासी :** **तुम्हालापण आत्ताच जेवायला जायचंय? मग दुसरे रिक्षाचालक जातील का तिथे?**
आपको अभी ही खाना खाने जाना हैं? फिर दूसरे रिक्शा ड्राइवर चलेंगे क्या वहाँ?

**टॅक्सीचालक :** **या वेळेला कोणीच जाणार नाही. सगळे जेवायला जातायत.**
इस समय कोई नहीं जाएगा। सब खाना खाने जा रहे हैं।

**प्रवासी :** **मग आता मी काय करू?**
तो अब मैं क्या करूँ?

**टॅक्सीचालक :** **तुम्हाला वाट बघावी लागेल. किंवा चला तुम्हीसुद्धा जेवायला. नंतर मी सोडतो तुम्हाला.**
आपको इंतजार करना पड़ेगा। चलो आप भी खाना खाने। बाद में मैं आप को छोड़ दूँगा।

प्रवासी : **अहो, काहीही काय बोलताय? मी का येऊ तुमच्यासोबत जेवायला? मला भूक नाहीये.**
अरे, आप यह क्या कह रहे हैं? मैं आपके साथ क्यों आऊँ खाना खाने? मुझे भूख नहीं है।

टॅक्सीचालक : **मग आता तुम्हाला चालतच मार्केटला जावं लागेल.**
फिर अब आपको बाजार तक पैदल ही जाना पड़ेगा।

## वरील संवादातून अपूर्ण (चालू) वर्तमानकाळातील क्रियापदे लिहू या.

| | होकारार्थी | नकारार्थी लिहिताना | नकारार्थी बोलताना |
|---|---|---|---|
| | मी वाट बघत आहे. | मी वाट बघत नाही आहे. | मी वाट बघत नाहीये. |
| | आम्ही / आपण वाट बघत आहोत. | आम्ही / आपण वाट बघत नाही आहोत. | आम्ही / आपण वाट बघत नाहीयोत. |
| | तू वाट बघत आहेस. | तू वाट बघत नाही आहेस. | तू वाट बघत नाहीयेस. |
| | तुम्ही / आपण वाट बघत आहात. | तुम्ही / आपण वाट बघत नाही आहात. | तुम्ही / आपण वाट बघत नाहीयात. |
|  | तो वाट बघत आहे. | तो वाट बघत नाही आहे. | तो वाट बघत नाहीये. |
|  | ती वाट बघत आहे. | ती वाट बघत नाही आहे. | ती वाट बघत नाहीये. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ते वाट बघत आहे. | ते वाट बघत नाही आहे. | ते वाट बघत नाहीये. |
| | ते वाट बघत आहेत. | ते वाट बघत नाही आहेत. | ते वाट बघत नाहीयेत. |
| | त्या वाट बघत आहेत. | त्या वाट बघत नाही आहेत. | त्या वाट बघत नाहीयेत. |
| | ती वाट बघत आहेत. | ती वाट बघत नाही आहेत. | ती वाट बघत नाहीयेत. |

**नकारार्थी चालू / अपूर्ण वर्तमानकाळ**
**जाणे = जात + नाही + आहे / आहोत, आहेस / आहात, आहे / आहेत ...**



**गब्बर :** अरे बबन, सकाळी रिक्षा चालवता चालवता मी रस्ता चुकलो. मला खूपच भीती वाटली.
**बबन :** अरे असा काय तू. कोणाला तरी रस्ता विचारायचास ना.
**गब्बर :** अरे पण कसं?
**बबन :** अगदी सोपे आहे. तुला एक उदाहरण देतो बघ.

## ८.७ खालील संवाद वाचून उत्तरे देऊ या. निम्नलिखित संवाद पढ़ कर उत्तर दें।

**प्रवासी :** **डॉन बॉस्को शाळेला येणार का?**
डॉन बॉस्को स्कूल चलोगे?

**रिक्षाचालक :** **हो. बसा.**
हाँ बैठो।
**(थोड्या वेळानंतर)**
(थोड़ी देर के बाद)


**प्रवासी :** **अहो, आपण कोणत्या रस्त्यानं जातोय? मला वाटतं आपण रस्ता चुकलो आहोत.**
अरे भाई, हम कौनसे रस्ते से जा रहे हैं। मुझे लगता है कि हम गलत रास्ते पे हैं।

**रिक्षाचालक : मलासुद्धा असंच वाटतंय. माफ करा. मी कोणाला तरी विचारतो.**

मुझे भी ऐसा ही लग रहा है। माफ कीजिए। मैं किसी से रस्ता पूछ लेता हूँ।

**रिक्षाचालक (बाजूच्या रिक्षावाल्यास) : माफ करा, मी रस्ता चुकलोय. मला डॉन बॉस्को शाळेला कसं जायचं हे सांगा ना!**

भाई, मैं गलत रस्ते पर आ गया हूँ। मुझे जरा डॉन बॉस्को स्कूल का रस्ता बताइए ना?



**बाजूचा रिक्षाचालक : अरे बाप रे! फारच पुढे आलात तुम्ही. इथून मागे फिरा आणि आधीचं डावं वळण घ्या. तिथून थोडेसं पुढे आलात की डॉन बॉस्को शाळा. आणि जरा हळू चालवा. रस्ता खणला आहे.**

अरे, आप बहुत आगे आ गए हैं। यहाँ से वापस मुड़िए और पिछला बायां मोड़ ले लीजिए। वहाँ से थोड़ा आगे गए की वहीं डॉन बोस्को स्कूल है। और थोड़ा धीरे चलाना। सड़क खोदी हुई है।

**रिक्षाचालक : अच्छा! आभारी आहे!**

अच्छा! थैंक यू!

**बाजूचा रिक्षाचालक : हरकत नाही!**

ठीक है!

## ८.८ होकारार्थी आणि नकारार्थी वाक्ये बनवू या. वाक्य बनाएँ।

| होकारार्थी | नकारार्थी |
|---|---|
| १. रस्ता बरोबर आहे. | रस्ता बरोबर नाहीये. |
| २. डॉन बॉस्को शाळेला कसं जायचं ते कळतंय. | डॉन बॉस्को शाळेला कसं जायचं ते ----------------. |
| ३. त्या शाळेकडे इथून ----------------. | त्या शाळेला इथून जायचं नाहीये. |
| ४. रस्ता चांगला आहे. | रस्ता चांगला ----------------. |
| ५. तो टॅक्सी पुसतोय. | तो टॅक्सी ----------------. |

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो विचार, ते –**<br>खयाल | **ती परीक्षा, त्या –**<br>परीक्षा | |
| **तो दिवस, ते –**<br>दिन | **ती पावती, त्या पावत्या**<br>चालान | |
| **तो राग**<br>गुस्सा | **ती वाट, त्या वाटा**<br>राह | |
| | **ती भूक**<br>भूख | |
| | **ती भीती**<br>डर | |

| क्रियापद | प्रश्नार्थी शब्द | इतर शब्द |
|---|---|---|
| **आणणे**<br>लाना | **कोणाशी**<br>किसके साथ | **तोपर्यंत**<br>तब तक |
| **पकडणे**<br>पकड़ना | **कोणी**<br>किसने | **मोठा**<br>बड़ा |
| **पळणे**<br>भागना | | **मग**<br>फिर |
| **फाडणे**<br>फाड़ना | | **हळू**<br>धीरे |
| **ओलांडणे**<br>पार करना | | **बराच**<br>बहुत |
| **सोडणे**<br>छोड़ना | | |
| **आपटणे**<br>टकराना | | |
| **चुकणे**<br>भूलना | | |
| **पुसणे**<br>पोंछना | | |

# प्रवासिदेवो भव।

१



## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **प्रवाशाला माहिती देणे**
  यात्री को जानकारी देना
- **भाडे स्वीकारताना ठिकाणाबद्दल विचारणे**
  सवारी लेते समय जगह की पूछताछ करना
- **आपल्या इच्छा व्यक्त करताना क्रियापद 'हवंय'चा वापर करणे**
  अपनी इच्छाएँ व्यक्त करना क्रियापद 'चाहना - चाहिए'
- **आहे - नाही / नाहीये : वर्तमानकाळातील होकारार्थी व नकारार्थीतील यातील फरक ओळखणे आणि वापरणे**
  होना - नहीं होना : वर्तमानकाल में सकारात्मक और नकारात्मक के बीच का भेद
- **ऋतू ओळखणे आणि सांगणे**
  मौसम पहचानना और बताना

## ९.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



**रिक्षाचालक : बोला साहेब, कुठे जायचंय?**
बोलो साहब, कहाँ जाना है?

**प्रवासी : स्टेशन.**
स्टेशन।

**रिक्षाचालक : बसा.**
बैठो।

**प्रवासी : हो. तुम्ही कोणत्या रस्त्याने जाणार?**
हाँ। आप किस रस्ते से जाओगे?

**रिक्षाचालक : इथून थोडसं पुढे गेलं की शिवाजी चौकातून डावीकडे वळायचं आणि थोडं पुढे उजवीकडे एक छोटीशी गल्ली आहे. तिथून गेलं की आपण थेट मेन रोडला पोहोचतो.**
यहाँ से थोड़ा आगे जाने के बाद शिवाजी चौक से बायीं ओर मुड़ो और वहाँ से थोड़ा आगे दाहिनी तरफ एक छोटी सी गली है। वहाँ से, हम सीधे मेन रोड़ तक पहुँचते हैं।

**प्रवासी : अच्छा! मग त्यानंतर ते हनुमानाचं मंदिर लागतं ना?**
अच्छा, तो उसके बाद वह हनुमानजी का मंदिर आता है ना?

**रिक्षाचालक : ते तर बरंच मागे आहे. आपण मेन रोडवरून थोडंसं सरळ चालवत गेलो की उजवीकडे वळायचं. तिथून सिग्नलला यू टर्न घेतला की आलं स्टेशन.**
वह तो बहुत पीछे है। हमें मेन रोड़ से थोड़ा सीधे चलने के बाद दाएँ मुड़ना है। वहाँ सिग्नल से यू टर्न लिया की आया स्टेशन।

**प्रवासी : अच्छा. बघितल्यावर अजून नीट कळेल मला.**
अच्छा। देखने के बाद मैं और अच्छे से समझ पाऊँगा।

**रिक्षाचालक : चला तर मग. निघू या आपण आता.**
चलो फिर। चलते हैं अब।


**प्रवासी : हो, हो. चला, निघू या.**
हाँ हाँ। चलो चलते हैं।

## ९.२ वरील संवाद वाचून, ठिकाणांची नावे आणि चिन्हे वापरून नवीन रस्ता तयार करू या. ऊपर दिया गया संवाद पढ़ें और ठिकाने और चिन्हों का प्रयोग करके नयी सड़क बनाएँ।

---------- शिवाजी चौक ----------

↑

सुरुवात



**गब्बर :** बबन, मला नवीन रिक्षा घ्यायची आहे. काय काय लागेल सांग ना.
**बबन :** अरे, मला काय विचारतोयस! त्या अनिलकडे चल. तो तुला अचूक सांगेल.
**गब्बर :** नको नको. तो फारच रागीट आहे. मला जरा कठीणच वाटतंय.
**बबन :** नाही रे. अगदी सोप्पंय. तू चल माझ्यासोबत.

## ९.३ रिक्षा स्टँडवरची एक दुपार. रिक्शा स्थानक पर एक दोपहर।



**बबन : दादा, या गब्बरला थोडी माहिती हवीय.**
भैया, इस गब्बर को थोड़ी जानकारी चाहिए।

**अनिल : बोल ना, काय झालं?**
बोल ना, क्या चाहिए?

**गब्बर : मला नवीन रिक्षा घ्यायचीय. त्यासाठी काय काय लागेल?**
मुझे नया रिक्शा खरीदना है। इसके लिए क्या क्या चाहिए?

**अनिल : ठीक आहे. सगळ्यात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैसे हवेत आणि मग लायसन्स. ते आहे का तुझ्याकडे?**
ठीक है। सबसे पहली और जरूरी बात है कि पैसे चाहिए और फिर लाइसेंस। वह है क्या तुम्हारे पास?

**गब्बर : चेष्टा करता काय दादा, पैसे लागतात हे काय सांगायला हवं? पैसे तर हवेतच. मी बँकेकडून लोन घेणार आहे.**
क्या मजाक कर रहे हो भैया, पैसे लगते हैं यह भी क्या बताने की बात है? पैसे तो लगेंगे ही। मैं बैंक से लोन लेने वाला हूँ।

**अनिल : ठीक आहे. उद्या माझ्यासोबत चल. आपण आधी रिक्षा बघू या. तुला त्यातली एखादी आवडली तर बोलणी करू या. कोणती रिक्षा घेणारेस तू? 'सूर्या'ची की 'बादल'ची?**
ठीक है। तो कल पहले मेरे साथ चलो। हम रिक्शा देख कर आते हैं। यदि तुम्हें कोई पसन्द आया, तो हम आगे बात करेंगे। तुम कौन सा रिक्शा ले रहे हो? 'सूर्या' वाला या 'बादल' वाला?

**गब्बर : मी तर 'सूर्या'ची घेणार, दादा.**
मैं तो 'सूर्या' ही लूँगा, भैया।

**अनिल : बरं. रिक्षा घ्यायला काही कागदपत्रंसुद्धा हवीत. त्यांची नावं मी तुला एस्.एम्.एस्. करतो.**
अच्छा, रिक्शा लेने क लिए कुछ कागज़ात भी चाहिए। उनके नाम मैं तुम्हे एस्.एम्.एस्. करता हूँ।

**गब्बर : ठीक आहे, दादा. मग मी तुम्हाला संध्याकाळी भेटतो. थँक्यू.**
ठीक है, भैया। तो फिर मैं आप से शाम को मिलता हूँ। धन्यवाद।

## ९.४ चूक की बरोबर ते ओळखू या. सही या गलत पहचानें।

| | बरोबर | चूक |
|---|---|---|
| १. अनिलला नवीन टॅक्सी हवीय. | | |
| २. दादा सांगतो अनिलला गाडी घ्यायला पैसे हवेत; पण लायसन्स नको. | | |
| ३. अनिल बँकमधून लोन घेणार आहे. | | |
| ४. अनिल टी॰व्ही॰एस्॰ ची रिक्षा घेणार आहे. | | |
| ५. रिक्षा घ्यायला कागदपत्रे हवीत. | | |

## ९.५ योग्य वाक्ये तयार करू या. सही वाक्य बनाएँ।

| | | |
|---|---|---|
| मला | (ते) लायसन्स | हवीत |
| | १. (तो) दाखला | हवीय |
| | २. (ती) रिक्षा | हवाय |
| | ३. (ती) कागदपत्रे | हवंय |

| | | |
|---|---|---|
| मला | (तो) चहा | हवंय |
| | ४. (ती) कॉफी | हवाय |
| | ५. (ते) लिंबू-सरबत | हवीय |

उदा॰ मला कागदपत्रे हवीत. मला चहा हवाय.

| तो | ती | ते | ते | त्या | ती |
|---|---|---|---|---|---|
| हवाय | हवीय | हवंय | हवेत | हव्यात | हवीत |

## ९.६ योग्य शब्द लिहू या. योग्य शब्द लिखें।

(हवंय, हवेत, हवंय, हवीय, हवीत, हवाय, हवंय, हवीय)

१. साहेब, मला लायसन्स ---------------------- त्यासाठी कोणती कागदपत्रं पाहिजेत?

२. भालचंद्र, काय ---------------------- तुला?

३. माझ्या गाडीच्या हेडलाईटचा बल्ब गेलाय. मला तो बल्ब --------------. देता का?

४. बाबा, मला नवीन गाडी ------------------. चारचाकी नको, दुचाकी ------------------.

५. मला सुट्टे पैसे ----------------------. आहेत का तुमच्याकडे?

६. अरे सुरेश, जरा पोटोबामधे येतोस का? काहीतरी खायला ----------------------.

## ९.७ आर.टी.ओ. ऑफिसमधली एक संध्याकाळ ... आर.टी.ओ. ऑफिस में एक शाम ...

**कर्मचारी :** **नमस्कार, बोला, काय काम आहे?**
नमस्ते, कहिए क्या काम है?

**सुरेंद्र :** **मला लायसन्स काढायचं आहे. त्यासाठी लागणारा फॉर्म हवाय.**
मैं लाइसेंस बनवाना चाहता हूँ। उसके लिए एक फार्म चाहिए।

**कर्मचारी :** **ठीक आहे. सोबत कागदपत्रं आणलीत का?**
ठीक है। साथ में कागज़ात लाए हैं क्या?




**सुरेंद्र :** **काय काय हवंय तुम्हाला?**
क्या क्या चाहिये आपको?

**कर्मचारी :** **एखादं ओळखपत्र आहे का तुमच्याकडे? मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, आधार कार्ड किंवा पॅन कार्ड?**
आपके पास कोई पहचान पत्र है क्या? मतदाता पहचान पत्र, पासपोर्ट, आधार कार्ड या पैन कार्ड?

**सुरेंद्र :** **मतदार ओळखपत्र नाहीये माझ्याकडे आणि पासपोर्टसुद्धा नाहीये. पण पॅन कार्ड आणि आधार कार्ड आहे.**
मेरे पास मतदाता पहचान पत्र नहीं है और मेरे पास पासपोर्ट भी नहीं है। लेकिन पैन कार्ड और आधार कार्ड है।

**कर्मचारी :** **यासोबतच तुमच्या जन्माचा दाखला आणि दोन फोटो हवेत मला.**
इसके साथ मुझे आप का जन्म प्रमाण पत्र और दो फोटो चाहिए।

**सुरेंद्र :** **जन्माचा दाखला आहे माझ्याजवळ. फोटो मात्र विसरलो.**
मेरे पास जन्म प्रमाण पत्र है। बस फोटो भूल गया।

**कर्मचारी :** **ते हवेत मला. त्याशिवाय काम होणार नाही. फोटो घेऊन या.**
फोटो तो मुझे लगेंगे। उस के बिना काम नहीं होगा। फोटो लेकर आओ।

## ९.८ सुरेंद्रकडे काय काय आहे आणि काय काय नाही आहे ते लिहू या.
सुरेंद्र के पास क्या है और क्या नहीं है वह लिखें।

| आहे ✔ | नाहीये × |
|---|---|
| पॅन कार्ड | |
| | |
| | फोटो |
| | |

## ९.९ वाचू या आणि लिहू या. पढ़ें और लिखें।



तो सामोसा

१. मला सामोसा हवाय.
मुझे समोसा चाहिए।



ती इडली

२. मला इडली हवीय.
मुझे इडली चाहिए।



ते कटलेट

३. मला कटलेट हवंय.
मुझे कटलेट चाहिए।



तो वडापाव

४. मला ----------------------
----------------------------------



ते थालीपीठ

५. मला ----------------------
----------------------------------




ती कांदाभजी

६. मला ----------------------
----------------------------------



ती पाणीपुरी

७. मला ----------------------
----------------------------------



ते पोहे

८. मला ----------------------
----------------------------------



ती अंडी

९. मला ----------------------
----------------------------------

## ९.१० हिवाळा, उन्हाळा, पुन्हा पावसाळा! शीत-, ग्रीष्म-, वर्षा ऋतु।



अरे, किती गरम होतंय!
उन्हाळा खूप आहे!
ओह, कितना तप रहा है।
बहुत गर्मी है।



पावसाळा सुरू झाला,
की छत्र्या बाहेर येतात.
बारिश शुरू होते ही
छाते बाहर आ जाते हैं।



नोव्हेंबर चालू झाला तरी
मुंबईत हिवाळा सुरू होत नाही.
नवंबर शुरू होने के बाद भी मुम्बई में
सर्दी का मौसम शुरू नहीं होता।

## ९.११ लक्षात ठेवा. ध्यान में रखें।

| महिने | ऋतू |
|---|---|
| फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे | उन्हाळा |
| जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर | पावसाळा |
| ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी | हिवाळा |

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो पैसा, ते पैसे**<br>पैसे | **ती गल्ली, त्या गल्ल्या**<br>गलियाँ | **ते मंदिर, ती मंदिरे**<br>मंदिर |
| **तो दाखला, ते दाखले**<br>प्रमाण पत्र | **ती माहिती**<br>जानकारी | **ते ओळखपत्र, ती ओळखपत्रे / ओळखपत्रं**<br>पहचान पत्र |
| **तो सामोसा, ते सामोसे**<br>समोसा | **ती इडली, त्या इडल्या**<br>इडली | **ते कटलेट, ती कटलेटे / कटलेटं**<br>कटलेट |
| **तो वडापाव, ते –**<br>वडापाव | **ती पाणीपुरी**<br>पानीपुरी | **ते थालीपीठ, ती थालीपीठे / थालीपीठं**<br>थालीपीठ |
| **तो पोहा, ते पोहे**<br>पोहा | **ती गोष्ट, त्या गोष्टी**<br>कहानी | **ते अंडे / अंडं, ती अंडी**<br>अंडा / बैदा |
| **तो उन्हाळा, ते उन्हाळे**<br>गर्मी का मौसम | **ती चेष्टा, त्या –**<br>मज़ाक | **ते कांदाभजे / कांदाभजं, ती कांदाभजी**<br>प्याज़ का पकौड़ा |
| **तो पावसाळा, ते पावसाळे**<br>बारिश का मौसम | **ती बोलणी**<br>डांट | **ती कागदपत्रे (फक्त अनेकवचन)**<br>कागज़ात |
| **तो हिवाळा, ते हिवाळे**<br>सर्दी का मौसम | **ती चारचाकी, त्या चारचाक्या**<br>गाडी | |
| **तो प्रवासी, ते –**<br>यात्री | **ती दुचाकी, त्या दुचाक्या**<br>साइकिल / मोटर साइकिल | |

| क्रियापद | इतर शब्द |
|---|---|
| **विसरणे**<br>भूलना | **प्रवासिदेवो भव।**<br>प्रवासी देवच असतो. / प्रवासी देवता होता है। |
| **सुरू होणे**<br>शुरू होना | **पक्कं**<br>पक्का |
| **बाहेर येणे**<br>बाहर आना | **सोबत**<br>साथ |
| **हवंय / हवीय**<br>चाहिए | **त्याशिवाय**<br>उसके बिना / सिवाय |
| **पाहिजे**<br>चाहिए | |

## चिंटू



# १० एक दिवस आर.टी.ओ.मध्ये









**चला, शिकू या...**

चलो, सीखें...

- ✔ **शासकीय कागदपत्रे वाचणे आणि समजणे**
  सरकारी दस्तावेजों की जानकारी
- ✔ **काही अर्ज भरणे आणि समजणे**
  परिवहन विभाग में जमा किए जाने वाले कुछ आवेदन पत्र

## १०.१ रिक्षा चालवताना पाळायचे नियम. रिक्शा चलाते समय इन नियमों का पालन करें।

१. ड्युटीवर जाताना स्वच्छ युनिफॉर्म घालावा, छातीच्या डाव्या बाजूस बॅच लावावा व लायसन्स बरोबर ठेवावे.

ड्यूटी पर जाते समय साफ वर्दी पहनें, सीने की बायीं ओर बैज लगाएं और लाइसेंस साथ रखें।



**जोड्या जुळवू या.** जोड़ियाँ बनाएँ।

| | |
|---|---|
| क. स्वच्छ युनिफॉर्म | १. ठेवावे |
| ख. बॅच छातीच्या डाव्या बाजूस | २. घालावा |
| ग. लायसन्स बरोबर | ३. लावावा |
| क. ------------ ख. ------------ ग. ------------ | |

२. ड्युटीवर जाताना पान तंबाखू खाऊ नये, बिडी ओढू नये, मद्यपान करू नये.

ड्यूटी पर जाते समय पान तंबाकू न खाएं, धूम्रपान न करें, शराब न पीएं।

**चूक की बरोबर.** सही या गलत पहचानें।

| | |
|---|---|
| क. पान तंबाखू रोज खावे. | ☐ |
| ख. बिडी खाऊ नये. | ☐ |
| ग. मद्यपान करू नये. | ☐ |

३. पॅसेंजर सामान गाडीत विसरला असेल तर नजीकच्या पोलीस स्टेशनमधून त्याची पोचपावती घ्यावी.

यदि यात्री गाड़ी में सामान भूल जाएं, तो निकटतम पुलिस स्टेशन से उसकी रसीद प्राप्त करें।



**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- पॅसेंजर सामान गाडीत विसरला असेल तर सामान ...
  - क. रस्त्यावर सोडून जावे
  - ख. पोलिसात जमा करावे
  - ग. घरी घेऊन जावे

**४. गाडी ताब्यात घेतेवेळी स्वच्छ आहे की नाही, ते पाहून ताब्यात घ्यावी. तसेच गाडीमध्ये टॅक्स बुक, फिटनेस विमा, परमिट, फर्स्ट एड बॉक्स आहे की नाही ते पाहावे.**

गाड़ी लेते समय ध्यान दें कि वह साफ है या नहीं और उसके बाद गाड़ी अपने अधिकार में ले लें। गाड़ी में टैक्स बुक, फिटनेस इंश्योरेंस, परमिट, फर्स्ट एड बॉक्स है या नहीं इसकी जाँच करें।

**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **गाडीमध्ये ...**

  **क. टॅक्स बुक असावे**
  **ख. परमिट नसावे**
  **ग. मोबाईल चार्जर असावे**

**५. पॅसेंजरला आरडाओरड करून बोलावू नये व शिफ्टवर असताना गाडी सोडून जाऊ नये.**

यात्री को चिल्लाकर न बुलाएं और ड्यूटी के समय गाड़ी छोड़कर न जाएं।

**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **पॅसेंजरला ...**

  **क. आरडाओरड करून बोलवावे**
  **ख. चुकीच्या ठिकाणी पोहोचवावे**
  **ग. आरडाओरड करून बोलावू नये**

**६. पॅसेंजरला जवळच्या रस्त्याने पोहोचवावे.**

यात्री को निकटतम मार्ग से पहुँचाएं।




**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **पॅसेंजरला ...**

  **क. लांबच्या रस्त्याने पोहोचवावे**
  **ख. जवळच्या रस्त्याने पोहोचवावे**
  **ग. चहा प्यायला न्यावे**

**७. एका गाडीपासून दुसरी गाडी लावताना २ ते ५ फूट अंतरावर गाडी लावल्यानंतर गाडी आपोआप चालू होणार नाही याची खात्री करून घ्यावी.**

एक गाड़ी के पीछे दूसरी गाड़ी लगाते समय २ से ५ फीट की दूरी रखने के बाद यह निश्चित करें कि गाड़ी अपने आप चालू न हो।

**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **एका गाडीपासून दुसरी गाडी लावताना ...**
  **क. २ ते ५ फूट अंतर ठेवावे**
  **ख. चिकटून लावावी**
  **ग. मित्राची मदत घ्यावी**

**८. गाडीत दोन फुलसीट व २ वर्षांचे आतील दोन मुले घेता येतात, पण अशा वेळी लगेज घेता येत नाही.**

गाड़ी में दो फुलसीट और २ साल से कम उम्र के दो बच्चे बिठाए जा सकते हैं, लेकिन ऐसे समय पर लगेज नहीं ले जा सकते।

**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **गाडीत दोन फुलसीट व २ वर्षांच्या आतील दोन मुले असतील तर ...**
  **क. दुप्पट पैसे घ्यावे**
  **ख. लगेज घेऊ नये**
  **ग. गाडी हळू चालवावी**

**९. लगेज भाडे नियमाप्रमाणे जे होईल ते घ्यावे. जास्तीत जास्त लगेज ४० किलो घेता येते.**

लगेज का किराया नियमों के अनुसार लें। ४० किलोग्राम तक अधिकतम लगेज लिया जा सकता है।

**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **जास्तीत जास्त लगेज ...**
  **क. ९० किलो घ्यावे**
  **ख. ४० किलो घ्यावे**
  **ग. घेऊ नये**

**१०. मीटर उभे असेल तर गाडी भाड्याने देणे आहे, आडवे असेल तर एंगेज आहे, खाली पडले असल्यास भाड्याने दिली आहे. वाटेत वाहनास तात्पुरता बिघाड झाल्यास वाहन दुरुस्त होईपर्यंत वाहन चालकाने मीटर बंद व आडवे ठेवावे. (वेटिंग चालू ठेवू नये)**

यदि मीटर ऊपर है, तो गाड़ी यात्री ले सकती है, समतल है, तो एंगेज है, नीचे है, तो भाड़ा चालू है। यदि वाहन अस्थायी रूप से खराब है, तो चालक मीटर बंद और समतल रखें जब तक कि वाहन ठीक नहीं हो जाता। [वेटिंग चालू मत रखिए]

**योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

- **वाटेत वाहनास तात्पुरता बिघाड झाल्यास वाहन दुरुस्त होईपर्यंत ...**
  **क. मीटर उभे ठेवावे**
  **ख. मीटर चालू ठेवावे**
  **ग. मीटर आडवे ठेवावे**

## १०.२ रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।

| |
|---|
| **घ्यावी, घेता, लावावी, ठेवावे, घ्यावे, घ्यावेत** |
| **क. एका गाडीपासून दुसरी गाडी २ ते ५ फूट अंतरावर ---------------------------.** |
| **ख. गाडी आपोआप चालू होणार नाही याची खात्री करून ---------------------------.** |
| **ग. गाडीत फक्त तीन पॅसेंजर ---------------------------.** |
| **घ. गाडीत पाच फुलसीट --------------------------- येत नाहीत.** |
| **च. भाडे नियमाप्रमाणे ---------------------------.** |
| **छ. वाहन तात्पुरतं बंद असल्यास मीटर बंद व आडवे ---------------------------.** |

## १०.३ आणखी थोडे नियम. और थोड़े नियम।

११. **वेटिंग चार्ज नियमाप्रमाणे जो होईल तो घ्यावा व वेटिंगसाठी जास्तीत जास्त दोन तास उभे राहावे.**
नियम के अनुसार जो वेटिंग चार्ज होगा वही लें और वेटिंग के लिए अधिकतम २ घंटे खड़े रहें।

१२. **मीटर पाडल्यानंतर नियमाप्रमाणे जे भाडे असेल व होईल ते घ्यावे.**
मीटर चालू होने के बाद नियमों के अनुसार जो किराया होगा वही लें।

१३. **सरकारी अधिकारी, डॉक्टर, वकील यांना अगोदर घ्यावे.**
सरकारी अधिकारी, डॉक्टर और वकील इन्हें पहले बैठने के लिए जगह दें।

१४. **गाडीत संसर्गजन्य रोगी घेऊ नये. अशा प्रवाशाने डॉक्टरचा दाखला हजर केल्यास परवानगी द्यावी.**
गाड़ी में छूत की बीमारी वाले व्यक्ति को न लें। ऐसे यात्री ने डॉक्टर का प्रमाणपत्र दिखाया तो उसे अनुमति दें।

१५. **गाडीत सुरुंगाची दारू, गॅस सिलेंडर, स्फोटक पदार्थ घेऊ नये.**
गाड़ी में किसी भी प्रकार का गोला-बारूद, गैस सिलेंडर, विस्फोटक पदार्थ न लें।

१६. **गाडीचा ॲक्सिडेंट झाल्यास गाडीतील पॅसेंजरवर प्रथमोपचार करावा; गाडी चालू स्थितीत असल्यास त्यांना प्रथम नजिकच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन जावे, परंतु जाण्यापूर्वी गाडी ज्या स्थितीत असेल त्यामध्ये बिघाड होऊ नये म्हणून गाडीच्या चाकाच्या जागी खुणा करून ठेवाव्यात. उपचार केल्यानंतर गाडी पूर्वीसारख्या स्थितीत ठेवावी व नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये कळवावे.**
अगर गाड़ी का ॲक्सिडेंट हो जाता है तो यात्री का प्राथमिक उपचार करें; यदि गाड़ी चालू स्थिति में है, तो यात्री को पहले निकटतम अस्पताल ले जाएँ; लेकिन जाने से पहले गाड़ी की अवस्था में बदलाव न हो इसलिये गाड़ी के पहियों की जगह पर निशान बनाएँ। उपचार के बाद गाड़ी को उसी अवस्था में रखें और पास के पुलिस स्टेशन में सूचित करें।

१७. **मीटर झाकून ठेवू नये. वाहन नादुरुस्त असल्याखेरीज किंवा सबळ कारणाशिवाय प्रवास भाडे नाकारू नये.**
मीटर को न ढ़कें। गाड़ी की खराबी या किसी ठोस कारण के बिना यात्री को ले जाने से मना न करें।

१८. **गणवेशात असलेले पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन निरीक्षक यांनी तपासणी करता परवाना मागितल्यास तो दिला पाहिजे.**
वर्दी पहने पुलिस अधिकारी या मोटर वाहन निरीक्षक के लाइसेंस माँगने पर उन्हें वह दिया जाना चाहिए।

**१०.४ वरील नियमांचे योग्य क्रमांक लिहू या.** ऊपर दी गयी सूचनाओं के सही क्रमांक लिखें।

| | |
|---|---|
| क. मीटर झाकून ठेवू नये. | ☐ |
| ख. वेटिंगसाठी जास्तीत जास्त दोन तास उभे राहावे. | ☐ |
| ग. गाडीचा ॲक्सिडेंट झाल्यास गाडीतील पॅसेंजरवर प्रथमोपचार करावा. | ☐ |
| घ. गाडीत स्फोटक पदार्थ घेऊ नये. | ☐ |
| च. तपासणी करता परवाना मागितल्यास तो द्यावा. | ☐ |
| छ. सरकारी अधिकारी, डॉक्टर, वकील यांना प्राधान्य द्यावे. | ☐ |
| ज. नियमाप्रमाणे भाडे घ्यावे. | ☐ |
| झ. संसर्गजन्य रोग्याने डॉक्टरचा दाखला हजर केल्यास त्या व्यक्तीला परवानगी द्यावी. | ☐ |

**१०.५ वरील सर्व नियम वाचून जोड्या जुळवू या.** ऊपर दी गयी सूचनाएँ पढ़ें और जोड़ियाँ लगाएँ।


| | |
|---|---|
| १. ड्युटीवर जाताना बरोबर ठेवायच्या गोष्टी | अ. ४० किलो |
| २. गाडीत न घेण्याच्या गोष्टी | ब. गाडीत प्रवासी आहे. |
| ३. सामानाचे जास्तीत जास्त वजन | क. स्वच्छ युनिफॉर्म, बॅच आणि लायसन्स |
| ४. यांना अगोदर घेईन. | ड. गाडी रिकामी आहे. |
| ५. मीटर उभे असेल तर | इ. सुरुंगाची दारू, गॅस सिलेंडर, स्फोटक पदार्थ |
| ६. मीटर खाली पडले असेल तर | ई. सरकारी अधिकारी, डॉक्टर, वकील |



**गब्बर :** बबन, मला हा फॉर्म भरायला मदत कर ना.

**बबन :** अगदी सोपं आहे. आपला रमाकांत काय सांगतोय ते ऐक.

## चिंटू



## १०.६ आर.टी.ओ. बाहेरील रांगेत ... आर.टी.ओ. के बाहर की कतार में ...



**काका : अरे बाळा, जरा मला मदत करतोस का?**
अरे बेटा, क्या तुम मेरी मदद करोगे?

**रमाकांत : बोला काका, काय हवंय?**
बोलिए चाचा, क्या चाहिए?

**काका : अरे, मला लिहिता-वाचता येत नाही. जरा हा फॉर्म भरून देशील का?**
मुझे पढ़ना लिखना नहीं आता। ज़रा यह फार्म भर दोगे?

**रमाकांत : हो, का नाही? बघू, काय फॉर्म आहे हा ... (रमाकांत फॉर्म बघतो) काका, पटापट तुमची माहिती सांगा मला. तुमचं नाव?**
जरूर, क्यों नहीं। देखूँ तो क्या फार्म है यह ... (रमाकांत फार्म देखता है।) चाचा, जल्दी से आपकी जानकारी बताइए मुझे। आपका नाम?

**काका : माझं नाव कांतिलाल भोजराज गुप्ता आहे; पण मी माझ्या मुलासाठी आलोय इथे. त्याचं नाव रमेश गुप्ता.**
मेरा नाम कांतिलाल भोजराज गुप्ता है; लेकिन मैं अपने बेटे के लिए यहाँ आया हूँ। उसका नाम रमेश गुप्ता।

**रमाकांत : तुमचा पत्ता आणि फोन नंबर सांगा. तुमचं काम काय आहे?**
आपका पता और फोन नंबर बताइए। आपका काम क्या है?

**काका : रूम नं. ४, अष्टविनायक चाळ, शिवाजी नगर, कांदिवली (प.). मला रिक्षाचालकाचा परवाना काढायचा आहे. माझ्या मुलाचा फोन नंबर मला माहीत नाही, बाळा. माझ्या मोबाईलमध्ये आहे. बघून लिहिशील का?**
रूम नं. ४, अष्टविनायक चाल, शिवाजी नगर, कांदिवली (प.)। मुझे रिक्शा चालक का परमिट बनवाना है। मेरे बेटे का फोन नंबर मुझे मालूम नहीं, बेटा। मेरे मोबाईल में है। देख कर लिख लोगे?

**रमाकांत : अच्छा, द्या तो फोन. हं ... मिळाला नंबर. ७६२५३४१६७८. अरे हो ... त्या एजंटचा नंबरपण हवाय. घेऊ का?**
अच्छा लाओ वह फोन। हं ... नंबर मिला। ७६२५३४१६७८। अरे, उस एजेंट का नंबर भी चाहिये। ले लूँ?

**काका : हो, घे ना.**
हाँ, ले लो।

**रमाकांत : मिळाला, काका. ९९८७५५४४३२. घ्या, काका, झाला फॉर्म भरून.**
मिल गया, चाचा। ९९८७५५४४३२। ये लो, चाचा, हो गया फार्म पूरा।

**काका : धन्यवाद, बाळा. खूप मोठी मदत केलीस तू मला. देव तुझं भलं करो. येतो मी.**
धन्यवाद, बेटा। तुमने मेरी बहुत मदद की। भगवान तुम्हारा भला करे। मैं चलता हूँ।

**१०.७ वरील संवाद वाचून खालील अर्ज भरू या.** ऊपर दिया गया संवाद पढ़ें और अर्ज भरें।

**अधिकार पत्र**

मी श्री. / श्रीमती ------------------------------------------------
राहणार ------------------------------------------------
दूरध्वनी क्र. ------------------------------------------------
परिवहन कार्यालयातील माझ्या ------------------------------------------------
------------------------------------------------
कामासाठी श्रीयुत / श्रीमती ------------------------------------------------
राहणार ------------------------------------------------
दूरध्वनी क्र. ------------------------ यांची एजंट / प्रतिनिधी म्हणून नेमणूक करत आहे.
या नेमणुकीची संपूर्ण जबाबदारी माझी राहील, याची मला जाणीव आहे.
एजंट स्वाक्षरी स्वाक्षरी
दिनांक : ------------------------
ठिकाण : ------------------------

नवीन रिक्षा परवाना मिळणेकामी / मिळण्यासाठी
नामनिर्देशन प्रमाणपत्र

मी श्री. / ~~श्रीमती~~ आशिष नरहर वाजपेयी
रा. २०२, रामकृष्ण सोसा. अनंत चौक, गोरेगाव (प.) - असे कथन करतो की, आ. क्र. ४५३२ दिनांक २१-८-२०१८ नुसार ऑटोरिक्षा परवाना मिळण्यासाठी मी अर्जदार असून, सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर मला ऑटोरिक्षा परवाना प्रदान झाल्यास माझा वारसदार पुढीलप्रमाणे आहे.

| वारसदाराचे नाव | अर्जदाराशी नाते | वय |
|---|---|---|
| अश्विनीकुमार आशिष वाजपेयी | मुलगा | २१ वर्षे |

साक्षीदार क्र. १: नाव व पत्ता : किसन राजा पाटील, ५०५, मोरया गोसावी पार्क, आग्रा रोड, गोरेगाव (पू.)
स्वाक्षरी : ------------------------
साक्षीदार क्र. २: नाव व पत्ता : जीत किरण प्रजापती, सी-४०७, फ्लॉवर व्हॅली, एस्.एन्. रोड, बांद्रा (पू.)
स्वाक्षरी : ------------------------

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

## १०.८ चूक की बरोबर ते ओळखू या. सही या गलत पहचानें।

| | बरोबर | चूक |
|---|---|---|
| १. अश्विनीकुमार हा आशिषचा वारसदार आहे. | | |
| २. आशिष गोरेगावला राहतो. | | |
| ३. अर्जामध्ये अश्विनीकुमारने सही करणे गरजेचे आहे. | | |
| ४. आशिषला ऑटोरिक्षा परवाना प्रदान झाल्यावर अश्विनीकुमार वारसदार होईल. | | |
| ५. किसन मालाडला राहतो. | | |
| ६. अर्जामध्ये किसन आणि जीतने सही करावयाची आहे. | | |

नवीन रिक्षा परवाना मिळणेकामी / मिळण्यासाठी

नामनिर्देशन प्रमाणपत्र

मी श्री. / श्रीमती ------------------------------------------------

रा. ---------------------------------------------------- असे कथन करतो की,

आ. क्र. ----------------- दिनांक ----------------- नुसार ऑटोरिक्षा परवाना मिळण्यासाठी मी अर्जदार असून, सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर मला ऑटोरिक्षा परवाना प्रदान झाल्यास माझा वारसदार पुढीलप्रमाणे आहे. (... के अनुसार, मैं लाइसेंस प्राप्त करने के लिए एक आवेदक हूँ, और सभी आवश्यक कागजात की ज़ाँच के बाद और मुझे ऑटो रिक्शा लाइसेंस मिलने पर मेरा वारिस नीचे दिया गया है।)

| वारसदाराचे नाव | अर्जदाराशी नाते | वय |
|---|---|---|
| | | |

साक्षीदार क्र. १

नाव व पत्ता : ------------------------------------------------

स्वाक्षरी : ----------------------

साक्षीदार क्र. २

नाव व पत्ता : ------------------------------------------------

स्वाक्षरी : ----------------- अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी : -----------------

दिनांक : १२-१२- २०१८

## टॅक्सी / रिक्षा परवान्याकरिता इरादापत्र जारी करण्याबाबत

अर्जदाराचे नाव :- श्री॰ / श्रीमती मनमोहन गजानन शुक्ल. रा॰ अंधेरी

यांनी रिक्षा / टॅक्सी करिता ऑनलाईन अर्ज सादर केलेला आहे. स्टॅन्ड अंधेरी अनुज्ञप्ती क्रमांक MH01 20110037885 वैधता १९-०८-२०२१ बॅज क्रमांक ५८८ Transaction ID ४३२३५६५४३२ Fee RS 500/- Receipt No. ३२१० Date ११-१२-२०१८ नुसार भरणा केलेला आहे. आज दिनांक १२-१२-२०१८ रोजी त्यांनी उपस्थित राहून खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

| अनु॰ क्र॰ | कागदपत्रांची यादी | जोडली आहे / नाही |
|---|---|---|
| १. | P.Co.P.A. अर्जाची प्रत | √ |
| २. | परवाना शुल्काच्या पेमेंटची प्रत | √ |
| ३. | वैध लायसन्स (मूळ प्रत व स्वसाक्षांकित छायांकित प्रत) | √ |
| ४. | बॅज (मूळ प्रत व स्वसाक्षांकित छायांकित प्रत) | √ |
| ५. | आधार कार्ड (मूळ प्रत व स्वसाक्षांकित छायांकित प्रत) | √ |
| ६. | SEC. प्रमाणपत्र क्र॰ ------------------ तहसीलदार ------------------ | √ |
| ७. | शैक्षणिक अर्हता ------------------ | |
| ८. | चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (मूळ प्रत) | |
| ९. | प्रतिज्ञापत्र (स्वयंघोषणापत्र) | √ |
| १०. | वारसाचे नामनिर्देशन पत्र | √ |
| ११. | २ फोटो | √ |

वरील सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली असल्याने इरादापत्र जारी करण्याकरिता आदेशार्थ.

शेरा :- वरील कागदपत्रांमधील क्रमांक ------------------ ची आवश्यक कागदपत्रे न जोडल्याने अर्जदाराचा अर्ज अमान्य करण्यात येत असून वरील सर्व कागदपत्रे सादर केल्यावरच अर्ज पुढील कार्यावाही करण्यात येईल.

मोटार वाहन निरीक्षक

<u>मान्यतेस्तव सादर</u>

१. उपरोक्त कागदपत्रांच्या पूर्ततेच्या अहवालाच्या अनुषंगाने इरादापत्र जारी करावे यासाठी शिफारस आहे.

२. सदर प्रकरणी खालील मुद्यांवर पूर्ण पडताळणी करावी असे प्रस्तावित

३. इरादाप्रमाणपत्र खालील कारणास्तव नाकरण्यात यावे असे प्रस्तावित

कनिष्ठ लिपिक
सहा. / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
कल्याण

**१०.९ वरील अर्ज वाचून खालील माहिती लिहू या.** ऊपर दिया गया आवेदन पढ़िए और नीचे जानकारी लिखें।

| | |
|---|---|
| अर्जदाराचे नाव | |
| अर्जदाराच्या लायसन्सची वैधता | |
| अर्जदाराने ऑनलाईन सादर केला / केला नाही | |
| अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे | |
| अर्जदाराने सादर न केलेली कागदपत्रे | |
| या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींवर स्वतःची सही (स्वसाक्षांकित) असणे आवश्यक आहे. | |

दिनांक :

<u>टॅक्सी / रिक्षा परवान्याकरिता इरादापत्र जारी करण्याबाबत</u>

अर्जदाराचे नाव :- श्री. / श्रीमती ----------------------------------------

रा. ------------------- यांनी रिक्षा / टॅक्सी करिता ऑनलाईन अर्ज सादर केलेला आहे. स्टॅन्ड --------------- अनुज्ञप्ती क्रमांक --------------- वैधता --------------- बॅज क्रमांक --------------- Transaction ID ............... Fee RS 500/- Receipt No. ............... Date ............... नुसार भरणा केलेला आहे. आज दिनांक ------------------------- रोजी त्यांनी उपस्थित राहून खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

| अनु. क्र. | कागदपत्रांची यादी | जोडली आहे / नाही |
|---|---|---|
| १. | P.Co.P.A. अर्जाची प्रत | |
| २. | परवाना शुल्काची पेमेंटची प्रत | |
| ३. | वैध लायसन्स (मूळ प्रत व स्वसाक्षांकित छायांकित प्रत) | |
| ४. | बॅज (मूळ प्रत व स्वसाक्षांकित छायांकित प्रत) | |
| ५. | आधार कार्ड (मूळ प्रत व स्वसाक्षांकित छायांकित प्रत) | |
| ६. | SEC. प्रमाणपत्र क्र॰ ------------------- तहसीलदार ------------------- | |
| ७. | शैक्षणिक अर्हता ------------------- | |
| ८. | चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (मूळ प्रत) | |
| ९. | प्रतिज्ञापत्र (स्वयंघोषणापत्र) | |
| १०. | वारसाचे नामनिर्देशन पत्र | |
| ११. | २ फोटो | |

वरील सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली असल्याने इरादापत्र जारी करण्याकरिता आदेशार्थ.

शेरा :- वरील कागदपत्रांमधील क्रमांक ---------------------------- ची आवश्यक कागदपत्रे न जोडल्याने अर्जदाराचा अर्ज अमान्य करण्यात येत असून वरील सर्व कागदपत्रे सादर केल्यावरच अर्जावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मोटार वाहन निरीक्षक

मान्यतेस्तव सादर

१. उपरोक्त कागदपत्रांच्या पूर्ततेच्या अहवालाच्या अनुषंगाने इरादापत्र जारी करावे यासाठी शिफारस आहे.
२. सदर प्रकरणी खालील मुद्यांवर पूर्ण पडताळणी करावी असे प्रस्तावित
३. इरादाप्रमाणपत्र खालील कारणास्तव नाकरण्यात यावे असे प्रस्तावित

कनिष्ठ लिपिक
सहा॰ / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
कल्याण

दिनांक :

<u>टैक्सी / रिक्शा लाइसेंस के लिए एक अपरिवर्तनीय लाइसेंस जारी करने के संबंध में</u>

आवेदक का नाम : - श्रीमान / श्रीमती ---------------- र. ---------------- इसने ऑटो रिक्शा / टैक्सी के लिए ऑनलाइन आवेदन जमा कर दिया है। स्टॅन्ड ---------------- लाइसेंस नंबर ---------------- वैधता ---------------- बैज नंबर ---------------- Transaction ID ______________ शुल्क रु. 500 / - रसीद नंबर -------------------- तिथि -------------------- भुगतान -------------------- के अनुसार किया जाता है। आज, दि. -------------------- दस्तावेज जमा किए गए हैं और निम्नलिखित दस्तावेज प्रस्तुत कर रहे हैं :

| अनु. क्र. | दस्तावेज़ सूची | जोड़ा गया है / नहीं |
|---|---|---|
| १. | P.Co.P.A. आवेदन प्रति | |
| २. | लाइसेंस शुल्क भुगतान की प्रति | |
| ३. | वैध लाइसेंस (मूल प्रति और स्वयं प्रमाणित छाया प्रति) | |
| ४. | बैज (मूल प्रतिलिपि और स्वयं प्रमाणित छायांकित प्रतिलिपी / छाया प्रति) | |
| ५. | आधार कार्ड (मूल प्रति और स्वयं प्रमाणित छायांकित प्रतिलिपी / छाया प्रति) | |
| ६. | SEC. सर्टिफिकेट नं. ........... तहसीलदार ........... | |
| ७. | शैक्षणिक पात्रता | |
| ८. | चरित्र सत्यापन प्रमाणपत्र (मूल प्रति) | |
| ९. | शपथ पत्र (स्व-प्रमाणित घोषणा-पत्र) | |
| १०. | उत्तराधिकारी नामांकन पत्र | |
| ११. | २ फोटो | |

<u>उपरोक्त सभी दस्तावेजों का उपक्रम जारी करने के उद्देश्य से पालन किया गया है।</u>

टिप्पणियाँ : - उपर्युक्त कागजात में क्र. ........................ आवश्यक दस्तावेजों की अनुपलब्धता और उपरोक्त सभी दस्तावेजों को जमा करने के बाद आवेदक का आवेदन अमान्य है, आवेदन संसाधित हो जाएगा।

मोटर वाहन निरीक्षक

<u>सम्मानपूर्वक प्रस्तुत किया</u>

१. उपरोक्त दस्तावेजों की आपूर्ति की रिपोर्ट के संबंध में एक आई आर ए जारी करने के लिए सिफारिशें।
२. इस मामले में, निम्नलिखित बिंदुओं पर सत्यापन पूरा करने का प्रस्ताव है।
३. इरादे के लिए प्रस्ताव नीचे दिए गए कारणों से खारिज कर दिया जाना चाहिए।

ज्युनिअर क्लर्क
सहायक उप-क्षेत्रीय परिवहन अधिकारी
कल्याण

**बंधपत्र**

दुचाकी वाहने चालवितांना चालकाने तसेच त्याच्यामागे बसलेल्या व्यक्तीने वाहन चालविले जात असतांना स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेट वापरणे मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १२९ अन्वये बंधनकारक केले आहे याविषयी मला जाणीव करून देण्यात आली आहे व माझ्या मागे बसलेल्या व्यक्तीच्या वाहन चालविताना सुरक्षिततेसाठी मी सदर तरतुदींचे पालन करीन अशी मी या बंधनपत्राद्वारे हमी देतो.

दिनांक : अनुज्ञप्तिधारकाचे नाव व सही

शपथ-पत्र (बॉन्ड)

दो पहिया वाहन चलाते समय चलाने वाला और उसके पीछे बैठने वाले व्यक्ति को वाहन चलाते समय साल १९८८ के धारा १२९ के तहत हेलमेट का उपयोग करना अनिवार्य है ऐसा निर्देशित किया जा रहा है और मुझे इसके बारे में अवगत कराया गया है, और मैं बाध्यकारी अनुबंध द्वारा आश्वासन देता हूँ कि मैं अपने पीछे बैठे व्यक्ति की सुरक्षा के प्रावधानों का पालन करूँगा।

तिथि : लाइसेंस धारक का नाम और हस्ताक्षर

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो मुद्दा, ते मुद्दे**<br>मुद्दा | **ती छाती, त्या छात्या**<br>सीना | **ते पान, ती पाने / पानं**<br>पन्ना / पत्ता |
| **तो रोगी, ते –**<br>रोगी | **ती बिडी, त्या बिड्या**<br>बीड़ी | **ते मद्यपान**<br>मद्यपान |
| **तो पदार्थ, ते –**<br>पदार्थ | **ती दारू**<br>शराब | **ते प्रमाणपत्र, ती प्रमाणपत्रे / प्रमाणपत्रं**<br>प्रमाणपत्र |
| **तो प्रथमोपचार, ते –**<br>प्राथमिक उपचार | **ती खूण, त्या खुणा**<br>निशान | **ते चारित्र्य, ती चारित्र्ये / चारित्र्यं**<br>चरित्र |

| | | |
|---|---|---|
| **तो बिघाड, ते –**<br>खराबी | **ती तपासणी, त्या तपासण्या**<br>निरीक्षण | **ते नाते / नातं, ती नाती**<br>रिश्ता |
| **तो उपचार, ते –**<br>उपचार | **ती स्वाक्षरी, त्या स्वाक्षऱ्या**<br>हस्ताक्षर | **ते कारण, ती कारणे / कारणं**<br>वजह |
| **तो पोशाख, ते –**<br>पोशाक | **ती नेमणूक, त्या नेमणुका**<br>नियुक्ति | |
| **तो निरीक्षक, ते –**<br>निरीक्षक | **ती जाणीव, त्या जाणिवा**<br>एहसास | |
| **तो देव, ते –**<br>भगवान | **ती सही, त्या सह्या**<br>हस्ताक्षर | |
| **तो प्रतिनिधी, ते –**<br>प्रतिनिधि | **ती प्रत, त्या प्रती**<br>फोटोकॉपी, ज़ीरॉक्स | |
| **तो वारसदार, ते –**<br>वारिस | **ती वैधता**<br>वैधता | |
| **तो साक्षीदार**<br>गवाह | **ती शिफारस, त्या शिफारशी**<br>सिफ़ारिश | |
| **तो लिपिक, ते –**<br>लिपिक | **ती तरतूद, त्या तरतुदी**<br>प्रावधान | |
| **तो अर्ज, ते –**<br>अर्जी | **ती हमी**<br>आश्वासन | |
| | **ती पडताळणी**<br>जाँच-पड़ताल | |
| | **ती तंबाखू, –**<br>तम्बाकू | |

## क्रियापदे

| | |
|---|---|
| **कळवणे**<br>सूचित करना | **नाकारणे**<br>इन्कार करना |
| **ठेवणे**<br>रखना | **निवडणे**<br>चुनना |

## इतर शब्द

| | | |
|---|---|---|
| **नजीक**<br>पास | **नादुरुस्त**<br>खराब | **प्रदान**<br>प्रदान |
| **अगोदर**<br>पहले | **सबळ**<br>सबल | **आवश्यक**<br>जरूरी |
| **उभा**<br>खड़ा | **श्रीयुत**<br>श्रीमान | **कनिष्ठ**<br>कनिष्ठ |
| **स्फोटक**<br>विस्फोटक | **श्रीमती**<br>श्रीमती | **प्रादेशिक**<br>क्षेत्रीय |
| **सादर**<br>सादर | **अनुसार**<br>अनुसार | **अमान्य**<br>अमान्य |
| **मूळ**<br>मूल | **बंधनकारक**<br>बाध्य | |

# किती झाले ? ११











**चला, शिकू या...**

चलो, सीखें...

- ✔ **प्रवाशाला माहिती देणे**
  यात्री को जानकारी देना
- ✔ **रिक्षा / टॅक्सीचे भाडे सांगणे**
  रिक्शा / टैक्सी का किराया बताना
- ✔ **हा, ही, हे, तो, ती, ते : दर्शक सर्वनामे वापरणे**
  यह, ये, वह, वे : दर्शक सर्वनाम
- ✔ **'पण' आणि 'आणि'चा फरक ओळखणे**
  लेकिन – और का अंतर

**११.१ खालील चित्रे पहा.** तस्वीरें देखें।



**हे हात मला दे, ठाकूर!**
ये हाथ मुझे दे दे ठाकुर!



**भाई, तुला सही करावी लागेल.**
भाई, तुम्हें दस्तखत करने होंगे।



**तुम्हाला भीती वाटतेय का?**
आपको डर लग रहा है क्या?




**आपल्याला झोपायला हवं!**
हमें सोना चाहिए!



**भाई, तुम्ही असताना आम्हाला कसली काळजी?**
भाई, आपके होते हुए हमें किस बात की फिक्र?



**हा आहे हनी.**
**त्याला प्रिया आवडते.**
यह हनी है।
इसे प्रिया पसंद है।



**त्यांना तिच्यासोबत नाचायचंय.**
उनको उसके साथ नाचना है।



**तिला अनिल कपूर हवा.**
उसे अनिल कपूर चाहिए।

## ११.२ पत्र वाचू आणि ऐकू या. पत्र पढ़ें और सुनें।

प्रिय उल्हास,

कसा आहेस तू? तुला सांगितल्याप्रमाणे मी हे पत्र मराठीतून लिहिण्याचा प्रयत्न करतोय. पण मला ते जरा कठीण वाटतंय. मला कधी कधी कळत नाही काय लिहावं ते. पण तरीही तुझ्यामुळे मला थोडं थोडं मराठी येतय. माझ्यासारखंच तू माझ्या मुलाला म्हणजे सुनीलला मराठी शिकवावंस, असं मला वाटतं. मुंबईचे रस्ते मला हळू हळू पाठ होत आहेत. लोकसुद्धा मला मदत करतात. मी काही विचारलं तर त्यांना राग येत नाही.

बरेच दिवस आपण भेटलो नाही आहोत. मला तुला भेटायचं आहे. तुला रविवारी भेटायला जमेल का?

तुझा मित्र,
प्रकाश

प्रिय उल्हास,

तुम कैसे हो? जैसा कि तुम्हें कहा था, मैं इस पत्र को मराठी में लिखने की कोशिश कर रहा हूँ। लेकिन मुझे यह मुश्किल लग रहा है। मुझे कभी-कभी समझ में नहीं आता कि लिखना क्या है; लेकिन तुम्हारी वजह से मुझे थोड़ी बहुत मराठी आ रही है। मैं चाहता हूँ कि मेरी तरह तुम मेरे बेटे सुनील को मराठी सिखाओ। मुंबई की लगभग सभी सड़कें मुझे धीरे-धीरे याद हो रही हैं। लोग भी मेरी मदद करते हैं। अगर मैं कुछ पूछता हूँ, तो वे नाराज नहीं होते हैं।

हम कई दिनों से मिले नहीं हैं। मुझे तुमसे मिलना है। क्या हम रविवार को मिल सकते हैं?


तुम्हारा मित्र,
प्रकाश

## ११.३ चूक की बरोबर ते ओळखू या. सही या गलत पहचानें।

| | बरोबर | चूक |
|---|---|---|
| १. उल्हासला मराठीत पत्र लिहिणं कठीण वाटतंय.<br>उल्हास को मराठी में पत्र लिखना मुश्किल लग रहा है। | | |
| २. सुनील हा प्रकाशचा मुलगा नाही आहे.<br>सुनील प्रकाश का बेटा नहीं है। | | |
| ३. प्रकाशला मुंबईचे रस्ते हळू हळू पाठ होत आहेत.<br>प्रकाश को मुंबई की लगभग सभी सड़कें धीरे-धीरे याद हो गयी हैं। | | |
| ४. सुनीलने लोकांना काही विचारलं तर त्यांना राग येतो.<br>सुनील लोगों से कुछ पूछता है, तो उनको गुस्सा आता है। | | |

## ११.४ वाचू या. पढ़ें।

| मी | आम्ही | तू | तुम्ही | आपण | तो | ती | ते | ते त्या ती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मला** मुझे | **आम्हाला** हमें / हमको | **तुला** तुझे / तुझको | **तुम्हाला** तुम्हें / तुमको | **आपल्याला** आपको | **त्याला** उसे / उसको | **तिला** उसे / उसको | **त्याला** उसे / उसको | **त्यांना** उनको |



**गब्बर** : अरे, बबन, तुला काय सांगू, प्रवासी काहीही प्रश्न विचारतात.

**बबन** : म्हणजे, काय झालं रे?

**गब्बर** : अरे, चांगलं जेवण कुठे मिळेल इथपासून ते आता दुपारच्या वेळी मार्केटमध्ये गर्दी असेल का इथपर्यंत काहीही प्रश्न विचारतात. खूपच कठीण आहे रे हे.

**बबन** : नाही रे, अगदी सोपं आहे. प्रवाशांना वाटतं आपण एवढे फिरतो त्यामुळे आपल्याला सगळं माहीत असेल, म्हणून विचारतात रे ते. असो. आपल्याला माहीत असेल तेवढं सांगायचं.

## ११.५ खालील संवाद ऐकू या आणि त्यांतील सर्वनामे अधोरेखित करू या. नीचे दिया संवाद सुनें और सर्वनामों को रेखांकित करें।

**प्रवासी** : **टॅक्सी! टॅक्सी!**
टैक्सी! टैक्सी!

**टॅक्सीचालक** : **नमस्कार मॅडम, कुठे जायचंय तुम्हाला?**
नमस्ते मैडम! कहाँ जाना है आपको?



**प्रवासी** : **एल.बी.एस. रोड?**
एल.बी.एस. रोड?

**टॅक्सीचालक** : **या, बसा.**
आइए, बैठिए।

**प्रवासी** : **एल.बी.एस. रोडला काही खायला मिळेल का? मला खूप भूक लागलीये.**
एल.बी.एस. रोड पर कुछ खाने के लिए मिलेगा क्या? मुझे बहुत भूख लगी है।

**टॅक्सीचालक** : **हो, मिळेल की! तो रोड प्रसिद्ध आहे. खूप हॉटेलं आहेत तिथे. तुम्हाला खरेदी करायची असेल तर जवळच बाजारपण आहे, मॅडम.**

हाँ मिलेगा ना। वह रस्ता बहुत फेमस है। वहाँ बहुत सारे होटल हैं। आपको कुछ खरीदना हो तो पास में बाज़ार भी है, मैडम।

**प्रवासी** : **बाजार नकोय. मला खायला हवंय. माझ्यासोबत माझी मुलगी आहे. तिलासुद्धा भूक लागलीये. तिथे एखाद्या हॉटेलजवळ सोडा आम्हाला.**
नहीं। बाज़ार नहीं जाना। मुझे खाने के लिए कुछ चाहिए। मेरे साथ मेरी बेटी है। उसे भूख लगी है। उधर ही किसी होटल के पास छोड़ दो हमें।

**टॅक्सीचालक** : **ठीक आहे!**
ठीक है।

**प्रवासी** : **किती रुपये झाले?**
कितने पैसे हुए?

**टॅक्सीचालक** : **५२ रुपये.**
५२ रुपए हुए।

**प्रवासी** : **हे घ्या.**
ये लीजिए।

## ११.६ सर्वनामे अधोरेखित करू या. सर्वनाम रेखांकित करें।



उदा॰ ही माया आहे.
तिला चित्रपट पाहायला आवडतं.



क. हा अनिकेत आहे.
त्याला एक लहान बहीण आहे.



ख. ती राधा आहे.
तिला लाल रंग खूप आवडतो.



ग. तो शशांक आहे.
त्याला नवीन मोबाईल हवा आहे.

### ११.७ रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।

(त्याला, तुम्हाला, तिला, तुला)

१. ती रेवती आहे. आम्ही ------------------------------- रेवा म्हणतो.

२. हा सचिन आहे. सगळे जण ------------------------------- ओळखतात.

३. तुम्ही खूप छान काम करता. आम्ही ------------------------------- टी.व्ही.वरच्या मालिकेत रोज पाहतो.

४. इथे आहेस का तू? तुझी आई ------------------------------- बोलावते आहे.

### ११.८ रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।


क. मी ------------------------------- शोधत आहे. (तो)


ख. ------------------------------- काय हवंय? (तुम्ही)

ग. ------------------------------- त्यांना भेटायचंय. (मी)

घ. आधी ------------------------------- भेटीचं कारण द्यावं लागतं. (आम्ही)

### ११.९ वाचू या. पढ़ें।

| | |
|---|---|
|  | **सुरेश चॉकलेट खातोय.**<br>सुरेश चॉकलेट खा रहा है। |
|  | **रमेश आणि सुरेश चॉकलेट खातायत.**<br>रमेश और सुरेश चॉकलेट खा रहे हैं। |
|  | **रमेश चॉकलेट खातोय; पण त्याचे बाबा खात नाहीयेत.**<br>रमेश चॉकलेट खा रहा है; लेकिन उसके पिता नहीं खा रहे हैं। |

| | |
|---|---|
|  | **‘अंदाज अपना अपना’मध्ये आमिर खान आणि सलमान खान नायक आहेत.**<br>‘अंदाज अपना अपना’ में आमिर खान और सलमान खान नायक हैं। |
|  | **सलमानला काहीतरी बोलायचंय; पण आमिर त्याला बोलू देत नाहीये.**<br>सलमान कुछ बोलना चाहता है, लेकिन आमिर उसे बोलने नहीं दे रहा। |
|  | **रिक्षा आणि टॅक्सी चालवण्यासाठी लायसन्स लागतं.**<br>रिक्शा और टैक्सी चलाने के लिए लाइसेन्स लगता है। |
|  | **सायकल चालवण्यासाठी लायसन्स लागत नाही.**<br>साइकिल चलाने के लिए लाइसेन्स नहीं लगता। |
|  | **ट्रक चालवण्यासाठी वेगळं लायसन्स लागतं.**<br>ट्रक चलाने के लिए अलग लाइसेन्स लगता है। |

**११.१० रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।


**(आणि, पण, आणि)**

**क. लायसन्ससाठी अर्ज, फोटो ---------------------------- कागदपत्रे लागतात.**

**ख. रिक्षा ---------------------------- टॅक्सी चालवताना युनिफॉर्म घालणे आवश्यक आहे.**

**ग. टॅक्सी चालवताना योग्य रस्त्याने चालवावी; ---------------------------- जवळचा रस्ता माहीत असल्यास शक्यतो तिथून न्यावी.**


## ११.११ वाचू या. पढ़ें।



हा टी॰व्ही॰ आहे.
यह टीवी है।



ही खुर्ची आहे.
यह कुर्सी है।



हे सफरचंद आहे.
यह सेब है।



हा कॉम्प्यूटर आहे.
यह कंप्यूटर है।



ही बॅग आहे.
यह बैग है।



हे घड्याळ आहे.
यह घड़ी है।



हा चेंडू आहे.
यह गेंद है।



ही गाडी आहे.
यह गाड़ी है।



हे पुस्तक आहे.
यह किताब है।

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तो – त्याला | हा – ह्याला / याला | ते | | हे | |
| ती – तिला | ही – हिला | त्या | त्यांना | ह्या / या | ह्यांना / यांना |
| ते – त्याला | हे – ह्याला / याला | ती | | ही | |

### लक्षात ठेवा.

१. हा सुरेश आहे. तो रमेश आहे. यह सुरेश है। वह रमेश है।
२. ही टॅक्सी आहे. ती रिक्षा आहे. यह टैक्सी है। वह रिक्शा है।
३. हे आधारकार्ड आहे. ते पॅन कार्ड आहे. यह आधारकार्ड है। वह पैन कार्ड है।

'हा, ही, हे' या सर्वनामांनी जवळची वस्तू दाखवली जाते.
'हा, ही, हे' इन सर्वनामों से करीब की वस्तुएँ दिखाई जाती हैं।
'तो, ती, ते' या सर्वनामांनी लांबची वस्तू दाखवली जाते.
'तो, ती, ते' इन सर्वनामों से दूर की वस्तुओं के बारे में बताया जाता है।

११.१२ **सर्वनामे आणि नामे यांच्या जोड्या जुळवू या.** जोड़ियाँ बनाएँ।

हा, ही, हे, ह्या, तो, ती, ते, त्या



(घड्याळ, सीडी, दूध, बॅग, खुर्च्या, पुस्तक, टूथपेस्ट, भाज्या, फळे, कॉफी, शर्ट, टेबल, कॉम्प्युटर,)

| हा ही हे ह्या | तो ती ते त्या |
|---|---|
| उदा॰ हा चहा, | |

११.१३ **रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

१. नमित रिक्षा छान चालवतो, पण ------- माणूस नीट चालवत नाही. (तो, ही, ते)
२. ------- स्कूटर घे, ती नको. (ते, हे, ही)
३. लायसन्स काढायचंय ना, मग हा फोटो घे, ------- छोटा फोटो नको. (तो, हा, ते)
४. मला ------- पुस्तक नको, ------- हवंय. (हे, ही, ते)
५. या मुली खूप घाईत आहेत, ------- मुलींना कसलीच घाई नाहीये. (ह्या, त्या, हे)
६. अरे ------- पोलीस खूप कडक आहेत, तो पोलीस तर काही बोलतच नाही. (हा, ही, हे)

**११.१४ वाचू या आणि सर्वनामे लक्षात ठेवू या.** पढ़ें व नीचे दिए गए सर्वनामों पर ध्यान दें।

**(हे, तो, हा, त्या, तो, ते, या, ही, ती)**




**प्रवासी : टॅक्सी! टॅक्सी!**

**टॅक्सीचालक : नमस्कार मॅडम, कुठे जायचंय तुम्हाला?**
नमस्ते मैडम! कहाँ जाना हैं आपको?

**प्रवासी : एल॰बी॰एस॰ रोड?**

**टॅक्सीचालक : या, बसा. हे सामान मागे ठेवू?**
आओ, बैठो। यह सामान पीछे रखूँ?

**प्रवासी : नको. ते सामान मी माझ्याजवळच ठेवते.**
नहीं। मैं यह सामान अपने पास ही रखती हूँ।

**प्रवासी : एल॰बी॰एस॰ रोड ला काही खायला मिळेल का? मला खूप भूक लागलीये.**
एल॰बी॰एस॰ रोड पर कुछ खाने के लिए मिलेगा क्या? मुझे बहुत भूख लगी है।

**टॅक्सीचालक : हो, मिळेल की! तो रोड प्रसिद्ध आहे. खूप हॉटेलं आहेत तिथे.**
हाँ मिलेगा ना। वह रोड बहुत प्रसिद्ध है। वहाँ बहुत सारे होटल हैं।

**प्रवासी : मी असं ऐकलंय की तिथे रामदेव हॉटेल आहे. त्या हॉटेलजवळ सोडा आम्हाला. आणि इथे एक छत्री आहे या बाजूला. ही तुमची आहे का?**
मैंने सुना है कि वहाँ रामदेव होटल है। हमें उस होटल के पास छोड़ दीजिए। और यहाँ एक छाता है, इस तरफ। क्या यह आपका है?

**टॅक्सीचालक : हो. ती छत्री माझीच आहे. आणि मॅडम, तुम्हाला खरेदी करायची असेल तर जवळच बाजारपण आहे. हा बघा बाजार. भरपूर काय काय मिळतं इथे.**
हाँ। वह छाता मेरा है। और मैडम, अगर आप कुछ खरीदना चाहती हैं तो पास में बाज़ार भी है। वह रहा बाज़ार। यहाँ बहुत सी चीजें मिलती हैं।

**प्रवासी : नाही. बाजार नकोय. खायला हवंय. माझ्यासोबत माझी मुलगी आहे. तिलासुद्धा भूक लागलीये.**
नहीं। बाज़ार नहीं जाना। मुझे खाने के लिए कुछ चाहिए। मेरे साथ मेरी बेटी है। उसे भी भूख लगी है। उधर ही किसी होटल के पास छोड़ दो हमें।

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो शर्ट, ते –**<br>शर्ट | **ती खुर्ची, त्या खुर्च्या**<br>कुर्सी | **ते पत्र, ती पत्रे / पत्रं**<br>खत |
| | **ती टूथपेस्ट, त्या टूथपेस्टी**<br>टूथपेस्ट | **ते कारण, ती कारणे / कारणं**<br>वजह |
| | **ती भाजी, त्या भाज्या**<br>सब्जी | **ते सफरचंद, ती सफरचंदे / सफरचंदं**<br>सेब |
| | **ती कॉफी**<br>कॉफी | **ते फळ, ती फळे / फळं**<br>फल |
| | | **ते टेबल, ती टेबले / टेबलं**<br>टेबल |

## क्रियापद

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **नाचणे**<br>नाचना | **जमणे**<br>हो पाना / हो सकना | **लागणे**<br>लगना | **शिकवणे**<br>सिखाना | **घालणे**<br>पहनना |



**धनाजी :** साहेब, ब्रेक फेल झालेत आणि रिक्षा थांबत नाही आहे. काय करू?
**देशपांडे :** सर्वात आधी तुम्ही मीटर बंद करा.

# १२ रस्त्यावरील गफलती










## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **आज्ञा देणे, विनंती करणे**
  आदेश देना, अनुरोध करना
- **करणे - कर / करा : आज्ञार्थी आणि विध्यर्थी क्रियापदे वापरणे**
  करना - करो / किजिए : आज्ञार्थक क्रिया और क्रियापद का विध्यर्थ रूप

## १२.१ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



**पोलीस : अरे ए, थांबा रे तुम्ही दोघं.**
अरे ए, रुको, तुम दोनों।

**क्षितिज : काय झालं, साहेब?**
क्या हुआ, साहब?

**पोलीस : काय झालं? खाली उतर आधी, मग सांगतो. हेल्मेट कुठे आहे तुझं? चल, लायसन्स दाखव. गाडीची कागदपत्रं काढ. लवकर.**
क्या हुआ? पहले नीचे उतरो। फिर बताता हूँ। हेल्मेट कहाँ है तुम्हारा? लाइसेंस दिखाओ। स्कूटर के कागज़ाद निकालो। जल्दी।

**क्षितिज : हो साहेब.**
हाँ साहब।

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| करणे | कर | करा |
| चालवणे | चालव | चालवा |
| थांबणे | थांब | थांबवा |

**पोलीस : नाव सांग तुझं पटापट.**
नाम बताओ, फटाफट।

**क्षितिज : क्षितिज.**
क्षितिज।

**पोलीस : अच्छा. किती वेळा सांगतो आम्ही की हेल्मेट घालून गाडी चालवा. पण तरीही कोणी ऐकत नाही. बघू, दाखव ते पेपर.**
अच्छा। कितनी बार बताया गया है कि गाड़ी चलाते समय हेल्मेट पहनो। लेकिन कोई नहीं सुनता। चलो, दिखाओ सब पेपर।

**क्षितिज : माफ करा, साहेब. चूक झाली.**
माफ कर दो, साहब। गलती हो गयी।

**पोलीस : ते सगळं घरी बोलायचं. आणि काय रे, इन्श्युरन्स कुठेय गाडीचा? यात नाहीये.**
ये सब घर पर बोलो। और हाँ, बीमा कहाँ है स्कूटर का? इसमें तो नहीं है।

**क्षितिज : नाहीये, साहेब.**
नहीं है, साहब।

**पोलीस : मग घरी कोणी असेल तर त्यांना सांग की आणा म्हणून.**
अगर घर पर कोई होगा तो उसे लाने के लिए कहो।

**क्षितिज : घरी कोणी नाहीये, साहेब.**
घर पर कोई नहीं है, साहब।

**पोलीस : भर मग आता २६५ रुपयांचा दंड.**
फिर भरो २६५ रुपए जुर्माना।

## १२.२ आता पुढे ... अब आगे ...

**क्षितिज : जाऊ द्या न साहेब!**
जाने दो न साहब।

**पोलीस : कसं जाऊ देऊ? परत पुढच्या वेळी असाच हेल्मेटशिवाय गाडी चालवशील.**
ऐसे कैसे जाने दूँ? अगली बार ऐसे ही बिना हेल्मेट स्कूटर चलाओगे।

**क्षितिज : साहेब, आज पहिलीच वेळ. पुन्हा नाही होणार असं.**
साहब, आज पहली बार। वापस नहीं होगा ऐसा।

**पोलीस : मी कसा विश्वास ठेवू तुझ्यावर? आता दंड भर. म्हणजे पुढच्या वेळी लक्षात राहील. दे, चल, दंडाचे पैसे.**
मैं कैसे भरोसा करूँ? अभी जुर्माना भरो। फिर अगली बार याद रहेगा। चलो, जुर्माने के पैसे दो।

**क्षितिज : मी का देऊ?**
मैं क्यूँ दूँ?

**पोलीस : का म्हणजे? हेल्मेट घातलं नाहीस तू. नियम तोडलास तू. मग दंडही भर तूच.**
क्यूँ मतलब? तुमने हेल्मेट नहीं पहना। तुमने कानून तोड़ा। फिर अब जुर्माना भी तुम ही भरो।

**क्षितिज : पण मीच का? ती बाईपण गेली बघा हेल्मेटशिवाय. तिला का सोडलंत? बाई म्हणून?**
पर मैं ही क्यूँ? वह औरत भी गई देखो बिना हेल्मेट। उसे क्यूँ छोड़ा? औरत है इसलिए?

**पोलीस : एऽऽ! जास्त बडबड करशील तर सरळ ठाण्यात घेऊन जाईन.**
एऽऽ! ज्यादा बकवास की तो सीधा हवालात ले जाऊँगा।

**क्षितिज : बरं, बरं, भरतो मी दंड.**
ठीक है। ठीक है। भरता हूँ मैं जुर्माना।

**वाचू या.** पढ़ें।

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| करणे | कर | करा |
| सांगणे | सांग | सांगा |
| बोलणे | बोल | बोला |

| | | |
|---|---|---|
| वळणे | वळ | वळा |
| जाणे | जा | जा |
| वाजवणे | वाजव | वाजवा |
| देणे | दे | द्या |

**१२.३ खालील वाहतुकीची चिन्हे नीट पाहू या.** नीचे दिए गए यातायात के चिन्ह देखें।



सक्तीने डावीकडे वळा



सक्तीने उजवीकडे वळा



फक्त पुढे जा



सक्तीने डाव्या बाजूस रहा



सक्तीने पुढे जा अथवा डावीकडे वळा




सक्तीने पुढे जा अथवा उजवीकडे वळा




सक्तीने हॉर्न वाजवा



थांबू अथवा उभे राहू नये




थांबा



मार्ग द्या

**१२.४ तक्ता भरू या.** तालिका पूरी करें।

| येणे | ये | या |
|---|---|---|
| होणे | हो | व्हा |
| आणणे | ---------- | ---------- |
| काढणे | ---------- | ---------- |
| भरणे | ---------- | ---------- |
| दाखवणे | ---------- | ---------- |
| निवडणे | ---------- | ---------- |
| थांबणे | ---------- | ---------- |
| उतरणे | ---------- | ---------- |



**गब्बर :** अरे बबन, काल मला पोलिसांनी पकडलं. मला काय करावं हे कळतच नव्हतं.

**बबन :** अरे, अगदी सोप्पं आहे. आणि घाबरण्यासारखं काहीच नाही त्यात. पण आपण सिग्नल तोडायचा नाही हं. आणि कधी चूक झालीच तर काय करायचं हे आपल्या सुनीलकडून शीक.

**१२.५ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.** संवाद सुनें और पढ़ें।

सुनीलला पोलिसांनी अडवलंय....


**पोलीस : लायसन्स दाखव रे तुझं.**
तुम्हारा लाइसेंस दिखाओ।

**सुनील : हे घ्या, साहेब.**
यह लीजिये, साहब।

**पोलीस : समोरचं चिन्ह दिसत नाही का तुला. सांग जरा काय अर्थ होतो त्याचा?**
सामने बोर्ड नहीं दिख रहा है क्या तुझे? बता, इसका क्या मतलब है?

**सुनील : डावीकडे वळू नका.**
बाएँ न मुड़ें।





**पोलीस : म्हणजे मराठी समजतं ना? तरीही का वळलास?**
मतलब मराठी समझता है न? फिर भी क्यों मुड़ा?

**सुनील : माफ करा, साहेब. मी नवीन आहे मुंबईमध्ये.**
माफ करें, साहब। मैं मुंबई में नया हूँ।

**पोलीस : ते मला नको सांगूस. बघता येत नाही का तुला? मुंबईमध्ये नवीन आलास तर त्याचं काय? दंड भर आता तू.**
ये मुझे मत बताओ। दिखता नहीं है? मुम्बई में नये आए हो तो क्या हुआ? जुर्माना भरो अब तुम।

**सुनील : ठीक आहे, साहेब. भरतो. पण मला त्याची पावती सुद्धा द्या.**
ठीक है, साहब। भरता हूँ। पर मुझे उसकी रसीद भी दीजिए।

## १२.६ तक्ता भरू या. तालिका भरें।

| क्रियापद | अनौपचारिक | औपचारिक |
|---|---|---|
| | दे | |
| | | घ्या |
| | सांग | |
| भरणे | | |
| | | दाखवा |

## १२.७ रस्त्यावर मध्येच भांडण चालू आहे. अखिल टॅक्सी चालवताना ते पाहतो आणि उतरून तिथे जातो... संवाद सुनें।

**अखिल : अरे, हे काय चालू आहे? मला जरा सांगता का?**
ये क्या हो रहा है? क्या मुझे बता सकते हो?

**माणूस : या मुलाने माझ्या गाडीला धडक दिली आहे. मूर्ख मुलगा.**
इस लड़के ने मेरी कार को टक्कर मारी है। बेवकूफ कहीं का।

**अखिल : जरा शांत व्हा, काका. मी जरा बोलू का त्याच्याशी?**
ज़रा शांत हो जाईए, चाचाजी। मैं बात करूं उससे?

**माणूस : हो, बोल. पण माझं नुकसान झालंय त्याचं काय?**
हाँ करो; लेकिन मेरा जो नुकसान हुआ है उसका क्या?

**अखिल : थांबा, काका. काय रे मुला, सांगतोस का आता लवकर?**
रुकिये, चाचाजी। ए लड़के, बताओगे क्या हुआ अभी जल्दी से?




**मुलगा :** **अहो दादा, हे काकाच मध्ये आले आणि ब्रेक दाबला त्यांनी. आणि मला दोष देतायत ते. मी नीटच गाडी चालवतो.**
भैया, ये चाचा ही बीच में आए और ब्रेक दबाया इन्होंने। और अब मुझे दोष दे रहे हैं। मैं हमेशा सही ड्राइव करता हूँ।

**माणूस :** **गप्प बस. काहीही बोलू नकोस.**
चुप रहो। कुछ भी मत कहो।

**अखिल :** **काका, तुम्ही एक काम करता का? तिथे बाजूला जाऊन बसा तुम्ही. मला बोलू देता का त्याच्याशी? (मुलाकडे वळून) बघतोस ना तू किती नुकसान झालंय ते? पैसे कोण देणार?**
आप एक काम करोगे, चाचाजी? आप वहाँ बाजू में बैठ जाओ। मुझे उससे बात करने दोगे? (लड़के की तरफ मुड़ कर) देखा न कितना नुकसान हुआ है? पैसा कौन देगा?

**मुलगा :** **मी काय करू, दादा. माझी काहीच चूक नाही. सोडा मला, जाऊ द्या.**
मैं क्या करूँ, भैया? मेरी कोई गलती नहीं है। मुझे छोड़ दीजिए, जाने दीजिए।

## १२.८ वरील संवादातील क्रियापदे शोधू या आणि त्यांचे विनंतीरूप लिहू या.
ऊपर दिए गये संवाद में क्रिया पहचानें और विनती रूप लिखें।

| क्रियापद | विनंतीरूप | | |
|---|---|---|---|
| | तुम्ही | तू | |
| | | पु. | स्त्री. |
| करणे | करता का?<br>करेंगे / करेंगी क्या? | करतोस का?<br>करोगे / करेंगे क्या? | करतेस का?<br>करोगी / करेंगी क्या? |
| देणे | देता का? | देतोस का? | देतेस का? |
| | | सांगतोस का? | |
| होणे | होता का? | | |
| | बोलता का? | | |
| बसणे | | | |
| | | | सोडतेस का? |
| | जाता का? | | |

**१२.९ रिकाम्या जागी योग्य रूप लिहू या.** रिक्त स्थान भरें।

उदा॰ काका, मला तो अर्ज देता (देणे) का?

१. नमस्कार, मला तुम्ही मदत ........................? (करणे) माझी गाडी चालू होत नाहीये.

२. हाय करण, माझ्यासोबत आर॰टी॰ओ॰ ऑफिसला ........................ (चलणे) ना! साहेबांनी बोलावलंय मला.

३. मला तुमच्या रिक्षाची चावी ........................? (देणे) – हो, ही ........................ (घेणे) चावी.

४. रमेश : दादा, वेळ आहे का तुमच्याकडे? मला जरा बोलायचंय.
भावेश : ........................, (बोलणे) काय काम आहे तुझं?

५. काकू, आदित्यला खेळायला ........................ (पाठवणे) ना. आम्ही त्याची वाट बघतोय.
काकू : अरे त्याला बरं नाहीये. आज तुम्हीच खेळायला ............ (जाणे).

## चिंटू



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो मार्ग, ते –**<br>मार्ग | **ती सक्ती**<br>अनिवार्य | **ते नुकसान**<br>हानि |
| **तो अर्थ, ते –**<br>मतलब / अर्थ | **ती सूचना, त्या सूचना**<br>अनुदेश | |
| | **ती मनाई**<br>मना करना | |
| | **ती धडक, त्या धडका**<br>ठोकर / टक्कर | |
| | **ती गफलत, त्या गफलती**<br>गलती | |

## क्रियापदे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **उतरणे**<br>उतरना | **अडवणे**<br>रोकना | **थांबणे**<br>रुकना | **आणणे**<br>लाना | **मोडणे**<br>टूटना |
| **वाजवणे**<br>बजाना | **दाखवणे**<br>दिखाना | **काढणे**<br>निकालना | **सोडणे**<br>छोड़ना | **वळणे**<br>मुड़ना |

## इतर शब्द

| | |
|---|---|
| **पटापट**<br>जल्दी से | **अथवा**<br>या |

# ओय् तेरी! १३









## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **सूचना देणे**
  निर्देश देना
- **सल्ला देणे**
  सलाह देना
- **आज्ञार्थी आणि विध्यर्थी क्रियापदे व त्यांची नकारार्थी रूपे वापरणे**
  आज्ञार्थक और विध्यर्थ क्रियापद और उनके नकारात्मक रूप
- **१००च्या पुढील अंक ओळखणे आणि सांगणे**
  अंक : १०० के बाद पहचानना और पूछना
- **शिव्या देणे**
  गालियाँ देना

### १३.१ **'नाही म्हणा'** 'न / नहीं कहना।'

| | होकारार्थी<br>तू / तुम्ही | नकारार्थी<br>तू / तुम्ही |
|---|---|---|
| देणे | दे / द्या | देऊ नकोस / देऊ नका |
| करणे | कर / करा | करू नकोस / करू नका |
| वागणे | वाग / वागा | वागू नकोस / वागू नका |
| सोडणे | सोड / सोडा | सोडू नकोस / सोडू नका |
| बोलणे | बोल / बोला | बोलू नकोस / बोलू नका |

## सर्व टॅक्सी आणि रिक्षाचालकांसाठी सूचना....
सर्व टैक्सी और रिक्शा चालकों के लिए सूचना...

|  हे करा |  हे करू नका |
|---|---|
| **नेहमी सीट बेल्ट लावा.**<br>हमेशा सीट बेल्ट लगाएं। | **दारू पिऊन गाडी चालवू नका.**<br>शराब पीकर गाड़ी न चलाएँ। |
| **वेगमर्यादेचे पालन करा.**<br>गति सीमा का पालन करें। | **गाडी चालवताना मोठ्याने गाणी वाजवू नका.**<br>गाड़ी चलाते समय जोर जोर से गाने न बजाएँ। |
| **इतर वाहनांना जागा द्या. (सायकल, मोटार सायकल, चारचाकी इ.)**<br>अन्य वाहनों को जगह दें। (साइकिल, मोटर साइकिल, इ.) | **गाडी चालवताना दुसरी कामे करू नका. (उदा. खाणे, फोनवर बोलणे, इ.)**<br>गाड़ी चलाते समय अन्य काम न करें। (खाना, फोन पर बात करना, इ.) |
| **गाडी चालवताना आजूबाजूला नीट लक्ष द्या.**<br>ड्राइविंग करते समय, आसपास ठीक ध्यान दें। | **'नो पार्किंग' भागात गाडी उभी करू नका.**<br>'नो पार्किंग' क्षेत्र में गाड़ी पार्क न करें। |
| **इतर चालकांशी आदराने वागा.**<br>अन्य ड्राइवरों के साथ सम्मान के साथ बर्ताव करें। | **आपले किमती सामान गाडीत सोडू नका.**<br>गाड़ी में अपना कीमती सामान न छोड़ें। |

**१३.२ प्रकाशला टॅक्सी चालवायची आहे. त्याला खालीलपैकी योग्य सल्ला देऊ या. योग्य पर्याय निवडू या.** प्रकाश टैक्सी चलाना चाहता है। उसे निम्नलिखित सलाहों में से सही सलाह दें । सही विकल्प चुनें।

१. **प्रकाशकडे लायसन्स नाहीये.**
प्रकाश के पास लाइसेंस नहीं है।

- क. **लायसन्स काढू नकोस.** ☐
  लाइसेंस मत बनाओ।
- ख. **लायसन्स काढ.** ☐
  लाइसेंस बनाओ।
- ग. **लायसन्सची गरज नाहीये.** ☐
  लाइसेंस आवश्यक नहीं है।

२. **प्रकाश दारू पितो.**
प्रकाश शराब पीता है।

- क. **इतर वाहनांना जागा दे.** ☐
  अन्य वाहनों को जगह दें।
- ख. **सीट बेल्ट लाव.** ☐
  सीट बेल्ट लगाओ।
- ग. **दारू पिऊन गाडी चालवू नकोस.** ☐
  शराब पी कर गाड़ी मत चलाओ।

३. **प्रकाश गाडी वेगाने चालवतो.**
प्रकाश गाड़ी तेजी से चलाता है।

- क. **वेगमर्यादेचे पालन कर.** ☐
  गति सीमा का पालन करो।
- ख. **गाडी वेगात चालव.** ☐
  गाड़ी तेजी से चलाओ।
- ग. **गाडी पार्क कर.** ☐
  गाड़ी पार्क करो।

४. **गाडी चालवताना प्रकाशला फोन आला.**
गाड़ी चलाते समय प्रकाश को फोन आया।

- क. **फोनवर बोल.** ☐
  फोन पर बात करो।
- ख. **गाडी बाजूला घे आणि बोल.** ☐
  गाड़ी को एक तरफ ले लो और बात करो।
- ग. **गाडी चालवणं सोड.** ☐
  गाड़ी चलाना छोड़ दो।

**१३.३ खालील तक्ता भरू या.** तालिका पूरी करें।

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| न करणे | करू नकोस | करू नका |
| न घेणे | | |
| न पाळणे | पाळू नकोस | |
| न लिहिणे | | |
| न येणे | | येऊ नका |
| न चालवणे | | |

कधी कधी – “नको करूस, नको जाऊस, नको लिहूस...” असेही म्हणतात.

**१३.४ काही माणसे चुका करीत आहेत. खाली पाट्यांवर सूचना दिल्या आहेत. आपण योग्य त्या पाट्या निवडू या आणि लोकांना सल्ले / सूचना देऊ या.** कुछ लोग गलतियाँ कर रहे हैं। नीचे कुछ सूचनाएँ दी गयी हैं। उचित सूचना चुनें और लोगों को सुझाव दें।

क




ख





ग







घ




च




छ




ज

| | | | |
|---|---|---|---|
| **१. एक माणूस रस्त्यावर थुंकत आहे.**<br>एक आदमी सड़क पर थूक रहा है। | | **५. ड्रायव्हर गाडी चुकीच्या ठिकाणी लावत आहे.**<br>चालक गाड़ी गलत जगह पर पार्क कर रहा है। | |
| **२. लोक तिकीट घ्यायला गर्दी करत आहेत.**<br>टिकट लेने के लिए लोगों की भीड़ लगी है। | | **६. एक जण ओरडून बोलत आहे.**<br>एक आदमी चिल्ला कर बात कर रहा है। | |
| **३. एक व्यक्ती फोनवर बोलत आहे.**<br>एक व्यक्ति फोन पर बात कर रहा है। | | **७. एक माणूस वेगाने गाडी चालवत आहे.**<br>एक आदमी तेजी से गाड़ी चला रहा है। | |
| **४. एक व्यक्ती सिगारेट मागत आहे.**<br>एक व्यक्ति सिगरेट माँग रहा है। | | | |

**चला, अंक कसे बनतात ते पाहू या.** चलो, अंकों की रचना समझें।

१०१ – एकशे एक → १ × शे (१००) + १
१०२ – एकशे दोन → १ × शे (१००) + २
१०३ – एकशे तीन → १ × शे (१००) + ३
२०० – दोनशे → २ × शे (२००)
२०१ – दोनशे एक → २ × शे (२००) + १
३०० – तीनशे → ३ × शे (३००)
४०० – चारशे → ४ × शे (४००)
५०० – पाचशे → ५ × शे (५००)
१००० – एक हजार (हजार) → १ × हजार
२००० – दोन हजार → २ × हजार

**१३.५ खालील क्रमांक अक्षरात लिहू या.** नीचे दिये गए अंक शब्दों में लिखें।

१. १०५ ----------------
२. २२२ ----------------
३. ५३३ ----------------
४. ६७१ सहाशे एकाहत्तर
५. १००१ ----------------
६. ३४६ ----------------
७. ९९६ ----------------




**१३.६ खालील क्रमांक अंकांत लिहू या.** नीचे दिये गये शब्द अंकों में लिखें।

१. एकशे दहा ----------------------
२. तीनशे सतरा ----------------------
३. सातशे सत्तर ----------------------
४. आठशे अठ्ठ्याहत्तर ----------------------
५. एकहजार नऊ ----------------------
६. नऊशे नव्याण्णव ----------------------
७. सहाशे एकावन्न ६५१

**१३.७ आता शिव्यासुद्धा ...** अब गालियाँ भी ...



**गब्बर :** अरे बबन, काल मला एका रिक्षावाल्याचा खूप राग आला. तो माझ्या रिक्षाला ठोकणारच होता. कसाबसा वाचलो.
**बबन :** अरे देवा! मग काय बोललास तू त्याला?
**गब्बर :** मी काय बोलणार? मला एवढं मराठी कुठे येतंय?
**बबन :** अरे अगदी सोपं आहे रे. चल, संदीप आणि आकाश कसे भांडतायत ते ऐकू या.

## १३.८ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।

**आकाश : तू मूर्ख आहेस का रे, संदीप? तुझ्यामुळे मला भाडं मिळत नाहीये.**
तू पागल है क्या, संदीप? तेरी वजह से मुझे सवारी नहीं मिल रही।

**संदीप : ए साल्या, मला मूर्ख बोलू नकोस. तूच बेअक्कल आहेस.**
अबे साले, मुझे पागल मत बोल। तू ही बेवकूफ़ है।



**आकाश : मी बेअक्कल? तू मीटरपेक्षा जास्त पैसे घेतोस. १५० रुपये झाले तर तू २०० घेतोस. लाज वाटते का तुला? निर्लज्ज!**
मैं बेवकूफ़? तू तो मीटर से ज्यादा पैसा लेता है। १५० रुपए किराया हुआ तो तू २०० रुपए लेता है। शर्म नहीं आती क्या तुझे? बेशरम!

**संदीप : तुझ्याएवढा नालायक नाहीये मी. लायसन्स नसूनही रिक्षा चालवतोस. गाढव कुठला.**
तेरे जैसा कमीना नहीं हूँ मैं। लाइसेंस नहीं है फिर भी रिक्शा चलाता है। गधा कहीं का।

**आकाश : जा रे तू!**
जा बे।

## चिंटू



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो आदर**<br>आदर | **ती जागा, त्या –**<br>जगह | **ते पालन**<br>पालन |
| **तो कायदा, ते कायदे**<br>कानून | **ती मर्यादा, त्या –**<br>मर्यादा | **ते गाणे / गाणं, ती गाणी**<br>गाना |
| **तो बैल, ते –**<br>बैल | **ती शांतता**<br>शांति | **ते लक्ष**<br>ध्यान |
| **तो घोडा, ते घोडे**<br>घोड़ा | **ती गर्दी**<br>भीड़ | **ते धूम्रपान**<br>धूम्रपान |
| | **ती रांग, त्या रांगा**<br>कतार | **ते गाढव, ती गाढवे / गाढवं**<br>गधा |
| | **ती लाज, त्या लाजा**<br>शर्म | |

## क्रियापद

| | | | |
|---|---|---|---|
| **लावणे**<br>लगाना | **थुंकणे**<br>थूकना | **निवडणे**<br>चुनना | **मागणे**<br>माँगना |

## इतर शब्द

| | |
|---|---|
| **कृपया**<br>कृपया | **बुद्दू**<br>बेअक्ल |
| **इथे**<br>यहाँ | **साला**<br>साला |
| **मूर्ख**<br>मूर्ख | **हरामखोर**<br>हरामखोर |
| **बेअक्कल**<br>बेवकूफ़ | **नालायक**<br>नालायक |
| **मठ्ठ**<br>मूर्ख | **निर्लज्ज**<br>बेशर्म |
| **चक्रम**<br>पागल | **बेशरम**<br>बेशर्म |

# तुझं-माझं १४




## चला, शिकू या...
चलो, सीखें...

- **मालकी हक्क दाखवणे : माझा, माझी, माझे / माझं वापरणे**
  किसी व्यक्ति या वस्तु का दूसरे व्यक्ति या वस्तु से संबंध दिखाना : मेरा, मेरी ...
- **चा, ची, चे, चे च्या ची : सर्वनामाची षष्ठी ओळखणे आणि वापरणे**
  का, की, के ... : सर्वनाम के षष्ठी रूप
- **कोणाचा, कोणाची, कोणाचे, कोणाचं वापरणे**
  किसका, किसकी, किसके

**१४.१ खालील चित्रे पाहून गाळलेल्या जागा भरू या.** नीचे दिए गए चित्रों की मदद से रिक्त स्थान भरें।

| | | |
|---|---|---|
| <br>तो मोबाईल, ते मोबाईल<br>राधाचा मोबाईल,<br>राधाचे मोबाईल | <br>ती गाडी, त्या गाड्या<br>बबनची गाडी,<br>बबनच्या गाड्या | <br>ते घड्याळ, ती घड्याळे / घड्याळं बबनचे / चं घड्याळ,<br>बबनची घड्याळे / घड्याळं |
| <br>ती टॅक्सी, त्या टॅक्स्या<br>राधाची टॅक्सी, राधाच्या टॅक्स्या | <br>ती सायकल, त्या सायकली<br>बबनची सायकल, बबनच्या सायकली | |
| <br>तो ट्रक, ते ट्रक<br>राधाचा ट्रक, राधाचे ट्रक | <br>ती शाळा, त्या शाळा<br>राधाची शाळा, राधाच्या शाळा | |

उदा॰ राधाचा मोबाईल सोनीचा आहे. 

१. राधा-------- ---------------------------- पांढऱ्या रंगाचा आहे. 

२. बबन-------- ------------------------- हरवली आहे. 

३. राधा-------- ------------------------- पिवळ्या रंगाची आहे. 

४. राधा-------- ------------------------------- महात्मा गांधी मार्गावर आहे. 

५. बबन-------- ----------------- सोलेक्स कंपनीचे / कंपनीचं आहे. 

६. बबन-------- ------------------------- लाल रंगाची आहे. 



**गब्बर :** बबन, माझा नवीन गाडी आणि माझी फोन बघ.
**बबन :** छान आहे रे! पण **माझा फोन आणि माझी गाडी** म्हणावं.
**गब्बर :** बरं. **माझा फोन, माझी गाडी.**
**बबन :** अगदी बरोबर.

**१४.२ चूक की बरोबर ते ओळखू या आणि खूण करू या. चूक असल्यास दुरुस्त करून लिहू या.** सही या गलत बताएँ। गलत वाक्य सही रूप में लिखें।

| | बरोबर | चूक | बरोबर वाक्य |
|---|---|---|---|
| १. **प्रदीपचा शाळा डावीकडे आहे.**<br>प्रदीप का स्कूल बायीं ओर है। | | | |
| २. **घनश्यामचा परवाना मिळत नाहीये.**<br>घनश्याम का लाइसेंस मिल नहीं रहा है। | | | |
| ३. **भूषणचे (गाडीच्या) चाव्या हिरव्या रंगाच्या आहेत.**<br>भूषण की कार की चाबियाँ हरे रंग की हैं। | | | |
| ४. **रामचा मोबाईल टेबलच्या खाली आहे.**<br>राम का मोबाईल टेबल के नीचे है। | | | |
| ५. **सुनिताची ट्रक इथे नाहीये.**<br>सुनीता का ट्रक यहाँ नहीं है। | | | |

**वाचू या.** पढ़ें।

लक्षात ठेवा

प्रश्न (पुल्लिंगी) – कोणाचा? — उत्तर (पुल्लिंगी) – रोहनचा / त्याचा / तिचा

प्रश्न (स्त्रीलिंगी) – कोणाची? — उत्तर (स्त्रीलिंगी) – रोहनची / त्याची / तिची

प्रश्न (नपुंसकलिंगी) – कोणाचे? — उत्तर (नपुंसकलिंगी) – रोहनचे / त्याचे / तिचे

१. टॅक्सीचे चाक खड्ड्यात अडकले आहे.
२. रिक्षाची अवस्था वाईट आहे.
३. रिक्षाचे कव्हर फाटले आहे.
४. टॅक्सीचा मीटर बंद आहे.

**१४.३ खालील तक्ता वाचू या.** तालिका पढ़ें।

| | पु॰ एकवचन / अनेकवचन | स्त्री॰ एकवचन / अनेकवचन | नपुं॰ एकवचन / अनेकवचन |
|---|---|---|---|
| मी / | माझा – माझे | माझी – माझ्या | माझे / माझं – माझी |
| तू / | तुझा – तुझे | तुझी – तुझ्या | तुझे / तुझं – तुझी |
| तो / ते / | त्याचा – त्याचे | त्याची – त्याच्या | त्याचे / त्याचं – त्याची |
| ती | तिचा – तिचे | तिची – तिच्या | तिचे / तिचं – तिची |
| आम्ही | आमचा – आमचे | आमची – आमच्या | आमचे / आमचं – आमची |
| आपण | आपला – आपले | आपली – आपल्या | आपले / आपलं – आपली |
| तुम्ही | तुमचा – तुमचे | तुमची – तुमच्या | तुमचे / तुमचं – तुमची |
| ते / ती / त्या | त्यांचा – त्यांचे | त्यांची – त्यांच्या | त्यांचे / त्यांचं – त्यांची |

| | तो ट्रक / ते ट्रक | ती टॅक्सी / त्या टॅक्स्या | ते विमान / ती विमाने / विमानं |
|---|---|---|---|
| मी | हा माझा ट्रक आहे. हे माझे ट्रक आहेत. | ही माझी टॅक्सी आहे. या माझ्या टॅक्स्या आहेत. | हे माझे / माझं विमान आहे. ही माझी विमाने / विमानं आहेत. |
| तू | हा तुझा ट्रक आहे. हे तुझे ट्रक आहेत. | ही तुझी टॅक्सी आहे. या तुझ्या टॅक्स्या आहेत. | हे तुझे / तुझं विमान आहे. ही तुझी विमाने / विमानं आहेत. |
| तो / ते | हा त्याचा ट्रक आहे. हे त्याचे ट्रक आहेत. | ही त्याची टॅक्सी आहे. या त्याच्या टॅक्स्या आहेत. | हे त्याचे / त्याचं विमान आहे. ही त्याची विमाने / विमानं आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ती | हा तिचा ट्रक आहे.<br>हे तिचे ट्रक आहेत. | ही तिची टॅक्सी आहे.<br>या तिच्या टॅक्स्या आहेत. | हे तिचे / तिचं विमान आहे.<br>ही तिची विमाने / विमानं आहेत. |
| आम्ही | हा आमचा ट्रक आहे.<br>हे आमचे ट्रक आहेत. | ही आमची टॅक्सी आहे.<br>या आमच्या टॅक्स्या आहेत. | हे आमचे / आमचं विमान आहे.<br>ही आमची विमाने / विमानं आहेत. |
| आपण | हा आपला ट्रक आहे.<br>हे आपले ट्रक आहेत. | ही आपली टॅक्सी आहे.<br>या आपल्या टॅक्स्या आहेत. | हे आपले / आपलं विमान आहे.<br>ही आपली विमाने / विमानं आहेत. |
| तुम्ही | हा तुमचा ट्रक आहे.<br>हे तुमचे ट्रक आहेत. | ही तुमची टॅक्सी आहे.<br>या तुमच्या टॅक्स्या आहेत. | हे तुमचे / तुमचं विमान आहे.<br>ही तुमची विमाने / विमानं आहेत. |
| ते / त्या / ती | हा त्यांचा ट्रक आहे.<br>हे त्यांचे ट्रक आहेत. | ही त्यांची टॅक्सी आहे.<br>या त्यांच्या टॅक्स्या आहेत. | हे त्यांचे / त्यांचं विमान आहे.<br>ही त्यांची विमाने / विमानं आहेत. |

## १४.४ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



**कुशल : हॅलो आशिष, आहेस कुठे तू हल्ली?**
हॅलो आशिष, कहाँ हो तुम आज कल?

**आशिष : अरे मी आता मुंबईमध्ये असतो.**
अरे फिलहाल तो मैं मुंबई में रहता हूँ।

**कुशल : काय सांगतोस? तू नागपूरमध्ये नसतोस का?**
क्या बात कर रहे हो? तुम नागपुर में नहीं रहते हो क्या?

**आशिष : हो, मी तिथे नसतो.**
हाँ, मैं वहाँ नहीं रहता।

**कुशल : अच्छा. आणि तुझी बायको? ती तर असते ना नागपूरमध्ये?**
अच्छा। और तुम्हारी बीवी? वह तो नागपुर में ही रहती है न?

**आशिष : नाही रे, माझी बायकोसुद्धा माझ्यासोबत राहते.**
नहीं, मेरी बीवी भी मेरे साथ ही रहती है।

**कुशल : मुंबईमध्ये काय करतोस तू?**
मुंबई में क्या करते हो तुम?

**आशिष : मी रिक्षा चालवतो. काय रे, तुझा भाऊ असतो ना मुंबईमध्ये? तो डॉक्टर आहे ना?**
मैं रिक्शा चलाता हूँ। सुन, तेरा भाई रहता है न मुंबई में? वह डॉक्टर है न?

**कुशल : हो, पण तो मुंबईमध्ये नसतो. तो दिल्लीत असतो. त्याने दिल्लीत घर घेतले आहे. शनिवारी आणि रविवारी येतो तो मुंबईला.**
हाँ, पर वह मुंबई में नहीं रहता। वह दिल्ली में रहता है। उसने दिल्ली में घर लिया है। शनिवार और इतवार को वह मुंबई में आता है।

**आशिष : आणि तुझे बाबासुद्धा दिल्लीत असतात?**
और तेरे पिताजी भी दिल्ली में रहते हैं न?

**कुशल : नाही, माझे बाबा तिथे नसतात. ते नागपूरमध्ये असतात. त्यांची बहीण असते दिल्लीमध्ये.**
नहीं, मेरे पिताजी वहाँ नहीं रहते। वह नागपुर में रहते है। उनकी बहन रहती हैं दिल्ली में।

**आशिष : छान. चल जातो मी. ४ वाजले. कामं आहेत.**
अच्छा चलो! अब मैं चलता हूँ। ४ बज गए है। काम है।

**कुशल : ठीक आहे. मीसुद्धा निघतो आता. उद्या भेट मला. माझे काम आहे एक.**
ठीक है। मैं भी अब निकलता हूँ । कल मिल मुझे। मेरा एक काम है तेरे पास।

**आशिष : हो नक्की. उद्या भेटूयात. टाटा.**
हाँ, जरूर । कल मिलते हैं। बाय।

**१४.५ योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

१. ---------- भाऊ दिल्लीत असतो.
- क. कुशलचा
- ख. कुशलचे
- ग. कुशलची

२. आशिषच्या ------- तब्येत खराब आहे.
- क. बायकोचे
- ख. बायकोची
- ग. बायकोचा

३. ---------- बाबा दिल्लीमध्ये नसतात. ---------- भाऊ दिल्लीत असतो.
- क. कुशलचा, त्यांचे
- ख. कुशलची, त्यांचा
- ग. कुशलचे, त्यांचा

४. ---------------- आशिषकडे एक काम आहे.
- क. कुशलच्या
- ख. कुशलचे
- ग. कुशलची

**१४.६ रिकाम्या जागी कंसातील सर्वनामाचे योग्य रूप लिहू या.** रिक्त स्थान भरें।

उदा॰ ही गाडी (तो) त्याची आहे.

१. हा ट्रक (ते) ---------------- आहे.

२. (तुम्ही) ---------------- मुलगी विद्यापीठात शिकवते का?

३. (मी) ---------------- रिक्षा नवीन आहे.

४. (तू) ---------------- मोबाईल कुठे आहे?

५. (आपण) ---------------- पत्ता ह्या कागदावर लिहा.

६. (तो) ---------------- घड्याळे माझ्याकडे आहेत.

७. (ती) ---------------- नाव समृद्धी आहे.

**१४.७ योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

उदा॰ माझी रिक्षा नवीन आहे. (माझा - तिचा - माझी)

१. ---------------- ऑफिस (ते ऑफिस) लांब आहे. (त्याचा - त्याचं - त्याची)

२. ---------------- मैत्रीण (ती मैत्रीण) मुंबईत असते. (माझं - त्यांचा - माझी)

३. ---------------- मुलगा (तो मुलगा) डॉक्टर आहे. (माझी - त्यांची - त्याचा)

४. सुरेश, ---------------- गाडी कुठे आहे? (तुझी - त्याचा - तुझ्या)

५. ---------------- मित्र (तो मित्र) पोलीस आहे का? (आमची - तुझा - तिची)

# १४ तुझं-माझं

## दृष्टिक्षेप

| तो भ्रमणध्वनी, ते –<br>मोबाईल | ती चावी, त्या चाव्या<br>चाबी |
|---|---|



माझी रिक्षा
मेरा रिक्शा





माझी टॅक्सी
मेरी टैक्सी



# १५

# अति घाई, संकटात नेई










## चला, शिकू या...

चलो, सीखें...

- इतरांचे वर्णन करणे
  दूसरों का वर्णन करना
- एखाद्या प्रसंगाचे वर्णन करणे
  किसी घटना का वर्णन करना
- नवीन – जुना : विरुद्धार्थी विशेषणे ओळखणे आणि वापरणे
  विशेषणों के विलोम शब्द बताएँ
- पटकन, भरभर, ... : क्रियाविशेषण ओळखणे आणि वापरणे
  क्रियाविशेषण

## १५.१ काही विशेषणे ... कुछ विशेषण

**ही रिक्षा लहान आहे.**
यह रिक्शा छोटा है।






**हा ट्रक मोठा आहे.**
यह ट्रक बड़ा है।

**विमान जलद उडते.**
विमान तेज़ उड़ता है।





**जहाज हळू चालते.**
जहाज धीरे चलता है।

**हा मोबाईल नवीन आहे.**
यह मोबाईल नया है।





**हा मोबाईल जुना आहे.**
यह मोबाईल पुराना है।

**हे काका रागीट आहेत.**
ये चाचा गुस्सैल हैं।





**हे काका प्रेमळ आहेत.**
ये चाचा दयालु हैं।

**या बाई गरीब आहेत.**
यह महिला गरीब है।






**या बाई श्रीमंत आहेत.**
यह महिला अमीर है।

ही गाडी **महाग** आहे.
यह गाड़ी महंगी है।



ही गाडी **स्वस्त** आहे.
यह गाड़ी सस्ती है।

हे भाडे **कमी** आहे.
यह भाड़ा कम है।



हे भाडे **जास्त** आहे.
यह भाड़ा ज्यादा है।



**गब्बर :** अरे बबन, आज मी एक अपघात पाहिला. खूपच भयानक होता तो. पोलीस चौकशी करत होते.

**बबन :** मग काय केलंस तू. पोलिसांना सांगितलंस की नाही.

**गब्बर :** नाही बाबा. खूपच कठीण असतं ते. मला फार भीती वाटते.

**बबन :** वेडाच आहेस तू. अगदी सोपं आहे ते. पोलिसांना मदत करणं, त्यांना खरं खरं सांगणं हे आपलं कर्तव्य आहे.

### १५.२ पोलीस आणि नरेश अपघातस्थळी आहेत. पोलीस अपघाताबद्दल चौकशी करत आहेत.

रस्ते में पुलिस के साथ नरेश खड़ा है। पुलिस हादसे के बारे में पूछताछ कर रही है।

**पोलीस : इकडे ये रे तू. नाव सांग तुझं. काय काम करतोस तू?**
अरे, तुम जरा यहाँ आओ। नाम बताओ तुम्हारा। तुम क्या काम करते हो?

**नरेश : माझं नाव नरेश. मी रिक्षा चालवतो.**
मेरा नाम नरेश है। मैं रिक्शा चलाता हूँ।

**पोलीस : इथे अपघात झालेला तू पाहिलास का?**
क्या तुमने यहाँ हुआ एक्सीडेंट देखा?

**नरेश : हो पाहिला, साहेब. दुपारी ४ वाजून २५ मिनिटांनी अपघात झाला.**
हाँ देखा, साहब। यह एक्सीडेंट दोपहर ४ बजकर २५ मिनट पर हुआ।

**पोलीस : अच्छा ठीक आहे. अपघाताचं कारण माहीत आहे तुला? ही लाल गाडी कोणाची आहे?**
अच्छा, ठीक है। क्या तुम एक्सीडेंट का कारण जानते हो? यह लाल गाड़ी किसकी है?




**नरेश : त्या हरीशची गाडी आहे ती.**
उस हरीश की गाड़ी है ये।

**पोलीस : कोण आहे हा हरीश? कसा दिसतो तो? आणि कुठला आहे तो?**
कौन है यह हरीश? कैसा दिखता है वह? और कहाँ का है?

**नरेश : हरीश थोडा लठ्ठ आहे आणि जरासा ठेंगणा आहे. बोरीवलीला राहतो तो. पण पत्ता माहीत नाही मला त्याचा.**
हरीश थोड़ा मोटा और थोड़ा सा नाटा है। वह बोरीवली में रहता है। लेकिन मुझे उसका पता नहीं मालूम!

**पोलीस : ठीक आहे. अजून काही सांगू शकतोस का त्याच्याबद्दल?**
ठीक है। क्या तुम उसके बारे में मुझे और कुछ बता सकते हो?

**नरेश : हो साहेब. गरीब मुलगा आहे तो आणि हुशारपण आहे.**
हाँ साहब। वह एक गरीब लड़का है और होशियार भी है।

**पोलीस : अरे, त्याची गरज नाहीये आम्हाला. तो कसा दिसतो ते सांग. तो गोरा आहे की सावळा आहे की काळा आहे दिसायला? म्हणजे आम्ही त्याला शोधू. तो नेमका कुठे राहतो?**
हमें इसकी ज़रूरत नहीं है। यह बताओ कि वह कैसा दिखता है। वह गोरा है या काला है या साँवला है? इससे हम उसे ढूँढेंगे। दरअसल रहता कहाँ है वह?

**नरेश : तसा गोरा आहे तो दिसायला आणि केस लांब आहेत त्याचे.**
वैसे दिखने में तो वह गोरा है और बाल लंबे हैं उसके।

**पोलीस : ओके. पुढचं आम्ही बघतो. एवढं सगळं सांगितलंस, पण अपघाताचं कारण सांगितलं नाहीस! तू जा.**
ठीक है। इसके आगे हम जरूरी कार्रवाई करेंगे। तुमने इतना सब बताया, लेकिन एक्सीडेंट का कारण नहीं बताया! तुम जाओ!

**नरेश : धन्यवाद, साहेब.**
शुक्रिया साहब।

**१५.३ वरील संवाद ऐकून / वाचून त्यातील विशेषणे ओळखून लिहू या.** ऊपर दिया गया संवाद पढ़ कर / सुन कर विशेषण पहचान कर लिखें।

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## १५.४ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



**ही आहे श्रुती. तिला सगळे हळूबाई म्हणतात. ती सगळीच कामं खूप हळूहळू करते. ती हळू जेवते, हळू चालते, बोलतेही सावकाश.**

यह है श्रुति। उसे सब सुस्त कहते हैं। वह अपना सारा काम बहुत धीरे-धीरे करती है। वह धीरे-धीरे खाना खाती है, धीरे-धीरे चलती है, और धीमे बात करती है।






**आणि तिच्याउलट ओंकार. जलद हा शब्द जणू त्याच्याचसाठी बनवलाय. त्याचं सगळंच जलद असतं. तो जलद पेपर वाचतो, भरभर स्वयंपाक करतो आणि तितक्याच वेगाने गाडीही चालवतो.**

और उससे अलग है ओंकार। 'जल्दी' यह शब्द मानो उसके लिए ही बनाया गया है। उसका सब बहुत जल्द होता है। वह जल्दी जल्दी पेपर पढ़ता है, फटाफट खाना बनाता है, और कार भी उतनी ही तेज़ चलाता है।




## १५.५ वाचू या. पढ़ें।

१. मुले भरभर धावत आहेत.
२. आजोबा हळू चालत आहेत.
३. गाड्या सावकाश चालत आहेत.
४. विमान जलद उडत आहे.



**१५.६ खालील शब्द योग्य त्या गटात घालू या.** नीचे दिए गए शब्द सही समूह में लिखें।



















| हळू | जलद |
|---|---|
| | |
| | |
| | |

**१५.७ ऐकू या आणि वाचू या.** सुनें और पढ़ें।

**श्रीकांत मुंबईत टॅक्सी चालवतो. त्याला मराठी भाषा चांगली बोलता येत नाही. म्हणून अनेकदा त्याला प्रवाशांसोबत बोलताना अडचण होते. त्यांच्याशी तो हळू हळू बोलतो. भरभर त्याला बोलता येतच नाही. तो इतर टॅक्सीचालकांशी मराठीत बोलायचा भरपूर प्रयत्न करतो. त्याला हे माहितीये की मराठी सोपी भाषा नाहीये आणि ती पटकन बोलता येणार नाही. पण त्याला विश्वास आहे की एकदा का मराठी भाषा बोलता आली, की तो एकदम चांगलं बोलेल.**

श्रीकांत मुंबई में टैक्सी चलाता है। वह मराठी में अच्छी तरह से बात नहीं कर सकता। अक्सर उसे यात्रियों के साथ बात करते समय दिक्कत होती है। वह उनके साथ धीरे-धीरे बोलता है। अन्य टैक्सी ड्राइवरों के साथ मराठी में बात करने की वह बहुत कोशिश करता है। वह जानता है कि मराठी एक आसान भाषा नहीं है और वह जल्दी मराठी में बात नहीं कर सकेगा। लेकिन उसका मानना है कि एक बार जब वह मराठी बोलना सीख जाएगा, तो वह बहुत अच्छी तरह से बात करेगा।

**अनकेदा, भरपूर, पटकन, एकदा**

**उन्हाळ्यात किती पाणी प्यावे? – उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावे.**

**कितीदा जेवतोस रे तू एक दिवसात? – मी दिवसातून तीनदा जेवतो.**

**१५.८ वरील दोन्ही परिच्छेदांतील रंगीत शब्द योग्य त्या गटात लिहू या.** रंगीन शब्द योग्य समूह में लिखें।

| कसा / कशी / कसे | किती / कितीदा |
|---|---|
| | |
| | |
| | |

**१५.९ कंसातील शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहू या.** उदाहरण के अनुसार वाक्य लिखें।

उदा॰ अगं, ट्रेन २ मिनिटांत येतेय. चल. (भरभर)
अगं, ट्रेन २ मिनिटांत येतेय. भरभर चल.

१. लिंकिंग रोडवर सिग्नल तोडताना ट्रॅफिक पोलीस पकडतात. (अनेकदा)

---

२. घाटात गाडी चालवायची. (हळू)

---

३. अरे, एस. व्ही. रोडवर मेट्रोचे काम चालू आहे. रिक्षा चालव! (सावकाश)

---

४. 'एक्सप्रेस वे' म्हणजे गाडी चालवण्याचा मार्ग. (जलद)

---



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो विश्वास**<br>यक़ीन | **ती वीज, त्या विजा**<br>बिजली | **ते विमान, ती विमाने / विमानं**<br>हवाई जहाज़ |
| **तो घाट, ते – घाट** | **ती हातगाडी, त्या हातगाड्या**<br>ठेला | |

## प्रश्नशब्द

| | | |
|---|---|---|
| **कितीदा**<br>कितनी बार | **किती**<br>कितना | **कसा / कशी / कसे**<br>कैसा / कैसी / कैसे |

## इतर शब्द

| | | | |
|---|---|---|---|
| **उंच**<br>ऊंचा | **ठेंगणा**<br>बौना | **बारीक**<br>पतला | **लठ्ठ / जाड**<br>मोटा |
| **गोरी**<br>गोरी | **सावळी**<br>साँवली | **लांब**<br>उंचा | **बुटका**<br>छोटा |
| **गरीब**<br>गरीब | **श्रीमंत**<br>अमीर | **जलद**<br>जल्दी जल्दी | **हळू**<br>धीरे |
| **भरभर / पटकन**<br>जल्दी | **सावकाश**<br>आराम से | **एकदा**<br>एक बार | **अनेकदा**<br>बहुत बार |

# काल काय झालं? १६










**चला, शिकू या...**
चलो, सीखें...

- **झालेली गोष्ट सांगणे**
  हुई बात बताना
- **होणे - होतो, होत नाही, झाला : वर्तमानकाळ, नकारार्थी आणि भूतकाळ रूपे ओळखणे आणि वापरणे**
  होना : वर्तमान, भूतकाल और नकारात्मक रूप

## १६.१ खालील उतारा ऐकू या आणि वाचू या. निम्नलिखित परिच्छेद सुनें और पढ़ें।



सुधाकर रोज टॅक्सी चालवतो. त्याचा दिवस सकाळी बरोबर ६.३० वाजता सुरू होतो. तो आधी टॅक्सी धुतो आणि मगच त्याचं पुढचं काम चालू होतं. त्यानंतर त्याची अंघोळ होते आणि मगच ८.१५ वाजता नाश्ता होतो. बाकी सगळं आवरेपर्यंत ९.४५ वाजतात. मग त्याची टॅक्सी चालवायची वेळ होते. दुपारी १.३० वाजेपर्यंत टॅक्सी चालवली, की मग तो घरी जेवायला जातो. त्याचं जेवण घरीच होतं. जेवण झाल्यावर सुधाकर ३.३० वाजेपर्यंत झोपतो आणि पुन्हा ४ वाजता टॅक्सी चालवायला बाहेर पडतो. रात्री ८.४५ वाजले की तो घरी येतो आणि मग ११ वाजता जेवून झोपतो.

सुधाकर रोज टैक्सी चलाता है। उसका दिन ठीक साढ़े छः बजे शुरू होता है। वह पहले टैक्सी धोता है और उसके बाद ही उसका अगला काम शुरू होता है। उसके बाद, उसका स्नान होता है और फिर सवा आठ बजे नाश्ता होता है। बाकी सब काम होने तक पौने दस बजते हैं। फिर उसका टैक्सी चलाने का समय होता है। दोपहर डेढ़ बजे तक टैक्सी चलाने के बाद वह खाना खाने घर जाता है। वह खाना घर में ही खाता है। खाना खाने के बाद सुधाकर साढ़े तीन बजे तक सोता है और फिर से चार बजे टैक्सी चलाने बाहर निकलता है। रात पौने नौ बजे वह घर आता है और फिर ग्यारह बजे खाना खा कर सो जाता है।

## १६.२ चूक की बरोबर ते ओळखू या. सही या गलत पहचानें।

| | बरोबर | चूक |
|---|---|---|
| १. सुधाकरचा दिवस पावणेसहा वाजता सुरू होतो. | ☐ | ☐ |
| २. त्याचा नाश्ता साडेआठ वाजता होतो. | ☐ | ☐ |
| ३. सुधाकर आधी अंघोळ करतो आणि मग टॅक्सी धुतो. | ☐ | ☐ |
| ४. तो घरी जेवतो. | ☐ | ☐ |
| ५. दीड ते साडेतीन या वेळात सुधाकरचे जेवण आणि झोप होते. | ☐ | ☐ |

## १६.३ जोड्या जुळवू या. जोड़ियाँ बनाएँ।

| | |
|---|---|
| १. ८.१५ | अकरा |
| २. ३.३० | साडे तीन |
| ३. ८.४५ | सव्वा आठ |
| ४. ११ | पावणे दहा |
| ५. ९.४५ | पावणे नऊ |

## होणे – साधा वर्तमानकाळ

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ 'होणे' |
|---|---|
| मी<br>मैं | पाऊस पडला, की मी अगदी खुश होतो.<br>बारिश होने पर मैं बहुत खुश होता हूँ। |
| मी<br>मैं | पाऊस पडला, की मी अगदी खुश होते.<br>बारिश होने पर मैं बहुत खुश होती हूँ। |
| आम्ही / आपण<br>हम | पाऊस पडला, की आम्ही / आपण अगदी खुश होतो.<br>बारिश होने पर हम बहुत खुश होते हैं। |
| तू<br>तू | पाऊस पडला, की तू अगदी खुश होतोस.<br>बारिश होने पर तू बहुत खुश होता है। |
| तू<br>तू | पाऊस पडला, की तू अगदी खुश होतेस.<br>बारिश होने पर तू बहुत खुश होती है। |
| तुम्ही / आपण<br>आप | पाऊस पडला, की तुम्ही / आपण अगदी खुश होता.<br>बारिश होने पर आप बहुत खुश होते हैं / होती हैं। |
| तो<br>वह | पाऊस पडला, की तो अगदी खुश होता.<br>बारिश होने पर वह बहुत खुश होता है। |
| ती<br>वह | पाऊस पडला, की ती अगदी खुश होते.<br>बारिश होने पर वह बहुत खुश होती है। |
| ते<br>वह | पाऊस पडला, की ते अगदी खुश होते / होतं.<br>बारिश होने पर वह बहुत खुश होता है। |
| ते / त्या / ती<br>वे | पाऊस पडला, की ते / त्या / ती अगदी खुश होतात.<br>बारिश होने पर वे बहुत खुश होते हैं। |

**१६.४ खालील वाक्यांत 'होणे' क्रियापदाचे योग्य रूप लिहू या.** "होना" क्रियापद का योग्य रूप लिखें।


उदा॰ वडापाव बघितला, की मी वेडा होतो.

१. सीट बेल्ट लावल्यामुळे आपले संरक्षण ----------------.

२. तू (पुल्लिंगी) ------------------- का रिक्षा चालक-मालक संघटनेचा अध्यक्ष?

३. पावसाळ्यात गाडीचा ब्रेक जाम -------------------.

४. सिग्नल खराब असले, की वाहतूक कोंडी ----------------.



**गब्बर :** बबन, मी काल काका होणार. माझ्या दादाला एक मुलगी होते.
**बबन :** अभिनंदन मित्रा! पण काका झालो म्हणावं. आणि मुलगी झाली.
**गब्बर :** आता हे काय नवीन! काका झालो आणि मुलगी झाली.
**बबन :** नवीन नाही, जुनंच आहे. आणि अगदी सोपे आहे. झालो, झाली याला भूतकाळ म्हणतात.

## साधा भूतकाळ 'होणे'

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| **मी ड्रायव्हर झालो.**<br>मैं (ड्राइवर) हुआ / हो गया / बन गया।<br>**मी ड्रायव्हर झाले.**<br>मैं (ड्राइवर) हुई / हो गई / बन गई। | **आम्ही / आपण ड्रायव्हर झालो.**<br>हम (ड्राइवर) हुए / हो गये / बन गये। |
| **तू ड्रायव्हर झालास.**<br>तू (ड्राइवर) हुआ / हो गया / बन गया।<br>**तू ड्रायव्हर झालीस.**<br>तू (ड्राइवर) हुई / हो गई / बन गई। | **तुम्ही / आपण ड्रायव्हर झालात.**<br>तुम / आप (ड्राइवर)<br>हुए / हो गये / बन गये ।<br>हुईं / हो गईं / बन गईं। |
| **तुम्ही / आपण ड्रायव्हर झालात.**<br>तुम / आप (ड्राइवर) हुए / हो गये / बन गये।<br>हुईं / हो गईं / बन गईं। | |
| **तो ड्रायव्हर झाला.**<br>वह (ड्राइवर) हुआ / हो गया / बन या। | **ते ड्रायव्हर झाले.**<br>वे (ड्राइवर) हुए / हो गये / बन गये। |
| **ती ड्रायव्हर झाली.**<br>वह (ड्राइवर) हुई / हो गई / बन गई। | **त्या ड्रायव्हर झाल्या.**<br>वे (ड्राइवर) हुईं / हो गईं / बन गईं। |
| **ते ड्रायव्हर झाले.**<br>वह (ड्राइवर) हुआ / हो गया / बन गया। | **ती ड्रायव्हर झाली.**<br>वे (ड्राइवर) हुए / हो गये / बन गये। |

**टीप – एखादी क्रिया घडून गेली असेल, तर त्या क्रियेला भूतकाळ म्हणतात.**

**वर्तमानकाळ – माझी अंघोळ सकाळी ८ वाजता होते.**
मेरा स्नान सुबह ८ बजे होता है।





**भूतकाळ – माझी अंघोळ सकाळी ८ वाजता झाली.**
मेरा स्नान सुबह ८ बजे हो गया।

**१६.५ खालील उताऱ्यात रिकाम्या जागी 'होणे' क्रियापदाचे भूतकाळातील योग्य रूप लिहू या.** नीचे दिए गए परिच्छेद में रिक्त स्थानों में "होणे" क्रिया के योग्य रूप भूतकाल में लिखें।

**(झालं / झाले, झाला, झाली, झालं / झाले, झाला, झाली)**



**सुधाकर त्याच्या मित्राला सुधाकरच्या कालच्या दिवसाबद्दल सांगतोय. सुधाकरचा दिवस सकाळी बरोबर साडेसहा वाजता सुरू ------------ (अ). त्याने आधी टॅक्सी धुतली आणि मगच त्याचं पुढचं काम चालू -------- (ब). त्यानंतर त्याची अंघोळ ------------ (क) आणि मग सव्वाआठला नाश्ता ---------- (ड). बाकी सगळं आवरेपर्यंत पावणे दहा वाजले. मग त्याची टॅक्सी चालवायची वेळ -------- (इ). दुपारी दीड वाजेपर्यंत टॅक्सी चालवली, आणि मग तो घरी जेवायला गेला. त्याचं जेवण घरीच ---------- (ई). जेवण झाल्यावर सुधाकर साडेतीन वाजेपर्यंत झोपला आणि पुन्हा ४ वाजता टॅक्सी चालवायला बाहेर पडला. रात्री ८ वाजता तो घरी आला आणि मग ११ वाजता जेवून झोपला.**

**१६.६ खालील वाक्यांमध्ये 'होणे' क्रियापदाचे भूतकाळातील योग्य रूप लिहून वाक्य पुन्हा लिहू या.** निम्नलिखित वाक्यों में 'होना' क्रिया का भूतकाल का उचित रूप भरें और वाक्य दुबारा लिखें।

उदा॰ **तू होतोस का रे रिक्षा चालक-मालक संघटनेचा अध्यक्ष?**
तू बनेगा क्या रिक्शा चालक-मालिक संगठन का अध्यक्ष?
**तू झालास का रे रिक्षा चालक-मालक संघटनेचा अध्यक्ष?**

१. **सुधीर परीक्षेत पास होतो.**
सुधीर परीक्षा में उत्तीर्ण होता है।
--------------------------------------------------------------------------------





२. **अंकिता ड्रायव्हर होते.**
अंकिता ड्राइवर बनती है।
--------------------------------------------------------------------------------

३. **गाडी चालवण्याची परीक्षा मैदानात होते.**
ड्राइविंग परीक्षण मैदान में होता है।
--------------------------------------------------------------------------------

४. **सीट बेल्ट लावल्यामुळे आपले संरक्षण (ते संरक्षण) होते.**
सीट बेल्ट आपको बचाता है।
--------------------------------------------------------------------------------

५. **पावसामुळे गाड्या खराब होतात.**
बारिश की वजह से गाडीयाँ खराब होती हैं।
--------------------------------------------------------------------------------

## **१६.७ पूर्वी काय होते आणि आता काय झाले आहे?** पहले क्या था और अब क्या हुआ है?

| **पूर्वी** (पहले) | **आता** (अब) |
|---|---|
| <br>**पूर्वी बस तिकीट स्वस्त होते.**<br>पहले बस का टिकट सस्ता था। | <br>**आता तिकीट महाग झाले आहे.**<br>अब टिकट महँगा हुआ है। |
| <br>**पूर्वी माझे केस काळे होते.**<br>पहले मेरे बाल काले थे। | <br>**आता माझे केस पांढरे झाले आहेत.**<br>अब मेरे बाल सफ़ेद हो गए हैं। |
| <br>**पूर्वी माझी गाडी जुनी होती.**<br>पहले मेरी कार पुरानी थी। | <br>**आता माझी गाडी आधुनिक झाली आहे.**<br>अब मेरी कार आधुनिक हो गई है। |
| <br>**पूर्वी मी जाड होतो.**<br>पहले मैं मोटा था। | <br>**आता मी बारीक झालो आहे.**<br>अब मैं पतला हो गया हूँ। |

**१६.८ वर्तमानकाळ की भूतकाळ? योग्य पर्याय निवडू या.** वर्तमानकाल या भूतकाल? सही पर्याय चुनें।

उदा॰ खराब रस्त्यामुळे गाडीचे टायर खराब होतात. (होतो / होतात / झाली)

१. रमेश, तुझी कालची ड्रायव्हिंगची परीक्षा कशी ------------------ (झाली / होते / झाले) रे?

२. उशीरा झोपलं, की माझी तब्येत (ती तब्येत) खराब ----------------- (होतं / होतीस / होते).

३. सकाळी मला वेळेवर टॅक्सी मिळाली नाही. म्हणून माझी पळापळ ------------- (झालास / झाली / होतो).

४. लॉटरी लागल्यानंतर तुम्ही खूप प्रसिद्ध -------------. (झालात / झालो / होते)

**१६.९ खालील तक्ता वाचू या.** तालिका पढ़ें।

**क्रियापद : होणे**

| वर्तमानकाळ | भूतकाळ |
|---|---|
| **होतो** होता है | **झाला** हो गया |
| **होत नाही** नहीं होता है | **झाला नाही** नहीं हुआ |

## काय होत नाही?

**१६.१० खालील वाक्ये वाचू या आणि त्यांतील क्रियापदे अधोरेखित करू या.** वाक्य पढ़ें और उनके क्रिया रूप पहचानें।

१. **मी काही या परीक्षेत पास होत नाही.**
मैं अब इस परीक्षा में पास नहीं होने वाला।

२. **तू काही या परीक्षेत पास होत नाहीस.**
तू अब इस परीक्षा में पास नहीं होने वाला।

३. **इंजिनमध्ये तेल टाकलं, की ते लवकर खराब होत नाही.**
इंजन में तेल डालने से वह जल्दी ख़राब नहीं होता।



४. **टायरची नियमित निगा राखली, की टायर पंक्चर होत नाहीत.**
टायर की हमेशा देखभाल करने से टायर पंक्चर नहीं होता।

५. **एखाद्या दिवशी गाडी चालवून तुम्ही आणि आम्ही ड्रायव्हर होत नाही.**
एक दिन गाड़ी चलाने से हम और आप ड्राइवर नहीं बन जाते हैं।

**१६.११ आता खालील तक्ता पूर्ण करू या.** निम्नलिखित तालिका पूर्ण करें।

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी होत -------------------------- | आम्ही / आपण होत -------------------------- |
| तू होत नाहीस | तुम्ही / आपण होत -------------------------- |
| तुम्ही / आपण होत -------------------------- | |
| तो / ती / ते होत -------------------------- | ते / त्या / ती / होत नाहीत |

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो अध्यक्ष, ते अध्यक्ष**<br>अध्यक्ष | **ती संघटना, त्या –**<br>संगठन | **ते संरक्षण**<br>संरक्षण |
| **तो वर्तमानकाळ**<br>वर्तमानकाल | **ती पळापळ**<br>भाग-दौड़ | **ते मैदान, ती मैदाने / मैदानं**<br>मैदान |
| **तो भूतकाळ**<br>भूतकाल | **ती वाहतूक**<br>परिवहन | **ते तेल, ती तेले / तेलं**<br>तेल |
| **तो केस, ते –**<br>बाल | | |
| **तो टायर, ते –**<br>टायर | | |

| क्रियापद | इतर शब्द | विशेषणे |
|---|---|---|
| **धुणे** धोना | **पूर्वी** पहले | **महाग** महँगा / महँगी |
| **भरणे** भरना | **आता** अब | **खराब** ख़राब |
| | **सुरू** शुरू | **प्रसिद्ध** मशहूर |
| | | **आधुनिक** आधुनिक |
| | | **जुनी** पुराना / पुरानी |
| | | **बारीक** पतला / पतली |
| | | **मजबूत** मज़बूत |

१७

# वेग कमी, जीवनाची हमी











**चला, शिकू या...**

चलो, सीखें...

- **भूतकाळातील प्रसंगाचे वर्णन करणे**
  भूतकाल की घटना का वर्णन करना
- **असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (आहे, होता, नव्हता) ओळखणे आणि वापरणे**
  होना : वर्तमानकाल, भूतकाल और नकारात्मक रूप (है, था, नहीं था)

## १७.१ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढें।



**बाला :** **हॅलो आशिष, कुठे होतास तू काल?**
हैलो आशीष, तू कहाँ था कल?

**आशिष :** **अरे, काल माझी टॅक्सी बंद पडली होती. म्हणून मग घरीच होतो मी.**
अरे, कल मेरी टैक्सी खराब थी। तो मैं घर पर ही था।

**बाला :** **अरे गाढवा, घरी होतास तू? गॅरेज मध्ये जायचं ना!**
गधे, घर पर था तू? गराज में जाना था न!

**आशिष :** **अरे मंद माणसा, तू समजतोस काय रे मला? फक्त घरीच बसेन का मी? दुपारी मी आणि माझा मुलगा आम्ही दोघेही तिथेच होतो रे.**
अरे पागल, समझता क्या है तू मुझे? घर में ही बैठा रहूँगा क्या मैं? मैं और मेरा बेटा हम दोनों दोपहर में उधर ही थे।

**बाला :** **मग काय सांगितलं मेकॅनिकने?**
तो मैकेनिक ने क्या कहा?

**आशिष :** **अरे गाडीची क्लच प्लेट खराब होती. त्यामुळे गियर अडकत होता.**
अरे, गाड़ी की क्लच प्लेट खराब थी। तो गियर अटक रहा था।



**बाला :** **क्लच प्लेट खराब होती म्हणजे वाईटच रे!**
क्लच प्लेट खराब थी मतलब गड़बड़ ही है!

**आशिष :** **हो ना. अजूनही खूप कामं होती टॅक्सीची आणि खर्चही खूप होता. गुपचूप घरी आलो.**
हाँ! और भी कई काम थे टैक्सी के और खर्चा भी खूब। चुपचाप घर चला आया।

**बाला :** **आपण बाबा गरीब माणसं! आपलं असंच चालणार!**
अपन तो भाई गरीब आदमी। अपना तो ऐसा ही चलेगा।

## १७.२ वरील संवादातील 'असणे' या क्रियापदाची भूतकाळातील रूपे लिहू या.
ऊपर दिए गए संवाद में से "होणे" इस क्रिया के भूतकाल रूप लिखें।

## असणे

| साधा वर्तमानकाळ | साधा वर्तमानकाळ | साधा भूतकाळ |
|---|---|---|
| मी असतो<br>मैं होता हूँ | मी आहे<br>मैं हूँ | मी होतो<br>मैं था |
| मी असते<br>मैं होती हूँ | मी आहे<br>मैं हूँ | मी होते<br>मैं थी |
| तू असतोस<br>तू होता है | तू आहेस<br>तू है | तू होतास<br>तू था |
| तू असतेस<br>तू होती है | तू आहेस<br>तू है | तू होतीस<br>तू थी |
| तो असतो<br>वह होता है | तो आहे<br>वह है | तो होता<br>वह था |
| ती असते<br>वह होती है | ती आहे<br>वह है | ती होती<br>वह थी |
| ते असते / तं<br>वह होता है | ते आहे<br>वह है | ते होते / होतं<br>वह था |
| आम्ही / आपण असतो<br>हम होते है | आम्ही / आपण आहोत<br>हम हैं | आम्ही / आपण होतो<br>हम थे |
| तुम्ही / आपण असता<br>आप होते हैं | तुम्ही / आपण आहात<br>आप हैं | तुम्ही / आपण होता / होतात<br>आप थे |
| ते असतात (अनेकवचन)<br>वे होते हैं | ते आहेत<br>वे हैं | ते होते<br>वे थे |
| त्या असतात (अनेकवचन)<br>वे होती हैं | त्या आहेत<br>वे हैं | त्या होत्या<br>वे थीं |
| ती असतात (अनेकवचन)<br>वे होते हैं | ती आहेत<br>वे हैं | ती होती<br>वे थे |

**१७.३ खालील वाक्ये भूतकाळात लिहू या.** नीचे दिए गए वाक्य भूतकाल में लिखें।

उदा॰ तो रिक्षाचालक खूप चांगला आहे.
तो रिक्षाचालक खूप चांगला होता.

१. मी कल्याणला आहे.

२. माझं तुझ्याकडे एक काम आहे.

३. हॅलो प्रताप, अरे कुठे आहेस तू?

४. माझे मित्र कसे आहेत रे? मस्त आहेत ना?

५. माझ्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स आहे.

## ‘होणे’ - साधा वर्तमानकाळ आणि ‘असणे’ – साधा भूतकाळ

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ ‘होणे’ | साधा भूतकाळ ‘असणे’ |
|---|---|---|
| मी  | होतो होता हूँ | होतो था |
| मी  | होते होती हूँ | होते थी |
| आम्ही / आपण | होतो होते हैं | होतो थे |
| तू  | होतोस होता है | होतास था |
| तू  | होतेस होती है | होतीस थी |
| तुम्ही / आपण | होता होते हैं | होता / होतात थे |
| तो  | होतो होता है | होता था |
| ती  | होते होती है | होती थी |
| ते  | होते / होतं होता है | होते / होतं था |
| ते (अनेकवचन) | होतात होते हैं | होते थे |
| त्या (अनेकवचन) | होतात होते हैं | होत्या थीं |
| ती (अनेकवचन) | होतात होते हैं | होती थे |

### १७.४ असणे की होणे? रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।

उदा॰ माझे नाव अहमद आहे. मी रिक्षा चालवतो. सोमवार ते शुक्रवार मला खूप काम असते. पण मी २ वाजता रिक्षा चालवत नाही. तेव्हा माझी जेवणाची वेळ होते.

१. सकाळच्या वेळी शिवाजी चौकात खूप ट्रॅफिक (ते) ............... मी तिथून माझी टॅक्सी चालवत नाही. कारण तिथून गेलं की मग उशीर (तो) ...............

२. मला वडापाव खूप आवडतो. पण 'खिडकी वडा' तिखट ............... माझी तब्येत त्यामुळे खराब (ती) ...............

३. काही टॅक्सींना चार गियर असतात तर काहींना पाच ............... या टॅक्सीला मात्र सहा गियर ...............

४. तुम्ही इथे का आला आहात? लायसन्सचा अर्ज घ्यायचा दिवस शुक्रवारचा (तो) असतो.

५. अमेरिकेमध्ये टॅक्सीचे स्टीयरिंग व्हील डाव्या बाजूला (ते) ............... भारतात मात्र स्टीयरिंग व्हील उजव्या बाजूला (ते) ...............




### १७.५ खालील तक्ता वाचू या. तालिका पढ़ें।

'असणे' क्रियापदाची रूपे

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ | साधा वर्तमानकाळ – नकारात्मक रूप | साधा भूतकाळ | साधा भूतकाळ – नकारात्मक रूप |
|---|---|---|---|---|
| मी  | असतो, आहे | नसतो, नाही | होतो | नव्हतो |
| मी  | असते, आहे | नसते, नाही | होते | नव्हते |
| आम्ही / आपण | असतो, आहोत | नसतो, नाही | होतो | नव्हतो |
| तू  | असतोस, आहेस | नसतोस, नाहीस | होतास | नव्हतास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तू | असतेस, आहेस | नसतेस, नाहीस | होतीस | नव्हतीस |
| तुम्ही / आपण | असता / आहात | नसता, नाही | होता / होतात | नव्हता |
| तो | असतो, आहे | नसतो, नाही | होता | नव्हता |
| ती | असते, आहे | नसते, नाही | होती | नव्हती |
| ते | असते / असतं, आहे | नसते / नसतं, नाही | होते / होतं | नव्हतं |
| ते | असतात, आहेत | नसतात, नाहीत | होते | नव्हते |
| त्या | असतात, आहेत | नसतात, नाहीत | होत्या | नव्हत्या |
| ती | असतात, आहेत | नसतात, नाहीत | होती | नव्हते |



**बबन** : गब्बर तुला माहीत आहे का काल आपल्या एका मित्राने खूपच हिमतीचं काम केलं आहे. आपण त्याच्याकडून काहीतरी शिकायला हवं.
**गब्बर** : कोणी काय केलं? मलासुद्धा सांग ना.
**बबन** : मी कशाला? अखिल स्वतःच नकुलला सांगतोय बघ. चल ऐकू या.

### १७.६ ऐकू या आणि वाचू या. सुनें और पढ़ें।



**अखिल : अरे नकुल, ऐक ना, काल मी टॅक्सी चालवत असताना माझ्या गाडीपुढे एक अपघात झाला.**
अरे सुन नकुल, कल जब मैं टैक्सी चला रहा था तब मेरे सामने एक ॲक्सिडेंट हो गया।

**नकुल : काय सांगतोस! कुठे होतास तू काल?**
क्या कह रहे है? तू कहाँ था कल?

अखिल : काल मी नरीमन पॉइंटला होतो. पोलीस आले होते तिथे.
कल मैं नरीमन पॉइंट में था। पुलिस आई थी वहाँ।

नकुल : अरे बाप रे! मग काय झालं? जवळपास एखादं हॉस्पिटल होतं का?
अरे बाप रे! फिर क्या हुआ? वहाँ आस पास कोई अस्पताल था क्या?

अखिल : नाही ना. नव्हतं हॉस्पिटल.
नहीं नहीं, कोई अस्पताल नहीं था।



नकुल : मग काय झालं?
फिर क्या हुआ?

अखिल : मी पोलिसांच्या मदतीने त्या माणसाला हॉस्पिटलला घेऊन गेलो. फारच रक्तबंबाळ झाला होता तो.
मैं पुलिस की मदद से उसको अस्पताल ले गया। उसका बहुत खून बह चुका था।

नकुल : शाब्बास मित्रा! हे फारच छान केलंस तू.
बहुत खूब! यह बड़ा अच्छा काम किया तूने।

**१७.७ वरील संवाद वाचून खालील वाक्यांतील चुकीचा शब्द खोडू या.** उपर्युक्त संवाद पढ़िए और नीचे दिए गए वाक्यों से गलत शब्द हटाएँ।

उदा॰ पोलीस नरीमन पॉइंटला आले होते / ~~नव्हते.~~

१. अखिल काल नरीमन पॉइंटला होता / नव्हता.

२. जवळपास हॉस्पिटल होतं / नव्हतं.

३. तो माणूस जखमी झाला होता / झाला नव्हता.

४. अखिलच्या रिक्षेत गिऱ्हाईक होते / नव्हते.

५. पोलीस काम करत होते / नव्हते.

**१७.८ 'असणे' या क्रियापदाचे भूतकाळातील नकारात्मक रूप लिहू या.** "असणे" के भूतकाल के नकारात्मक रूप लिखें।

(नव्हतास, नव्हतो, नव्हत्या, नव्हतो, नव्हते)




सारा : काल पुण्यात कोण कोण होतं?

नयना : मी नव्हते.

कमला, कबीर : आम्ही ------------- (१).

सारा : तू ------------- (२) रवी?

रवी : नाही, मी सुद्धा ------------- (३).

नयना : स्नेहल, सुनीता?

कबीर : नाही, त्या ------------- (४).

## १७.९ योग्य उत्तर निवडू या. सही पर्याय चुनें।

१. काल गुरुवार होता का?
- अ. काल गुरुवार नव्हते. ☐
- ब. काल गुरुवार नव्हता. ☐
- क. काल गुरुवार नव्हती. ☐

२. तू घरी होतास का?
- अ. मी घरी नव्हती. ☐
- ब. मी घरी नव्हता. ☐
- क. मी घरी नव्हतो. ☐

३. तुम्ही दोघे कुर्ल्याला होतात का?
- अ. नाही, आम्ही कुर्ल्याला नव्हते. ☐
- ब. नाही, आम्ही कुर्ल्याला नव्हतास. ☐
- क. नाही, आम्ही कुर्ल्याला नव्हतो. ☐

४. जोशीकाका, काल का नाही आलात?
- अ. माझी तब्येत बरी नव्हती. ☐
- ब. माझी तब्येत बरी नव्हत्या. ☐
- क. माझी तब्येत बरी नव्हता. ☐

### दृष्टिक्षेप


| | | |
|---|---|---|
| **तो चौक, ते –**<br>चौक | **ती वेळ, त्या वेळा**<br>समय | **ते गिऱ्हाईक, ती गिऱ्हाइके / गिऱ्हाइकं**<br>ग्राहक |
| **तो अपघात, ते –**<br>दुर्घटना | **ती हिंमत, त्या हिंमती**<br>साहस | **ते जीवन, ती जीवने / जीवनं**<br>जिंदगी |

### इतर शब्द

| | |
|---|---|
| **रक्तबंबाळ**<br>खून से लथपथ | **जवळपास**<br>आसपास |

१८

# नवी टॅक्सी, नवा प्रवास









**चला, शिकू या...**

चलो, सीखें...

- **उद्याची गोष्ट सांगणे**
  अगले दिन होने वाला काम बताना
- **करणे – मी करीन / करणार (साधा भविष्यकाळ ओळखणे आणि वापरणे)**
  करना – मैं करूँगा (सामान्य भविष्यकाल)


**१८.१ वाचू या.** पढ़ें।





**२०१९चा क्रिकेट वर्ल्डकप इंग्लंड आणि वेल्समध्ये झाला.**
२०१९ क्रिकेट विश्वकप इंग्लैंड और वेल्स में आयोजित किया गया था।

**२०२३चा क्रिकेट वर्ल्डकप भारतात होणार आहे.**
२०२३ क्रिकेट विश्वकप भारत में होगा।



**गब्बर :** बबन, तुला एक आनंदाची बातमी सांगतो. मी या रविवारी क्रिकेटची मॅच बघायला जाणार आहे.

**बबन :** फारच छान! आणि या वेळी तू अगदी बरोबर बोललास.

**गब्बर :** धन्यवाद! तुझ्यामुळेच शिकलो सारं.

**एखादी क्रिया पुढे घडणार असेल, तर त्या काळाला 'भविष्यकाळ' म्हणतात.**

## साधा भविष्यकाळ

**बसणे : बस + णार = बसणार**
**गाणे : गा + णार = गाणार**
**चालवणे : चालव + णार = चालवणार**
**होणे : हो + णार = होणार**

## १८.२ साधा भविष्यकाळ

| | होकारार्थी | | नकारार्थी |
|---|---|---|---|
| **मी**<br>मैं | **चालवेन**<br>चलाऊँगा / चलाऊँगी | **चालवणार आहे**<br>चलाने वाला / चलाने वाली हूँ | **चालवणार नाही**<br>चलाने वाला / चलाने वाली नहीं हूँ |
| **तू**<br>तू / तुम | **चालवशील**<br>चलाएगा / चलाएगी / चलाओगे / चलाओगी | **चालवणार आहेस**<br>चलाने वाला / चलाने वाली है /<br>चलाने वाले / चलाने वाली हो | **चालवणार नाहीस**<br>चलाने वाला / चलाने वाली नहीं है /<br>चलाने वाले / चलाने वाली नहीं हो |
| **तुम्ही / आपण**<br>आप | **चालवाल**<br>चलाएँगे / चलाएँगी | **चालवणार आहात**<br>चलाने वाले / चलाने वाली हैं | **चालवणार नाही**<br>चलाने वाले / चलाने वाली नहीं हैं |
| **तो / ती / ते**<br>वह | **चालवेल**<br>चलाएगा / चलाएगी | **चालवणार आहे**<br>चलाने वाला /<br>चलाने वाली है | **चालवणार नाही**<br>चलाने वाला /<br>चलाने वाली नहीं है |
| **आम्ही / आपण**<br>हम | **चालवू**<br>चलाएँगे | **चालवणार आहोत**<br>चलाने वाले हैं | **चालवणार नाही**<br>चलाने वाले नहीं हैं |
| **तुम्ही / आपण**<br>आप | **चालवाल**<br>चलाएँगे / चलाएँगी | **चालवणार आहात**<br>चलाने वाले / चलाने वाली हैं | **चालवणार नाही**<br>चलाने वाले / चलाने वाली नहीं हैं |
| **तुम्ही / आपण**<br>आप | **चालवाल**<br>चलाएँगे / चलाएँगी / चलाओगे / चलाओगी | **चालवणार आहात**<br>चलाने वाले / चलाने वाली हैं | **चालवणार नाही**<br>चलाने वाले / चलाने वाली नहीं हैं |
| **ते / त्या / ती**<br>वे | **चालवतील**<br>चलाएँगे / चलाएँगी | **चालवणार आहेत**<br>चलाने वाले / चलाने वाली हैं | **चालवणार नाहीत**<br>चलाने वाले / चलाने वाली नहीं हैं |

**टीप**

**एखाद्या वाक्यात 'मी चालवणार आहे' या ऐवजी नुसते 'मी चालवणार' असा प्रयोग झाला तर त्याचा अर्थ 'मी नक्की चालवणार आहे' असा होतो.**

| | | |
|---|---|---|
|  | मी मुंबईत टॅक्सी चालवतो.<br>मैं मुंबई में टैक्सी चलाता हूँ। | वर्तमानकाळ |
|  | मी मुंबईत टॅक्सी चालवणार आहे.<br>मैं मुंबई में टैक्सी चलाने वाला हूँ। | भविष्यकाळ |

**१८.३ याचप्रमाणे खालील क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे लिहू या.** इसी तरह नीचे दिए गए क्रियाओं के भविष्यकाल के रूप लिखें।

**राहणे, खाणे, जाणे, येणे, बदलणे, असणे, लिहिणे, वाचणे, करणे, काढणे**

**१८.४ रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

उदा॰ मुंबईत गेल्यावर मी माझ्या भावाला <u>भेटणार</u>. (भेटणे)

१. ऑक्टोबरमध्ये मी नवीन रिक्षा ------------------. (घेणे)

२. तू वाहतुकीच्या नियमांचे पालन ------------------ ना? (करणे)

३. मी उद्या पेट्रोल ------------------. (भरणे)

४. ती तिच्या मित्राकडे ------------------. (जाणे)

५. आरती तिची टॅक्सी ------------------. (पुसणे)

६. माझी परीक्षा झाली की मी तुला भेटायला ------------------. (येणे)

**१८.५ रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

उदा॰ नकुल ऑफिसला गेला.
नकुल ऑफिसला जाणार आहे.

१. कपिलने अक्षयला गाडी दिली.
कपिल अक्षयला गाडी ------------------ ------------------.

२. मी लायसन्स काढले.
मी लायसन्स ------------------ ------------------.

३. परीक्षेत अमितने गाडी चालवली.
परीक्षेत अमित गाडी ------------------ ------------------.

४. मी रोज सकाळी धावतो.
मी रोज सकाळी ------------------ ------------------.

**१८.६ ऐकू या आणि वाचू या.** सुनें और पढें।

**निसारचाचा : अरे, अजित, बरं झालं भेटलास.**
अरे, अजित, अच्छा हुआ मिल गये।

**अजित : सलाम, निसार चाचा.**
सलाम, निसार चाचा।

**निसारचाचा : उद्या येणार आहेस ना माझ्याकडे ईदनिमित्त? तुझी चाची शीर खुरमा करणार आहे. ये नक्की.**
कल आओगे ना मेरे घर ईद के लिये? तुम्हारी चाची शीर खुरमा बनाने वाली है। पक्का आना।

**अजित : हो, चाचा. मी नवीन टॅक्सी घेतली. उद्या पहिल्यांदाच चालवणार आहे. आणि तीच टॅक्सी घेऊन तुमच्याकडे शीर खुरमा खायला येणार आहे.**
हाँ, चाचा। मैंने नयी टैक्सी खरीद ली। कल पहली बार चलाने वाला हूँ। और वही टैक्सी लेकर आपके घर शीर खुरमा खाने आऊँगा।

**निसारचाचा : अरे वा! अभिनंदन! तुझी आईही येईल ना तुझ्याबरोबर?**
अरे वा! बधाई! तुम्हारी माँ भी आएंगी ना तुम्हारे साथ?

**अजित : हो तर! उद्या दिवसभर मी तिला आणि माझ्या ताईच्या मुलांना माझ्या टॅक्सीतून मुंबई फिरवणार आहे. आणि संध्याकाळी तसाच त्यांना घेऊन तुमच्याकडे येणार आहे. आईला माझ्या स्वत:च्या टॅक्सीत बसवण्याचं माझं स्वप्न उद्या पूर्ण होईल.**
बिलकुल! कल दिनभर मैं उसे और मेरी दीदी के बच्चों को अपनी टैक्सी में मुंबई घुमाऊँगा। और शाम को वैसे ही उनको लेकर आप के घर आऊँगा। माँ को मेरी अपनी टैक्सी में बिठाने का मेरा सपना कल पूरा होगा।

**निसारचाचा : खरंय. तुझ्या आईला खूप अभिमान वाटेल मुलाच्या टॅक्सीतून फिरताना.**
सही कहा। तुम्हारी माँ को बहुत गर्व होगा अपने बेटे की टैक्सी में घूमते हुए।

**अजित : हो, चाचा. निघतो. उद्या भेटू. सलाम.**
हाँ, चाचा। चलता हूँ। कल मिलेंगे। सलाम।

**निसारचाचा : आम्ही वाट पाहू तुमची. भेटूच. सलाम.**
हम तुम्हारी राह देखेंगे। मिलते हैं। सलाम।

**१८.७ वरील संवादातील रंगीत क्रियापदाची मूळ रूपे लिहू या.** ऊपर दिये गये संवाद में से रंगीन क्रियाओं के मूल रूप लिखें।

उत्तर - ------------------, चालवणे, ------------------, ------------------, ------------------, ------------------

**भविष्यकाळ**

| | करणे | राहणे | खाणे |
|---|---|---|---|
| मी | करीन / करेन | राहीन | खाईन |
| तू | करशील | राहशील | खाशील |
| तुम्ही / आपण | कराल | राहाल | खाल |
| तो / ती / ते | करील / करेल | राहील / राहेल | खाईल |
| आम्ही / आपण | करू | राहू | खाऊ |
| तुम्ही / आपण | कराल | राहाल | खाल |
| तुम्ही / आपण | कराल | राहाल | खाल |
| ते / त्या / ती | करतील | राहतील | खातील |

**(खाणे प्रमाणे – जाणे, येणे, होणे)**

**१८.८ याचप्रमाणे खालील क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे लिहू या.** इसी तरह नीचे दिए गए क्रियापदों के भविष्यकाल के रूप लिखें।

धावणे, असणे, वाचणे, चालणे, काढणे

**१८.९ खालील तक्ता भरू या.** तालिका भरें।

| | पिणे | जाणे | देणे | घेणे | येणे | होणे |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | पिईन | | | | | होईन |
| आम्ही / आपण | पिऊ | | | | | |
| तू | पिशील | | | | | |
| तुम्ही / आपण | प्याल | | | घ्याल | | व्हाल |
| तो / ती / ते | पिईल | | | | | |

**१८.१० पुढील वाक्यांमध्ये कंसांत दिलेल्या क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे वापरून वाक्ये पूर्ण करू या.** नीचे दिए गए क्रियापदों के भविष्यकाल के रूप लिखें।

उदा॰ मी आज सहा वाजता (येणे) येईन तुझ्याकडे, चालेल ना?

१. आता मी वडा बनवतोय. तू पण (खाणे) ---------------- का?
२. तू एवढं टेन्शन कशाला घेतोयस? नक्की पास (होणे) ---------------- .
३. मी पाच वाजता भेटते तुला. मग आपण पार्कात (जाणे) ---------------- .
४. गाडीची चावी लोकेशकडे आहे. तो ---------------- (देणे) तुला.
५. दादा, आपण उद्या सकाळी पत्र (लिहिणे) ---------------- ना, प्लीज!

**१८.११ वाचू या.** पढ़ें।

**भारती : दादा, मला नंदिनी हॉस्पिटलला जायचं आहे. कसं जाऊ?**
भाई, मुझे नंदिनी हॉस्पिटल जाना है। कैसे जाऊँ?

**सलीम : तो शॉर्ट कट आहे. पण त्या रस्त्याला खूप ट्रॅफिक लागेल. त्यापेक्षा या रस्त्याने जा. थोडा लांबचा आहे. पण या रस्त्याला ट्रॅफिक लागणार नाही.**



वह शॉर्ट कट है। पर उस रस्ते पर बहुत ट्रॅफिक होगा। इससे अच्छा आप इस रस्ते से जाइये। थोड़ा दूर पड़ेगा लेकिन इस रस्ते पर ट्रॅफिक नहीं मिलेगा।

**भारती : ठीक आहे दादा. मी याच रस्त्याने जाईन.**
ठीक है भाई। मै इसी रस्ते से जाऊँगी।

## दृष्टिक्षेप

| | |
|---|---|
| **तो भविष्यकाळ, –**<br>भविष्यकाल | **ती चावी, त्या चाव्या**<br>चाबी |

| क्रियापद | इतर शब्द |
|---|---|
| **धावणे**<br>भागना | **एकत्र**<br>एक साथ |
| | **कुठेही**<br>कहीं भी |

# १९ हे माझं कुटुंब











## चला, शिकू या...
चलो, सीखें...


- **नाती ओळखणे**
  रिश्ते पहचानना
- **'चालकाला' आणि 'चालकांना' अशी रूपे ओळखणे आणि वापरणे**
  'चालक को' व 'चालकों को' ये रूप


अमिताभ बच्चन



जया बच्चन



अभिषेक



आराध्या


ऐश्वर्या


श्वेता


अगस्त्य


नव्या


निखिल नंदा

## १९.१ खालील परिच्छेद ऐकू या आणि वाचू या. नीचे दिया गया परिच्छेद सुनें और पढ़ें।

**चला, भेटू या बच्चन कुटुंबाला.**

**ही आहे छोटी आराध्या. तिच्या आजोबा-आजीची म्हणजेच अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांची ही सहा वर्षांची छोटीशी नात. अमिताभ आणि जया बच्चन यांना दोन मुलं. एक, आराध्याचे वडील, अभिषेक आणि दुसरी आराध्याची आत्या श्वेता. श्वेता म्हणजे अभिषेकची मोठी बहीण. अभिषेकची बायको आणि आराध्याची आई, ऐश्वर्या. श्वेता बच्चन यांचे पती निखिल नंदा. श्वेता आणि निखिल यांना नव्या आणि अगस्त्य अशी दोन मुलं आहेत. लाडक्या आराध्याप्रमाणेच नव्याही अमिताभ यांची लाडकी नात आहे आणि अगस्त्य लाडका नातू आहे. अनेकदा नव्या आणि अगस्त्य आपल्या मामा-मामीकडे आराध्याला भेटायला जातात.**

आइये, मिलते हैं, बच्चन परिवार से।

ये है छोटी आराध्या। अपने दादा-दादी, मतलब अमिताभ बच्चन और जया बच्चन की छः साल की छोटी सी पोती। अमिताभ और जया बच्चन के दो बच्चे हैं। एक, आराध्या के पिता, अभिषेक और दूसरी, आराध्या की बुआ, श्वेता। श्वेता अभिषेक की बड़ी बहन है। अभिषेक की पत्नी और आराध्या की माँ हैं ऐश्वर्या। श्वेता बच्चन के पति हैं निखिल नंदा। श्वेता और निखिल के दो बच्चे हैं, नव्या और अगस्त्य। लाड़ली आराध्या की तरह ही नव्या भी अमिताभ जी की लाड़ली नातिन और अगस्त्य लाड़ला नाती है। कई बार नव्या और अगस्त्य अपने मामा-मामी के पास आराध्या से मिलने जाते हैं।

**१९.२ आराध्या आणि नव्याला नाती कळत नाहीयेत. त्यांना मदत कराल?** आराध्या और नव्या ये रिश्ते समझ नहीं सकती हैं। उनकी मदद करेंगे?

**(मामी, आजोबा, आत्या, आजी, मामा, आई)**

१. अभिषेकची बहीण, आराध्याची ---------------

२. अभिषेकचे बाबा, आराध्याचे ---------------

३. श्वेताचा भाऊ, नव्याचा ---------------

४. श्वेताची आई, नव्याची ---------------

५. अभिषेकची बायको, आराध्याची ---------------

६. अभिषेकची बायको, नव्याची ---------------

७. श्वेताचा नवरा, आराध्याचे काका



**गब्बर :** बबन, तुला माहीत आहे का आपल्या रिक्षाचंसुद्धा एक कुटुंब आहे.

**बबन :** ते कसं काय?

**गब्बर :** हे बघ, ही आपली रिक्षा. ती टॅक्सी. रिक्षाची आई. आणि तो टेम्पो. तो म्हणजे आपल्या रिक्षाचे वडील.

**बबन :** अरे वा, गब्बर! फारच विनोदी झालायस.

**अमित : अरे सुभाष, गेटवे ऑफ इंडियाला कसं जायचं माहीत आहे का तुला?**
अरे सुभाष, क्या तुम्हें पता है, गेटवे ऑफ इंडिया कैसे जाते हैं?

**सुभाष : नाही रे. तू प्रवीणला विचार. त्याला माहीत आहे. ओळखतोस का तू त्याला?**
नहीं रे। तुम प्रवीण से पूछो। उसे पता है। क्या तुम उसे पहचानते हो?


**अमित : प्रवीण ना? हो, मी ओळखतो त्याला. मी विचारतो.**
प्रवीण ना? हाँ, मैं उसे पहचानता हूँ। मैं पूछूँगा।

| एकवचन |
| --- |
| बबन + ला |
| उदा. मराठी कसे बोलावे, हे बबनला कळत नाही |

| | | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| तो | गौरव | गौरवला | - |
| तो | नरेश | नरेशला | - |
| ती | गीता | गीताला | - |
| ती | प्रणाली | प्रणालीला | - |
| ते | पुणे | पुण्याला | - |
| ते | धुळे | धुळ्याला | - |

रानडे काका : अहो पाटील, हे कांबळे कुठे गेले माहीत आहे का तुम्हाला?
सुनो पाटील, क्या तुम्हें पता है, ये कांबले कहाँ गये हैं?
पाटील : नाही हो. तुम्ही सावंतांना विचारा. त्यांना माहीत आहे.
नहीं भाई। तुम सावंत से पूछो। उन्हें पता है।
रानडे काका : ठीक आहे. विचारतो मी त्यांना.
ठीक है। मैं उनसे पूछूँगा।

### १९.३ समजतंय का? चला तर, बघू या. समझ में आ रहा है क्या? चले, देखें।

| | | |
|---|---|---|
|  | रोहन मित्राला बोलावतो.<br>रोहन दोस्त को बुलाता है। |  |
| | रोहन मैत्रिणीला बोलावतो.<br>रोहन सहेली को बुलाता है। |  |
| | रोहन मुलाला बोलावतो.<br>रोहन बच्चे को बुलाता है। |  |
| | रोहन मित्रांना बोलावतो.<br>रोहन दोस्तों को बुलाता है। |  |
| | रोहन मैत्रिणींना बोलावतो.<br>रोहन सहेलीयों को बुलाता है। |  |
| | रोहन मुलांना बोलावतो.<br>रोहन बच्चों को बुलाता है। |  |

थोडक्यात

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| नदी + ला | नदी + ं + ना |
| उदा. पावसाळ्यात या नदीला पूर येतो. | उदा. पावसाळ्यात या नद्यांना पूर येतो. |

## पुल्लिंगी नामे

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| कागद | कागदाला | कागदांना |
| रस्ता | रस्त्याला | रस्त्यांना |
| प्राणी | प्राण्याला | प्राण्यांना |
| प्रवासी | प्रवाशाला | प्रवाशांना |
| तराजू | तराजूला | तराजूंना |
| लाडू | लाडवाला | लाडवांना |

## नपुंसकलिंगी नामे

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| झाड | झाडाला | झाडांना |
| देऊळ | देवळाला | देवळांना |
| पाणी | पाण्याला | - |
| केळे | केळ्याला | केळ्यांना |

## स्त्रीलिंगी नामे

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| रांग | रांगेला | रांगांना |
| चूक | चुकीला | चुकांना |
| भिंत | भिंतीला | भिंतींना |
| जागा | जागेला | जागांना |
| खिडकी | खिडकीला | खिडक्यांना |
| वाळू | वाळूला | - |
| बायको | बायकोला | बायकांना |

## आणि मराठीत आलेले इंग्रजी शब्द

तो फोन - फोनला - फोनना (याचप्रमाणे : तो मोबाईल, तो बसस्टॉप, तो टायर, ती ट्रेन, ती बस, ती लाईट, ते नेलपेंट)

तो पेपर - पेपराला - पेपरांना (याचप्रमाणे : ते पोस्ट, ते पेन)

तो डॉक्टर - डॉक्टरला - डॉक्टरांना (याचप्रमाणे : तो बिल्डर)

ती बॅग - बॅगेला - बॅगांना (याचप्रमाणे : ती बँक, ती पिन)

ती पेन्सिल - पेन्सिलीला - पेन्सिलींना (याचप्रमाणे : रिफिल, वायर)



**१९.४ खालील शब्द 'ला' आणि 'ना' हे जोडून लिहू या.** नीचे दिए गए शब्दों को "ला" और "ना" जोड़कर लिखें।

बाळ आजी बाबा रिक्षा मित्र पुस्तक गाडी बाई आजोबा चाक मल्लिका सिग्नल नकुल बिल्ला बिल्डींग मोबाईल टाकी अजित ब्रेक चावी

| | ला | ना |
|---|---|---|
| बाई | बाईला | बाईंना |
| बाळ | | |
| मोबाईल | | - |
| गाडी | | गाड्यांना |
| बाबा | | |
| मल्लिका | | - |
| चाक | | |
| बिल्ला | | बिल्ल्यांना |
| अजित | | - |
| आजोबा | | |

| | ला | ना |
|---|---|---|
| आजी | | |
| ब्रेक | | |
| रिक्षा | | |
| मित्र | | |
| सिग्नल | | - |
| पुस्तक | | |
| बिल्डींग | | |
| टाकी | | |
| नकुल | | - |
| चावी | | |

**१९.५ योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

१. अरे आकाश, उद्या माझ्या घरी येशील?
माझ्या ------------------ तुला भेटायचं आहे.
अ. मामेला ☐
ब. मामाला ☐

२. प्रवीण, तुला पोलिसांबद्दल मी सांगतो,
आजकाल पोलिसांना कोणीच विचारत नाही.
अ. पोलिसाला ☐
ब. पोलिसांना ☑

३. माझ्या ------------------ गाडी चालवता येत नाही.
अ. आजोबाला ☐
ब. आजोबांना ☐

४. सकाळच्या वेळी ------------------ खूप गर्दी असते.
अ. ट्रेनला ☐
ब. ट्रेनना ☐

५. तुझ्या गाडीच्या पेट्रोलच्या --------------- भोक पडलंय.
अ. टाकीला ☐
ब. टाक्यांना ☐



६. गाडी चालवताना काळजी घे, मनोज.
तू गाडी हळू चालव. बाकीच्या ------------------ पुढे जाऊ दे.
अ. गाडीला ☐
ब. गाड्यांना ☐

## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो / ते आजोबा, ते –**<br>नाना / दादा | **ती आजी, त्या आज्या**<br>नानी / दादी | **ते कुटुंब, ती कुटुंबे**<br>परिवार |
| **तो बाबा / ते बाबा**<br>(आदरार्थी)<br>पिता | **ती आई**<br>माँ | **ते पेन, ती पेने / पेनं**<br>पेन |
| **तो / ते मामा, ते –**<br>मामा | **ती मामी**<br>मामी | |
| **तो नातू, ते –**<br>पोता, नाती | **ती आत्या, त्या –**<br>बुआ | |
| **तो बसस्टॉप, ते –**<br>बसस्टॉप | **ती नात, त्या नाती**<br>पोती, नातिन | |
| **तो बिल्डर, ते –**<br>बिल्डर | **ती ट्रेन, त्या –**<br>ट्रेन | |
| | **ती बस, त्या बसेस**<br>बस | |
| | **ती लाईट, त्या लाईटी**<br>लाईट | |
| | **ती बँक, त्या बँका**<br>बँक | |
| | **ती पिन, त्या पिना**<br>पिन | |
| | **ती रिफिल, त्या रिफिली / रिफिल्स**<br>रिफिल | |
| | **ती वायर, त्या वायरी**<br>वायर | |

## क्रियापदे

| |
|---|
| **भेटणे** मिलना |

२०

# अशी बनते माझी रिक्षा / टॅक्सी











**चला, शिकू या...**


चलो, सीखें...

- ✔ **टॅक्सी आणि रिक्षाचे पार्ट्स सांगणे**

  टैक्सी और रिक्शा के पार्ट्स

**वाचू या.** पढ़ें।


TAXI
टप
विंडस्क्रीन
हूड
आरसा
हेडलाईट
फॉग लाईट
रेडीएटर
नंबर प्लेट


खिडकी
CNG
चाक / टायर
दरवाजा
हँडल
पाठीमागचा दिवा
हबकॅप

**२०.१ वरील चित्रांमध्ये इंग्रजी आणि मराठी शब्द ओळखू या.** ऊपर दिये गये चित्रों में से अंग्रेजी और मराठी शब्द पहचानें।

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| हँडल | चाक |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**२०.२ ऐकू या आणि वाचू या.** सुनें और पढ़ें।

**जयेश : अरे साहेब, आज गॅरेज मध्ये कसे काय आलात? काय झालं तुमच्या रिक्षाला?**
अरे साहब, आज गराज में कैसे आना हुआ? क्या हुआ रिक्शा को?



**अनवर : अरे काय सांगू ... रिक्षा पूर्ण खराब झाली आहे.**
अरे क्या बताऊँ ... रिक्शा पूरी तरह से खराब हो गया है।

**जयेश : अच्छा! आधी तुमची रिक्षा बघू या आपण.**
अच्छा! तो पहले हम आपका रिक्शा देखते हैं।

**अनवर : बघ ना. रिक्षाचा आरसा तुटला आहे, हेडलाईट चालत नाहीये, क्लच अडकतोय.**
देखो ना। रिक्शे का आईना टूट गया है, हेडलाइट नहीं चल रही है, क्लच अटक रहा है।

**जयेश : अरे बाप रे, सिरीयस (गंभीर) आहे हे साहेब!**
अरे बाप रे! ये तो सिरीयस है साहब!

**अनवर : अरे, हे काहीच नाहीये. मेन म्हणजे किक चालत नाहीये (किक बिघडली आहे). किती प्रॉब्लेम होतो रिक्षा चालू करताना.**
अरे, यह तो कुछ भी नहीं है। पहली बात तो, किक काम नहीं कर रही है। रिक्शा चालू करने में कितनी दिक्कत होती है।

**जयेश : अरे देवा! हे बघा, सीट पण फाटली आहे तुमच्या रिक्षाची. भरपूर खर्च होणार आहे बरं का!**
हे भगवान! देखो, सीट भी फटी है। बहुत खर्चा होने वाला है।

**अनवर : अरे, होऊ दे खर्च. सुरक्षा महत्त्वाची. ते म्हणतात ना, 'सर सलामत तो पगडी पचास'!**
अरे, होने दो खर्चा। सुरक्षा जरूरी है। वह कहते है न, 'सर सलामत तो पगड़ी पचास'!

**२०.३ वरील संवाद वाचून पार्ट समोर खूण करू या.** उपर दिया गया संवाद पढ़कर पार्ट्स के सामने √ निशान लगाएँ।


| पार्ट्स | खराब आहे | खराब नाहीये |
|---|---|---|
| १. विंडस्क्रीन | | √ |
| २. आरसा | | |
| ३. रिम | | |
| ४. किक | | |
| ५. क्लच | | |
| ६. व्हायपर | | |
| ७. हेडलाईट | | |
| ८. चाक | | |

**रिक्षाचे काही पार्ट्स...**



## दृष्टिक्षेप

| | | |
|---|---|---|
| **तो दरवाजा, ते दरवाजे**<br>दरवाजा | **ती विंडस्क्रीन, –**<br>विंडस्क्रीन | **ते हँडल, –**<br>हैंडल |
| **तो गियर, –**<br>गियर | **ती खिडकी, त्या खिडक्या**<br>खिड़की | **ते स्टीअरिंग व्हील, –**<br>स्टीअरिंग व्हील |
| **तो क्लच, –**<br>क्लच | **ती हेडलाईट, –**<br>हेडलाईट | **ते इंजिन, –**<br>इंजन |
| **तो ब्रेक, –**<br>ब्रेक | **ती टेललाईट, –**<br>टेललाईट | **ते चाक, ती चाके**<br>पहिया |
| **तो आरसा, ते आरसे**<br>आईना | **ती फॉग लाईट, –**<br>फॉग लाईट | **ते हूड, –**<br>हुड |
| **तो हॉर्न**<br>हॉर्न | **ती साईडलाईट, –**<br>साईडलाईट | **ते बोनेट, –**<br>बॉनट |
| | **ती नंबर प्लेट, –**<br>नंबर प्लेट | **ते ब्रेक लाईनर, –**<br>ब्रेक लाईनर |
| | **ती टाकी, त्या टाक्या**<br>टंकी | **ते पेट्रोल, –**<br>पेट्रोल |
| | **ती क्लच प्लेट, –**<br>क्लच प्लेट | **ते डीझेल, –**<br>डीजल |
| | **ती डीक्की, –**<br>डिक्की | **ते इंजिन ऑइल, –**<br>इंजन ऑइल |
| | **ती चेसी, –**<br>चेसी | |




**गब्बर :** मित्रा मी तुझा खूप आभारी आहे. तू मला मराठी शिकवलंस.

**बबन :** आभार काय मानतोस वेड्या. तू छान मराठी बोलायला लागलास यातच सगळं आलं.

# २१. वाक्प्रचारांची यादी

## १. रिक्षावाला प्रवाशाशी संवाद साधताना ... प्रवासी के साथ बात करते समय ...

**बोला दादा / ताई, कुठे जायचंय तुम्हाला?**
कहिये, भाईसाहब / दीदी, कहाँ जाना है आपको?

**हो, चला बसा ना.** हाँ, चलिये, बैठिये।

**बसा.** बैठिये।

**मी येतो. पण मला रस्ता माहीत नाही. तुम्हाला माहीत आहे ना?**
आता हूँ। मगर मुझे रस्ता नहीं मालूम। आपको तो मालूम है ना?

**माफ करा, तिथे कसं जायचं हे मला माहीत नाही.**
माफ कीजिये, वहाँ कैसे जाना है मुझे नहीं पता।

**आता कसं जायचं?** अब कैसे जाएँ?

**उजवीकडे वळू की डावीकडे?** दाहिने मुड़ूं, या बाएँ?

**माफ करा, गाडीत पेट्रोल / गॅस कमी आहे.** माफ कीजिये, गाड़ी में पेट्रोल / गैस कम है।

**माझी शिफ्ट संपली. गाडी परत करायची वेळ झाली.**
मेरी शिफ्ट खत्म हो गयी है। गाड़ी लौटाने का समय हो गया है।

**नाही. मी तिथे येणार नाही.** नहीं, मैं वहाँ नहीं चलूँगा।

**ते इथून जवळच / लांब आहे.** वह यहां से पास में ही / दूर है।

**पुढे ट्रॅफिक आहे. दुसऱ्या रस्त्याने घेऊ का?** आगे ट्रैफिक है। दूसरे रस्ते से लूँ?

**सुट्टे पैसे द्या.** छुट्टा दीजिये।

**५२ रुपये झाले. २ रुपये सुट्टे आहेत का?** ५२ रुपये हुए। २ रुपये छुट्टे हैं?

**बोहनीची वेळ आहे. ५०० सुट्टे नाहीत.** बोहनी का समय है। ५०० का छुट्टा नहीं है।

**नीट बसा!** ठीक से बैठिये।

**दादा / ताई पाय खाली ठेवा!** भाईसाहब / दीदी, पैर नीचे रखिये।

**इथे धूम्रपान करू नका! / इथे सिगारेट ओढू नका.** यहाँ सिगारेट मत पीजिये।

**पोहोचलो. चला उतरा!** पहुंच गये। चलिये, उतरिये।

**प्लीज, सुट्टे पैसे द्या ना.** प्लीज, छुट्टा दीजिये ना।

## १. रिकाम्या जागा भरू या. रिक्त स्थान भरें।

१. ................ जायचंय तुम्हाला? (कुठे, कोणाला, काय)
२. पण मला रस्ता ................ नाही. (वाचत, माहीत, शिकत)
३. ५२ रुपये झाले. २ रुपये ................ आहेत का? (परत, सुट्टे, कमी)
४. ................ वेळ आहे. (बोहनीची, सकाळची, रात्रीची)
५. उजवीकडे वळू की ................? ( डावीबाजूला, डावीकडे, डावीसोबत)

## २. रिक्षावाला रस्ता चुकलेल्या व्यक्तीला मार्गदर्शन करताना ... रस्ता बताना ...

**काय झालं दादा / ताई? तुम्ही रस्ता चुकला आहात का?**
क्या हुआ भाईसाहब / दीदी? रस्ता भटक गये हैं क्या?

**घाबरू नका. मी तुम्हाला मदत करतो.** डरिये मत। मैं आपकी मदद करता हूँ।

**कुठे जायचंय तुम्हाला?** कहाँ जाना है आपको?

**ते अगदी जवळ / जरा लांब आहे.** वह बिलकुल नजदीक / कुछ दूर है।

**अच्छा. इकडून डावीकडे / उजवीकडे वळा. थोडं सरळ गेलं की एक बँक येईल. बँकेसमोरच आहे तुमचं ठिकाण.**
अच्छा। यहाँ से बाएँ / दाहिने मुड़िये। थोड़ा सीधे जाने पर एक बैंक आयेगा। बैंक के सामने ही है आपका ठिकाना।

**सिग्नलवरून दुसरा डावा / उजवा घ्या.** सिग्नल से दूसरा बायाँ / दाहिना मोड़ लीजिये।

**चौकातून उजवीकडे / डावीकडे वळा.**
चौक से दाहिने / बाएँ मुड़िये।

**मी तुम्हाला सोडू का ?**
क्या मैं आपको छोड़ दूँ?

**किंवा ४० नंबरची बस पकडा.**
या फिर ४० नंबर की बस पकड़िये।


**मला माहीत नाही.** मुझे नहीं मालूम।

**त्या पेपरवाल्याला विचारा.** उस पेपर वाले से पूछिये।

**माफ करा. मी सुद्धा इकडे नवीनच आहे.**
माफ कीजिये। मैं भी यहाँ नया ही हूँ।

२. **रिक्षावाला चुकलेल्या व्यक्तीस मार्गदर्शन करताना कोणती वाक्ये वापरेल? त्यांपुढे √ करू या.** रस्ता भूले हुए इन्सान से रिक्शावाला क्या कहेगा? उनके आगे √ किजीये।

१. मला तहान लागली आहे.
२. सिग्नलवरून दुसरा डावा घ्या.
३. मला माहीत नाही.
४. कुठे जायचंय तुम्हाला?
५. मी कर्नाटकचा.



३. **रिक्षावाला पोलिसांशी बोलताना ...** पुलिस के साथ बात करते हुए ...

| |
|---|
| **काय झालं साहेब? मी काय केलं?** क्या हुआ साहब? मैंने क्या किया? |
| **हो, माझ्याकडे लायसन्स आहे. ही बघा गाडीची कागदपत्रे.**<br>हाँ, मेरे पास लाइसेंस है। ये देखिये गाड़ी के कागजात। |
| **माझ्याकडे लायसन्स नाही आहे.** मेरे पास लाइसेंस नहीं है। |
| **चूक झाली साहेब. माफ करा.** गलती हुई साहब, माफ कीजिये। |
| **पुन्हा असं होणार नाही. एकदा सोडून द्या ना साहेब.**<br>फिर ऐसा नहीं होगा। एक बार छोड़ दीजिये ना, साहब। |
| **मी पुन्हा सिग्नल तोडणार नाही.** फिर से सिग्नल नहीं तोड़ूँगा। |
| **पहिल्यांदाच सिग्नल तोडला. माफ करा ना.**<br>पहली बार सिग्नल तोड़ा है। माफ कर दीजिये ना। |
| **मी दंड भरतो. मला पावती द्या.**<br>मैं चालान भरता हूँ। आप मुझे रसीद दीजिये। |

३. **जोड्या जुळवू या.** जोडियाँ बनाएँ।

| | |
|---|---|
| १. मी काय | आहे. |
| २. मी पुन्हा सिग्नल तोडणार | भरतो. |
| ३. मी दंड | केलं? |
| ४. माफ | नाही. |
| ५. हो. माझ्याकडे लायसन्स | करा. |



४. **रिक्षावाला आजारी व्यक्ती / गर्भवती स्त्री सोबत संवाद साधताना ...** बीमार / गर्भवती औरत के साथ बात करते हुए ...

| |
|---|
| **काय होतंय तुम्हाला?** क्या आप ठीक हो ना? |
| **तुम्हाला बरं वाटत नाही आहे का?** क्या आपकी तबियत ठीक नहीं? |
| **शांत व्हा. हे घ्या, पाणी प्या.** शांत हो जाइये। ये लीजिये, पानी पीजिये। |
| **आपण डॉक्टरकडे जावू या का?** क्या हम डॉक्टर के पास चलें? |
| **तुम्हाला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊ का?** आपको अस्पताल ले चलूँ? |
| **तुम्हाला काही औषधं घ्यायची आहेत का?** आपको कोई दवाईयाँ लेनी हैं? |
| **तुम्ही काही खाल्लं आहे का?** आपने कुछ खाया है? |
| **तुमच्या सोबत कोण आहे?** आपके साथ कौन है? |
| **तुमच्या नातेवाईकांचा नंबर सांगा. मी त्यांना फोन करून बोलवतो.**<br>आपके रिश्तेदारों का नंबर बताइये। मैं उन्हें फोन कर के बुलाता हूँ। |
| **आजारी असताना तुम्ही एकटे / एकट्या का बाहेर पडलात?**<br>बीमार होते हुए आप अकेले / अकेली क्यों बाहर निकले / निकलीं? |

४. **रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

१. ------------------- होतंय तुम्हाला?
२. तुमच्या ------------------- कोण आहे?
३. पाणी -------------------------- .
४. तुमच्या ------------------- नंबर सांगा.
५. ------------------- बरं वाटत नाही आहे का?



### ५. रिक्षावाला हरवलेल्या वस्तूबाबत बोलताना ... खोई चीज़ के बारे में बात करते हुए ...

| |
|---|
| **अरेरे! कोणीतरी रिक्षात / टॅक्सीत मोबाईल / पिशवी / ... विसरले.**<br>अरेरे! कोई रिक्शा / टैक्सी में मोबाईल / बैग / ... भूल गया। |
| **ही पिशवी तुमची आहे का?**<br>क्या यह बैग आपका है? |
| **ही पिशवी / हा मोबाईल कदाचित त्या आजींची / आजींचा असेल.**<br>यह मोबाईल / बैग शायद उन दादी जी का होगा। |
| **बिचारे / बिचाऱ्या! त्यांना किती वाईट वाटत असेल!**<br>बेचारे / बेचारी! उन्हें कितना बुरा लग रहा होगा! |
| **आता मी काय करू?**<br>अब मैं क्या करूँ? |
| **त्या कुठे राहत असतील?**<br>वे कहां रहती होंगी? |
| **त्यांचा पत्ता / नंबर मिळतोय का ते बघू या.**<br>उनका पता / नंबर ढूंढते हैं। |
| **कोणी येतंय का याची वाट बघतो. नाही तर ही वस्तू पोलिसात जमा करतो.**<br>किसी के आने का इंतजार करते हैं। वरना यह चीज पुलिस के पास जमा कर देते हैं। |

### ५. वाक्ये लिहू या. वाक्य लिखें।

उदा॰ करू – आता – काय – मी　　　　आता मी काय करू?

१. विसरले – रिक्षात – पिशवी – कोणीतरी
२. जमा – वस्तू – ही – करतो – पोलीसात – नाही – तर
३. त्या – राहत – कुठे – असतील
४. ही – पिशवी – आहे – तुमची – का

६. **रिक्षावाला बस स्टँड / रेल्वे स्थानकावर संवाद साधताना ...** बस स्टँड / रेल्वे स्थानक पर बात करते हुए ...

**कोळीवाडा कोळीवाडा कोळीवाडा!**
कोलीवाडा कोलीवाडा कोलीवाडा!

**शेअरींग, कोळीवाड्यापर्यंतच.**
शेअरींग सिर्फ कोलीवाडे तक ही।

**शेअरींगचे प्रत्येकी ८ रुपये होतील.**
शेअरींग का हर एक का ८ रुपया होगा।

**१५ रुपये सीट. पटकन चला!**
१५ रुपया सीट। जल्दी चलिये।

**२ / १ सीट बाकी.** २ / १ सीट बाकी।

**एका वेळी तीनच प्रवासी घेतो आम्ही.**
एक बार में हम सिर्फ तीन यात्री लेते है।

**लगेज घेणार नाही दादा / ताई.**
लगेज नहीं लेंगे भाईसाहब / दीदी।

**थोडा वेळ थांबा!** थोडी देर रुकिये।

**आज बस / लोकल / ट्रेन वेळेवर आहेत / ३० मिनिटे उशिरा आहेत.**
आज बस / ट्रेन समय पर है / ३० मिनट देरी से है।

**चला लवकर बसा!** आईये जल्दी बैठिये।

**रांगेत या!** कतार में आईये।

**गोराईचं अजून कोणी आहे का?**
और कोई है, जिसे गोराई जाना है?

६. **चूक की बरोबर ते लिहू या.** सही या गलत पहचानें।

१. रिक्षात एका वेळी तीनच प्रवासी घेतात.
२. शेअर रिक्षावाल्यांना सुट्टे पैसे द्यावेच लागतात.
३. शेअर रिक्षा ठरलेल्या ठिकाणाच्या पुढे जात नाहीत.
४. शेअर रिक्षात लगेज घेत नाहीत.
५. शेअर रिक्षाला रांग लावावी लागत नाही.




७. **रिक्षावाला बँक कर्मचाऱ्याशी लोन / कर्जा बद्दल चौकशी करताना ...** बँक कर्मचारी से लोन के बारे में बात करते हुए ...

| |
|---|
| **मला लोन / कर्जा बद्दल चौकशी करायची आहे.**<br>मुझे लोन / कर्जे के बारे में पूछताछ करनी है। |
| **मला नवीन रिक्षा / टॅक्सी घ्यायची आहे. मला लोन / कर्ज मिळेल का?**<br>मुझे नया रिक्शा / नयी टैक्सी लेनी है। क्या मुझे लोन / कर्जा मिलेगा? |
| **लोनसाठी तुमच्याकडे काय काय योजना आहेत?**<br>आपके पास लोन की कौन कौनसी योजनाए है? |
| **यासाठी कोणती कागदपत्रे लागतील?** इस के लिये कौनसे कागज़ात लगेंगे? |
| **या कार्यवाहीला साधारण किती वेळ लागेल?**<br>इस कार्यविधी के लिये कितना समय लगेगा? |
| **मला व्याजदर सांगाल का?** मुझे ब्याज दर बताएंगे? |
| **लोन / कर्ज परत करण्यासाठी किती वर्षांची मुदत मिळेल?**<br>लोन / कर्जा वापसी के लिये कितने सालों की अवधी मिलेगी? |
| **यासाठी कोणी जामीन लागेल का?** इस के लिये कोई जमानतदार लगेगा का? |
| **मी परप्रांतीय आहे. मला लोन / कर्ज मिळेल का?**<br>मै परदेसी हुँ। मुझे लोन / कर्जा मिलेगा क्या? |
| **व्याजदरात काही सवलत मिळेल का?** ब्याज दर में कुछ छुट मिलेगी क्या? |
| **वेळेवर हफ्ता भरणाऱ्यांना काही सवलती आहेत का?**<br>समय पर पैसे भरने वालों के लिये कोई छूट है क्या? |
| **लोन / कर्ज मिळवण्यासाठी माझे या बँकेत खाते असणे गरजेचे आहे का?**<br>लोन / कर्जा मिलने के लिये मेरा इस बँक में खाता होना जरूरी है क्या? |

७. **रिकाम्या जागा भरू या.** रिक्त स्थान भरें।

१. मला लोन बद्दल -------------------- करायची आहे.
२. मला -------------------- दर सांगाल का?
३. मी -------------------- आहे.
४. यासाठी कोणी -------------------- लागेल का?
५. व्याजदरात काही -------------------- मिळेल का?



८. **गाडी बिघडल्यावर रिक्षावाल्याच्या मनात ...** रिक्शावाले के मन में ...

**अरे देवा! काय झालं गाडीला? अचानक बंद का पडली?**
हे भगवान! क्या हुआ गाड़ी को? अचानक बंद क्यों पड़ गयी?

**आत्ताच बंद पडायची होती गाडी?**
अभी बंद पड़ना था गाड़ी को?

**आता मी प्रवाशांना काय सांगू?**
अब मैं पैसेंजर से क्या कहूँ?

**त्यांना दुसरी रिक्षा करून देतो.**
उनको दूसरा रिक्शा करा देता हूँ।

**गेल्याच आठवड्यात दुरुस्त केली होती रिक्षा. आता काय झालं असेल?**
पिछले हफ्ते ही तो ठीक करवाई थी रिक्शा। अब क्या हुआ होगा?

**पुन्हा पप्पू मेकॅनिककडे जावं लागेल.**
फिर से पप्पू मेकॅनिक के पास जाना पड़ेगा।

**प्रयत्न करून बघतो सुरू होते आहे का ते?**
कोशिश कर के देखता हूँ कि रिक्शा शुरू होगा या नहीं।

**आताच महत्त्वाच्या कामासाठी बाहेर निघालो तर ही बंद पडली.**
अभी जरूरी काम के लिये निकला तो बंद पड़ गयी।

८. **गाडी बिघडल्यावर रिक्षावाल्याच्या मनात कोणती वाक्ये येतील? त्यांपुढे √ करू या.** गाडी बंद पडने पर रिक्शावाला क्या कहेगा? उन वाक्यों के आगे √ करें।

१. आत्ताच बंद पडायची होती गाडी.
२. चल, चहा प्यायला जाऊ या.
३. अरे व्वा! किती सुंदर!
४. पुन्हा पप्पू मकॅनिककडे जावं लागेल.
५. प्रयत्न करून बघतो सुरू होते आहे का ते?



## ९. पप्पू मेकॅनिककडे. पप्पू मेकॅनिक के पास।

| |
|---|
| **काय रे पप्पू, गेल्याच आठवड्यात दुरुस्त केली होती ना? हे बघ, पुन्हा बंद पडली.**<br>क्यों रे पप्पू? पिछले हफ्ते ही तो मरम्मत की थी ना? ये देखो, फिर बंद पड़ गयी। |
| **काय झालंय, बघ जरा.**<br>क्या हुआ है, देखो तो जरा। |
| **ब्रेक लागत नाही आहे. हॉर्नपण नीट वाजत नाही आहे.**<br>ब्रेक नहीं लग रहा। हॉर्न भी ठीक से नहीं बजता। |
| **हेड लाईट्स बदलाव्या लागणार कदाचित.** हेड लाईटस् बदलनी पड़ेंगी शायद। |
| **क्लच प्लेट खराब झाली आहे वाटतं.** लगता है क्लच प्लेट खराब हो गयी है। |
| **टायर पंक्चर झालंय.** टायर पंक्चर हो गया है। |
| **चांगलं ऑईल वापर, हां?** अच्छा ऑइल इस्तेमाल करना, हां? |
| **काय करता येईल?** क्या किया जा सकता है? |
| **एकदाच काय तो बंदोबस्त कर. परत बंद पडायला नको गाडी.**<br>हमेशा के लिये ठीक कर देना। फिर से बंद नहीं पड़नी चाहिये गाड़ी। |
| **ड्युप्लिकेट पार्ट लावू नकोस, हां?** ड्युप्लिकेट पार्ट नहीं लगाना, हां? |
| **मला पार्ट्सची बिलं हवी आहेत.** मुझे पार्ट्स के बिल चाहिये। |
| **किती खर्च होईल?** कितना खर्चा होगा? |
| **काहीही काय! मी नेहमी तुझ्याकडेच येतो. जरा विचार करून पैसे सांग.**<br>कुछ भी! मैं तो हमेशा तुम्हारे ही पास आता हूँ। थोड़ा सोच समझकर पैसा लगाना। |

## ९. वाक्ये लिहू या. वाक्य लिखें।

उदा॰ खर्च – होईल – किती — किती खर्च होईल?

१. जरा – काय – बघ – झालंय ------------------------------

२. बंदोबस्त – काय – तो – एकदाच – कर ------------------------------

३. येतो – नेहमी – तुझ्याकडेच – मी ------------------------------

४. आहे – नाही – नीट – वाजत – हॉर्न ------------------------------

## १०. रिक्षावाला हवामाना बद्दल बोलताना ... मौसम के बारे में बात करते हुए ...

**आज फारच उकडतंय.**
आज बहुत गर्मी है।

**उन्हामुळे भर दुपारी रिक्षा चालवणं कठीण झालंय.**
धूप की वजह से भरी दोपहर में रिक्शा चलाना मुश्किल हो गया है।

**एवढ्या थंडीत पहाटे पहाटे कशी चालवणार रिक्षा?**
इतनी ठंड में सुबह कैसे चलाएँ रिक्शा?

**आज पावसाने जोरच धरलाय.**
आज बारिश ने जोर ही पकड़ लिया है।

**पुढे खूप पाणी साचलंय. रिक्षा पुढे जाणार नाही.**
आगे बहुत पानी जमा है। रिक्शा आगे नहीं जाएगा।

## १०. जोड्या जुळवू या. जोडियाँ बनाएँ।

| | |
|---|---|
| १. आज पावसाने | क. कशी चालवणार रिक्षा? |
| २. एवढ्या थंडीत पहाटे पहाटे | ख. चालवणं कठीण झालंय. |
| ३. उन्हामुळे भर दुपारी रिक्षा | ग. जोरच धरलाय. |



# २२. दृक्‌श्राव्य

## व्हिडियो १

**१. योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।



१. **एकूण भाडे किती झाले?** किराया कितना हुआ?
अ. ₹ ३७.५०
ब. ₹ ३८.५०
क. ₹ ३४.५०

२. **दिवसाची वेळ कोणती आहे?** दिन का कौन सा समय है?
अ. सकाळ
ब. दुपार
क. संध्याकाळ

३. **प्रवासी सुट्टे पैसे कोणाकडून घेतो?** यात्री किससे छुट्टे पैसा लेता है?
अ. बाईकडून
ब. पोलिसाकडून
क. लहान मुलाकडून

४. **पोलीस कोणाला पकडून घेऊन जातात?** पुलिस किसे पकड़ के ले जाती है?
अ. टॅक्सीचालकाला
ब. टॅक्सीचालकाला आणि प्रवाशाला
क. प्रवाशाला

**२. चूक की बरोबर?** सही या गलत?

अ. टॅक्सीचालकाकडे सुट्टे पैसे आहेत.
ब. प्रवासी टॅक्सीचालकाला ६० रुपये सुट्टे देतो.

फिल्म : ही पोरगी कोणाची

## व्हिडियो २

### १. योग्य पर्याय निवडू या. सही पर्याय चुनें।

१. **टॅक्सीचालक काय करत आहे?** टैक्सी चालक क्या कर रहा है?
   - अ. पेपर वाचतोय
   - ब. टॅक्सी चालवतोय
   - क. चहा पितोय



२. **प्रवाशाला कुठे जायचंय?** यात्री को कहाँ जाना है?
   - अ. घरी
   - ब. ऑफिसला
   - क. फिरायला

३. **टॅक्सीचालक भाडे का नाकारतो?** टैक्सी चालक यात्री को ले जाने से मना क्यों करता है?
   - अ. त्याची इच्छा नाहीये.
   - ब. त्याला झोप आलीये.
   - क. टॅक्सीचालकांचा संप (हड़ताल) आहे.

४. **प्रवासी टॅक्सीचालकाला कोणती वेळ सांगतो?** यात्री टैक्सी चालक को क्या समय बताता है?
   - अ. १ वाजून १० मिनिटे
   - ब. १ वाजून ३० मिनिटे
   - क. २ वाजून १० मिनिटे

### २. चूक की बरोबर ओळखू या. सही या गलत पहचानें।

१. प्रवाशाने बोलावल्यावर टॅक्सीचालक जातो.
२. टॅक्सीचालकांचा संप १२ वाजता चालू झाला.
३. संप सुरू होऊन १० मिनिटे झाली.
४. टॅक्सीचालक प्रवाशाला पायी जायला सांगतो.

फिल्म : एक उनाड दिवस

## व्हिडियो ३

### १. योग्य पर्याय निवडू या. सही पर्याय चुनें।



१. **प्रवाशाला कुठे जायचंय?** यात्री को कहाँ जाना है?
   अ. प्रभादेवी
   ब. लालबाग
   क. अंधेरी

२. **मुंबईमध्ये एकूण किती महिला टॅक्सीचालक आहेत?** मुंबई में कितने महिला टैक्सी चालक हैं?
   अ. दोन
   ब. पाच
   क. चार

३. **टॅक्सीचालकाला कोणतं भाडं हवं होतं?** टैक्सी चालक को कहाँ के लिये यात्री चाहिये था?
   अ. गोरेगाव
   ब. परेल
   क. अंधेरी

४. **प्रवासी भाडे किती झाले, हे बघायला काय मागतो?** यात्री भाड़ा कितना हुआ देखने के लिए क्या मांगता है?
   अ. कार्ड
   ब. मीटर
   क. मोबाईल

### २. चूक की बरोबर ओळखू या. सही या गलत पहचानें।

१. बाई टॅक्सीचालकाची माफी मागत नाही.
२. टॅक्सीचालक प्रवाशाला शिवी देते.
३. टॅक्सीचालक प्रवाशाला सुट्टे पैसे देत नाही.
४. टॅक्सीचालक प्रवाशाला “ओ पिवळा शर्ट” अशी हाक मारते.

**फिल्म : अगं बाई अरेच्चा**

## व्हिडियो ४

**१. योग्य पर्याय निवडू या.** सही पर्याय चुनें।

१. **दुसरा रिक्षावाला काय जेवतो?** दुसरा रिक्शावाला क्या खाता है?



अ. वडापाव
ब. पावभाजी
क. मच्छी

२. **बाईला आधी कुठे जायचय?** औरत को पहले कहाँ जाना है?
अ. शनिवार पेठ
ब. रास्ता पेठ
क. शिवाजी नगर

३. **बाईला कुठे थांबायच आहे?** औरत को कहाँ रुकना है?
अ. मधे
ब. डावीकडे
क. उजवीकडे

४. **पाण्याच्या ट्रकचा नंबर काय आहे?** पानी के ट्रक का नंबर कौन सा है?
अ. ३४७४
ब. ४७४३
क. ४३४७

**२. चूक की बरोबर ओळखू या.** सही या गलत पहचानें।

१. बाई पहिल्या रिक्षातून जाते.
२. रस्त्यात ट्रॅफिक आहे.
३. सायकल चालवणारा मुलगा “पाणी वाचवा” असं ओरडतो.

फिल्म : चि॰ व चि॰ सौ॰ कां॰

# २३. पुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित संवाद, उतारे, इ.

## पाठ १ परिचय

### स्वाध्याय १.१ ऐकू या आणि वाचू या.

नमस्ते, मी बबन पाटील.
मी नाशिकचा.
मी टॅक्सीचालक आहे.

हॅलो, माझं नाव गब्बर स्वामी.
मी चेन्नईचा.
मी रिक्षाचालक आहे.

हाय, मी नमिता शर्मा.
मी पंजाबची.
मी डॉक्टर आहे.

नमस्ते. मी सुमित.
मी हैदराबादचा.
मी शिक्षक आहे.

नमस्कार. माझं नाव राहुल जाधव.
मी मुंबईचा.
मी पोलीस आहे.

हाय, मी टीना सिंग.
मी नागपूरची.
मी विद्यार्थिनी आहे.

नमस्कार, मी आशिष घोष.
मी भोपाळचा.
मी वेटर आहे.

### स्वाध्याय १.२ ऐकू या आणि स्वतः बद्दल लिहू या.

तुमचं नाव काय? = नमित शर्मा
तुम्ही कुठले? = पंजाबचा
तुम्ही काय करता? = डॉक्टर

## स्वाध्याय १.४ ऐकू या आणि वाचू या.

स्वर :- अ आ इ ई
उ ऊ ए अॅ ऐ
ओ ऑ औ
ऋ
स्वरादी :- अं अः
व्यंजने :- क ख ग घ ङ
च छ ज झ ञ
ट ठ ड ढ ण
त थ द ध न
प फ ब भ म
य र ल व
श ष स
ह ळ क्ष ज्ञ

## स्वाध्याय १.६ चला, वाचू या.

हरिप्रसाद : नमस्कार, माझं नाव हरिप्रसाद यादव. तुझं नाव काय?
निरंजन : नमस्ते, माझं नाव निरंजन जाधव.
हरिप्रसाद : अच्छा. कुठे राहतोस तू?
निरंजन : मी अंधेरीत राहतो. आणि तू?
हरिप्रसाद : मी दादरला राहतो.
निरंजन : अच्छा. मग तू इथे काय करतोस?
हरिप्रसाद : मी रिक्षाचालक आहे.
निरंजन : ठीक आहे. चला, नंतर भेटू.
हरिप्रसाद : चालेल. नमस्ते.

## स्वाध्याय १.१२ ऐकू या आणि वाचू या.

उदा० हिरवा - मला हिरवा रंग आवडतो.
केशरी - मला केशरी रंग आवडतो.
निळा - मला निळा रंग आवडतो.
गुलाबी - मला गुलाबी रंग आवडतो.
पांढरा - मला पांढरा रंग आवडतो.
काळा - मला काळा रंग आवडतो.
राखाडी - मला राखाडी रंग आवडतो.
जांभळा - मला जांभळा रंग आवडतो.

## पाठ २ ओळख करून घेऊ या

### स्वाध्याय २.१ ऐकू या आणि वाचू या.

हरिप्रसाद : काय मित्रा, कसा आहेस? खूप दिवसांनी दिसलास!
रमेश : मी मस्त. तू कधीपासून मुंबईत राहतोस?
हरिप्रसाद : मी फेब्रुवारीपासून मुंबईमध्ये राहतोय.
रमेश : अच्छा, मला आजची तारीख सांगशील का?
हरिप्रसाद : आज १२ मार्च.
रमेश : धन्यवाद!

### स्वाध्याय २.४ ऐकू या आणि वाचू या.

| ० | शून्य | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ६ | सहा | ११ | अकरा | १६ | सोळा |
| २ | दोन | ७ | सात | १२ | बारा | १७ | सतरा |
| ३ | तीन | ८ | आठ | १३ | तेरा | १८ | अठरा |
| ४ | चार | ९ | नऊ | १४ | चौदा | १९ | एकोणीस |
| ५ | पाच | १० | दहा | १५ | पंधरा | २० | वीस |

### स्वाध्याय २.८ ऐकू या आणि वाचू या.

राहुल : हॅलो, माझं नाव राहुल. तुमचं नाव?
मेहुल : नमस्कार, मी मेहुल. काय करता तुम्ही?
राहुल : मी रिक्षाचालक आहे. तुम्ही काय करता?
मेहुल : अरे वा, मीसुद्धा रिक्षाचालक आहे. तुम्ही रिक्षा कधी चालवता?
राहुल : मी सोमवार ते शुक्रवार रिक्षा चालवतो. तुम्ही कधी चालवता?
मेहुल : मी शनिवारी आणि रविवारी.
राहुल : अच्छा! चला, मी निघतो. नंतर भेटू.

## पाठ ३ मस्त चाललंय आमचं

### स्वाध्याय ३.२ तुम्ही सध्या काय करता?

• तू सध्या काय करतोस रे?
o मी टॅक्सी चालवतो. आणि तुम्ही काय करता, दळवीकाका?
• मी शाळेत शिकवतो.

- साहेब, आपण काय करता? माझं एक काम आहे.
- o मी सरकारी अधिकारी आहे. आत्ता मदत करू शकत नाही. मी व्यस्त आहे.

- सुरेश, तुम्ही काय करता?
- o मी रिक्षाचालक आहे.

- आपण इथे काय करतो?
- o आपण इथे परवाना काढतो.

### स्वाध्याय ३.५ पुढील संवाद ऐकू या आणि सर्वनामे आणि क्रियापदे ओळखू या.

काका : तू कसा आहेस?
सुहास : मी ठीक आहे.
काका : आणि प्रिया? ती कशी आहे?
सुहास : ती मजेत आहे. तुम्ही कसे आहात, काका?
काका : अरे, मी ठणठणीत आहे.

### स्वाध्याय ३.६ ऐकू या आणि वाचू या.

राजेंद्रने घड्याळ बघितले. ८.१७ वाजले. आईने त्याला विचारले, "काय रे, आज तू कामाला जात नाहीस का?" तो म्हणाला, "मी आज नाही जात, आई!". आई बाबांना म्हणाली, "तो आज कामाला जात नाही आहे". बाबा म्हणाले, "अरे हो! आज रविवार, आज तर सुट्टी आहे ना!" राजेंद्र म्हणाला, "हो पण माझ्यासाठी नाही. मी रविवारीसुद्धा रिक्षा चालवतो. रविवारी प्रवासी तर असतातच ना! पण आज मी जात नाहीय."

### स्वाध्याय ३.१३ ऐकू या आणि वाचू या.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस | ५१ | एकावन्न |
| २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस | ५२ | बावन्न |
| २३ | तेवीस | ३३ | तेहतीस | ४३ | त्रेचाळीस | ५३ | त्रेपन्न |
| २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस | ५४ | चोपन्न |
| २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस | ५५ | पंचावन्न |
| २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | शेहेचाळीस | ५६ | छप्पन्न |
| २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस | ५७ | सत्तावन्न |
| २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस | ५८ | अठ्ठावन्न |
| २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास | ५९ | एकोणसाठ |
| ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास | ६० | साठ |

### स्वाध्याय ३.१४ ऐकू या आणि वाचू या.

अनिल : नमस्कार, माझं नाव अनिल. तुमचं नाव काय?
सुनील : माझं नाव सुनील. मी नागपूरचा. ५ वर्षांपासून मी इकडे राहतो.
अनिल : अरे वा! मी पण नागपूरचाच. पण इथे १९ वर्षांपासून आहे. मी १७ वर्षांचा होतो. तेव्हांच इकडे पळून आलो. सलमान खानला भेटायला.
सुनील : खरचं! म्हणजे तुम्ही फक्त ३६ चे! वाटत तर नाही.
अनिल : हो ना. मी सलमानसारखा फिट राहतो.
सुनील : मस्तंच! पण सलमान भेटला का?
अनिल : सोडा ना! चला, उद्या भेटू या.

### स्वाध्याय ३.१६ दुसऱ्या दिवशी ...

अनिल : अरे सुनील, आज जुहूला सलमानची शुटींग आहे. येतोस का?
सुनील : आज? आज तर शुक्रवार, १० डिसेंबर.
अनिल : हा मग?
सुनील : मग. १० डिसेंबर म्हणजे, माझा वाढदिवस.
अनिल : अरे वा! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
सुनील : धन्यवाद! चला ७.१५ झाले. माझी बायको वाट बघतेय.
अनिल : चला, निघू या. सलमानपण माझी वाट बघतोय.

## पाठ ४ चौकातून उजवीकडे वळा!

### स्वाध्याय ४.२ बोरीवली कुठे आहे?

क. प्रभव : बोरीवली कुठे आहे? मंगेश : बोरीवली उत्तर मुंबईत आहे.
ख. विराज : कुलाबा कुठे आहे? सुरेखा : कुलाबा दक्षिण मुंबईत आहे.

### स्वाध्याय ४.३ ऐकू या. वाचू या.

राहुल : मेहुल, तू सगळ्यांना मदत करतोस. आज मला मदत कर ना.
मेहुल : बोल ना, मी काय मदत करू?
राहुल : अरे माझ्या रिक्षाची क्लच प्लेट खराब झालीय. एखादं गॅरेज सांग ना.
मेहुल : तू रिक्षा चालवतोस आणि तुला गॅरेज माहीत नाही? माठ. पप्पूकडे जा. तो चांगलं काम करतो.
राहुल : अच्छा. मी क्लच प्लेटचं काम करतो. आणि हो, आठवलं. रिक्षाचा ब्रेक खराब आहे, काच खराब आहे, चाक वाकडं आहे. आणि शेवटची गोष्ट...पत्रा गंजलाय.
मेहुल : अरे देवा! चल पळ आता. रानडे चौकातून उजवीकडे जा. तिथून दुसरा उजवा घे. पटेल चहा टपरीसमोर पप्पूचं गॅरेज आहे.
राहुल : ठीक आहे. धन्यवाद!

## पाठ ५ इथे नाही, तिथे!

### स्वाध्याय ५.१ ऐकू या आणि वाचू या.

सुरेश : काय रमेश, कसा आहेस?
रमेश : मी मस्त. तू कसा आहेस?
सुरेश : मीसुद्धा मजेत आहे. असतोस कुठे तू हल्ली?
रमेश : अरे, मी आता मुंबईत नसतो.
सुरेश : मग, कुठे असतोस तू हल्ली?
रमेश : हल्ली मी नागपूरमध्ये असतो.
सुरेश : अच्छा. आणि तुझी बायको? ती तर असते ना मुंबईमध्ये?
रमेश : काय रे शहाण्या, मी नागपूरमध्ये आणि ती मुंबईत?! तीसुद्धा इथे नसते. ती माझ्यासोबतच नागपूरमध्ये असते.
सुरेश : मला वाटलं, की तू इथे नसतोस, ... वहिनी एकट्या असतात. त्यांना काही मदत लागली तर ...?
रमेश : तू काहीच काळजी करू नकोस. मी आहे ना.

### स्वाध्याय ५.६ ऐकू या आणि वाचू या.

आदित्य : दादा, मी आदित्य. आम्ही मुंबई विद्यापीठात ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मराठी पुस्तक लिहीत आहोत. त्यासाठी तुमची माहिती हवी.
अहमद : काय सांगता! मराठी पुस्तक! खूपच छान! ठीक आहे. काय सांगू?
आदित्य : नेहमीचीच. नाव, गाव, कुठे राहता वगैरे वगैरे ...
अहमद : मी अहमद. मी बिहारचा. २०१८ पासून मी मुंबईत रहातोय. अजूनही घर नाही मिळालं. ही माझी रिक्षा. मी इथे रिक्षात रहातो. रिक्षात खातो, पितो, झोपतो.
आदित्य : अरे बापरे! सगळं रिक्षात! पण, तुम्ही खूप छान मराठी बोलता. कुठून शिकलात?
अहमद : मी 'माय मराठी' पुस्तक वाचतो.
आदित्य : रिक्षात? आता तुम्ही 'ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी मराठी' हे नवीन पुस्तक नक्की वाचा.
अहमद : नक्की! का नाही! धन्यवाद!
आदित्य : माहितीसाठी धन्यवाद! तुम्हाला भेटून बरं वाटलं.

### स्वाध्याय ५.७ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.

हरीशला क्रमांक ४ पासून इस्पितळापर्यंत जायचं आहे. तिथे कसं जायचं, हे प्रवीण त्याला सांगतोय.

प्रवीण : शिवाजी रोडहून सरळ गेलास की पुढे उजवीकडे वळायचं. आता आला केळकर रोड. तिथे डावीकडे वाचनालय आहे. उजवीकडे वळल्यावर सरळ चालायचं. समोरच बाजार आहे. पुढे गेलास की डावीकडे एक रस्ता आहे. तो रस्ता टपालघर आणि चर्चच्या मध्ये आहे. डावीकडे वळल्यावर सरळ चालायचं. हा आहे एस्.व्ही. रोड. थोडंसं पुढे चाललं की उजवीकडे इस्पितळ आहे.

### स्वाध्याय ५.८ ऐकू या आणि रिकाम्या जागा भरू या.

प्रवीण : महात्मा गांधी रोडहून सरळ जायचं आणि पुढे डावीकडे वळायचं. आता आला केळकर रोड. डावीकडे वळल्यावर सरळ चालायचं. समोरच बाजार आहे. डावीकडे एल्॰बी॰एस्॰ रोड आहे. तिथे वळायचं नाही. केळकर रोडवर समोर चालत राहायचं. सरळ पुढे आलास की उजवीकडे वाचनालय आहे आणि त्याच्या बाजूला बँक आहे. तिथून उजवीकडे वळायचं. तोच महम्मद अली रोड आहे.

### स्वाध्याय ५.११ ऐकू या आणि वाचू या.

अदिती : नमस्कार! मला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानला कसं जायचं, ते सांगाल का?
परिमल : हो! इथून पुढे डाव्या बाजूला वळायचं. तिथून थोडं पुढे गेलं की एक मोठा सिग्नल लागेल.
अदिती : अच्छा, तिथे जवळच आहे का?
परिमल : नाही हो. थोडं लांब आहे. सिग्नलच्या पुढे गेलं की तिथून उजवीकडे जायचं. तिथून दुसऱ्यांदा उजवीकडे वळायचं आणि मग डावीकडे वळायचं.
अदिती : अच्छा, तुम्ही येणार का संजय गांधी राष्ट्रीय उद्यानला?
परिमल : हो. बसा ना. अहो ताई, आधीच सांगायचं ना. मघाशीच निघालो असतो.

## पाठ ६ हे माझं शहर

### स्वाध्याय ६.२ ऐकू या आणि वाचू या.

आदित्य : ती रिक्षा कोणाची आहे?
अहमद : ती रिक्षा माझी आहे.
आदित्य : तुझी?
अहमद : हो. माझी.
आदित्य : नक्की ना?

आदित्य : त्या सायकली कोणाच्या आहेत?
अहमद : त्या सायकली माझ्या आहेत.
आदित्य : तुझ्या?
अहमद : हो. माझ्या.
आदित्य : नक्की ना?

## स्वाध्याय ६.६ ऐकू या आणि वाचू या.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | एकसष्ट | ७१ | एकाहत्तर | ८१ | एक्क्याऐंशी | ९१ | एक्याण्णव |
| ६२ | बासष्ट | ७२ | बाहत्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ६५ | पासष्ट | ७५ | पंचाहत्तर | ८५ | पंच्याऐंशी | ९५ | पंच्याण्णव |
| ६६ | सहासष्ट | ७६ | शहात्तर | ८६ | शाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्त्याहत्तर | ८७ | सत्त्याऐंशी | ९७ | सत्त्याण्णव |
| ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्याण्णव |
| ७० | सत्तर | ८० | ऐंशी | ९० | नव्वद | १०० | शंभर |

## स्वाध्याय ६.७ ऐकू या आणि वाचू या.

रिक्षावाला : स्टेशन आलं दादा.
प्रवासी : हो, किती झाले?
रिक्षावाला : बाहत्तर.
प्रवासी : काय? बाहत्तर? एवढे कसे? मी रोज साठ रुपयात येतो.
रिक्षावाला : अहो दादा, आज ट्रॅफिक होतं खूप. मी मीटरप्रमाणेच सांगतोय.
प्रवासी : काहीही बोलू नकोस. वाहतुकीची कोंडी तर रोजचीच आहे. मी फक्त पासष्ट रुपये देणार. जास्त नाटकं करतोस? पोलिसांना बोलावू का?
रिक्षावाला : तुम्हाला हवं, तर बोलवा. हक्काचे पैसेच तर मागतोय.

# पाठ ७ माझा दिनक्रम

## स्वाध्याय ७.१ ऐकू या आणि वाचू या.

डॉ० कपिल : काय रे, तू हल्ली रिक्षा स्टँडवर का दिसत नाहीस?
अजय : तब्येत बरी नाहीये, दादा.
डॉ० कपिल : काय झालं?
अजय : पोट दुखतंय हो माझं!
डॉ० कपिल : अरे, असं कसं चालेल रे! पोट दुखण्यासारखं तू दिवसभर काय करतोस, सांग जरा किती वाजता उठतोस तू?
अजय : मी सकाळी लवकर उठतो ६ वाजता. आणि लगेचच अंघोळ करतो.

डॉ० कपिल : आणि मग नाश्ता कधी करतोस?
अजय : नाश्ता नाही करत, दादा. लगेच रिक्षा काढतो अन् भाडी घेतो.
डॉ० कपिल : हे बरोबर नाहीये बरं का! मग दुपारी किती वाजता जेवतोस?
अजय : दुपारी नाही जेवत मी. संध्याकाळी जवळपास ५ वाजतात मला जेवायला. दुपारी फक्त रिक्षा चालवतो आणि कधी कधी रिक्षामध्येच झोपतो.
डॉ० कपिल : बरं! आणि मग रात्री?
अजय : रात्री घरी गेल्यावर बायकोसोबत जरा गप्पा मारतो. स्वयंपाकात मदत करतो आणि मग जेवून झोपायला रात्रीचे १२ वाजतात.
डॉ० कपिल : हाच तर प्रॉब्लेम आहे ना! कधीही काहीही करतोस तू. जेवण, झोप कसं वेळच्या वेळी झालं पाहिजे. वेळच्या वेळी सगळं करत जा म्हणजे तब्येत खराब होणार नाही.

## पाठ ८ चला, विचारू या

### स्वाध्याय ८.१ ऐकू या आणि वाचू या.

प्रभात : अहो ताई, मला आर०टी०ओ० ऑफिसला कसं जायचं सांगाल का?
मालती : माफ करा. मला माहीत नाही.
प्रभात : ठीक आहे. मी दुसऱ्या कोणाला तरी विचारतो. अहो दादा, मला एक रस्ता सांगाल का?
दत्ता : हो. कुठे जायचंय तुम्हाला?
प्रभात : मला आर०टी०ओ० ऑफिसला जायचंय. जवळचा रस्ता सांगा ना!
दत्ता : हो. या सिग्नलवरून डावीकडे वळा. पुढे महात्मा फुले चौक लागेल. तिकडून पुन्हा डावीकडे वळा. मग दुसरं उजवं वळण घ्या. सरळ गेल्यावर आर०टी०ओ० ऑफिस येतं.
प्रभात : धन्यवाद!

### स्वाध्याय ८.६ संवाद वाचू या आणि ऐकू या आणि अपूर्ण (चालू) क्रियापदे ओळखू या.

प्रवासी : मार्केटला येणार का?
टॅक्सीचालक : नाही. मी जेवायला चाललोय.
प्रवासी : तुम्हालापण आत्ताच जेवायला जायचंय? मग दुसरे रिक्षाचालक जातील का तिथे?
टॅक्सीचालक : या वेळेला कोणीच जाणार नाही. सगळे जेवायला जातायत.
प्रवासी : मग आता मी काय करू?
टॅक्सीचालक : तुम्हाला वाट बघावी लागेल. किंवा चला तुम्हीसुद्धा जेवायला. नंतर मी सोडतो तुम्हाला.
प्रवासी : अहो, काहीही काय बोलताय? मी का येऊ तुमच्यासोबत जेवायला? मला भूक नाहीये.
टॅक्सीचालक : मग आता तुम्हाला चालतच मार्केटला जावं लागेल.

## पाठ ९ प्रवासिदेवो भव।

### स्वाध्याय ९.१ ऐकू या आणि वाचू या.

रिक्षाचालक : बोला, साहेब, कुठे जायचंय?
प्रवासी : स्टेशन.
रिक्षाचालक : बसा.
प्रवासी : हो. तुम्ही कोणत्या रस्त्याने जाणार?
रिक्षाचालक : इथून थोडसं पुढे गेलं की शिवाजी चौकातून डावीकडे वळायचं आणि थोडं पुढे उजवीकडे एक छोटीशी गल्ली आहे. तिथून गेलं की आपण थेट मेन रोडला पोहोचतो.
प्रवासी : अच्छा! मग त्यानंतर ते हनुमानाचं मंदिर लागतं ना?
रिक्षाचालक : ते तर बरंच मागे आहे. आपण मेन रोडवरून थोडंसं सरळ चालवत गेलो की उजवीकडे वळायचं. तिथून सिग्नलला यू टर्न घेतला की आलं स्टेशन.
प्रवासी : अच्छा. बघितल्यावर अजून नीट कळेल मला.
रिक्षाचालक : चला तर मग. निघू या आपण आता.
प्रवासी : हो, हो. चला, निघू या.

### स्वाध्याय ९.३ रिक्षा स्टँडवरची एक दुपार.

बबन : दादा, या गब्बरला थोडी माहिती हवीय.
अनिल : बोल ना, काय झालं?
गब्बर : मला नवीन रिक्षा घ्यायचीय. त्यासाठी काय काय लागेल?
अनिल : ठीक आहे. सगळ्यात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे पैसे हवेत आणि मग लायसन्स. ते आहे का तुझ्याकडे?
गब्बर : चेष्टा करता काय दादा, पैसे लागतात हे काय सांगायला हवं? पैसे तर हवेतच. मी बँकेकडून लोन घेणार आहे.
अनिल : ठीक आहे. उद्या माझ्यासोबत चल. आपण आधी रिक्षा बघू या. तुला त्यातली एखादी आवडली तर बोलणी करू या. कोणती रिक्षा घेणारेस तू? सूर्याची की बादलची?
गब्बर : मी तर सूर्याची घेणार, दादा.
अनिल : बरं. रिक्षा घ्यायला काही कागदपत्रंसुद्धा हवीत. त्यांची नावं मी तुला एस्०एम्०एस्० करतो.
गब्बर : ठीक आहे, दादा. मग मी तुम्हाला संध्याकाळी भेटतो. थँक्यू.

### स्वाध्याय ९.७ आर०टी०ओ० ऑफिसमधली एक संध्याकाळ...

कर्मचारी : नमस्कार, बोला, काय काम आहे?
सुरेंद्र : मला लायसन्स काढायचं आहे. त्यासाठी लागणारा फॉर्म हवाय.
कर्मचारी : ठीक आहे. सोबत कागदपत्रं आणलीत का?
सुरेंद्र : काय काय हवंय तुम्हाला?
कर्मचारी : एखादं ओळखपत्र आहे का तुमच्याकडे? मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, आधार कार्ड

किंवा पॅन कार्ड?

सुरेंद्र : मतदार ओळखपत्र नाहीये माझ्याकडे आणि पासपोर्टसुद्धा नाहीये. पण पॅन कार्ड आणि आधार कार्ड आहे.

कर्मचारी : यासोबतच तुमच्या जन्माचा दाखला आणि दोन फोटो हवेत मला.

सुरेंद्र : जन्माचा दाखला आहे माझ्याजवळ. फोटो मात्र विसरलो.

कर्मचारी : ते हवेत मला. त्याशिवाय काम होणार नाही. फोटो घेऊन या.

## पाठ १० एक दिवस आर.टी.ओ.मध्ये

### स्वाध्याय १०.१ रिक्षा चालवताना पाळायचे नियम

१. ड्युटीवर जाताना स्वच्छ युनिफॉर्म घालावा, छातीच्या डाव्या बाजूस बॅच लावावा व लायसन्स बरोबर ठेवावे.
२. ड्युटीवर जाताना पान तंबाखू खाऊ नये, बिडी ओढू नये, मद्यपान करू नये.
३. पॅसेंजर सामान गाडीत विसरला असेल तर नजीकच्या पोलीस स्टेशनमधून त्याची पोचपावती घ्यावी.
४. गाडी ताब्यात घेतेवेळी स्वच्छ आहे की नाही, ते पाहून ताब्यात घ्यावी. तसेच गाडीमध्ये टॅक्स बुक, फिटनेस विमा, परमिट, फर्स्ट एड बॉक्स आहे की नाही ते पाहावे.
५. पॅसेंजरला आरडाओरड करून बोलावू नये व शिफ्टवर असताना गाडी सोडून जाऊ नये.
६. पॅसेंजरला जवळच्या रस्त्याने पोहोचवावे.
७. एका गाडीपासून दुसरी गाडी लावताना २ ते ५ फूट अंतरावर गाडी लावल्यानंतर गाडी आपोआप चालू होणार नाही याची खात्री करून घ्यावी.
८. गाडीत दोन फुलसीट व २ वर्षांचे आतील दोन मुले घेता येतात, पण अशा वेळी लगेज घेता येत नाही.
९. लगेज भाडे नियमाप्रमाणे जे होईल ते घ्यावे. जास्तीत जास्त लगेज ४० किलो घेता येते.
१०. मीटर उभे असेल तर गाडी भाड्याने देणे आहे, आडवे असेल तर एंगेज आहे, खाली पडले असल्यास भाड्याने दिली आहे. वाटेत वाहनास तात्पुरता बिघाड झाल्यास वाहन दुरुस्त होईपर्यंत वाहन चालकाने मीटर बंद व आडवे ठेवावे. (वेटिंग चालू ठेवू नये)

### स्वाध्याय १०.६ आर.टी.ओ. बाहेरील रांगेत

काका : अरे बाळा, जरा मला मदत करतोस का?

रमाकांत : बोला काका, काय हवंय?

काका : अरे, मला लिहिता-वाचता येत नाही. जरा हा फॉर्म भरून देशील का?

रमाकांत : हो, का नाही? बघू, काय फॉर्म आहे हा ... (रमाकांत फॉर्म बघतो) काका, पटापट तुमची माहिती सांगा मला. तुमचं नाव?

काका : माझं नाव कांतिलाल भोजराज गुप्ता आहे; पण मी माझ्या मुलासाठी आलोय इथे. त्याचं नाव रमेश गुप्ता.

रमाकांत : तुमचा पत्ता आणि फोन नंबर सांगा. तुमचं काम काय आहे?

काका : रूम नं. ४, अष्टविनायक चाळ, शिवाजी नगर, कांदिवली (प.). मला रिक्षाचालकाचा

परवाना काढायचा आहे. माझ्या मुलाचा फोन नंबर मला माहीत नाही, बाळा. माझ्या मोबाईलमध्ये आहे. बघून लिहिशील का?

रमाकांत : अच्छा, द्या तो फोन. हं... मिळाला नंबर. ७६२५३४१६७८. अरे हो...त्या एजंटचा नंबरपण हवाय. घेऊ का?

काका : हो, घे ना.

रमाकांत : मिळाला, काका. ९९८७५५४४३२. घ्या, काका, झाला फॉर्म भरून.

काका : धन्यवाद, बाळा. खूप मोठी मदत केलीस तू मला. देव तुझं भलं करो. येतो मी.

## पाठ ११ किती झाले?

### स्वाध्याय ११.२ पत्र वाचू या.

प्रिय उल्हास,

कसा आहेस तू? तुला सांगितल्याप्रमाणे मी हे पत्र मराठीतून लिहिण्याचा प्रयत्न करतोय. पण मला ते जरा कठीण वाटतंय. मला कधी कधी कळत नाही काय लिहावं ते. पण तरीही तुझ्यामुळे मला थोडं थोडं मराठी येतेय. माझ्यासारखंच तू माझ्या मुलाला म्हणजे सुनीलला मराठी शिकवावंस, असं मला वाटतं. मुंबईचे रस्ते मला हळू हळू पाठ होत आहेत. लोकसुद्धा मला मदत करतात. मी काही विचारलं तर त्यांना राग येत नाही.

बरेच दिवस आपण भेटलो नाही आहोत. मला तुला भेटायचं आहे. तुला रविवारी भेटायला जमेल का?

तुझा मित्र,

प्रकाश

### स्वाध्याय ११.५ खालील संवाद ऐकू या आणि त्यांतील सर्वनामे अधोरेखित करू या.

प्रवासी : टॅक्सी! टॅक्सी!

टॅक्सीचालक : नमस्कार मॅडम, कुठे जायचंय तुम्हाला?

प्रवासी : एल॰ बी॰ एस॰ रोड?

टॅक्सीचालक : या, बसा.

प्रवासी : एल॰ बी॰ एस॰ रोडला काही खायला मिळेल का? मला खूप भूक लागलीये.

टॅक्सीचालक : हो, मिळेल की! तो रोड प्रसिद्ध आहे. खूप हॉटेलं आहेत तिथे. तुम्हाला खरेदी करायची असेल तर जवळच बाजारपण आहे, मॅडम.

प्रवासी : नाही. बाजार नकोय. मला खायला हवंय. माझ्यासोबत माझी मुलगी आहे. तिलासुद्धा भूक लागलीये. तिथे एखाद्या हॉटेलजवळ सोडा आम्हाला.

टॅक्सीचालक : ठीक आहे!

प्रवासी : किती रुपये झाले?

टॅक्सीचालक : ५२ रुपये.

प्रवासी : हे घ्या.

## पाठ १२ पोलिस आपले मित्र

### स्वाध्याय १२.१ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.

पोलीस : अरे ए, थांबा रे तुम्ही दोघं.
क्षितिज : काय झालं, साहेब?
पोलीस : काय झालं? खाली उतर आधी, मग सांगतो. हेल्मेट कुठे आहे तुझं? चल, लायसन्स दाखव. गाडीची कागदपत्रं काढ. लवकर.
क्षितिज : हो साहेब.
पोलीस : नाव सांग तुझं पटापट.
क्षितिज : क्षितिज.
पोलीस : अच्छा. किती वेळा सांगतो आम्ही की हेल्मेट घालून गाडी चालवा. पण तरीही कोणी ऐकत नाही. बघू, दाखव ते पेपर.
क्षितिज : माफ करा, साहेब. चूक झाली.
पोलीस : ते सगळं घरी बोलायचं. आणि काय रे, इन्श्युरन्स कुठेय गाडीचा? यात नाहीये.
क्षितिज : नाहीये, साहेब.
पोलीस : मग घरी कोणी असेल तर त्यांना सांग की आणा म्हणून.
क्षितिज : घरी कोणी नाहीये, साहेब.
पोलीस : भर मग आता २६५ रुपयांचा दंड.

### स्वाध्याय १२.२ आता पुढे ...

क्षितिज : जाऊ द्या न साहेब!
पोलीस : कसं जाऊ देऊ? परत पुढच्या वेळी असाच हेल्मेटशिवाय गाडी चालवशील.
क्षितिज : साहेब, आज पहिलीच वेळ. पुन्हा नाही होणार असं.
पोलीस : मी कसा विश्वास ठेवू तुझ्यावर? आता दंड भर. म्हणजे पुढच्या वेळी लक्षात राहील. दे चल दंडाचे पैसे.
क्षितिज : मी का देऊ?
पोलीस : का म्हणजे? हेल्मेट घातलं नाहीस तू. नियम मोडलास तू. मग दंडही भर तूच.
क्षितिज : पण मीच का? ती बाईपण गेली बघा हेल्मेटशिवाय. तिला का सोडलंत? बाई म्हणून?
पोलीस : एऽऽ! जास्त बडबड करशील तर सरळ ठाण्यात घेऊन जाईन.
क्षितिज : बरं, बरं, भरतो मी दंड.

### स्वाध्याय १२.५ खालील संवाद ऐकू या आणि वाचू या.

सुनीलला पोलिसांनी अडवलंय....
पोलीस : लायसन्स दाखव रे तुझं.
सुनील : हे घ्या, साहेब.
पोलीस : समोरचं चिन्ह दिसत नाही का तुला. सांग जरा काय अर्थ होतो त्याचा?
सुनील : डावीकडे वळू नका.
पोलीस : म्हणजे मराठी समजतं ना? तरीही का वळलास?

सुनील : माफ करा, साहेब. मी नवीन आहे मुंबईमध्ये.
पोलीस : ते मला नको सांगूस. बघता येत नाही का तुला? मुंबईमध्ये नवीन आलास तर त्याचं काय? दंड भर आता तू.
सुनील : ठीक आहे, साहेब. भरतो. मला त्याची पावतीसुद्धा द्या.

**स्वाध्याय १२.७ रस्त्यावर मध्येच भांडण चालू आहे. अखिल टॅक्सी चालवताना ते पाहतो आणि उतरून तिथे जातो.....**

अखिल : अरे, हे काय चालू आहे? मला जरा सांगता का?
माणूस : या मुलाने माझ्या गाडीला धडक दिली आहे. मूर्ख मुलगा.
अखिल : जरा शांत व्हा, काका. मी जरा बोलू का त्याच्याशी?
माणूस : हो, बोल. पण माझं नुकसान झालंय त्याचं काय?
अखिल : थांबा, काका. काय रे मुला, सांगतोस का आता लवकर?
मुलगा : अहो दादा, हे काकाच मध्ये आले आणि ब्रेक दाबला त्यांनी. आणि मला दोष देतायत ते. मी नीटच गाडी चालवतो.
माणूस : गप्प बस. काहीही बोलू नकोस.
अखिल : काका, तुम्ही एक काम करता का? तिथे बाजूला जाऊन बसा तुम्ही. मला बोलू देता का त्याच्याशी? (मुलाकडे वळून) बघतोस ना तू किती नुकसान झालंय ते? पैसे कोण देणार?
मुलगा : मी काय करू, दादा. माझी काहीच चूक नाही. सोडा मला, जाऊ द्या.

## पाठ १३ ओय् तेरी!

**स्वाध्याय १३.८ ऐकू या आणि वाचू या.**

आकाश : तू मूर्ख आहेस का रे, संदीप? तुझ्यामुळे मला भाडं मिळत नाहीये.
संदीप : ए साल्या, मला मूर्ख बोलू नकोस. तूच बेअक्कल आहेस.
आकाश : मी बेअक्कल? तू मीटरपेक्षा जास्त पैसे घेतोस. १५० रुपये झाले तर तू २०० घेतोस. लाज वाटते का तुला? निर्लज्ज!
संदीप : तुझ्याएवढा नालायक नाहीये मी. लायसन्स नसूनही रिक्षा चालवतोस. गाढव कुठचा.
आकाश : जा रे तू!

## पाठ १४ तुझं-माझं

**स्वाध्याय १४.४ ऐकू या आणि वाचू या.**

कुशल : हॅलो आशिष, आहेस कुठे तू हल्ली?
आशिष : अरे मी आता मुंबईमध्ये असतो.
कुशल : काय सांगतोस? तू नागपूरमध्ये नसतोस का?
आशिष : हो, मी तिथे नसतो.

कुशल : अच्छा. आणि तुझी बायको? ती तर असते ना नागपूरमध्ये?
आशिष : नाही रे, माझी बायकोसुद्धा माझ्यासोबत राहते.
कुशल : मुंबईमध्ये काय करतोस तू?
आशिष : मी रिक्षा चालवतो. काय रे, तुझा भाऊ असतो ना मुंबईमध्ये? तो डॉक्टर आहे ना?
कुशल : हो, पण तो मुंबईमध्ये नसतो. तो दिल्लीत असतो. त्याने दिल्लीत घर घेतले आहे. शनिवारी आणि रविवारी येतो तो मुंबईला.
आशिष : आणि तुझे बाबासुद्धा दिल्लीत असतात?
कुशल : नाही, माझे बाबा तिथे नसतात. ते नागपूरमध्ये असतात. त्यांची बहीण असते दिल्लीमध्ये.
आशिष : छान. चल जातो मी. ४ वाजले. कामं आहेत.
कुशल : ठीक आहे. मी सुद्धा निघतो आता. उद्या भेट मला. माझे काम आहे एक.
आशिष : हो नक्की. उद्या भेटूयात. टाटा.

## पाठ १५ अति घाई, संकटात नेई

**स्वाध्याय १५.२ पोलीस आणि नरेश अपघातस्थळी आहेत. पोलीस अपघाताबद्दल चौकशी करत आहेत.**

पोलीस : इकडे ये रे तू. नाव सांग तुझं. काय काम करतोस तू?
नरेश : माझं नाव नरेश. मी रिक्षा चालवतो.
पोलीस : इथे अपघात झालेला तू पाहिलास का?
नरेश : हो पाहिला, साहेब. दुपारी ४ वाजून २५ मिनिटांनी अपघात झाला.
पोलीस : अच्छा ठीक आहे. अपघाताचं कारण माहीत आहे तुला? ही लाल गाडी कोणाची आहे?
नरेश : त्या हरीशची गाडी आहे ती.
पोलीस : कोण आहे हा हरीश? कसा दिसतो तो? आणि कुठला आहे तो?
नरेश : हरीश थोडा लठ्ठ आहे आणि जरासा ठेंगणा आहे. बोरीवलीला राहतो तो. पण पत्ता माहीत नाही मला त्याचा.
पोलीस : ठीक आहे. अजून काही सांगू शकतोस का त्याच्याबद्दल?
नरेश : हो साहेब. गरीब मुलगा आहे तो आणि हुशारपण आहे.
पोलीस : अरे, त्याची गरज नाहीये आम्हाला. तो कसा दिसतो ते सांग. तो गोरा आहे की सावळा आहे की काळा आहे दिसायला? म्हणजे आम्ही त्याला शोधू. तो नेमका कुठे राहतो?
नरेश : तसा गोरा आहे तो दिसायला आणि केस लांब आहेत त्याचे.
पोलीस : ओके. पुढचं आम्ही बघतो. एवढं सगळं सांगितलंस, पण अपघाताचं कारण सांगितलं नाहीस! तू जा.
नरेश : धन्यवाद, साहेब.

### स्वाध्याय १५.४ ऐकू या आणि वाचू या.

ही आहे श्रुती. तिला सगळे हळूबाई म्हणतात. ती सगळीच कामं खूप हळूहळू करते. ती हळू जेवते, हळू चालते, बोलतेही सावकाश. आणि तिच्याउलट ओंकार. जलद हा शब्द जणू त्याच्याचसाठी बनवलाय. त्याचं सगळंच जलद असतं. तो जलद पेपर वाचतो, भरभर स्वयंपाक करतो आणि तितक्याच वेगाने गाडीही चालवतो.

### स्वाध्याय १५.७ ऐकू या आणि वाचू या.

श्रीकांत मुंबईत टॅक्सी चालवतो. त्याला मराठी चांगली बोलता येत नाही. म्हणून अनेकदा त्याला प्रवाशांसोबत बोलताना अडचण होते. त्यांच्याशी तो हळू हळू बोलतो. भरभर त्याला बोलता येतच नाही. तो इतर टॅक्सीचालकांशी मराठीत बोलायचा भरपूर प्रयत्न करतो. त्याला हे माहितीये की मराठी सोपी भाषा नाहीये आणि ती पटकन बोलता येणार नाही. पण त्याला विश्वास आहे की एकदा का मराठी बोलता आली, की तो एकदम चांगलं बोलेल.

## पाठ १६ काल काय झालं?

### स्वाध्याय १६.१ खालील उतारा ऐकू या आणि वाचू या.

सुधाकर रोज टॅक्सी चालवतो. त्याचा दिवस सकाळी बरोबर ६.३० वाजता सुरू होतो. तो आधी टॅक्सी धुतो आणि मगच त्याचं पुढचं काम चालू होतं. त्यानंतर त्याची अंघोळ होते आणि मगच ८.१५ वाजता नाश्ता होतो. बाकी सगळं आवरेपर्यंत ९.४५ वाजतात. मग त्याची टॅक्सी चालवायची वेळ होते. दुपारी १.३० वाजेपर्यंत टॅक्सी चालवली, की मग तो घरी जेवायला जातो. त्याचं जेवण घरीच होतं. जेवण झाल्यावर सुधाकर ३.३० वाजेपर्यंत झोपतो आणि पुन्हा ४ वाजता टॅक्सी चालवायला बाहेर पडतो. रात्री ८.४५ वाजले की तो घरी येतो आणि मग ११ वाजता जेवून झोपतो.

## पाठ १७ वेग कमी, जीवनाची हमी

### स्वाध्याय १७.१ ऐकू या आणि वाचू या.

बाला : हॅलो आशिष, कुठे होतास तू काल?
आशिष : अरे, काल माझी टॅक्सी बंद पडली होती. म्हणून मग घरीच होतो मी.
बाला : अरे गाढवा, घरी होतास तू? गॅरेज मध्ये जायचं ना!
आशिष : अरे मंद माणसा, तू समजतोस काय रे मला? फक्त घरीच बसेन का मी? दुपारी मी आणि माझा मुलगा आम्ही दोघेही तिथेच होतो रे.
बाला : मग काय सांगितलं मेकॅनिकने?
आशिष : अरे गाडीची क्लच प्लेट खराब होती. त्यामुळे गियर अडकत होता.
बाला : क्लच प्लेट खराब होती म्हणजे वाईटच रे!
आशिष : हो ना. अजूनही खूप कामं होती टॅक्सीची आणि खर्चही खूप होता. गुपचूप घरी आलो.
बाला : आपण बाबा गरीब माणसं! आपलं असंच चालणार!

### स्वाध्याय १७.६ ऐकू या आणि वाचू या.

अखिल : अरे नकुल, ऐक ना, काल मी टॅक्सी चालवत असताना माझ्या गाडीपुढे एक अपघात झाला.
नकुल : काय सांगतोस! कुठे होतास तू काल?
अखिल : काल मी नरीमन पॉइंटला होतो. पोलीस आले होते तिथे.
नकुल : अरे बाप रे! मग काय झालं? जवळपास एखादं हॉस्पिटल होतं का?
अखिल : नाही ना. नव्हतं हॉस्पिटल.
नकुल : मग काय झालं?
अखिल : मी पोलिसांच्या मदतीने त्या माणसाला हॉस्पिटलला घेऊन गेलो. फारच रक्तबंबाळ झाला होता तो.
नकुल : शाब्बास मित्रा! हे फारच छान केलंस तू.

## पाठ १८ नवी टॅक्सी, नवा प्रवास

### स्वाध्याय १८.६ ऐकू या आणि वाचू या.

निसारचाचा : अरे, अजित, बरं झालं भेटलास.
अजित : सलाम, निसारचाचा.
निसारचाचा : उद्या येणार आहेस ना माझ्याकडे ईदनिमित्त? तुझी चाची शीर खुरमा करणार आहे. ये नक्की.
अजित : हो, चाचा. मी नवीन टॅक्सी घेतली. उद्या पहिल्यांदाच चालवणार आहे. आणि तीच टॅक्सी घेऊन तुमच्याकडे शीर खुरमा खायला येणार आहे.
निसारचाचा : अरे वा! अभिनंदन! तुझी आईही येईल ना तुझ्याबरोबर?
अजित : हो तर! उद्या दिवसभर मी तिला आणि माझ्या ताईच्या मुलांना माझ्या टॅक्सीतून मुंबई फिरवणार आहे. आणि संध्याकाळी तसाच त्यांना घेऊन तुमच्याकडे येणार आहे. आईला माझ्या स्वत:च्या टॅक्सीत बसवण्याचं माझं स्वप्न उद्या पूर्ण होईल.
निसारचाचा : खरंय. तुझ्या आईला खूप अभिमान वाटेल मुलाच्या टॅक्सीतून फिरताना.
अजित : हो, चाचा. निघतो. उद्या भेटू. सलाम.
निसारचाचा : आम्ही वाट पाहू तुमची. भेटूच. सलाम.

## पाठ १९ हे माझं कुटुंब

### स्वाध्याय १९.१ खालील परिच्छेद ऐकू या आणि वाचू या.

चला, भेटू या बच्चन कुटुंबाला.
ही आहे छोटी आराध्या. तिच्या आजोबा-आजीची म्हणजेच अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांची ही सहा वर्षांची छोटीशी नात. अमिताभ आणि जया बच्चन यांना दोन मुलं. एक, आराध्याचे वडील, अभिषेक आणि दुसरी आराध्याची आत्या श्वेता. श्वेता म्हणजे अभिषेकची मोठी बहीण. अभिषेकची बायको आणि आराध्याची आई, ऐश्वर्या. श्वेता बच्चन यांचे पती निखिल नंदा. श्वेता आणि निखिल यांना नव्या आणि अगस्त्य अशी दोन मुलं आहेत. लाडक्या आराध्याप्रमाणेच नव्याही अमिताभ यांची लाडकी नात आहे आणि अगस्त्य लाडका नातू आहे. अनेकदा नव्या आणि अगस्त्य आपल्या मामा-मामीकडे आराध्याला भेटायला जातात.

## पाठ २० अशी बनते माझी रिक्षा / टॅक्सी

### स्वाध्याय २०.२ ऐकू या आणि वाचू या.

जयेश : अरे साहेब, आज गॅरेज मध्ये कसे काय आलात? काय झालं तुमच्या रिक्षेला?
अनवर : अरे काय सांगू... रिक्षा पूर्ण खराब झाली आहे.
जयेश : अच्छा. आधी तुमची रिक्षा बघू या आपण.
अनवर : बघ ना. रिक्षेचा आरसा तुटला आहे, हेडलाईट चालत नाहीये, क्लच अडकतोय.
जयेश : अरे बापरे, सिरीयस आहे हे साहेब!
अनवर : अरे, हे काहीच नाहीये. मेन म्हणजे किक चालत नाहीये. किती प्रॉब्लेम होतो रिक्षा चालू करताना.
जयेश : अरे देवा! हे बघा, सीट पण फाटली आहे तुमच्या रिक्षेची. भरपूर खर्च होणार आहे बरं का!
अनवर : अरे, होऊ दे खर्च. सुरक्षा महत्त्वाची. ते म्हणतात ना, 'सर सलामत तो पगडी पचास'!

## लेखी परीक्षा : १०० गुण

**१. अ. चित्रे पाहून जोड्या लावा.** **(५)**

| | |
|---|---|
|  | १. |
|  | २. |
|  | ३. |
|  | ४. |
|  | ५. |

| | |
|---|---|
| अ. | मी एक डॉक्टर आहे. |
| ब. | मी एक शिक्षक आहे. |
| क. | मी झोपलो आहे. |
| ड. | मी ट्रॅफिक पोलीस आहे. |
| ई. | माझी गाडी खराब झाली आहे. |

**१. ब. योग्य प्रश्नशब्द भरा.** योग्य प्रश्नशब्द भरें। (५)

(कोणता, काय, कधी, कोण, कुठे)

१. नमस्कार, तुमचं नाव ------------------------?

२. तुम्ही रोज ------------------------ जेवता?

३. हॅलो, मला सांगू शकाल का लालबाग ------------------------ आहे?

४. आपण ------------------------ आहात? – माझं नाव आदित्य आहे.

५. आज ------------------------ वार आहे? – आज शनिवार आहे.

**२. योग्य सर्वनामाखाली खूण करा.** (१०)

| | तो | आपण | त्या | ते | मी | ती | तुम्ही | तू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| येतात | | | | | | | | |
| खाते | | | | | | | | |
| झोपा | | | | | | | | |
| काम करतो | | | | | | | | |
| लिहितात | | | | | | | | |
| बोलतोस | | | | | | | | |
| रिक्षा चालवतात | | | | | | | | |
| तपासतो | | | | | | | | |
| शोधते | | | | | | | | |
| बघते | | | | | | | | |

**३. अ. सल्ला द्या. आज्ञार्थी रूपात वाक्ये लिहा.** (५)

१. माझं लायसन्स संपलंय. ------------------------------------------------ (नवीन लायसन्स काढणे)

२. पुढे स्पीडब्रेकर आहे. ------------------------------------------------ (गाडी हळू चालवणे)

३. मी वाहतुकीचा नियम मोडला. ------------------------------------------------ (दंड भरणे)

४. पुढे इस्पितळ आहे. ------------------------------------------------ (हॉर्न नाही वाजवणे)

५. रस्ता छोटा आहे. ------------------------------------------------ (ओव्हरटेक नाही करणे)

**३. ब. चूक की बरोबर. खूण करा.** (५)

बरोबर चूक

१.  सक्तीने उजवीकडे वळा.

२.  हॉर्न वाजवू नका.

३.  फक्त पुढे जा.



४.  थांबा.

५.  डावीकडे वळण्यास सक्त मनाई

**४. अ. रिकाम्या जागी अपूर्ण वर्तमानकाळातील योग्य रूपे लिहा.** (६)

१. सुनील, तू काय करत आहेस? – मी रिक्षा ------------------------. (चालवणे)
२. त्या दोघी सिनेमा ------------------------. (बघणे)
३. आम्ही वडापाव ------------------------. (खाणे)
४. तो टॅक्सीमध्ये ------------------------. (बसणे)
५. ती रिक्षाचे भाडे ------------------------. (देणे)
६. तुम्ही किती वेळापासून ------------------------. (जेवणे)

**४. ब. किती वाजले आहेत ते लिहा.** **(४)**

| | | | |
|---|---|---|---|
|  |  |  |  |
| १. -------------------- | २. -------------------- | ३. -------------------- | ४. -------------------- |

**५. अ. खालील उताऱ्यात रिकाम्या जागी 'होणे' क्रियापदाचे भूतकाळातील योग्य रूप लिहा.** (६)

संजीवचा दिवस गडबडीत सुरू (१) --------------------. सकाळी उशिरा उठल्यामुळे त्याची अंघोळ उशिरा (२) --------------------. त्यामुळे त्याचा नाश्ता नाही (३) ------------------------. रिक्षा चालवायला गेल्यावर दुपारी ३:३० ला त्याचे जेवण (४) ------------------------. नंतर मध्येच त्याची रिक्षा खराब (५) --------------------. गॅरेजमध्ये रिक्षा टाकल्यावर त्याचे बाकीचे काम (६) -------------------- आणि मग तो संध्याकाळी ७ वाजता घरी गेला.

**५. ब. योग्य ते सर्वनाम निवडा.** (४)

१. सुनीलकडे लायसन्स नाहीये. -------------------- परीक्षा द्यावी लागेल.
☐ तिला
☐ त्यांना
☐ त्याला

२. त्या दोन मुलींना काहीतरी हवंय. मी विचारून येतो -------------------- काय हवंय ते.
☐ त्यांना
☐ तुला
☐ आपल्याला

३. माझी आत्या जाड आहे. -------------------- खायला आवडते.
☐ तुम्हाला
☐ तिला
☐ त्याला

४. अरे प्रकाश, ------------------- अलिबागला कसं जातात हे माहितीये का रे?
- ☐ मला
- ☐ त्यांना
- ☐ तुला

### ६. अ. खाली शब्द अंकांत लिहा. (५)

१. सातशे अडुसष्ट - ----------------------

२. पाचशे दहा - --------------------------

३. नऊशे शहाण्णव - ---------------------

४. आठशे पस्तीस - ----------------------

५. तीनशे अठ्ठेचाळीस - -------------------





### ६. ब. क्रियापदाचे भूतकाळातील रूप लिहा. (५)

(नव्हते, नव्हतो, नव्हता, होते, होता)

सुशांत : काय रे, काल ६ वाजता रिक्षास्टँडवर तू होतास का?
निलेश : नाही. मी ---------------------
सुशांत : मग ललित आणि अनिल होते का?
निलेश : नाही ते ---------------------
सुशांत : मग कोण होतं?
निलेश : जयेश आणि विक्रांत --------------------- तिथे.
सुशांत : अच्छा. आणि कपिल काल आला --------------------- का?
निलेश : नाही तो काल आला -------------------- तो बाहेर गेला.

### ७. अ. जोड्या लावा. (५)

| | |
|---|---|
| अरे इथून कोळीवाडा जवळ आहे. | १. |
| मागे कोण हॉर्न वाजवतंय रे सारखं? | २. |
| गाडीच्या वर काहीतरी पडलंय. | ३. |
| धारावी अजून किती लांब आहे? | ४. |
| गाडी खराब झालीये? पुढे एक गॅरेज आहे. | ५. |

| | |
|---|---|
| क. |  |
| ख. |  |
| ग. |  |
| घ. |  |
| ङ. |  |

**७. ब. रिकाम्या जागा भरा.** (५)

१. अरे ---------- हेडलाईट कशी फुटली? (हा, ही, हे)

२. तुझ्या टॅक्सीच्या इथे एक मुलगा आलाय. बघ ---------- काय म्हणतोय ते. (तो, त्या, ते)

३. साहेब, हे घ्या ---------- नियम वाचा. (हे, त्या, ही)

४. अरे ---------- स्पीडब्रेकर बघ. ब्रेक दाब. (ते, तो, हे)

५. निलेश, तुला लायसंससाठी अर्ज हवाय ना? ---------- घे. (हा, ही, ती)

**८. अ. रिकाम्या जागी क्रियापदाचे भविष्यकाळातील योग्य रूप लिहा.** (६)

१. आज गॅरेज बंद आहे. मी रिक्षा गॅरेजमध्ये उद्या घेऊन ---------- (जाणे)

२. माझा भाऊ उद्या माझ्यासोबत ---------- (येणे)

३. नमिता गाडी चालवायला ---------- (शिकणे)

४. या बसा रिक्षेत. – तुम्ही जर टिळक चौकात नेणार असाल तरच आम्ही रिक्षेत ---------- (बसणे)

५. नकुल आणि समीर एकच टॅक्सी चालवतात. पण ते दोघेही आजारी आहेत म्हणून ते टॅक्सी ---------- (चालवणे - नकारार्थी)

६. साहेब, तुम्ही माझं एक काम ----------? (करणे)

**८. ब. योग्य रूपे लिहा.** (४)

(ला, ना, ला, ना)

१. भरत------ टॅक्सी चालवायला आवडते.

२. अरे त्या बाई------ जाऊ नको देऊस. त्या रोज माझ्याच रिक्षेत बसतात.

३. माझ्या मोबाईल------ काहीतरी झालं आहे. चालतच नाहीये.

४. माझ्या बाबां------ ड्रायव्हींग लायसन्स हवंय.

**९. अ. खालील परिच्छेद वाचून योग्य ती माहिती भरा.** (५)

दिनांक २३ जुलै २०१९ ला अमित रामचंद्र दुबे याला ड्रायव्हींग लायसन्स काढायचे आहे. त्यासाठी तो आर॰टी॰ओ॰ ऑफिसमध्ये जातो. तिथे त्याची माहिती तो देतो. तो अंधेरीचा आहे. तो ३०४, नक्षत्र अपार्टमेंट, टिळक नगर येथे राहतो. तो २४ वर्षांचा आहे. आणि आता त्याचा फॉर्म भरला जातो.

दि. ----------


नाव : ----------

वडिलांचे नाव : ----------

वय : ----------

पत्ता : ----------


**९. ब. खालील चित्रे पाहून योग्य विशेषणे लिहा.** (५)




१. हा माणूस ................................ आहे.
२. हा माणूस ................................ आहे.
३. या मुलीचे केस ........................ आहेत.
४. ही मुले ................................ आहेत.
५. हा माणूस ................................ आहे.

**१०. खालील चित्र आणि मजकूर वाचून रस्ता सांगा.** (१०)

सुमितला 6 इथून युनिव्हर्सिटीला जायचंय. तिथे कसं जायचं ते लिहा.




........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................
........................................................................................................................

## पाठ १ परिचय

१.३ अभिवादन : नमस्कार / नमस्ते / हॅलो / हाय
प्रश्न : तुमचं नाव काय?
उत्तर : माझं नाव... / मी...
प्रश्न : तुम्ही कुठले?
उत्तर : मी ---------- चा / ची.
प्रश्न : तुम्ही काय करता?
उत्तर : मी... आहे.
निरोप घेणे (अलविदा कहना) : अच्छा / टाटा / उद्या भेटू (कल मिलेंगे) / उद्या भेटू या (कल मिलेंगे)

१.७

| व्यक्ती १ | व्यक्ती २ |
|---|---|
| नाव : हरिप्रसाद यादव | नाव : निरंजन जाधव |
| कुठे राहतो? : दादर | कुठे राहतो? : अंधेरी |
| व्यवसाय : रिक्षाचालक | व्यवसाय : रिक्षाचालक |

१.११ १. तपकिरी २. केशरी ३. पिवळा ४. जांभळा ५. पांढरा

## पाठ २ ओळख करून घेऊ या

२.२ १. पुढचा २. मागचा ३. नंतर ४. आधी
२.३ १. ऑक्टोबर, ऑगस्ट २. मे
२.५ ०, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११
२.६ दहा, आठ, सहा
२.९ २. तुम्ही काय करता? ३. तुम्ही रिक्शा कधी चालवता?
४. मी सोमवार ते शुक्रवार रिक्शा चालवतो. ५. माझं नाव तुषार आहे.
२.१० ४- शुक्रवार ८- मंगळवार १७- गुरुवार १२- शनिवार ६- रविवार
२.११ १. रविवार २. बुधवार ३. गुरुवार ४. शुक्रवार ५. मंगळवार ६. शनिवार ७. सोमवार
२.१३ २. क् + ट = डॉक्टर ३. ग् + न = सिग्नल ४. स् + त = मस्तक
५. ट् + र = ट्रक ६. त् + त = उत्तम

## पाठ ३ मस्त चाललंय आमचं

३.३ १. तुम्ही २. आपण ३. मी
३.४ १. तो २. तुम्ही - मी ३. ती ४. तुम्ही ५. आम्ही ६. त्या ७. तू ८. ते

३.५

| सर्वनाम | क्रियापद |
|---|---|
| मी | आहे |
| ती | आहे |
| तुम्ही | आहात |

३.७ २. तू ड्रायव्हर नाहीस. ३. तुम्ही / आपण ड्रायव्हर नाही.
४. तो / ती / ते ड्रायव्हर नाही. ५. आम्ही / आपण ड्रायव्हर नाही.
६. ते / त्या / ती ड्रायव्हर नाहीत.

३.११ १. ग २. ग ३. ख ४. ग

३.१२ १. कुठले २. काय ३. कोणता ४. कोणती

३.१५ १. पाच २. एकोणीस ३. सतरा ४. छत्तीस

३.१७

| | |
|---|---|
| कोणता महिना? | डिसेंबर |
| कोणता वार? | शुक्रवार |
| किती वाजले? | ७:१५ (सव्वा सात) |

३.१९ १. दहा वाजले २. बारा वाजले ३. पाच वाजले ४. सात वाजले ५. आठ वाजले

३.२० ख. सव्वा दोन वाजले आहेत. / दोन वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत.
ग. पाच वाजून तीस मिनिटे झाली आहेत.
घ. पावणे अकरा वाजले आहेत. / अकरा वाजायला पंधरा मिनिटे बाकी आहेत.
छ. सव्वा दहा वाजले आहेत. / दहा वाजून पंधरा मिनिटे झाली आहेत.
ज. बारा वाजायला दहा मिनिटे बाकी आहेत.
झ. साडे आठ वाजले आहेत. / आठ वाजून तीस मिनिटे झाली आहेत.
ट. सहा वाजून अडतीस मिनिटे झाली आहेत.

## पाठ ४ चौकातून उजवीकडे वळा!

४.१ १. उत्तर : संजय गांधी उद्यान २. पश्चिम : जुहू ३. पूर्व : ऐरोली ४. दक्षिण : फोर्ट

४.२ क. बोरीवली : उत्तर ख. कुलाबा : दक्षिण

४.४

| | बोलणे<br>बोल(णे) | चालवणे<br>चालव(णे) | जाणे<br>जा(णे) | बदलणे<br>बदल(णे) |
|---|---|---|---|---|
| मी | बोलतो | चालवतो | जातो | बदलतो |
| मी | बोलते | चालवते | जाते | बदलते |
| आम्ही / आपण | बोलतो | चालवतो | जातो | बदलतो |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तू | बोलतोस | चालवतोस | जातोस | बदलतोस |
| तू | बोलतेस | चालवतेस | जातेस | बदलतेस |
| तुम्ही / आपण | बोलता | चालवता | जाता | बदलता |
| तो | बोलतो | चालवतो | जातो | बदलतो |
| ती | बोलते | चालवते | जाते | बदलते |
| ते | बोलते | चालवते | जाते | बदलते |
| ते / त्या / ती | बोलतात | चालवतात | जातात | बदलतात |

४.५ १. चालवतोस २. राहतो – राहता ३. जाते ४. करते ५. बोलता ६. खेळतो
७. करतोस – बदलतो

## पाठ ५ इथे नाही, तिथे!

५.२ १. नागपूर २. नागपूर ३. मुंबई ४. मुंबई

५.४

| | करणे | असणे | नसणे | येणे | बघणे |
|---|---|---|---|---|---|
| मी | करतो | असतो | नसतो | येतो | बघतो |
| मी | करते | असते | नसते | येते | बघते |
| आम्ही / आपण | करतो | असतो | नसतो | येतो | बघतो |
| तू | करतोस | असतोस | नसतोस | येतोस | बघतोस |
| तू | करतेस | असतेस | नसतेस | येतेस | बघतेस |
| तुम्ही / आपण | करता | असता | नसता | येता | बघता |
| तो | करतो | असतो | नसतो | येतो | बघते |
| ती | करते | असते | नसते | येते | बघतो |
| ते | करते / करतं | असते / असतं | नसते / नसतं | येते / येतं | बघते / बघतं |
| ते / त्या / ती | करतात | असतात | नसतात | येतात | बघतात |

५.५ १. असतोस २. नसतो ३. असतात ४. नसतो ५. नसतं

५.८ १. सरळ २. डावीकडे ३. केळकर रोड ४. डावीकडे ५. डावीकडे
६. सरळ ७. उजवीकडे ८. बाजूला ९. उजवीकडे

५.९ शिवाजी रोडहून सरळ जायचं आणि उजवीकडे वळायचं. उजवीकडे भाऊ दाजी लाड संग्रहालय आहे. डावीकडे रानडे रोड आहे. तिथे वळायचं नाही. पुढे जायचं. आता आला केळकर रोड. तिथेच बाजार आहे. उजवीकडे महानगरपालिका आहे. तिथून उजवीकडे वळल्यावर महात्मा गांधी रोड आहे. सरळ गेल्यावर उजवीकडे राणीची बाग आहे.

५.१० मध्ये - चेंडू कुठे आहे? - चेंडू दोघांच्यामध्ये आहे.
मागे - चेंडू कुठे आहे? - चेंडू मागे आहे.
जवळ - चेंडू कुठे आहे? - चेंडू जवळ आहे.
लांब - चेंडू कुठे आहे? - चेंडू लांब आहे.
समोर - चेंडू कुठे आहे? - चेंडू समोर आहे.
वर - चेंडू कुठे आहे? - चेंडू वर आहे.
खाली - चेंडू कुठे आहे? - चेंडू खाली आहे.

५.१२ २. हो सांगतो की. जवळच आहे तो चौक. ३. अच्छा. सांगा ना कसं जायचं तिथे. ४. इथून सरळ जा आणि डावीकडे वळा. तिथून २ मिनटे सरळ चाललं की आला शिवाजी चौक! ५. धन्यवाद तुम्ही मदत केल्याबद्दल. मी जातो आता.

५.१३ १. छ २. ड ३. अ ४. च ५. क ६. ज ७. ब

५.१४ २. मागे इमारत आहे. ३. पुढे सायकलवाला आहे. ४. जवळ ट्रक आहे. ५. जवळ दुकान आहे. ६. मागे जाहिरात आहे. ७. पुढे जिलेबीवाला आहे. ८. मागे फळवाला आहे. ९. मागे बस आहे. १०. मध्ये मोटारसायकल आहे.

## पाठ ६ हे माझं शहर

६.१ १. घ २. ग ३. च ४. छ ५. ख ६. क

६.४ १. घ २. क ३. च ४. झ ५. ज ६. ग ७. ख ८. छ

६.५ १. स्टॉक एक्सचेंज २. जुहू बीच ३. हॉस्पिटल / रुग्णालय ४. हॉटेल ताज ५. मरीन ड्राईव ६. गेटवे ऑफ इंडिया

## पाठ ७ माझा दिनक्रम

७.२ १. चूक २. चूक ३. बरोबर ४. चूक ५. बरोबर

७.३ क. ४ ख. ३ ग. १ घ. २

७.४ १. खाते २. पिते ३. वाचते

७.५

| क्रियापद | धातू | अपूर्ण वर्तमानकाळ |
|---|---|---|
| तू (खाणे) | खा | खात आहेस |
| तुम्ही / आपण (जाणे) | जा | जात आहोत |
| ती (येणे) | ये | येत आहे |
| ते (बोलणे) | बोल | बोलत आहेत |
| आम्ही / आपण (जेवणे) | जेव | जेवत आहोत |

## पाठ ८ चला, विचारू या

८.२ २. तुम्हाला कुठे जायचंय? ३. मला माहीत नाही.
४. आर.टी.ओ. ऑफिसला कसं जायचं सांगाल का? ५. या सिग्नलवरून डावीकडे वळा.

८.४ १. कुशल रस्ता ओलांडतोय. २. महेश गाडी चालवतोय आणि फोनवर बोलतेय.
३. ट्रॅफिक पोलीस पावती फाडतोय. ४. गीता आणि मोहीत भांडतायत.
५. गाड्या आपटतायत. ६. काका टॅक्सीमध्ये बसतायत.

८.५


| लिहिताना | बोलताना |
|---|---|
| २) मायकल रस्ता ओलांडत आहे. | २) मायकल रस्ता ओलांडतोय. |
| ३) किरण गाडी चालवत आहे आणि फोनवर बोलत आहे. | ३) किरण गाडी चालवतेय आणि फोनवर बोलतेय. |
| ४) समीर आणि रीटा रागाने भांडत आहेत. | ४) समीर आणि रीटा रागाने भांडतायत. |
| ५) रस्त्यावर खूप गाड्या धावत आहेत. | ५) रस्त्यावर खूप गाड्या धावतायत. |
| ६) ओमर टॅक्सीमध्ये बसत आहे. | ६) ओमर टॅक्सीमध्ये बसतोय. |
| ७) ट्रॅफिक पोलीस पावती फाडत आहे. | ७) ट्रॅफिक पोलीस पावती फाडतोय. |

८.६ चाललोय, जायचंय, जातायत, नाहीये.

८.८ २. डॉन बॉस्को शाळेला कसं जायचं ते कळत नाहीये. ३. त्या शाळेकडे इथून जायचंय.
४. रस्ता चांगला नाहीये. ५. तो टॅक्सी पुसत नाहीये.

## पाठ ९ प्रवासिदेवो भव।

९.२




९.४ १. चूक २. चूक ३. बरोबर ४. चूक ५. बरोबर

९.५ १. मला दाखला हवाय. २. मला रिक्षा हवीय. ३. मला कागदपत्रे हवीत.
४. मला कॉफी हवीय. ५. मला लिंबूसरबत हवंय.

९.६ १. हवंय २. हवंय ३. हवाय ४. हवीय - हवीय ५. हवेत ६. हवंय

९.८

| आहे ✓ | नाहीये x |
|---|---|
| पॅन कार्ड | मतदानाचं ओळखपत्र |
| आधार कार्ड | पासपोर्ट |
| जन्माचा दाखला | फोटो |

९.९ ४. मला वडापाव हवाय. ५. मला थालीपीठ हवंय. ६. मला कांदाभजी हवीत.
७. मला पाणीपुरी हवीय. ८. मला पोहे हवेत. ९. मला अंडी हवीत.

## पाठ १० एक दिवस आर॰टी॰ओ॰मध्ये

१०.१ १. क. २ ख. ३ ग. १
२. क. चूक ख. चूक ग. बरोबर
३. ख ४. क ५. ग ६. ख ७. क ८. ख ९. ख १०. ग

१०.२ क. लावावी ख. घ्यावी ग. घ्यावेत घ. घेता च. घ्यावे छ. ठेवावे

१०.४ क. १७ ख. ११ ग. १६ घ. १५ च. १८ छ. १३ ज. १२ झ. १४

१०.५ १. क २. इ ३. अ ४. ई ५. ड ६. ब

१०.७

अधिकार पत्र

मी श्री / ~~श्रीमती~~ रमेश कांतीलाल गुप्ता

राहणार रूम नं. ४, अष्टविनायक चाळ, शिवाजी नगर, कांदिवली (प.) दूरध्वनी क्र. ७६२५३४१६७८ परिवाहन कार्यालयातील माझ्या रिक्षाचालकाचा परवाना कामासाठी श्रीयुत / ~~श्रीमती~~ कश्यप दवे

राहणार बी-विंग ४०७ विकास अपार्टमेंट, बोरीवली पश्चिम दूरध्वनी क्र. ९९८७५५४४३२ यांची एजंट / प्रतिनिधी म्हणून नेमणूक करत आहे.

या नेमणुकीची संपूर्ण जबाबदारी माझी राहील, याची मला जाणीव आहे.

एजंट स्वाक्षरी स्वाक्षरी

दिनांक : ..................................

ठिकाण : ..................................

१०.८ १. बरोबर २. बरोबर ३. चूक ४. बरोबर ५. चूक ६. बरोबर

१०.९

| | |
|---|---|
| अर्जदाराचे नाव | मनमोहन गजानन शुक्ल |
| अर्जदाराच्या लायसन्सची वैधता | १९-०८-२०२१ |
| अर्जदाराने ऑनलाईन सादर केला/केला नाही | केला |
| अर्जदाराने सदर केलेली कागदपत्रे | P.Co.P.A. अर्जाची प्रत, परवाना शुल्काची पेमेंटची प्रत, वैध लायसन्स, बॅज, आधार कार्ड, SEC. प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, वारसाचे नामनिर्देशन पत्र, २ फोटो |
| अर्जदाराने सादर न केलेली कागदपत्रे | शैक्षणिक अर्हता, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र |
| या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींवर स्वतःची सही (स्वाक्षांकित) असणे आवश्यक आहे. | वैध लायसन्स, बॅज, आधार कार्ड |

## पाठ ११ किती झाले?

११.३ १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. चूक

११.५ मला, तुम्हाला, तिला, आम्हाला

११.६ क. त्याला ख. तिला ग. त्याला

११.७ क. तिला ख. त्याला ग. तुम्हाला घ. तुला

११.८ क . त्याला ख. तुम्हाला ग. मला घ. आम्हाला

११.१० क. आणि ख. आणि ग. पण

११.१२ हा ही हे या : हा चहा, हे घड्याळ, ही सीडी, हे टेबल, हे शर्ट, ही टूथपेस्ट, ह्या / या भाज्या, ही बॅग
तो ती ते त्या : ते दूध, ती कॉफी, ती फळे, त्या खुर्च्या, ते पुस्तक, तो कॉम्प्युटर

११.१३ १. तो २. ही ३. तो ४. ते - हे ५. ह्या ६. हे

## पाठ १२ पोलिस आपले मित्र

१२.४

| | | |
|---|---|---|
| आणणे | आण | आणा |
| काढणे | काढ | काढा |
| भरणे | भर | भरा |
| दाखवणे | दाखव | दाखवा |

| | | |
|---|---|---|
| निवडणे | निवड | निवडा |
| थांबणे | थांब | थांबा |
| उतरणे | उतर | उतरा |

१२.६

| क्रियापद | अनौपचारिक | औपचारिक |
|---|---|---|
| देणे | दे | द्या |
| घेणे | घे | घ्या |
| सांगणे | सांग | सांगा |
| भरणे | भर | भरा |
| दाखवणे | दाखव | दाखवा |

१२.८

| क्रियापद | विनंतीरूप | | |
|---|---|---|---|
| | तुम्ही | तू | |
| | | पुल्लिंगी | स्त्रीलिंगी |
| करणे | करता का? | करतोस का? | करतेस का? |
| देणे | देता का? | देतोस का? | देतेस का? |
| सांगणे | सांगता का? | सांगतोस का? | सांगतेस का? |
| होणे | होता का? | होतोस का? | होतेस का? |
| बोलणे | बोलता का? | बोलतोस का? | बोलतेस का? |
| बसणे | बसता का? | बसतोस का? | बसतेस का? |
| सोडणे | सोडता का? | सोडतोस का? | सोडतेस का? |
| जाणे | जाता का? | जातोस का? | जातेस का? |

१२.९ १. करता का? २. चला ३. देता का? - घे ४. बोल ५. पाठवा - जा

## पाठ १३ ओय् तेरी!

१३.२ १. लायसन्स काढ. २. दारू पिऊन गाडी चालवू नकोस.
३. वेगमर्यादेचे पालन कर. ४. गाडी बाजूला घे आणि बोल.

१३.३

| | तू | तुम्ही |
|---|---|---|
| न करणे | करू नकोस | करू नका |
| न घेणे | घेऊ नकोस | घेऊ नका |

| | | |
|---|---|---|
| न पाळणे | पाळू नकोस | पाळू नका |
| न लिहिणे | लिहू नकोस | लिहू नका |
| न येणे | येऊ नकोस | येऊ नका |
| न चालवणे | चालवू नकोस | चालवू नका |

१३.४ १. ज २. ग ३. क ४. घ ५. च ६. ख ७. छ

१३.५ १०५ – एकशे पाच, २. २२२ – दोनशे बावीस, ३. ५३३ – पाचशे तेहतीस,
५. १००१ – एक हजार एक, ६. ३४६ – तीनशे सेहेचाळीस, ७. ९९६ – नऊशे शहाण्णव

१३.६ १. एकशे दहा – ११०, २. तीनशे सतरा – ३१७, ३. सातशे सत्तर – ७७०,
४. आठशे अठ्ठ्याहत्तर – ८७८, ५. एक हजार नऊ – १००९, ६. नऊशे नव्याण्णव – ९९९

## पाठ १४ तुझं-माझं

१४.१ १. राधाचा ट्रक २. बबनची सायकल ३. राधाची टॅक्सी ४. राधाची शाळा
६. बबनचे / बबनचं घड्याळ ७. बबनची गाडी

१४.२

| | बरोबर | चूक | |
|---|---|---|---|
| १. प्रदीपचा शाळा डावीकडे आहे. | | ✗ | प्रदीपची शाळा डावीकडे आहे. |
| २. घनश्यामचा परवाना मिळत नाहीये. | ✓ | | |
| ३. भूषणचे (गाडीच्या) चाव्या हिरव्या रंगाच्या आहेत. | | ✗ | भूषणच्या गाडीच्या चाव्या हिरव्या रंगाच्या आहेत. |
| ४. रामचा मोबाईल टेबलच्या खाली आहे. | ✓ | | |

१४.५ १. क २. ख ३. ग ४. ख

१४.६ २. त्याचा ३. तुमची ४. माझी ५. तुझा ६. आपला ७. त्याचे / त्याचं ८. तिचे / तिचं

१४.७ १. त्याचं २. माझी ३. त्याचा ४. तुझी ५. तुझा

## पाठ १५ अति घाई, संकटात नेई

१५.३ लठ्ठ, ठेंगणा, हुशार, गोरा, सावळा, काळा, लांब

१५.६

| हळू | जलद |
|---|---|
| हातगाडी | वीज |

| | |
|---|---|
| बुलडोझर | विमान |
| स्कूटर | कार |

१५.८

| कसा / कशी / कसे | किती / कितीदा |
|---|---|
| भरभर | अनेकदा |
| पटकन | एकदा |
| | भरपूर |
| | तीनदा |

१५.९ १. लिंकिंग रोडवर सिग्नल तोडताना ट्रॅफिक पोलीस अनेकदा पकडतात.
२. घाटात गाडी हळू चालवायची.
३. अरे, एस० व्ही० रोडवर मेट्रोचे काम चालू आहे. रिक्षा सावकाश चालव!
४. 'एक्सप्रेस वे' म्हणजे गाडी जलद चालवण्याचा मार्ग.

## पाठ १६ काल काय झालं?

१६.२ १. चूक २. चूक ३. चूक ४. बरोबर ५. बरोबर

१६.३ १. सव्वा आठ २. साडे तीन ३. पावणे नऊ ४. अकरा ५. पावणे दहा

१६.४ १. होते २. होतोस ३. होतो ४. होते

१६.५ अ. झाला ब. झालं / झाले क. झाली ड. झाला इ. झाली ई. झालं / झाले

१६.६ १. सुधीर परीक्षेत पास झाला.
२. अंकिता ड्रायव्हर झाली.
३. गाडी चालवण्याची परीक्षा मैदानात झाली.
४. सीट बेल्ट लावल्यामुळे आपले संरक्षण झाले / झालं.
५. पावसामुळे गाड्या खराब झाल्या.

१६.८ १. झाली २. होते ३. झाली ४. झालात

१६.१० १. होत नाही २. होत नाहीस ३. होत नाही ४. होत नाहीत ५. होत नाही

१६.११

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी होत नाही | आम्ही / आपण होत नाही |
| तू होत नाहीस | तुम्ही / आपण होत नाहीत |
| तुम्ही / आपण होत नाहीत | |
| तो / ती / ते होत नाही | ते / त्या / ती / होत नाहीत |

## पाठ १७ वेग कमी, जीवनाची हमी

१७.२ होतास, होतो, होतास, होतो, होती, होता, होती, होता

१७.३ १. मी कल्याणला होतो. २. माझं तुझ्याकडे एक काम होते / होतं.
३. हॅलो प्रताप, अरे कुठे होतास तू? ४. माझे मित्र कसे होते रे? मस्त होते ना?
५. माझ्याकडे ड्रायव्हिंग लायसन्स होते.

१७.४ १. असते - होतो २. असतो - होते ३. असतात - आहेत ५. असते - असते

१७.७ १. होता २. नव्हतं ३. झाला होता ४. नव्हते. ५. होते

१७.८ १. नव्हतो २. नव्हतास ३. नव्हतो ४. नव्हत्या

१७.९ १. ब २. क ३. क ४. अ

## पाठ १८ नवी टॅक्सी, नवा प्रवास

१८.३

| | राहणे | खाणे | जाणे | येणे | बदलणे | असणे | लिहिणे | वाचणे | करणे | काढणे | असणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | राहणार | खाणार | जाणार | येणार | बदलणार | असणार | लिहिणार | वाचणार | करणार | काढणार | आहे |
| तू | राहणार | खाणार | जाणार | येणार | बदलणार | असणार | लिहिणार | वाचणार | करणार | काढणार | आहेस |
| तो / ती / ते | राहणार | खाणार | जाणार | येणार | बदलणार | असणार | लिहिणार | वाचणार | करणार | काढणार | आहे |
| आम्ही /आपण | राहणार | खाणार | जाणार | येणार | बदलणार | असणार | लिहिणार | वाचणार | करणार | काढणार | आहोत |
| तुम्ही / आपण | राहणार | खाणार | जाणार | येणार | बदलणार | असणार | लिहिणार | वाचणार | करणार | काढणार | आहात |
| ते / त्या / ती | राहणार | खाणार | जाणार | येणार | बदलणार | असणार | लिहिणार | वाचणार | करणार | काढणार | आहेत |

१८.४ १. घेणार २. करणार ३. भरणार ४. जाणार ५. पुसणार ६. येणार

१८.५ १. देणार आहे २. काढणार आहे ३. चालवणार आहे ४. धावणार आहे

१८.७ येणे, करणे, फिरवणे, होणे, वाटणे

१८.८

| | धावणे | असणे | वाचणे | चालणे | काढणे |
|---|---|---|---|---|---|
| मी | धावेन | असेन | वाचेन | चालेन | काढेन |
| तू | धावशील | असशील | वाचशील | चालशील | काढशील |
| तो / ती / ते | धावेल | असेल | वाचेल | चालेल | काढेल |
| आम्ही / आपण | धावू | असू | वाचू | चालू | काढू |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुम्ही / आपण | धावाल | असाल | वाचाल | चालाल | काढाल |
| ते / त्या / ती | धावतील | असतील | वाचतील | चालतील | काढतील |

१८.९

| | पिणे | जाणे | देणे | घेणे | येणे | होणे |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | पिईन | जाईन | देईन | घेईन | येईन | होईन |
| आम्ही/ आपण | पिऊ | जाऊ | देऊ | घेऊ | येऊ | होऊ |
| तू | पिशील | जाशील | देशील | घेशील | येशील | होशील |
| तुम्ही/ आपण | प्याल | जाल | द्याल | घ्याल | याल | व्हाल |
| तो/ ती/ ते | पिईल | जाईल | देईल | घेईल | येईल | होईल |

१८.१० १. खाशील २. होशील ३. जाऊ ४. देईल ५. लिहू

## पाठ १९ हे माझं कुटुंब

१९.२ १. आत्या २. आजोबा ३. मामा ४. आजी ५. आई ६. मामी

१९.४

| | ला | ना | | ला | ना |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | **आजी** | **आजीला** | **आजींना** |
| बाळ | बाळाला | बाळांना | ब्रेक | ब्रेकला | ब्रेकना |
| मोबाईल | मोबाईलला | - | रिक्षा | रिक्षाला | रिक्षांना |
| गाडी | गाडीला | गाड्यांना | मित्र | मित्राला | मित्रांना |
| बाबा | बाबाला | बाबांना | सिग्नल | सिग्नलला | - |
| मल्लिका | मल्लिकाला | - | पुस्तक | पुस्तकाला | पुस्तकांना |
| चाक | चाकाला | चाकांना | बिल्डींग | बिल्डींगला | बिल्डींग्सना |
| बिल्ला | बिल्ल्याला | बिल्ल्यांना | टाकी | टाकीला | टाक्यांना |
| अजित | अजितला | - | नकुल | नकुलला | - |
| आजोबा | आजोबाला | आजोबांना | चावी | चावीला | चाव्यांना |

१९.५ १. ब ३. ब ४. अ ५. अ ६. ब

## पाठ २० अशी बनते माझी रिक्षा / टॅक्सी

२०.१

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| हँडल | खिडकी |
| टायर | छत |
| हबकॅप | चाक |
| हेडलाईट | आरसा |
| फॉग लाईट | दरवाजा |
| नंबर प्लेट | टाकी |
| रेडीएटर | दिवा |
| विंडस्क्रीन | - |

२०.३

| पार्ट्स | खराब आहे | खराब नाहीये |
|---|---|---|
| १. विंडस्क्रीन | | √ |
| २. आरसा | √ | |
| ३. रिम | | √ |
| ४. किक | √ | |
| ५. क्लच | √ | |
| ६. व्हायपर | | √ |
| ७. हेडलाईट | √ | |
| ८. चाक | | √ |

## पाठ २१ वाक्प्रचारांची यादी

१. १. कुठे २. माहीत ३. सुट्टे ४. बोहनीची ५. डावीकडे

२. १. X २. √ ३. √ ४. √ ५. X

३. १. केलं? २. नाही. ३. भरतो. ४. करा. ५. आहे.

४. १. काय २. सोबत ३. प्या ४. नातेवाईकांचा ५. तुम्हाला

५. १. कोणीतरी रिक्षात पिशवी विसरले. २. नाहीतर ही वस्तू पोलिसात जमा करतो. ३. त्या कुठे राहत असतील. ४. ही पिशवी तुमची आहे का?

६. १. बरोबर २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. चूक

७. १. चौकशी २. व्याज ३. परप्रांतीय ४. जामीन ५. सवलत

८. १. √ २. X ३. X ४. √ ५. √

९. १. काय झालंय बघ जरा. २. एकदाच काय तो बंदोबस्त कर. ३. मी नेहमी तुझ्याकडेच येतो. ४. हॉर्न नीट वाजत नाही आहे.

१०. १. ग. २. क. ३. ख.

## पाठ २२ व्हिडियो

**व्हिडियो १**

१. १. अ २. अ ३. क ४. ब

२. अ चूक ब चूक

**व्हिडियो २**

१. १. अ २. ब ३. क ४. अ

२. १. चूक २. चूक ३. बरोबर ४. बरोबर

**व्हिडियो ३**

१. १. ब २. क ३. क ४. अ

२. १. चूक २. बरोबर ३. चूक ४. बरोबर

**व्हिडियो ४**

१. १. क २. ब ३. अ ४. क

२. १. चूक २. बरोबर ३. बरोबर

## पाठ २४ परीक्षा

**१. अ** १. ई २. अ ३. ड ४. क ५. ब

**१. ब** १. काय २. कधी ३. कुठे ४. कोण ५. कोणता

**२.**

| | तो | आपण | त्या | ते | मी | ती | तुम्ही | तू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| येतात | | | √ | √ | | | | |
| खाते | | | | | √ | √ | | |
| झोपा | | √ | | | | | √ | |
| काम करतो | √ | | | | √ | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लिहितात | | | √ | √ | | | | |
| बोलतोस | | | | | | | | √ |
| रिक्षा चालवतात | | | √ | √ | | | | |
| तपासतो | √ | | | | √ | | | |
| शोधते | | | | | √ | √ | | |
| बघते | | | | | √ | √ | | |

**३. अ** १. नवीन लायसन्स काढ. २. गाडी हळू चालव. ३. दंड भर.
४. हॉर्न वाजवू नकोस. ५. ओव्हरटेक करू नकोस.

**३. ब** १. चूक २. चूक ३. बरोबर ४. बरोबर ५. बरोबर

**४. अ** १. चालवत आहे २. बघत आहेत ३. खात आहोत
४. बसत आहे ५. देत आहे ६. जेवत आहात

**४. ब** १. पाच २. पावणे सात ३. दीड ४. एक वाजून पन्नास मिनिटे

**५. अ** १. झाला २. झाली ३. झाला ४. झाले ५. झाली ६. झाले

**५. ब** १. त्याला २. त्यांना ३. तिला ४. तुला

**६. अ** १. ७६८ २. ५१० ३. ९९६ ४. ८३५ ५. ३४८

**६. ब** नव्हतो नव्हते होते होता नव्हता

**७. अ** १. क २. ग ३. ङ ४. ख ५. घ

**७. ब** १. ही २. तो ३. हे ४. तो ५. हा

**८. अ** १. जाईन २. येईल ३. शिकेल ४. बसणार ५. चालवणार नाहीत ६. कराल

**८. ब** १. ला २. ना ३. ला ४. ना

**९. अ** दि. २३ जुलै २०१९
नाव : अमित रामचंद्र दुबे
वडिलांचे नाव : रामचंद्र दुबे
वय : २४ वर्षे
पत्ता : ३०४, नक्षत्र अपार्टमेंट, टिळक नगर, अंधेरी

**९. ब** १. जाड २. उंच ३. लांब ४. ठेंगणी ५. बारीक

**१०.** इथून सरळ जायचं आणि पुढे उजवीकडे वळायचं. आता आला अहिल्याबाई चौक. तिथे उजवीकडे शाळा आहे. उजवीकडे वळल्यावर सरळ चालायचं. समोरच गांधारी रोड आहे. तिथून सरळ चालायचं. उजवीकडे कोर्ट आहे. पुढे सरळ चालल्यावर डावीकडे वळायचं. आता आला अन्सारी रोड. थोडसं पुढे चाललं की डावीकडे युनिव्हर्सिटी आहे.

## शब्दसंग्रह

| | |
|---|---|
| अंक | तो अंक, ते – |
| अंडा | ते अंडे / अंडं, ती अंडी |
| अक्षर | ते अक्षर, ती अक्षरे / अक्षरं |
| अध्यक्ष | तो अध्यक्ष, ते अध्यक्ष |
| अनिवार्य | ती सक्ती |
| अभिवादन | ते अभिवादन, ती अभिवादने / अभिवादनं |
| अलविदा | तो निरोप, ते – |
| अस्पताल | ते रुग्णालय, ती रुग्णालये / रुग्णालयं |
| आईना | तो आरसा, ते आरसे |
| आदर | तो आदर |
| आम | तो आंबा, ते आंबे |
| आश्वासन | ती हमी |
| इडली | ती इडली, त्या इडल्या |
| इमारत | ती इमारत, त्या इमारती |
| उद्यान | ती बाग, त्या बागा |
| उपचार | तो उपचार, ते – |
| उम्र | ते वय, ती वये / वयं |
| एहसास | ती जाणीव, त्या जाणिवा |
| ऑटो रिक्शा | ती रिक्षा, त्या – |
| कटलेट | ते कटलेट, ती कटलेटे / कटलेटं |
| कतार | ती रांग, त्या रांगा |
| कलम | तो कलम, ती कलमे / कलमं |
| कांच | ती काच, त्या काचा |

| | |
|---|---|
| कागज़ात | ती कागदपत्रे / कागदपत्रं (फक्त अनेकवचन) |
| कानून / कायदा | तो कायदा, ते कायदे |
| कापी / प्रतिलिपि | ती प्रत, त्या प्रती |
| काम | ते काम, ती कामे / कामं |
| कारोबार | तो व्यवसाय, ते – |
| किराया / यात्री | ते भाडे / भाडं, ती भाडी |
| कुंजी | ती चावी, त्या चाव्या |
| कुर्सी | ती खुर्ची, त्या खुर्च्या |
| केला | ते केळे / केळं, ती केळी |
| कैलंडर | ते कॅलेंडर, ती कॅलेंडरे / कॅलेंडरं |
| कॉफ़ी | ती कॉफी |
| ख़त | ते पत्र, ती पत्रे / पत्रं |
| खराबी | तो बिघाड, ते – |
| खाना | ते जेवण, ती जेवणे / जेवणं |
| गधा | ते गाढव, ती गाढवे / गाढवं |
| गर्मी का मौसम | तो उन्हाळा, ते उन्हाळे |
| गलती | ती गफलत, त्या गफलती |
| गली | ती गल्ली, त्या गल्ल्या |
| गवाह | तो साक्षीदार |
| गाड़ी | ती गाडी, त्या गाड्या |
| गाना | ते गाणे / गाणं, ती गाणी |
| गुस्सा | तो राग |
| ग्राहक | ते गिऱ्हाईक, ती गिऱ्हाइके / गिऱ्हाइकं |
| घड़ी | ते घड्याळ, ती घड्याळे / घड्याळं |

| | |
|---|---|
| घर | ते घर, ती घरे / घरं |
| घाट | तो घाट, ते – |
| घोंघा | ती गोगलगाय, त्या गोगलगायी |
| घोड़ा | तो घोडा, ते घोडे |
| चप्पल | ती चप्पल, त्या चपला |
| चरित्र | ते चारित्र्य, ती चारित्र्ये / चारित्र्यं |
| चाबी | ती चावी, त्या चाव्या |
| चाय | तो चहा |
| चालक | तो चालक, ते – |
| चालान | ती पावती, त्या पावत्या |
| चिंता | ती काळजी, त्या काळज्या |
| चौक | तो चौक, ते – |
| छत | तो पत्रा, ते पत्रे |
| छात्रा | ती विद्यार्थिनी, त्या – |
| छुट्टी | ती सुट्टी, त्या सुट्ट्या |
| जगह | ती जागा, त्या – |
| जन्मदिन | तो वाढदिवस, ते – |
| जवाब | ते उत्तर, ती उत्तरे / उत्तरं |
| जाँच | ती पडताळणी |
| जानकारी | ती माहिती |
| जाम | ती कोंडी |
| जीवन | ते जीवन, ती जीवने / जीवनं |
| टंकी | ती टाकी, त्या टाक्या |
| टक्कर | ती धडक, त्या धडका |

| | |
|---|---|
| टायर | तो टायर, ते – |
| टूथपेस्ट | ती टूथपेस्ट, त्या टूथपेस्टी |
| टेम्पो | तो टेम्पो, ते – |
| ट्रक | तो ट्रक, ते – |
| ट्रेन | ती ट्रेन, त्या – |
| ठेला | ती हातगाडी, त्या हातगाड्या |
| डर | ती भीती |
| डाकघर | ते टपालघर, ती टपालघरे / टपालघरं |
| डाक्टर | तो डॉक्टर, ते – |
| तंबाकू | ती तंबाखू |
| तबीयत | ती तब्येत, त्या तब्येती |
| तारीख | ती तारीख, त्या तारखा |
| तेल | ते तेल, ती तेले / तेलं |
| थालीपीठ (मिक्स दाल का चीला) | ते थालीपीठ, ती थालीपीठे / थालीपीठं |
| दरवाजा | तो दरवाजा, ते दरवाजे |
| दस्तख़त | ती सही, त्या सह्या |
| दिन | तो वार, ते – |
| दिन | तो दिवस, ते – |
| दिनदर्शिका | ती दिनदर्शिका, त्या – |
| दिशा | ती दिशा, त्या – |
| दुकान | ते दुकान, ती दुकाने / दुकानं |
| दुर्घटना | तो अपघात, ते – |
| दोपहर | ती दुपार / ती मध्यान्ह, त्या मध्यान्ही |
| धूम्रपान | ते धूम्रपान |

| | |
|---|---|
| ध्यान | ते लक्ष |
| नगर निगम | ती महानगरपालिका, त्या – |
| नाना / दादा | तो / ते आजोबा, ते – |
| नानी / दादी | ती आजी, त्या आज्या |
| नाम | ते नाव, ती नावे / नावं |
| नाश्ता | तो नाश्ता, ते नाश्ते |
| नियम | तो नियम, ते – |
| नियुक्ति | ती नेमणूक, त्या नेमणुका |
| निरीक्षक | तो निरीक्षक, ते – |
| निरीक्षण | ती तपासणी, त्या तपासण्या |
| निशान | ती खूण, त्या खुणा |
| पड़ोसी | ती शेजारीण, त्या शेजारणी |
| पता | तो पत्ता, ते पत्ते |
| पत्ता | ते पान, ती पाने / पानं |
| पत्नी | ती बायको, त्या बायका |
| पदार्थ | तो पदार्थ, ते – |
| परवाना | तो परवाना, ते परवाने / ते लायसन्स |
| परिवहन | ती वाहतूक |
| परिवार | ते कुटुंब, ती कुटुंबे / कुटुंबं |
| परीक्षा | ती परीक्षा, त्या – |
| पहचान | ती ओळख, त्या ओळखी |
| पहचान पत्र | ते ओळखपत्र, ती ओळखपत्रे / ओळखपत्रं |
| पहिया | ते चाक, ती चाके |
| पाठशाला | ती शाळा, त्या – |

| | |
|---|---|
| पानी पूरी | ती पाणीपुरी |
| पालन | ते पालन |
| पिता | तो बाबा / ते बाबा (आदरार्थी) |
| पिन | ती पिन, त्या पिना |
| पुलिस | तो पोलीस, ते – |
| पेट | ते पोट, ती पोटे / पोटं |
| पेन | ते पेन, ती पेने / पेनं |
| पैसा | तो पैसा, ते पैसे |
| पोता | तो नातू, ते – |
| पोती | ती नात, त्या नाती |
| पोशाक | तो पोशाख, ते – |
| पोहा | तो पोहा, ते पोहे |
| प्याज के पकौड़े | ते कांदाभजे / कांदाभजं, ती कांदाभजी |
| प्रतिनिधि | तो प्रतिनिधी, ते – |
| प्रमाण-पत्र | तो दाखला, ते दाखले |
| प्राथमिक उपचार | तो प्रथमोपचार, ते – |
| प्रावधान | ती तरतूद, त्या तरतुदी |
| फल | ते फळ, ती फळे / फळं |
| बस | ती बस, त्या बसेस |
| बसस्टॉप | तो बसस्टॉप, ते – |
| बहन | ती बहीण, त्या बहिणी |
| बाजार | तो बाजार, ते – |
| बारिश का मौसम | तो पावसाळा, ते पावसाळे |
| बाल | तो केस, ते – |

| | |
|---|---|
| बिजली | ती वीज, त्या विजा |
| बिल्डर | तो बिल्डर, ते – |
| बीड़ी | ती विडी, त्या विड्या |
| बीमार | तो रोगी, ते – |
| बुआ | ती आत्या, त्या – |
| बैंक | ती बँक, त्या बँका |
| बैल | तो बैल, ते – |
| भगवान | तो देव, ते – |
| भरोसा | तो विश्वास |
| भविष्यकाल | तो भविष्यकाळ |
| भाई | तो भाऊ, ते – |
| भाग-दौड़ | ती पळापळ |
| भीड़ | ती गर्दी |
| भूख | ती भूक |
| भूतकाल | तो भूतकाळ |
| मंत्रालय | ते मंत्रालय, ती मंत्रालये / मंत्रालयं |
| मंदिर | ते मंदिर, ती मंदिरे / मंदिरं |
| मतलब / अर्थ | तो अर्थ, ते – |
| मदद | ती मदत |
| मद्यपान | ते मद्यपान |
| मना | ती मनाई |
| मर्यादा | ती मर्यादा, त्या – |
| महिला | ती स्त्री, त्या स्त्रिया |
| माँ | ती आई |

| | |
|---|---|
| मामा | तो / ते मामा, ते – |
| मामी | ती मामी |
| मार्ग | तो मार्ग, ते – |
| मुद्दा | तो मुद्दा, ते मुद्दे |
| मूर्ति | तो पुतळा, ते पुतळे |
| मेज | तो टेबल, ती टेबले / टेबलं |
| मैदान | ते मैदान, ती मैदाने / मैदानं |
| मोबाईल | तो भ्रमणध्वनी, ते – |
| रंग | तो रंग, ते – |
| रात | ती रात्र, त्या रात्री |
| रस्ता | तो रस्ता, ते रस्ते |
| राह | ती वाट, त्या वाटा |
| रिफिल | ती रिफिल, त्या रिफिली / रिफिल्स |
| रिश्ता | ते नाते, ती नाती |
| लाईट | ती लाईट, त्या लाईटी |
| लिपिक | तो लिपिक, ते – |
| लोकल | ती लोकल, त्या – |
| वजह | ते कारण, ती कारणे / कारणं |
| वडापाव | तो वडापाव, ते – |
| वर्तमानकाल | तो वर्तमानकाळ |
| वर्दी | तो गणवेश, ते – |
| वाचनालय | ते वाचनालय, ती वाचनालये / वाचनालयं |
| वायर | ती वायर, त्या वायरी |
| वारिस | तो वारसदार, ते – |

| | |
|---|---|
| वाहन | ते वाहन, ती वाहने / वाहनं |
| विचार | तो विचार, ते – |
| विज्ञापन | ती जाहिरात, त्या जाहिराती |
| विद्यापीठ | ते विद्यापीठ, ती विद्यापीठे / विद्यापीठं |
| विभाग | तो विभाग, ते – |
| वेटर | तो / ते वेटर, ते – |
| वैधता | ती वैधता |
| व्यक्ति | ती व्यक्ती, त्या – |
| शराब | ती दारू |
| शर्ट | तो शर्ट, ते – |
| शर्म | ती लाज, त्या लाजा |
| शांति | ती शांतता |
| शाम | ती संध्याकाळ, त्या संध्याकाळी |
| शिक्षक | तो शिक्षक, ते – |
| संगठन | ती संघटना, त्या – |
| संग्रहालय | ते संग्रहालय, ती संग्रहालये / संग्रहालयं |
| संदेह | ती शंका, त्या – |
| संयुक्ताक्षर | ते जोडाक्षर, ती जोडाक्षरे / जोडाक्षरं |
| संरक्षण | ते संरक्षण |
| संवाद / वार्तालाप | तो संवाद, ते – |
| सप्ताह | तो आठवडा, ते आठवडे |
| सब्ज़ी | ती भाजी, त्या भाज्या |
| समय | ती वेळ, त्या वेळा |
| समोसा | तो सामोसा, ते सामोसे |

| | |
|---|---|
| सर्दी का मौसम | तो हिवाळा, ते हिवाळे |
| साहस | ती हिंमत, त्या हिंमती |
| सिफारिश | ती शिफारस, त्या शिफारशी |
| सीना | ती छाती, त्या छात्या |
| सुबह | ती सकाळ, त्या सकाळी |
| सूचना | ती सूचना, त्या – |
| सेब | ते सफरचंद, ती सफरचंदे / सफरचंदं |
| सेहत | ती तब्येत, त्या तब्येती |
| स्टेशन | ते स्टेशन, ती स्टेशने / स्टेशनं / स्टेशन्स |
| स्थानक | ते स्थानक, ती स्थानके / स्थानकं |
| स्नान | ती अंघोळ, त्या अंघोळी |
| हवाईअड्डा | तो विमानतळ, ती विमानतळे / विमानतळं |
| हवाईजहाज | ते विमान, ती विमाने / विमानं |
| हस्ताक्षर | ती स्वाक्षरी, त्या स्वाक्षऱ्या |
| हानि | ते नुकसान |
| हॉर्न | तो हॉर्न |

# COMMUNICATIVE MARATHI FOR AUTO RICKSHAW AND TAXI DRIVERS

- Marathi text cum workbook for non-native autorickshaw and taxi drivers
- Special focus on vocabulary related to their profession
- For adult learners
- An integrated communicative approach
- Translation in Hindi
- Language skills: Listening, understanding, speaking, reading, writing Marathi

**The Set contains:** 1) A textbook with exercises 2) Link for audio and video learning material

ऑटोरिक्शा और टैक्सीचालकों के लिए मराठी

- अन्यभाषक ऑटोरिक्शा और टैक्सी ड्राइवरों के लिए मराठी पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तक
- पेशे से संबंधित शब्दावली
- वयस्क लक्ष्य समूह
- एकीकृत संवादात्मक पद्धति
- हिंदी में अनुवाद
- भाषा कौशल: मराठी सुनना, समझना, बोलना, पढ़ना, लिखना

सेट: पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तक ऑडियो और वीडियो सामग्री के लिए लिंक

9 789353 826055

University of Mumbai

Price Rs. 500

Visit: www.rmvs.maharashtra.gov.in
www.learn-marathi.com
www.mu.ac.in